Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Scanned by CamScanner

Dec-2018 ISSUE-IV, VOLUME-VII

Published Quarterly issue
With ISSN 2394-8426 International Impact Factor 4.374
Peer Reviewed Journal

Published On Date 02.01.2019

Issue Online Available At : http://gurukuljournal.com/

Organized &
Published By

Chief Editor,
Gurukul International Multidisciplinary Research Journal
Mo.+91-9373759904 Email: chiefeditor@gurukuljournal.com
Website: http://gurukuljournal.com/

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Scanned by CamScanner

ukul International Multidisciplinary
earch Journal (GIMRJ)*with*
ernational Impact Factor 4.374
er Reviewed Journal

ISSN No. 2394-8426
Dec-2018
Issue–IV, Volume–VII

INDEX

aper No.	Title	Author	Page No.
001	Colonial Legacy and Education in Bangladesh	Dr. Meinhaj Hossain	1-5
002	Building Language Learning Environment: A Naturalistic Approach	VANDANA & SANJAY KUMAR	6-16
003	Corporate Social Responsibility Policies And Practices	Dr P N Ladhe	17-22
004	Condition Of Women's Education In Uttar Pradesh	Tabassum Usmani	23-29
005	Swaraj- Concept And Relevance	Dr. Rajesh Agarwal	30-35
006	Maharashtra State Commission for Women and the issues of Dalit women in Bhandara District	Deepali Bhowate	36-44
007	Effective Grievance Handling Procedure in Industry	DR. Kalpana Jamgade	45-48
008	Marginalization of Women in Anita Desai's *In Custody*	Ashok Jagannath Jadhav	49-52
009	Research Paper- Geography Remote Sensing and GIS	Prof. Kailas V. Nikhade	53-53
010	GOALS OF ESL – IN TEACHING PRONUNCIATION	Dr. Humera Qureishi	54-58
011	Parliamentary system - Withering away from people's will	Dr. Pravin S. Bhagdikar	59-62
012	Worker's Participation in Management (WPM) at Orissa Sugar Corporation, Ganjam District, Orissa	DR. Vijaykumar Tupe	63-66
051	रेशीम उद्योगासाठीच्या शासनाच्या योजनांचा शेतकऱ्यांना झालेल्या लाभाचा अभ्यास	भाऊसाहेब पोपटराव दरेकर & प्राचार्य डॉ.शशांक कृष्णराव पोळ	201-206
052	तंजावरकडील भोसले राजवंशाची राहित्यासेवा व मराठी अभिजात परंपरेतील योगदान	डॉ.संजय रामदास पाखमोडे	207-211
053	सामाजिक, सांस्कृतिक विकास : भारतीय संविधान	डॉ.शिरीन अघोर	212-215
054	स्त्री सक्षमीकरणाची उपेक्षा : वास्तविक परिस्थिती	डॉ. सौ. मंजुषा राजेंद्र ठाकरे	216-220
055	पंडिती काव्याची काव्याची वैशिष्ट्ये	प्रा. डॉ. सौ. वीरा पावन मांडवकर	221-225
056	आदर्श गरम मेंढा-लेखा	कु.रचना एल.धडाडे	226-228
057	चंद्रपूर जिल्हयातील शालेय पोषण आहार योजना राबवितांना शालेय व्यवस्थापनात येणाऱ्या समस्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास	प्रकाश रामदास महाकाळकर	229-232
058	भारतीय कमोडिटी वायदा बाजार : एक विश्लेषण	सारंग विनायक घारपुरे & संदिपान माणिकराव कोल्हापूरे	233-245
059	संयुक्त राष्ट्र व भारतीय परराष्ट्र धोरण	डॉ.सचिन एस. वेरुळकर	246-252

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Vidyalaya, Ballarpur

Scanned by CamScanner

	निर्धारणा वरील प्रभाव		
060	आदिवासींचे हक्क, कायदे आणि माहितीचा अभाव	प्रा.शालिनी पु.तोरे	253-254
061	स्वयंसाहाय्यता बचत गट आणि महिला सक्षमीकरण	प्रा डॉ.व्ही.जी.चव्हाण	255-259
062	महात्मा गांधीजींचे सत्याग्रह विचार	प्रा.डॉ.व्यंकटी वाल्मिक नागरगोजे	260-264
063	डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय संविधानाच्या परिप्रेक्ष्यातून : संरक्षण विषयक विचार	प्रा. डॉ.कुचेकर एच.एस.	265-270
064	वर्तमान जीवनात वृद्धापुढील आव्हाने व उपाय	प्रा. शुभांगी रमेश भेंडे	271-278

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Scanned by CamScanner

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 4.374 Peer Reviewed Journal

ISSN No. 2394-8426
Dec-2018
Issue-IV, Volume-VII

वर्तमान जीवनात वृद्धापुढील आव्हाने व उपाय

प्रा. शुभांगी रमेश भेंडे
मा. ज्यो. फुले महा. , बल्लारपूर
मो. नं. ७७६७९८७६३३

आजच्या आधुनिक युगात वृद्धाची समस्या हा एक चिंतेचा विषय ठरला आहे. मात्र भारतामध्ये पूर्वी हि समस्या नव्हती निदान भारतात तरी 'वृद्ध' व्यक्ती हि समस्येच्या दृष्टिकोनातून कधी पहिल्याच जात नाही तर भारतात पूर्वीपासूनच पूर्वजांबद्दल आदर असायचा वृद्धाबद्दल प्रत्येकाच्या मनात पुण्यबुद्धि दिसून येत होती . घरातही वृद्धाना मान सन्मान असायचा सण समारंभ असल्यास त्यांना प्रथम नमस्कार करून त्यांचा आशीर्वाद घेतल्या जात असे. अश्या पद्धतीने त्यांच्या आशीर्वादाने शुभकार्याची सुरवात होत होती. त्यांच्या गोष्टींना मान असायचा कारण वृद्धापण म्हणजेच ज्ञानपूजा होय. त्यांचे हे ज्ञान त्यांचे अनुभव असायचे . या शुभ्र केसात अनुभवाचे मौल्यवान गाठोडे असते. त्या सुरकुतलेल्या शरीरावर कित्येक वर्षाचा इतिहास असतो म्हणून प्रत्येक बाबतीत वृद्धाचा सल्ला घेतला जाई व तो तितक्याच आग्रहाने मानल्या जात असे. कारण वृद्ध म्हणजे अनुभवसिद्ध अशी समजूत होती व वृद्धाचा आदर करावा अशी धर्माची शिकवण होती.कौटुंबिक भांडणात किंवा गावातील भांडणात वृद्ध लोक निकाल देत होते आणि त्यांच्या अनुभवसिद्ध ज्ञानाचा फायदा समाजातील व कुटुंबाच्या सर्व लोकांना मिळत असे.

आजचे युग हे सुधारलेले आहे. आधुनिकीकरण, औद्योगिकीकरण व नागरीकरणाच्या प्रभावाने भारतीय समाजात संयुक्त कुटुंबाचे विघटन यामुळे आधुनिक समाजात वृद्धाची समस्या एक महत्वपूर्ण सामाजिक प्रश्नाच्या स्वरूपात भारतीय समाजासमोर उपस्थित झाली आहे.

भारतात १९ व्या शतकापर्यंत वृद्धाची समस्या तेवढी जाणवत नसे मात्र आज आधुनिक काळात वृद्धाच्या समस्येच्या संदर्भात बोलले व लिहले जाते वर्तमानपत्र , टी .व्ही ., रेडिओ ,साप्ताहिके ,मासिके ह्या प्रसारमाध्यमाद्वारे समस्येला वाचा फोडण्याचे कार्य केले जाते त्याचबरोबर या समस्येकडे सामाजिक संस्था , शासन , सामाजिक कार्यकर्ते यांचे सुद्धा लक्ष वेधले जात आहे आणि हे शासनद्वारे वृद्धासाठी उपाययोजनेच्या माध्यमातून निर्माण केले जाणारे नवीन -नवीन कायद्याच्या निर्मितीतून दिसून येते.

आजचा युग हा सुधारलेला आधुनिक युग समाजाला जातो मात्र याच आधुनिक युगात असुधारीत अशिक्षित व्यक्तीची लक्षणे दिसून येते. कारण आजचा वृद्ध हा घरच्या मंडळींसाठी ओझं वाटतो आहे त्याचे अस्तित्व नकोसे वाटते आहे कुटुंबातील वृद्धाकडे दुर्लक्ष केले जाते. ज्याप्रमाणे घरात अडगळीच्या सामानासाठी एक छोटीशी खोली असते व त्या खोलीत अडगळीचे

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Scanned by CamScanner

सामान डांबले जाते तशीच गत आजच्या वृद्धाची त्यांच्या कुटुंबात झाली आहे. त्याच प्रमाणाची वागणूक कुटुंबातून वृद्धाला दिली जाते व त्यांच्याकडे तिरस्काराने पहिले जाते व त्याच प्रमाणे वागविले जाते.

"प्रौढ व्यक्तींच्या जीवनातील अंतिम कालखंड" असा वृद्धावस्थेचा अर्थ व्यक्त होतो.

शोध निबंधाची उद्दिष्टये :-

१) प्रस्तुत विषयाची पार्श्वभूमी समजून घेणे.

२) वृद्धाच्या प्रमुख समस्यावर नजर टाकणे.

३) वृद्धासमोर असलेल्या आव्हानांचा अभ्यास करणे.

४) वृद्धासमोर उभ्या असलेल्या समस्येच्या निराकरणासाठी उपाययोजनांवर प्रकाश टाकणे.

५) काही महत्वपूर्ण सूचना सुचविणे.

तथ्य संकलन :-

प्रस्तुत शोध निबंधाकरिता तथ्य संकलन हे लिखित साहित्याच्या आधारावर करण्यात येईल यासाठी प्रकाशित व अप्रकाशित लिखाण , संशोधन , प्रबंध , इंटरनेटवरील माहिती, मासिके, वृत्तपत्रे तत्सबंधी प्रकाशित विविध ग्रंथांचा आधार घेतला जाऊन अध्ययन केले जाईल.

वृद्धावस्थेतील महत्वाचे आव्हाने पुढील प्रमाणे आहेत.

१) **शारीरिक समस्या** :-

वृद्धावस्थेत व्यक्तीच्या शरीरात अनेक जैविक बदल घडून येतो. वाढत्या वयाबरोबर शरीरात अनेक बदल घडून येतात. त्यामुढे व्यक्तीचे मानसिक संतुलन ठळु लागते त्यामुळे अनेक आव्हानांना समोर जावे लागते. शारीरिक दुर्बलते सोबत मानसिक दुर्बलता दिसून येते.व्यक्ती मानसिकदृष्ट्या संवेदनशील बनतो किरकोड कारणावरून त्यांना राग येऊ लागतो त्यामुळे त्यांचा स्वभाव चिडचिडा बनतो त्यांच्या या विक्षिप्त वागण्यामुळे कुटुंबातील वातावरण बिघडण्याची शक्यता असते व्यक्तीची बुद्धी काम करेनाशी होते. स्मरणशक्तीचा ऱ्हास होतो अनेक गोष्टीचे विस्मरण होते. बऱ्याच वेळा शुल्लक गोष्टी हि त्याच्या लक्षात राहत नाही त्यामुळे कौटुंबिक ताण - तणाव निर्माण होते. त्यामुळे तर्कसंगत निर्णय घेता येत नाही.

२) **आर्थिक विपन्नावस्था** :-

आजच्या आधुनिक युगात पैसा - सेवा हे समीकरण रुठ झाले आहे. त्यामुळे पैश्याला महत्व प्राप्त झाले आहे. वर्तमानकाळात सर्वच घटक महागाईमुळे त्रस्त झाले आहे. एकीकडे प्रचंड महागाई , खर्चिक सेवा मात्र दुसरीकडे मोडणारी मिळकत तुटपुंजी यामुळे व्यक्तीने जगायचे कसे हा प्रश्न उपस्थित झाला आहे.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Scanned by CamScanner

कौटुंबिक जवाबदारी पार पाडून वृद्धाकडे तुटपुंजी पैसा शिल्लक राहतो त्यामुळे वृद्धापुढे केवळ अंधकार पसरलेला असतो.

३) **मानसिक समस्या :-**

वृद्धाच्या वाढत्या वयाबरोबर मानसिक बदल होत जातो स्मरणशक्तीचा ऱ्हास होऊन विस्मरण शक्तीत वाढ होत असते. उदा. आपल्याकडे कुणी लक्ष देत नाही आपण घरामध्ये अडगळ आहोत हि भावना वृद्धामध्ये निर्माण होते व घरातील मंडळी सोबत ताणतणाव निर्माण होतो आर्थिक व्यवहारात अडचणी , नातेसंबंध दुरावा ,कौटुंबिक बिघाड , सामाजिक अवनती यामुळे व्यक्ती मानसिकदृष्ट्या दुर्बल बनतो नवीन गोष्टींचा स्वीकार लवकर करत नाही व्यक्ती अंतर्मुख बनून त्यांच्या मनात चिंता, भीती निर्माण होते व त्यामुळे एकाकीपणा वाढतो कांम करणे व दगदगीचे कार्य करणे अशक्य होऊन व्यक्ती पूर्णतः परावलंबी बनतो. आपण कुटुंबात व समाजात उपेक्षित व दुर्लक्षित आहोत हा विचार त्यांच्या मनात घर करून जातो.

४) **ऱ्हास होणारी उपयुक्तता :-**

पूर्वी शेती हाच मुख्य व्यवसाय असायचा व संयुक्त कुटुंब प्रणाली दिसून येत होती. घराची मंडळी शेतावर कामावर गेल्यावर घरातील वृद्ध व्यक्ती मुलांचा सांभाळ करायचे मात्र आज संयुक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास होवून विभक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात आली त्यामुळे कुटुंबाच्या आकारात बदल झाला. तसेच औद्योगिकीकरण व नागरिकांमुळे खेड्यातून शहरात वास्तव्य करू लागले. नवीन नौकरी , राहावयाचे जागेचा अभाव इ. कारणामुळे वृद्ध व्यक्ती गावाकडेच राहायचे. अश्या वेळेस त्यांच्या पालन पोषणाचा प्रश्न निर्माण झाला. वृद्ध व्यक्ती एकाकी जीवन जगू लागले तसेच मुले टी . व्ही. , अंगणवाडी , कॉन्व्हेंटमध्ये व्यस्त झालीत त्यामुळे कुटुंबातील वृद्धाची उपयुक्तता संपूर्ण दुर्लक्षित होऊ लागली.

५) **सामाजिक दृष्टीने निर्माण झालेले प्रश्न :-**

वृद्धावस्थेत व्यक्ती निवृत्त झालेली असते कमी उत्पन्नामुळे वृद्धाना आपल्या आर्थिक गरजा नियंत्रित कराव्या लागतात वयानुसार होणाऱ्या आजारावरपण बराचसा पैसा औषोधोपचारावर खर्च होत असतो. तरुणवयात अनेक आव्हाने पेलली असतात मात्र वृद्धपकाळात शरीराची व मनाची साथ मिळत नसल्यामुळे मनात न्यूनगंडाची भावना निर्माण होते. यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. तरुण मंडळी त्यांच्यासोबत व्यवस्थित राहात नाही. दोन पिढ्यातील संघर्षामुळे तणाव निर्माण होतो. यातूनच निराक्षितांची, भिक्षावृत्ती , आत्महत्या इ. सारख्या समस्या निर्माण होतात.

६) **एकाकीपणा :-**

घरच्या मंडळी कडून दुर्लक्ष, संबंधातील न्यूनता, प्रचंड मोकळीक या सर्व बाबीमुळे एकाकीपणा खायला उठतो त्यातच जर जोडीदार मरण पावल्यास हा एकाकीपणा जीवघेणा ठरतो.

KD
Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Scanned by CamScanner

७) **समायोजनाची समस्या :-**

वृद्धावस्थेत शारीरिक दुर्बलता, कुटुंबात मिळणारे दुय्यम स्थान , तरुणांचा वृद्ध व्यक्तीकडे बघण्याचा दृष्टिकोन यामुळे दुरावा वाढतच जातो. तसेच वृद्धव्यक्ती कमावती असेल पेंशन धारक असेल किंवा संपत्तीचा मालक असेल तर हितचिंतक त्यांना मदत करतात मात्र सेवानिवृत्त झाला असेल आर्थिक अडचण असेल तर अश्यावेळेस मुले, सुना त्यांच्याकडे दुर्लक्ष करतात. कोणीही व्यक्ती त्यांचा सोबत समायोजन साधण्याचा प्रयत्न करीत नाही अश्यावेळेस ते एकाकी पडतात.

८) **अपर्याप्त आरोग्य सुविधा :-**

उपलब्ध असलेल्या वृद्धाच्या सुविधा हया पर्याप्त नसून त्यांना कल्याणकारी पर्याप्त सुविधा उपलब्ध केल्या जात नाही.

९) **सरकारी योजना अकार्यक्षम :-**

सरकारच्या अनेक योजना कागदोपत्री असतात. प्रत्यक्षात मात्र गरजू वृद्धाना फायदा मिळत नाही. अनेक त्रुटी आढळून येतात अधिकारी, कर्मचारी वर्ग त्याबद्दल उदासीन असतात.

१०) **सामाजिक व्यवस्थेमध्ये परिवर्तन :-**

परिवर्तन समाजाचा नियम आहे. आणि व्यक्ती कुतूहल प्राणी असल्यामुळे मानवी समाजात परिवर्तन दिसून येते याचाच परिणाम म्हणजे आधुनिक काळात औद्योगिकरण नागरिकीकरण संयुक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास हयासारख्या परिवर्तनामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत अखंडपणे होणारे परिवर्तन व त्यांचा स्वीकार करणे ही मनाची मजबुरी सुद्धा आहे आणि आजच्या काळाची गरज सुद्धा युवावर्ग परिवर्तनाचा लवकर स्वीकार करतात मात्र वृद्धव्यक्ती कडून नवीन गोष्टीचा स्वीकार करताना नेहमीच विरोध दर्शविला जातो. वृद्ध व्यक्तीनुसार त्यांच्या बाल्यावस्थेत व तरुणावस्थेत ज्या काही परंपरा होत्या त्याचाच स्वीकार करणे त्याला योग्य वाटत असते. भौतिक परिवर्तनासोबतच वेळोवेळी सामाजिक परिवर्तन दिसून येते. मात्र बऱ्याच वेळा वृद्धव्यक्तीकडून त्याचा विरोध दर्शविला जातो. आणि म्हणूनच वृद्ध नवीन पिढीला उद्देशून म्हणताना दिसतात कि काय जमाना आला आजची पिढी बेशरम झाली आहे. लहान मोठ्याचा मान सन्मान राहिला नाही . नवीन पिढी संस्कारहीन झाली आहे. लग्नात स्त्रीवर्गाकडून केलेला नृत्य , मुला ,मुलींची आपसातील वार्तालाप , फॅशनेबल कपडे इ. कडे पाहण्याचा दृष्टिकोन नेहमीच नकारात्मक राहिला आहे. अश्या सामाजिक परिवर्तनाचा वृद्धव्यक्तीकडून स्वीकार न केल्यामुळे विरोधी स्वभावामुळे युवक आणि वृद्ध यांच्यात विचारांची दरी वाढतच जाते.

११) **भौतिकवादाचे वाढते प्रस्थ :-**

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Scanned by CamScanner

मागच्या पन्नास वर्षाचा विचार केल्यास असे दिससुन येते कि व्यक्ती भौतिकवादाच्या पाठीमागे लागला आहे. पन्नास वर्षापुर्वी सर्वसाधारण व्यक्ती सायकय चालवत असे , रेडिओवर गाणे ऐकत होता ,स्वत:च्या घरी टेलिफोन असणे हे एक स्वप्न असायचं, पंख्याची हवा खुशी देत होती , काही लोकांच्याच घरी फ्रिज दिसत होता, सर्वसाधारण घर बांधेले जायचे मात्र आज कलर टी . व्ही ., स्कुटर, कार , फ्रिज , मोबाईल , कुलर सर्वसाधारण लोकांची आवश्यक गरज बनली आहे.

वृद्ध अधिकार हा भारताच्या मूलभूत अधिकारापैकी एक . वृद्ध व्यक्तीचा आंतरराष्ट्रीय दिवस १ ऑक्टोबर रोजी दरवर्षी साजरा केला जातो.

सरकारी सवलत आणि सुविधा

- ❖ वृद्धांना आत्मसन्मान आणि सेवा देण्याच्या उद्देशाने पालक आणि जेष्ठ नागरिक अधिनियम २००७ , नवीन कायदा मंजूर.

आरोग्य

- ❖ अनेक सरकारी आणि खाजगी रुग्णालये वृद्ध व्यक्तींना हृदयाच्या समस्या , मधुमेह ,मूत्रपिंड समस्या ,रक्तदाब समस्या आणि डोळ्याच्या समस्या यासारख्या रोगाच्या उपचार मध्ये सवलत देतात हॉस्पिटल बेडसाठी वृद्धासाठी आरक्षणाच्या स्वतंत्र रांगेत एक अट आहे. '
- ❖ प्रत्येक सरकारी व खाजगी दवाखान्यात समाजकायकर्त्याची नेमणूक करून त्यांच्या समस्या , अडचणी लक्षात घ्याव्या व त्यासाठी मदत करावी व आरोग्य मंत्रालयाकडे संबंधित सूचना पाठवाव्या व त्यावर मंत्रालयाने अंमलबजावणी करावी.
- ❖ जेष्ठ नागरिकांना आणि गर्भवती महिलांना कमी निधी उपलब्ध आहे
- ❖ सामूहिक व सहकारी तत्वावर चालणारे वृद्धांचे दवाखाने व सेवा केंद्र सरकारने सुरु करावी.

प्रवास

- ❖ भारतीय रेल्वे ६० वर्ष वयावरील वयाच्या सर्व व्यक्तींना तिकीट किमतीमध्ये ३०% सवलत देते. ६० वर्षापेक्षा जास्त वयोगटातील महिलांसाठी हे आरक्षण ५०% आहे. वयाचा पुरावा आवश्यक आहे.
- ❖ भारतीय विमान कंपन्यांनी त्यांच्या अर्थव्यवस्थेच्या श्रेणीमध्ये ५०% सवलत दिली आहे. (विशिष्ठ अटी व सशर्ती लागू गेल्या आहेत.)
- ❖ एअर इंडिया व्हीलचेअरमध्ये वृद्ध व्यक्तींना ४५% सूट देते आणि त्यांना प्रथम विमानात जाण्याची परवानगी असते.
- ❖ वरिष्ठ नागरिकांना तिकीट बुक करणे किंवा रद्द करणे आणि गर्दी टाळण्यासाठी वेगळे काउंटर आहे.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Scanned by CamScanner

- पोस्ट ऑफिस आणि इतर खासगी बँकांद्वारे चालविल्या जाणारी काही बचत योजनांवर जेष्ठ नागरिकांना व्याजदर अधिक आहे.

गृहनिर्माण

- भारतीय सरकार रिटायर्मेंट होम आणि मनोरंजक किंवा शैक्षणिक केंद्र यासारखे गृहनिर्माण सुविधा प्रदान करते हे केंद्र वृद्ध व्यक्तींना त्यांच्या विनामूल्य वेळेस विविध क्रियाकलाप करण्याचे व्यतीत करण्याच्या संधी देतात.

मनोरंजन केंद्र

- बऱ्याच मनोरंजन केंद्रामध्ये फिटनेस क्लब , योग्य केंद्र , उद्याने , आध्यत्मिक सत्र , पिकनिक्स , आरोग्य आणि खाद्यपदार्थांचे देखील वरिष्ठ नागरिकांसाठी मनोरंजन आहे.
- तसेच संगीत वर्ग , कला आणि हस्तकला , क्विझ आणि इनडोअर गेम्स यासारख्या सुविधा
- सरकारी विमा कंपनीने वृद्धांच्या विमा योजनेसाठी पाऊल उचलावे.
- वृद्ध समुपदेशन केंद्राची स्थापना करावी.
- विविध स्वयंसेवी संघटनांनी पुढाकार घेऊन वृद्धांच्या समस्ये बद्दल जनजागृती करावी व त्यासाठी सामाजिक व कौटुंबिक जबाबदारी नैतिक मूल्या ची जोपासना करावी.
- महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वृद्धाबद्दल आदर निर्माण होण्यासाठी वृध्दाश्रमाला भेट द्यावी वृद्धांच्या समस्या व समायोजन विषयी चर्चा करावी परिसंवाद कार्यशाळेचे आयोजन करावे.
- मातापित्यांनी मुलाचे संगोपन करताना सामाजिकरणाच्या माध्यमातून योग्य व आदर्श अश्या मूल्याची जाणीव करून द्यावी.
- ग्रामीण वृद्धांसाठी पेंशन योजना लागू करावी.
- निराशीत आर्थिकदृष्ट्या कमकुवत आणि कमी उत्पन्न असणाऱ्या गटासाठी स्थानिक संस्थांनी समूह घरे बांधावी.
- कल्याणकारी योजनांसाठी जनजागृती घडवून आणली पाहिजे.

सूचना :-

- वर्तमानकाळात वृद्धांच्या संख्येतही वाढ होत आहे. माझ्यामते वृध्दाश्रमामुळेही वृद्धांच्या समस्या उग्र रूप धारण करत आहे. वृद्धाश्रम केवळ अश्याच लोकांसाठी असायला पाहिजे जे निराधार आहेत ज्यांच्या कुटुंबात सांभाळ करणारे कोणीही नाही मात्र वृद्धांचे मुलं-मुली जिवंत असताना जर वृद्धांना वृद्धाश्रमाचा मार्ग दाखविल्या जात असेल तर ह्यासारखे त्या व्यक्तीचे दुर्दैव नाही म्हणून अश्या मुलांना सरकारनी

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Scanned by CamScanner

कठोरातील कठोर दंड केले पाहिजे त्यांच्याविरुद्ध (एफ . आय . आर) दाखल करून शिक्षेची तरतूद करावी आणि सरकारी सोयी-सुविधा पासून वंचित करावे.

- ❖ सरकारनी प्रत्येक वृद्धव्यक्तींसाठी महिन्यातून एकदातरी संपूर्ण तपासणीसाठी आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करून द्यावी.
- ❖ प्रत्येक सरकारी अथवा खाजगी रुग्णालयात वृद्धांसाठी आरक्षित वार्डची सेवा उपलब्ध करून द्यावी.
- ❖ ज्याप्रमाणे सरकारने वृद्धव्यक्तींच्या कल्याणासाठी बस व रेल्वे प्रवासभाड्यात सूट दिली आहे त्याचप्रमाणे खाजगी व सरकारी दवाखान्यात वृद्ध व्यक्तीसाठी " सूट प्राप्त कार्ड " ची सोय करणे जेणेकरून कोणत्याही स्वास्थकेंद्रात जाऊन तपासणी करता येईल.
- ❖ ज्याप्रमाणे कोणत्याही प्रकारच्या अपघातासाठी विशिष्ठ हेल्प लाईन नंबर असतो त्याचप्रमाणे वृद्धांसाठी सुद्धा विशिष्ठ प्रकारचा हेल्प लाईन नंबर असावा जेणेकरून त्यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल व वृद्धांच्या मनात सामाजिक सुरक्षितता निर्माण होईल.
- ❖ आई - वडील जिवंत असताना जर मुलगा - मुलगी आई वडिलांचा सांभाळ करू शकत नसले तर अश्या वेळी मुलगा मुलगी नौकरीत किंवा इतर कोणताही व्यवसाय करीत असल्यास त्या मुलाच्या मुलीच्या महिन्याच्या मिळकतीतून ठराविक रक्कम प्रत्यक्ष आईवडिलांना देणे किंवा पेंशनच्या स्वरूपात देणे.
- ❖ आई-वडील हयात असताना जर मुलगा-मुलगी वडिलांची संपत्ती फूस लावून किंवा चापलुसीने हडपत असेल व नंतर आई-वडिलांना घराच्या बाहेरचा रास्ता दाखवत असेल तर शासनांनी आठ दिवसाच्या आत मुलं-मुलीकडील संपत्ती हस्तगत करून वृद्ध व्यक्तीच्या स्वाधीन करावी.
- ❖ ज्याप्रमाणे 'दत्तक बालक योजना ' आहे त्याचप्रमाणे समाजातील उच्चभ्रू व्यक्तींनी किंवा मोठमोठ्या उद्योगांनी किंवा ज्यांचे आई-वडील जिवंत नाही आणि ज्यांचा उदर्निवाह करून झाल्यानंतर सुद्धा उत्पन्न शिल्लक राहत असेल अश्या लोकांसाठी वृद्धाश्रमातील वृद्धांना दत्तक घेण्यासाठी दत्तक योजना लागू करावी.

" वेदनेचा उत्सव साजरा करणे ज्याला जमते त्यासाठी जीवन हे सुंदर आहे मात्र ज्याला जमत नाही त्याच्या समोर आत्महत्येसारखा दुसरा पर्याय नाही. "

निष्कर्ष :-

१) वृद्धावस्थेत कुटुंबाकडून वृद्ध व्यक्तीस पाहिजे त्या प्रमाणात आर्थिक मदत मिळत नाही .

२) वृद्धांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य खालावले आहे.

Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Scanned by CamScanner

३)वृद्ध व्यक्ती व आजची पिढी यांच्यातील पिढीसंघर्षामुळे समायोजनात अनेक अडचणी वृद्धांसमोर निर्माण झाल्या आहेत.

४)आधुनिक काळात वृद्ध व्यक्तीला पूर्वीसारखे मानाचे स्थान राहिलेले नाही.

५) आजचे वृद्ध बदलत्या सांस्कृतिक व मूल्याना अंगीकारत नसल्यामुळे वृद्धांच्या समस्या वाढत आहेत.

६) वृद्धांच्या पालन पोषणात अनेक अडचणी दिसून येते.

७)वृद्धांचे पालन पोषण करण्यात नवीनपिढीची उत्सुकता कमी दिसून येत आहे.

समारोप :- वृद्धाचा प्रश्न निर्माण होण्यासाठी केवळ कुटुंब किंवा कुटुंबातील व्यक्ती जबाबदार आहे हे गृहीत धरून चालणार नाही आपल्या जीवनात वृद्धावस्था हि अवस्था अपरिहार्य व त्यासाठी सर्वाना समोर जावे लागेलच हि मानसिकता तयार करावी लागेल परंतु सामाजिक समस्येविषयी पूर्वज्ञान नसते यातूनच वृद्धांच्या सामाजिक कौटुंबिक आर्थिक शारीरिक समस्या निर्माण होत असतात.

स्पर्धेच्या युगात माणूस पैश्याच्या व संपत्तीच्या हव्यासापोटी स्वतःच्या कुटुंबाकडे दुर्लक्ष करू लागला आहे. आधुनिक युगात संपत्ती आणि भौतिक एही क सुख प्राप्त करण्याच्या स्पर्धेत व्यक्ती स्वतःची नैतिक जबाबदारी विसरत आहे. त्यामुळे आजच्या पिढीला वृद्ध अडगळ वाटू लागले आहे. सरकारणेसुद्धा कल्याणकारी योजनेकडे लक्ष देऊन त्यांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. वृद्धाच्या समस्या व समायोजन या विषयी सर्व समाजात जनजागृती केल्यास एक दिवस आपणही म्हातारे होऊ व आनंदाने व सुखाने जीवन जगू असे मन परिवर्तन झाल्यास वृद्धांमध्ये जीवनाप्रती आशावादी दृष्टिकोन निर्माण होईल.

संदर्भग्रंथ सूची :-

१) रा. ज. लोटे भारतीय सा. समस्या

२) डॉ . प्रदीप आगलावे : भारतीय समाज प्रश्न आणि समस्या

२) डॉ . प्रदीप आगलावे : भारतीय समाज संरचना आणि समस्या साईनाथ प्रकाशन नागपूर २००८.

४) डॉ . प्रदीप आगलावे : भारतीय समाज प्रश्न आणि समस्या साईनाथ प्रकाशन नागपूर २००८.

५) डॉ . एस . आर . तोष्णीवाल भारतीय समाज प्रश्न आणि समस्या विश्व् प .डी. २००९.

६) व्ही . बी . पाटील मानवी हक्क के सागर प . पुणे २०१०.

७) प्रा . माणिक माने भारतातील समकालीन सामाजिक समस्या विज्ञानप्रकाशन नागपूर २०१७.

८) डॉ . बी . एम . कऱ्हाडे भारतीय समाज प्रश्न आणि समस्या पिंपळापुरे प्रकाशन नागपूर.

९) डॉ . भा .कि . खडसे भारतातील सामाजिक समस्या मंगेश प्रकाशन २००९ .

Office
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Scanned by CamScanner

भारतीय स्त्री

आव्हाने व उपाय

: संपादक :

प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे

प्रा. डॉ. विश्वनाथ सूर्यवंशी



Scanned by CamScanner

अनुक्रमणिका

१. स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील स्त्रियांच्या सामाजिक चळवळी
डॉ.नारायण तु.कांबळे ८

२. पर्यावरण व्यवस्थापन आणि विकास संवर्धन संस्कृतीमध्ये महिलांचा सहभाग
डॉ. सुजाता रामदासजी नाईक २३

३. प्राचीन काळातील स्त्रियांचा दर्जा
प्रा. शुभांगी भेंडे-शर्मा ३१

४. महिला सक्षमीकरण : एक दृष्टिक्षेप
डॉ. बळीराम परशराम अवचार ४०

५. भारतीय समाजातील स्त्रियांचा सामाजिक दर्जा आणि आधुनिक काळातील स्त्रियांच्या समस्या व उपाययोजना
प्रा. डॉ. मधुकर आत्माराम देसले ४७

६. महिला सबलीकरण आणि पंचायतराज व्यवस्था
डॉ. अर्चना नारायण धर्मे ५४

७. उद्योग धंद्यातील स्त्रियांचे योगदान
सुचिता सुभाषराव ढोणे ६१

८. महिला सक्षमीकरण विषयक योजनांचे अर्थशास्त्रीय विश्लेषण
प्रा.डॉ. रमेश शिंदे ७०

९. महिला सबलीकरणापुढील आव्हाने
एकनाथ पवार, नागपूर ७५

१०. स्त्रीवाद आणि स्त्रियांच्या उध्दारातील संतांचे योगदान
प्रा.डॉ.जगताप यु.एस ८१

११. नोकरी करणा-या महिलांच्या समस्या
श्रीमती काळवणे के.आय. ८६

१२. महात्मा फूले पूर्वकालीन समाजजीवनात स्त्री जीवन
डॉ.सौ.कुलकर्णी एस.एन ९२

१३. भारतीय स्वातंत्र्याची ७५ वर्ष आणि ग्रामीण भागातील महिला सबलीकरण
प्रा.डॉ. प्रवीण पांडुरंगराव लोणारकर ९५

१४. स्त्रीवादी विविध दृष्टिकोन
स्वाती.बी.देशमुख १०२

१५. महिला सबलीकरण आणि बचत गट
श्री. स्वामी विरभद्रेश्वर सामलिंग १०९

Scanned by CamScanner

३.

प्राचीन काळातील स्त्रियांचा दर्जा

प्रा. शुभांगी भेंडे-शर्मा
समाजशास्त्र विभाग प्रमुख, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,बल्लारपूर

प्रस्तावना : प्राचीन काळापासूनच भारतीय समाज व्यवस्थेचा मुख्य कणा असलेली स्त्री सामाजिक जीवनात नेहमीच सक्रीय व महत्त्वपूर्ण असूनही नेहमीच दुर्लक्षित राहिलेली दिसून येते. कोणत्याही समाज रचनेत मग तो समाज भारतीय असो पाश्चिमात्य समाज असो, समाजात स्त्रीची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. कारण स्त्री पुरुष एकाच रथाची दोन चाके आहेत. एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. समाज व्यवस्थेच्या दृष्टीने स्त्री-पुरुष दोघेही समान आहे म्हणूनच दोघांचाही विकास होणे तेवढेच महत्त्वपूर्ण आहे. मात्र इ. स. पूर्व काळापासून च स्त्रियांना गौन समजले जायचे आणि अधिकारी स्त्रियांची ही स्थिती कमी-अधिक प्रमाणात सर्वच देशात सारखीच दिसून येते. स्त्री समाजाचा महत्त्वपूर्ण घटक असला तरी काळानुसार समाजातील स्त्रीचे स्थान बदलताना दिसून येते. प्रत्येक संस्कृतीमधील स्त्रीची परिस्थिती ही भिन्न स्वरूपाची असल्याचे आपल्याला दिसून येते आणि तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण आणि त्याचे मूल्यमापन करण्याचे मापन हे सुद्धा वेगवेगळे आढळून येते. स्त्री आणि पुरुषाच्या आणि जैविक क्षमता सारख्या असल्या तरीही धार्मिक सामाजिक, सांस्कृतिक, रूढी, परंपरा च्या माध्यमातून चार भिंतीच्या आत डांबून ठेवून तिला दुय्यम दर्जा देण्यात आला व पुरुषांपेक्षा स्त्रिया किती कमजोर कनिष्ठ आहे असे तिच्या मनावर लहानपणापासून संस्काराच्या माध्यमातून बिंबवण्यात आले. आणि या भावनेतूनच तिच्या मनामध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण झाली.

सुरुवातीच्या सिंधू काळात महिलांना अनेक अधिकार होते. मात्र वैदिक आणि उत्तर वैदिक काळापासून तिच्यावर अनेक बंधने लादून तिला सर्वच अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले.

ज्या समाजामध्ये पुरुषाप्रमाणे स्त्रियांना सारखाच अधिकार दर्जा प्राप्त होतो त्या समाजाचा विकास जलद गतीने होतांना दिसून येते हे सांगताना विख्यात समाजशास्त्रज्ञ हर्बर्ट स्पेन्सर म्हणतात, की समाजाची प्रगती अथवा अधोगती, विकसितपणा अथवा मागासलेपणा हा मुख्यतः त्या समाजातील

Scanned by CamScanner

स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीवर अर्थात सामाजिक दर्जा वर अवलंबून असतो.'[१]

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मानव समाजशास्त्रज्ञांनी स्त्री जीवनावर वेगवेगळ्या पद्धतीने अभ्यास केल्याचे आपल्याला दिसून येते. यातूनच स्त्री-पुरुषाच्या सांस्कृतिक अभ्यासाला गती प्राप्त झाली आणि समाजातील स्त्रीचे जीवन आणि तिचे स्थान जाणून घेण्याचा अनेक समाज कार्यकर्त्यांनी प्रयत्न सुरू केला.

ब्रिटिशांच्या काळामध्ये सर्वप्रथम भारतीय स्त्रियांच्या समस्या वर सविस्तर अध्ययन सुरू झाले तेव्हा असे दिसून आले की भारतीय समाजात जुन्या चालीरीती, रूढी, परंपरा या स्त्रियांच्या बाबतीत अन्यायकारक असल्यामुळे बालविवाह, विधवा विवाह, विधवां स्त्रीयांचा छळ, सतीची चाल इत्यादी सामाजिक समस्या निर्माण झाल्या होत्या .या सर्व प्रश्नांचे निर्मूलन करण्यासाठी राष्ट्रीय आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी स्त्रियांना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी अनेक प्रयत्न केले.

१९ व्या शतकात अनेक समाजसुधारकांनी या सर्व प्रश्नांचा गंभीरपणे विचार करून स्त्री शिक्षण किती आवश्यक आहे? हे लक्षात आणून देऊन त्या दृष्टीने प्रयत्न केले गेले.

स्वातंत्र्योत्तर काळात समतेच्या आधारावर राज्यघटना तयार करण्यात आली होती. मात्र स्त्रियांच्या प्रश्नाकडे लक्ष केंद्रित करता आले नाही कारण स्वातंत्र्योत्तर काळात समाजामध्ये दारिद्र्य, बेकारी नागरीकरण, औद्योगीकरण यासारख्या विषयाकडे लक्ष केंद्रित केले केले.

स्वातंत्र्योत्तर काळात योजनापूर्वक प्रगती नंतर जवळ जवळ तीन दशकांनी,१९७४ मध्ये राष्ट्रीय स्तराला नियुक्त मंडळाने देशातील स्त्रीचा समाजातील दर्जा आणि स्थान याचा पहिला अहवाल सादर केला. या अहवालावरून स्त्रीचे स्थान डागाळलेले, विदारक, धक्कादायक आढळले. मध्यमवर्गातल्या स्त्रियांचे शिक्षण आणि नोकरी व्यवसाय या संदर्भात थोडी जमेची बाजू वगळता एकूणच सर्वसामान्य स्त्रीचे स्थान हे मागे असलेले दिसून आले. भारतातील जवळजवळ निम्म्या स्त्रियांच्या जीवनात बालमृत्यू, उपासमार, व्यवसाय उपलब्धतेची संधी न मिळाल्यामुळे वाढलेली बेकारी, निराधारपणा या सर्वांमुळे उतरती कळा लागलेली आढळते.

वैदिक कालखंडात स्त्रियांची स्थिती : ऐतिहासिक काळात स्त्रीचे संस्कृतीमध्ये उत्पादनातील आणि पुनरउत्पादनातील योगदान मोलाचे मानले

Scanned by CamScanner

होते. मध्य भारतातील गृहामध्ये आढळणारी जुनी चित्रे असे सुचवितात की शिकारीच्या आणि कंदमुळे गोळा करणाऱ्या अवस्थेत लैंगिकतेवर आधारित श्रमविभागणी इतकी काटेकोर नव्हती. फळे कंदमुळे गोळा करणाऱ्या स्त्रिया शिकारी मध्येही सहभागी होत असत.'[२]

वैदिक काळात वेद पठणाला फार महत्त्व होते आणि पुढील बौद्ध काळात यातूनच भारतीय शिक्षण पद्धतीचा उदय झाला. या काळात स्त्रिया सुशिक्षित होत्या. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही वेदपठनाची मुभा होती. मुलांप्रमाणे मुलीची देखील मुंज करून गुरुगृही पाठविले जात. उपनयन संस्कार झाल्यानंतर अनेक विद्यार्थिनीं गुरुकुलात जाऊन शिक्षण घेत असत. विद्यार्थिनींसाठी सुद्धा स्वतंत्र छात्रीशाला अस्तित्वात होत्या. वैदिक कालखंडाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या काळात बालविवाह, स्त्रीभ्रूणहत्या तसेच सती प्रथा अस्तित्वात नव्हती. होम हवन आदि कृत्य पती व पत्नी या दोघांनी मिळून करावी असा स्पष्ट नियम ऋग्वेद काळात पहावयास मिळतात.'[३]

वेदकाळामध्ये कुटुंबामध्ये सर्वकष अधिकार हा पुरुषांचा असे. विविध घटकातील अंतिम निर्णय हे पुरुष घेत. कुटुंबातील वंशावळ पुरुषांच्याच नावानेच चालत होती .यावरून वेद काळातही पितृसत्ताक पद्धती अस्तित्वात होती हे लक्षात येते. दत्तक प्रसंगी मुलगा दत्तक घेतला जात असे. आजही वर्तमान काळात बऱ्याच ठिकाणी हीच पद्धत समाजात असलेली दिसून येते.'[४]

ऋग्वेदकालीन स्त्रीला ज्ञानाच्या क्षेत्रात पुरुषाच्या बरोबरीचे स्थान होते. ऋग्वेदाच्या सुक्तांची रचना करणाऱ्या कृषीमध्ये स्त्रियाही सहभागी होत्या असे म्हटले जाते. परंतु पुनरुज्जीववादी लोक याला गैरवाजवी महत्त्व देऊन तत्कालीन स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान होते आणि आमच्या प्राचीन संस्कृतीमध्ये स्त्री स्वातंत्र्य होते असे दाखविण्याचा प्रयत्न करतात. यामुळे आमच्या सांस्कृतिक अहंकाराचे पोषण होते. परंतु तत्कालीन स्त्री स्वातंत्र्याच्या मर्यादा दाखविणे व वस्तुस्थिती मांडणे आवश्यक आहे. ऋग्वेदातील सुमारे एक हजार सुक्तापैकी ४-२ सुक्त स्त्रियांची होती. एवढ्यावरून तत्कालीन स्त्री स्वातंत्र्याचे गोडवे गाता येणार नाही. काही आदरणीय व अनुकरणीय ब्रह्मवादिनी वेद कालीन भारतात होऊन गेल्या असल्या तरी सर्वसामान्य स्त्रीला शिक्षणाचा मार्ग खुला नव्हता हे स्पष्ट केले

Scanned by CamScanner

आहे. शिक्षणाचा मार्ग खुला होता परंतु त्या बाबत कमालीची उपेक्षा केली जात होती.'[५]

वैदिक काळातील स्त्रियांचा धर्मातील स्थानाचा विचार करता ते पुरुषा बरोबरीचे होते. त्या काळात धर्माचे महत्त्व फार जास्त होते.राज सत्तेवरही धर्माचे नियंत्रण असे. धर्मकांडात म्हणजेच यज्ञयाग करण्यात पुरुषाप्रमाणे स्त्रीला अधिकार होता. पुरुष घरापासून दूर गेला असता स्त्री देखील एकटीच यज्ञ करू शकत होती.'[६] पण यज्ञकृत्यात पत्नी बरोबर असणे किंवा याज्ञ याग करण्याचा अधिकार असणे याचा अर्थ स्त्रीला बरोबरीचे स्थान दिले असा होत नाही. कारण स्त्री हे यज्ञ पूर्तीचे साधन आहे, ऋत्विज व यज्ञय पशु इत्यादीच्या अभावीही यज्ञ पूर्ण होत नाही याचा अर्थ त्यांना यजमानांच्या बरोबरीचे स्थान मिळाले असा होत नाही. ज्याप्रमाणे यजमान एका ऋत्विजच्या ऐवजी दुसरा ऋत्विज घेऊन यज्ञ करू शकतो, त्याचप्रमाणे पत्नी रजस्वला असेल तर तिच्या ऐवजी दुसरी पत्नी घेऊन धर्म कृत्य करू शकत होता.'[५] बहुपत्नीत्वाची चाल सर्रास होती, सर्वच बाबतीत स्त्री-पुरुष समानता नव्हती.'[६] काही पुराव्यांच्या आधारावरून असे लक्षात येते की, वैदिक काळात यज्ञयाग व धार्मिक दृष्ट्या स्त्रियांना बरोबरीचे स्थान होते हे मुळीच सिद्ध होत नाही. परंतु मध्ययुगीन काळात मात्र स्त्रियांची स्थिती ही वैदिक काळापेक्षा ही खालावलेली होती एवढे मात्र खरे.

उत्तर वैदिक काळात स्त्रियांची स्थिती : उत्तर वैदिक कालखंडात स्त्रियांच्या सामाजिक दर्जात बरेच बदल झालेत. हा कालखंड स्त्रियांच्या दृष्टीने प्रतिकूल स्वरूपाचा होता.

आर्यांचे सांस्कृतिक आक्रमण जसे जसे द्रविडावर वाढले तस तसा स्त्रियांचा दर्जा खालावत केल्याचे दिसून येते. उत्तर वैदिक काळात स्त्रियांची स्थिती अतिशय वाईट झाली. ऋग्वेदाने स्त्री नींदेची पूर्वतयारी करून ठेवल्या नंतर ऋग्वेदाच्या अखेरीस आर्य लिहितात, 'स्त्रियांबरोबर सख्य असू शकत नाही. कारण त्यांची हृदय लांडग्यांच्या हृदया सारखी असतात, 'कि क्रम' या प्रश्नाला उत्तर आहे,' स्त्री हृदयम्:' ऋग्वेदात इंद्राचे भाष्य आहे, ज्या इंद्राने मातृसंस्कृति असलेल्या द्रविडीयन संस्कृतीची 'पुरे' उद्ध्वस्त केली, म्हणून त्याला 'पुरंदर' हा किताब दिला गेला, तो इंद्र म्हणतो की,'स्त्रीची मन ताब्यात राहत नाही आणि बुद्धी हलकी असते'[७] या आर्यांच्या श्लोकाने स्त्री दृष्टपणाचा कहरच केला होता. भर्तृहरी म्हणतो संशयाचा भोवरा, अविनयाची भवन, सहासाचे नगर, दोषांची बेरीज, शेकडो कपटाने भरलेली

Scanned by CamScanner

अविश्वासाचे क्षेत्र, स्वर्गदाराची विघ्न,नरक पुराचे मुख, सर्व मायांची (कपटाची) करंडी आणि प्राणीलोकांचा पाश, असे वरवर अमृतमय असूनही प्रत्यक्षात मूर्तिमंत विष असलेली हे स्त्री- यंत्र कोणी बरे निर्माण केले?' स्त्री प्रत्यक्ष अशूची पुत्रीका आणि मोहाचे दृश्य दुचश्रेष्ठ आहे, असेही भर्तृहरीने म्हटले आहे. महाभारताच्या अनुशासन पर्वत म्हटले आहे - शूरधारा विष सर्पवहि : इती एकत: स्त्रीम - म्हणजे वस्त्राची धार, विष, साप आणि अग्नि हे सर्व एकत्रितपणे स्त्रीमध्ये आढळते.'[८]

यावरून असे दिसून येते की उत्तर वैदिक काळात स्त्रियांवर अनेक बंधने लादली गेली होती. स्त्रियांची क्षेत्र घर-मुल पर्यंतच सीमित करण्यात आले होते. शिक्षण, विवाह मालमत्ता व वारसा हक्क, धर्मविधी इत्यादीचे स्वातंत्र्य हळूहळू स्त्रियांकडून हिरावून घेतले गेले. एवढेच नव्हे तर स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. स्त्रीला एक मनुष्य प्राणी न समजता तिला भोगाची वस्तू समजू लागले.

स्त्रियांची स्थिती या काळात निरंतर खालावत केली होती कारण या काळात स्त्री शिक्षणाचे तसेच धार्मिक आणि सामाजिक अधिकार पूर्णतः काढून टाकण्यात आले होते. स्त्रियांना पुरुषांचे गुलाम करण्यात आले होते. अशाप्रकारे स्त्रीला जे प्राधान्य मिळत होते त्याचा अस्त होऊन स्त्रिया पुरुषांच्या गुलाम झाल्या.

बुद्ध काळात स्त्रियांची स्थिती : बुद्ध काळ स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावलेला होता व समानतेचा होता. बुद्धाने समाजामध्ये समान दर्जा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्याचाच परिणाम म्हणजे समाजातील सांस्कृतिक, आर्थिक स्तरातील स्त्रिया बुद्धांच्या विचाराने प्रभावित होऊन भिक्षूनि संघ निर्माण झाला .बुद्धकालीन स्त्रीने नैतिक मूल्यांची जपवणूक करून प्रेम,सहकार्य, मैत्री, सदभाव, दया, क्षमा, शांती त्याग या गोष्टी या तत्वाला जीवनाशी जोडले. बौद्ध तत्वज्ञानाचा पाया या दिशेने मजबूत केला.'[९]

'स्त्रियांचे सर्व क्षेत्रातील स्वातंत्र्य नाकारले होते. वैदिक धर्मातील ब्राह्मणशाही, यज्ञयाग, उपनिषदे, कर्मकांड इत्यादी गोष्टींचा विरोध करून अडीच हजार वर्षांपूर्वी गौतम बुद्धाने (इ.स. पूर्व ५७३ ते ४६३) मानवतावादावर आधारलेल्या बौद्ध धर्माची स्थापना केली. गौतम बुद्धाने स्त्री स्वातंत्र्याचा विचार मांडला आणि त्यांनी या विचारांची अंमलबजावणी केली होती. बुद्धाने स्त्री-पुरुष असा भेद केला नाही.'[१०]

Scanned by CamScanner

बौद्ध काळात शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात स्त्रियांना मानाचे स्थान होते. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही विहारात प्रवेश मिळत होता व तेथे राहून त्यांना कोणत्याही शाखेचे अध्ययन करता येत होते. अनेक स्त्रियांनी विहारात राहून अध्ययन केले आणि व्रतस्थ आचरण पत्करून इतरांना प्रेम, विश्वबंधुत्व यांचा संदेश देण्यासाठी आयुष्य वेचले. 'एका उपदेश पर ग्रंथात बुद्धाने म्हटले आहे की, स्त्री असो वा पुरुष असो दोघांनाही एकाच रथातून निर्वाणाचा प्रवास करता येईल व निर्वाण पद प्राप्त ही करून घेता येईल. '[११] म्हणजे स्त्री आणि पुरुष दोघांनाही निर्वाण पद प्राप्त करण्याचा समान अधिकार होता. बौद्ध काळात स्त्रियांनाही विवाह करणे आवश्यक नव्हते. त्या म्हाताऱ्या होईपर्यंत एकट्या दुसऱ्याच्या आधाराशिवाय राहू शकत होत्या. तसेच मुल जन्माच्यावेळी पुत्र आणि पूत्री ची कामंना सामान्य रूपात केली जाईल. अशा प्रकारची समानता बौद्ध काळात निर्माण झाली होती.'[१२]

यावरून असे म्हणता येईल की बौद्ध काळात स्त्रियांना धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय अधिकार मिळाले. स्त्रियांना स्वातंत्र्य मिळाले म्हणून भारतीय स्त्रियांच्या उन्नतीचा काळ म्हणजे बौद्ध काळ होय असे म्हणता येईल.

स्मृती व पुराणकाळ : 'मनुस्मृति' हा हिंदुधर्माचा महत्त्वाचा ग्रंथ मानला जातो. मनुस्मृति ही तर 'स्त्री नींदेची गीता' म्हणावी. ती एक प्रकारची दंड संहिता आहे. एकूण १४ मनु होऊन गेले . या १४ मनूने प्रत्येक काळात वेगवेगळ्या प्रकारे आपले विचार मांडले व या सर्व मनूच्या या विचारांच्या सारालाच 'मनुस्मृति' असे विद्वान मानतात. या संहितेच्या दुसऱ्या अध्यायनातील १९३ व्या श्लोकात म्हटले आहे की पुरुषांच्या ठिकाणी अपवित्रता निर्माण करणे, हा स्त्रियांचा स्वभाव आहे.'[१३]

मनु म्हणतो की, 'पिता रक्षति कौमार्य,भ्राता रक्षति योवने श्रस्थविरे रक्षति पुत्र : न स्त्री-स्वातंत्र्य महर्ती' म्हणजेच बाल्यावस्थेत स्त्रीने पित्याच्या, तरुणपणी पतीच्या, आणि पतीच्या मृत्यूनंतर पुत्राच्या आज्ञेत अधीन होऊन राहावे अशा पद्धतीने स्त्रीला पूर्णतः निर्भर करण्यात आले. अशा प्रकारची अनेक बंधने स्त्रियांवर लादण्यात आली. स्त्रियांना या काळात विवाह करणे अनिवार्य ठरविण्यात आला. त्याच प्रमाणे जठरी कुमारीविवाह याच काळात होते म्हणजेच अगदी कमी वयाच्या मुलीचा जास्त मोठ्या वयाच्या मुलाशी विवाह लावून दिला जात असे.

Scanned by CamScanner

वडिलांनी अनुरूप नसलेल्या पुरुषाशी लग्न लावून दिले असले तरी स्त्रीने त्याला देव मानून त्याची सेवा करीत राहिले पाहिजे असा धर्मशास्त्राचा आदेश होता. उदाहरणात शंखलिखित म्हणतो, 'पती लैंगिक रोगाने पीडित अथवा नपुंसक असला; पतित म्हणजे महा घातक केल्यामुळे बहिष्कृत असला अंगहिन म्हणजे आंधळा; पांगळा इत्यादी प्रकारे अपंग असल्यास किंवा रोगी असला, तरी पत्नीने त्याचा द्वेष करू नये, कारण पती हा स्त्रियांच्या दृष्टीने देव असतो. मनुस्मृतीने म्हटले की, पती चरित्रहीन असला तरी स्त्री ने त्याची देवाप्रमाणे सतत सेवा करावी' परशुराम स्मृतीत म्हंटले की दरिद्री , रोगी व मूर्ख पतीचा मान राखू शकत नाही ती मृत्युनंतर सर्पीन बनते आणि पुन्हा पुन्हा विधवा होते.'[१४]

पहिली पत्नी हयात असताना दुसरी पत्नी करू शकत होता, मात्र पती कसाही असेल तर त्याचा त्याग करणे ही गोष्ट तिच्या कल्पनेपलीकडची होती. कोणत्याही स्थितीत स्त्रीला घटस्फोट घेण्याचा अधिकार नव्हता. उत्तर वैदिक काळात स्त्रीयांचा वारसा हक्क पूर्णपणे काढून घेण्यात आला. वंशपरंपरागत मालमत्तेवरील तिला कोणताही अधिकार उरला नव्हता. तसेच मालमत्तेचे सर्व अधिकार या काळात स्त्रियांकडून काढून घेण्यात आले असले तरीही पतीच्या गैरहजेरीत पत्नीला नेहमीचा खर्च करण्याचा अधिकार होता. मात्र स्थावर मालमत्ता ही ग्रामपंचायतीची किंवा मोठ्या अभिव्यक्त कुटुंबाची समजली जाई. पतीच्या मृत्यूनंतर पतीच्या मालमत्तेवर विधवेचा अधिकार नाकारला आहे. नंतरच्या काळात विष्णू व याज्ञवल्क्य धर्मशास्त्रकरांनी पुत्राच्या अभावी पतीच्या सर्व मालमत्तेवर पत्नीचा पूर्ण मालकी हक्क असावा असे म्हटले आहे. विधवेचा वारसाहक्क मान्य न करणाऱ्या मनुनी मातेचा वारसा हक्क मान्य केला आहे. तरी स्त्रीच्या वारसा विषयी परस्परविरोधी मते असल्याचे आपणास दिसते.

मध्ययुगीन काळात स्त्रियांचे स्थान : हा कालखंड म्हणजे दिल्लीला मुसलमान राज्यकर्ते झाले तेव्हापासून ते पेशवाई अखेर पर्यंतचा कालखंड होय' मध्ययुगीन काळात त्यांची स्थिती अतिशय वाईट झाली. आर्यांनी गैर आर्य स्त्रियांसोबत विवाह करायला सुरुवात केली. त्यातून स्त्रियांचा दर्जा खालावयास मदत झाली. मुलीचे लग्न कमी वयात करण्यामुळे त्याचा परिणाम मुलीच्या शिक्षण आणि संस्कृती वर झाला. स्त्रियांचे उपनयन संस्कार बंद झाले. विवाह बंधन हे जन्मो जन्मीचे कधीही न तुटणारे बंधन मानले जात. त्यामुळे पती कसाही असला तरी तो पुढील जन्मी मिळावा

Scanned by CamScanner

याकरिता कामना करीत असे. स्त्रीला विषाचा प्याला 'समजले जात होते. मनूने पतीला त्याच्या पत्नीवर संपूर्ण अधिकार गाजवण्याचा हक्क दिला. त्यातून पतिव्रता रहावे, पतीचा आदर करावा अशा गोष्टी पाळल्या जाऊ लागल्या. पुढे जाऊन मनूने म्हटल्याप्रमाणे पती कसाही असो, कितीही वाईट असो, त्याची देव मानून पुजा करावी अशा गोष्टी तात्कालीन समाजात रूढ झाल्या.'[१५]

इ.स. पूर्व ५०० ते १२०० या राजपूत काळात स्त्रियांचे पतन सुरूच होते. विवाहाचे वय खुप खालावले. मुलीच्या लग्नाचे वय आठ वर्ष आदर्श मांनण्यात आले आणि बालविवाहाची प्रथा रूढ झाली. काही वेळा तर अगदी लहानपणी पाळण्यात विवाह होऊ लागली. कमी वयात लग्न होण्याच्या कारणाने स्त्रियांच्याच काय तर पुरुषांच्या शिक्षणाचे प्रमाण कमी होऊन सामान्य लोकांमध्ये शिक्षण घेणे जवळजवळ थांबले. याच काळामध्ये पडदा पद्धती रूढ झाली आणि स्त्रियांची क्षेत्र घर, चूल आणि मूल इतके सीमित झाले. मुसलमानाच्या आक्रमणाने भारतातील स्त्रियांचा सामाजिक स्तर प्रभावित झाला. या आक्रमणामुळे देशातील स्त्रियांचा सामाजिक स्थर आणखी खाली खाली आला. तथा मुसलमानांच्या येण्यापूर्वी महिलांना समस्त अधिकारापासून वंचित करण्यात आले होते. परंतु स्त्रियांची स्थिती इतकी खालच्या स्तरावर गेली नव्हती. 'मुसलमानांमध्ये महिलांची संख्या कमी असल्याने ते येथील महिला आणि विधवा सोबत विवाह करण्याचा प्रयत्न करू लागले. त्यामुळे हिंदू धर्मातील ठेकेदारांनी समाजावर अधिक कठोर निर्बंध लावून महिलांना कुठल्याही क्षेत्रात स्वातंत्र्य दिले नाही किंवा ठेवलेली नाही .बालविवाह आणि पडदा पद्धतीचे पालन अगदी कठोरतेने होऊ लागले. विधवांची स्थिती कैद्याप्रमाणे झाली. महिलांना घराच्या बाहेर पडण्याकरिता नियंत्रणे लादण्यात आली. त्यामुळे शिक्षण घेण्यावर प्रतिबंध लादण्यात आले. रक्त शुद्ध रहावे याकरिता बालविवाह, पडदा पद्धती इत्यादी सामाजिक प्रयत्नांना चालना मिळाली.'[१६]

मध्ययुगीन काळात स्त्रियांचा दर्जा खूप खालावला होता. याच काळात अनेक वाईट चालीरिती अस्तित्वात असल्याचे दिसून येते. या अस्तित्वात असलेल्या चालीरिती च्या माध्यमातून स्त्रियांवर अनेक बंधने लादण्यात आली होती. स्त्री कडे फक्त एक उपभोगाची वस्तू म्हणून पाहिले जात होते. अशा प्रकारची वैचारिकता आणि मानसिकता समाजात दिसून येत होती. धार्मिक व सामाजिक, प्रथा, परंपरा च्या माध्यमातून अनेक बंधने लादली गेली होती आणि तिला या सर्व मानवी अधिकारापासून वंचित

Scanned by CamScanner

या काळात स्त्रियांची दयनीय अवस्था लक्षात घेऊन बऱ्याच समाजसुधारकांनी स्त्रियांच्या संदर्भात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. अशातच महात्मा ज्योतिबा फुले सारख्या ज्ञान सूर्याचा जन्म झाला आणि त्यांना साथ मिळाली त्यांची धर्मपत्नी सावित्रीबाई फुले यांची या दोघांनी सर्वप्रथम अस्पृश्य शिक्षण आणि स्त्री शिक्षणाचा बाबत जनजागृती घडवून आणण्याचे कार्य केले. यासाठी त्यांना समाजाचा तीव्र विरोध पत्करावा लागला मात्र त्यांच्या या अथक प्रयत्नांमुळेच आज वर्तमान काळातील चित्र एवढे बदललेले दिसते की, प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने किंबहुना काही ठिकाणी पुरुषापेक्षा पुढे स्त्रियांनी पावले टाकली आहेत. पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करण्याची क्षमता स्त्रीमध्ये निर्माण झालेली दिसून येत आहे. त्याचप्रमाणे स्त्री पुरुष समानता चे महत्व लक्षात घेऊन स्त्रियांना समान संधी उपलब्ध करून समाजातील स्त्रियांचा दर्जा उंचावला पाहिजे या दृष्टीने भारत प्रयत्नरत आहे.

संदर्भ ग्रंथ सूची

१. हर्डेकर मंजपा, बसवं दर्शन (मराठी) लेख संग्रह, पृ.८१.
२. चौधरी संदीप कुमार (२००६), शिक्षण आणि समाज योजना .पृ . क्र .५४.
३. बुद्धोत्तर कालीन भारतीय स्त्री डॉ. प्रतिमा बी. पखिडे - page 6
४. http://www.Jetir.org
५. घुर्ये सूर्यकांत, वीरशेव. व इतर धर्म आणि समाज, कोल्हापूर, २०००, .पृ . १६२
६. तत्रैव , .पृ . ३५
७. अनुसया लिमये, स्त्रीचे समाजातील स्थान आणि भूमिका, प्रकाशक - चिटणीस
१. समाजवादी महिला सभा, शनिवार पेठ, पुणे ३० ,.पृ . १२
८. मंगला सामंत, स्त्री पर्व, सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे ३०,पृ . ७४,७५
९. तत्रैव, .पृ. १४४
१०. बुद्धोत्तर कालीन भारतीय स्त्री डॉ. प्रतिमा बी. पखिडे - page 6
११. http: www.Jetir.org
१२. डॉ.सरोज आगलावे, ज्योतिराव फुले: सामाजिक तत्त्वज्ञान, सुगावा प्रकाशन, पुणे
२. ३०.पृ . ९३
१३. प्रा सौ माधवी कवी, महिला कल्याण आणि विकास-विद्या प्रकाशन नागपूर,पृ. ११
१४. Rita Sood.Changing Status and Adjustment of Women, Manak Publication , New Delhi,p.39
१५. मंगला सामंत, स्त्री पर्व, सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे ३०,पृ.७६
१६. तत्रैव, .पृ. ६०

❑❑❑

Scanned by CamScanner

SJIF Impact Factor: 8.33

ISSN 2230-7745

समाजशास्त्र संशोधन पत्रिका

वर्ष-४० / अंक-२७ / डिसेंबर, २०२२

संपादक
डॉ. राहुल भगत

कार्यकारी संपादक
डॉ. प्रियदर्शन भवरे

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

Scanned by CamScanner

अनुक्रमणिका

अ.क्र.	लेखाचे शीर्षक	लेखकाचे नाव	पृ.क्र.
१.	१९७० नंतरच्या महाराष्ट्रातील सामाजिक-राजकीय वास्तव...	संजयकुमार कांबळे	.. १
२.	महात्मा ज्योतीराव फुले यांची सामाजिक परिवर्तनाची चळवळ	सोमा गोंडाणे	.. ९
३.	मुंबईतील महिला पोलीस: भूमिका आणि ताण-तणाव	ज्योती पोटे	.. ११
४.	महिला सक्षमीकरण: एक समाजशास्त्रीय अभ्यास	व्ही. एन. कांबळे	.. १६
५.	गोंधळी जमातीची उत्पत्ती	मधुकर धुतुरे	.. २०
६.	भटक्या जमातींचे प्रश्न आणि समस्या	प्रभाकर गायकवाड	.. २४
७.	संविधानात्मक तरतुदी आणि आदिवासी महिलांच्या.....	रिटा मालचे	.. २८
८.	आदिवासी अस्मितेच्या संदर्भात स्वंयसेवी संस्थांची भूमिका	संजय चव्हाण	.. ३४
९.	शिक्षणाच्या खाजगीकरणाचा दुर्बल घटकावर पडलेला प्रभाव	दीपक पवार	.. ४०
१०.	कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक शोषण: एक सामाजिक	हिरालाल भोसले	.. ४४
११.	नागरिकांचे मुलभूत अधिकार आणि कर्तव्ये	जयमाला लाडे	.. ४८
१२.	अपंग आणि कुष्ठ बाधितांच्या सक्षमिकरणात आनंदवनचे योगदान	प्रवीण मुधोळकर	.. ५३
१३.	तुकडोजी महाराजांचे अंधश्रद्धा निर्मुलन विषयक विचारांचे....	शुभांगी मोहोड	.. ५८
१४.	जागतिकीकरण आणि कोरोना काळातील महिला.....	निर्मला वाघ	.. ६०
१५.	जागतिकीकरणाच्या विकासाचा तुलनात्मक अभ्यास	नंदलाल बर्डे	.. ६२
१६.	मोबाईलचा समाजावर झालेला परिणाम	नवनाथ खेत्री	.. ६४
१७.	गडहिंग्लज येथील हिरण्यकेशी पर्यावरण मंडळाची.....	सतीश धनवडे	.. ६९
१८.	लिंगभाव आणि कायदे	प्रज्ञा वेलेकर	.. ७२
१९.	समाज माध्यमाच्या विळख्यातील समाज	भगवान मनाळ	.. ७५
२०.	ग्रामीण महिलांच्या जमीन हक्क मागणी नंतरचे सामाजिक परिणाम	दीपक शिंदे	.. ८१
२१.	लॉकडॉऊन आणि कौटुंबिक हिंसाचार	पूनम गायकवाड	.. ८५
२२.	महात्मा फुले यांच्या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता	साहेबराव हिवाळे	.. ८९
२३.	बळीराजा चेतना अभियानाचे शेतकऱ्यांच्या जीवनावर व	संपत काळे	.. ९४
२४.	महिला उद्योजकता चळवळ आणि महिला सक्षमीकरण	सम्राट कसबे	.. ९८
२५.	भारतीय तरुणाई पाश्चिमात्य जीवनशैली आणि जबाबदार.....	नीलिमा सरप	.. १०४
२६.	समाज माध्यमाच्या विळख्यात मानवी जीवन	बिरादार प्रतिभा	.. १०८
२७.	भारतातील वृद्धांच्या समस्या	रामदास वैद्य	.. ११२
२८.	भारतातील स्त्रीयाप्रतींचा कौटुंबिक हिंसाचार	सुरेंद्र रोटे	.. ११४
२९.	कोविड १९: भारतीय स्त्रियांच्या संदर्भातील कौटुंबिक हिंसाचार	अर्चना कांबळे	.. ११७
३०.	पेसा कायद्याची अंमलबजावणी : एक समाजशास्त्रीय अध्ययन	श्रीनिवास पिलगुलवार शुभांगी भेंडे	.. १२०
३१.	भारतीय समाजव्यवस्थेत समतेचे महत्व	राजकुमार भगत	.. १२६
३२.	खुल्या कारागृहातील कैद्यांचा सुधारात्मक अभ्यास	विनोद खेडकर	.. १२९
३३.	आदिवासींच्या सामाजिक चळवळीत बिरसा मुंडा यांचे योगदान	रवींद्र विखार	.. १३४
३४.	प्रसार माध्यमे आणि समाज	अनिल गावंडे	.. १३८
३५.	भारतातील शेतकरी चळवळ: एक आढावा	रामेश्वर मोरे	.. १४०
३६.	बौद्धांच्या सामाजिक जाणिवा-डॉ. नलिनी बोरकर(पुस्तक परिचय)	प्रियदर्शन भवरे	.. १४३
३७.	मराठी समाजशास्त्र परिषदेच्या ३१ व्या अधिवेशनाचा अहवाल	नारायण कांबळे	.. १४६

Scanned by CamScanner

'पेसा' कायद्याची अंमलबजावणी: एक समाजशास्त्रीय अध्ययन

डॉ. श्रीनिवास पिलगुलवार, सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग प्रमुख, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा.
प्रा. शुभांगी भेंडे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, बल्लारपुर.

प्रस्तावना : अनुसूचित क्षेत्र अधिनियम १९९६ पेसा हा कायदा २४ डिसेंबर १९९६ रोजी अस्तित्वात आला. या कायदयाअंतर्गत देशातील एकुण दहा राज्यांचा समावेश होता. त्यामध्ये महाराष्ट्र, गुजरात, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, ओरीसा, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, राजस्थान, तेलंगाना या राज्यांना हा कायदा लागु आहे. तसेच महाराष्ट्र राज्यातील १३ जिल्हयांना हा कायदा लागु आहे. त्यामध्ये अहमदनगर, पुणे, ठाणे, पालघर, धुळे, नंदुरबार, जळगांव, अमरावती, यवतमाळ, नांदेड, चंद्रपुर व गडचिरोली यांना पेसा हा कायदा लागु आहे. हा कायदा अनुसूचित क्षेत्रातील आदीवासी लोकांशी संबधीत असून आदिवासी लोकांची संस्कृती, प्रथा, परंपरा यांचे जतन व संवर्धन करणे व ग्रामसभेच्या माध्यमातुन आदिवासींची स्वशासन व्यवस्था बळकट करणे हे या कायदयाचे प्रमुख सुत्र आहे. चंद्रपुर जिल्हयातील व तालुक्यातील ९६ गावात पेसा कायदयाची अमंलबजावणी होते. ७३ व्या घटना दुरूस्तीनुसार पंचायत एक्सटेन्शन शेडुल एरिया अंतर्गत ५० टक्के आदिवासी भाग असणाऱ्या क्षेत्रात ग्रामसभेला विशेष अधिकार देण्यात आले आहे. चंद्रपुर जिल्हयातील ५० आदिवासीबहुल भागाचा समावेश या कायदयात आहे. चंद्रपुर जिल्हयातील राजुरा ३३, जिवत ३२, कोरपणा तालुक्यातील ३१ ग्रामपंचायतीचा समावेश आहे.

पेसा कायदयाची अमलबजावनी: पाणी साठयाचे व्यवस्थापन, सामायिक जमिनीचा विकास करणे, सामायिक साधन संपदा व सामाजिक मालमत्ता विकसित करणे. गाव पातळीवरील तलावामध्ये मत्स्यबीज तयार करणे. खरेदी करणे. आदिवासींना त्यांच्या उदनिर्वाहासाठी व्यवसााय प्रशिक्षण केंद्रामार्फत प्रशिक्षण आयोजीत करणे. त्याचप्रमाणे सार्वजनिक स्वछतागृहे, गावामध्ये स्वछता राखणे, सांडपाण्याची व्यवस्था करणे, नविन गटारे बांधणे व त्याची देखभाल करणे, पिण्याच्या पाण्यासाठी सोय करणे. वन्य जीवन संवर्धन, जलसंधारण, पर्यटन, वण उपजीविका सामाजिक विकास वनीकरण पर्यटन स्थळांचा विकास करणे, नवीन झाडे लावणे. व जुन्या झाडांची देखभाल करणे, अतिकुपोषित बालकांचे प्रमाणे कमी करणे, बालविवाह यांच्यावर बंदी आणणे यावर मार्गदर्शन करणे, मुलींचे शिक्षणातील प्रमाण वाढविणे, वनजमीनीवर नव्याने होणारे अतिक्रमण थांबविणे, इत्यादी कामे ग्रमपंचायतीच्या गरजेनुसार घेतली जातात, पेसा अंतर्गत ग्रामपंचायतींना विशेष अनुदान रूपये उपलब्ध निधिपैकी २५ टक्के या प्रमाणात खर्च करावा.

विभाग ग्रामपंचायत विभाग योजनेचे कार्यक्षेत्र: अनुसुचित क्षेत्रातील पेसा गावे.

योजनेची कार्यपध्दती: या निधितुन संपुर्ण गावाचा विकास करण्यासाठी प्रामुखाने चार प्रकारची कामे आहे. पायाभुत सुविधा, वनहक्क अधिनियम व पेसा कायदयाची अमंलबजावणी, आरोग्य व स्वच्छता, शिक्षण. वनीकरण म्हणजे वन्यजीव संवर्धन वनजल संभारण वनतळी वन्यजीव पर्यटन व वनावर आधारित उपजिवीका अमलबजावनी.

१. ग्रामपंचायतीच्या खात्यात गावासाठी निधी उपलबध केल्या जातो. — ग्रामपंचायतीला आपल्या गावातील लोकसंख्येनुसार निधी मिळतो यासाठी ग्रामपंचायतीला एक वेगळे बॅक खाते उघडावे लागते, प्रत्येक वर्षाला ग्रमपंचायतीच्या खात्यात शासनाकडुन निधी जमा केल्या जातो, हा निधी वर्षाच्या सुरवातीलाच बॅकेत जमा केला जातो. जेणेकरून वर्षभरात गावाच्या विकासासाठी या निधिचा उपयोग करता येईल, हा निधी ग्रामतपंचायतीच्या येणाऱ्या सर्व महसुली गावासाठी आणि पांडया साठी लोकसंख्येच्या प्रमाणात वापरायचा असतो. ज्यामुळे सर्वांना लाभ मिळेल व कोणीही विकासापासुन वंचित राहणार नाही.

२. ग्रामसभेमार्फत निधीच्या खर्चाला मान्यता दिली जाते. — ग्रामपंचायतीच्या मिळालेल्या निधीतुन कोणती कामे करायची याचा निर्णय ग्रामसभा घेते, त्यामुळे विकासाचे निर्णय आणि त्याची अमलबजावणी झटकण केली जाते, मात्र तीन लाखापेक्षा जास्त खर्चाचे कामे असेल तर पंचायत समितीला प्रस्ताव पाठवुन मान्यता घ्यावी लागते, दरवर्षी ग्रामसभेमध्ये चार पैकी एका विषयाची निवड करून ती कामे वर्षभरात पुर्ण करायची आहे. आणि पुढच्या वर्षी उरलेल्या तीन पैकी एका विषयाची निवड करायची आहे. यामुळे आपल्या गावाचा विकास ग्रामस्थांना सगळया बाजुने करता येईल व सर्व गरजा गावातुन पुर्ण होतील अशा प्रकारची अमलबजावनी या कायदयात केलेली दिसुन येते.

नियोजनाचा आराखडा: निधीचा वापरा करण्याचे स्वातंत्र्य ग्रामसभेला असलयामुळे गावाचा पध्दतशिर नियोजन आराखडा तयार करण्याची जबाबदारी ग्रामसभेची असते. आराखडा दोन प्रकारे केला जातो, पुढच्या पाच वर्षात आपल्या ग्रामपंचायतीच्या विकास कसा व्हावा याचा दुष्टिक्षेप आराखडा आणि प्रत्येक वर्षी करायच्या कामाचा वार्षीक आराखडा, दरवर्षी दिनांक १ मे रोजी चा ग्रामसभेमध्ये वार्षिक आराखडयाला मान्यता द्यायची आहे. आणि हा आराखडा तयार करतांना प्रत्येक गावातील एक पाडयावरिल लोकांचा विचार होणे आवश्यक आहे. हयानंतर सर्वांच्या सहमतीने ग्रामपंचायतीचा आराखडा एकत्र केला जातो.

गावाच्या विकासासाठी विशेष स्वरूपाची कामे: गावाला मिळणाऱ्या थेट निधीतुन इतर योजनेखाली होणारी नेहमिची कामे वगळता काही विशेष स्वरूपाची कामे केली जाते, त्यामुळे गावाचा समतोल विकास होऊन गाव स्वावलंबी बनतो. कौशल्यवृध्दी रोजगार व उत्पनात वाढ, सार्वजनिक सुविधा जसे भात गिरणी, धान्य बॅक, दुरसंचार व दळणवळण सुविधांचे बळकटीकरण समुदायीक संसाधनाचे जतन व व्यवस्थापन, दुर्गम क्षेत्रामध्ये अतिरिक्त

Scanned by CamScanner

सुविधा कर्मचारी देणे, छोटे तलाव व खनिजे इत्यादीचे व्यवस्थापन सार्वजनिक वनहक्काचे उपक्रम गोन वनउपज यावर प्रक्रिया च्या सुविधा पर्यटनं विकासाचे उपक्रम नादुरूस्त सुविधांचे दुरूस्ती व पुनरूर्जीवन ग्रामपंचायत व ग्राम सक्षमीकरण.

विकासाच्या कामात गावातील लोकांचा पुढाकार व मदत: गाव विकासाचा आराखडा तयार करुन उत्तम दर्जाची कामे करण्यासाठी स्थानिक पातळीवरील स्थानिक संस्थांची मदत घेण्याचे स्वातंत्र्य असते. यासाठी कंत्राटी पध्दतीवर कर्मचारीसुध्दा न विचारता त्याचप्रमाणे गावातील समिती या गावांच्या विकास कार्यात मदत करतात. ग्रामसभेच्या मागणीनुसार विकास कामासाठी प्रशासकीय विभागांची अभियंता, तांत्रिक व्यक्तिंचे सहकार्य सुध्दा लागते.

खर्चाचा हिशोब: दरवर्षी गावाच्या निधीतून ही विकासाची कामे केली जातात त्याच्या हिशोबाची तपासणी आणि लेखाजोखा गावानेच करायचा असतो व संबंधित माहिती ग्रामपंचायतीच्या रजिस्टर व सूचना फलकावर जाहीर केली जाते यामूळे गावात विकासाच्या कामाबद्दल लोकांमध्ये विश्वास निर्माण होतो व गावाच्या विकासाच्या कामात सर्वांचे हातभार लागणे व मनापासून सहकार्य प्राप्त होते मात्र जर कामे यामध्ये गैरव्यवहार आढळून आला तर गावाला पुढच्या वर्षी निधी मिळणार नाही.

प्रोत्साहन निधी: या योजनेच्या पहिल्या वर्षी लोकसंख्येनुसार शंभर टक्के निधी ग्रामपंचायतींना मिळतो. मात्र दुसऱ्या वर्षापासून ५० टक्के निधी ग्रामपंचायतीच्या कामगारी नुसार देण्यात येतो. १०० टक्के निधी मिळवण्यासाठी काही अटी पूर्ण कराव्या लागतात. जसे गावातल्या कुपोषित मुलांचे प्रमाण कमी झाले पाहिजे. बालविवाह थांबले पाहिजे. मुलींची शाळेतून गळती कमी झाली पाहिजे. चांगल्या वरच्या अतिक्रमण कमी व्हायला हवेच. संपूर्ण कर वसूली झाली पाहिजे. इत्यादी अशा पध्दतीने ग्रामपंचायत उत्कृष्ट रीतीने काम करेल त्या ग्रामपंचायतीला प्रोत्साहनपर बक्षीस स्वरुपाने भेटते. यासाठी संपूर्ण गावाचा हातभार जरुरी आहे.

भारतामध्ये भारतीय राज्यघटनेनुसार आदिवासींना **'अनुसूचित जमाती'** अशा नावाने वर्गिकृत करण्यात आले आहे. या आदिवासी जमातीचे भारताच्या सर्व राज्यात कमी–अधिक प्रमाणात वास्तव्य असल्याचे आपल्याला दिसुन येते. २००१ च्या जनगनणेनुसार भारताची एकुण लोकसंख्या १०२.७ कोटी इतकी होती. आदिवासी जमाती भारताच्या सहा विभागामध्ये मुख्यत: आढळतात १) ईशान्यभारत २) हिमाचल पायऱ्याचा भाग ३) मध्यभारत ४) पश्चिम भारत ५) दक्षिण भारत ६) अंदमान –निकोबार प्रदेश. तसेच आदिवासी समुदायात भिन्न–भिन्न भाषांचा उपयोग केला जातो. भारतीय भाषांचा सखोल अभ्यासावरून भारतात आदिवासींना चार भाषिक विभागात विभाजित केले आहे.

"गिअर्सन यांच्या संशोधन अहवालनुसार भारतात एकुण १८० भाषा व ११६ बोलीभाषा आदिवासीच्या आहेत.भाषेच्या आधारावर भारतातील आदिवासीचे विभाजन खालिल प्रमाणे चार विभागात केले आहे.

१) **आर्य भाषिक समुह:** आर्य लोकांचे भारतात झालेल्या आगमनामुळे भारताच्या बऱ्याच मोठया प्रदेशावर भाषेचा प्रभाव पडला. त्यामुळे त्याच्या मुळ भाषेवरून आजच्या हिंदी, पंजाबी, बंगाली, गुजरात, मराठी, उडिया, आसामी ईत्यादी भाषा विकसित झाल्या आहेत. महाराष्ट्रातील वारली कातकरी ठाकुर तसेच मध्य भारतातील भिल्ल यांच्या भाषा या विभागात मोडतात.

२) **द्रविड भाषिक:** वायव्य व दक्षिण मध्य भारतात द्रविड भाषा बोलली जाते. कोरवा, थरावा, बडग, तोडा, कोटा, गई, गोंड इ. भाषा मुळ द्रविड भाषेतुन जन्मल्या आहेत.

बहुजन समाजाच्या राजकारणाबद्दलच्या अनास्थेबद्दल बाबासाहेबांनी अनेकदा खंत व्यक्त केली आहे. बहुजनांनी राजकीय वर्चस्व मिळवून आपला सर्वांगिण विकास साधावा अशी त्यांची मनोमन इच्छा होती.भारतामध्ये १९३० ते १९४० च्या दशकात इंग्रजी सत्ताधाऱ्यांनी 'तोडा आणि राज्य करा' या नीतीने जात—जमातवाद फोफावत असतानाही डॉ. बाबासाहेबांनी दलितांसाठी स्वतंत्र पक्ष स्थापन न करता दलित बहुजनांना समाविष्ट करणाऱ्या स्वतंत्र मजूर पक्षाची १५ ऑगस्ट १९३६ रोजी स्थापना केली. या संदर्भात प्राचार्य आर.के. क्षिरसागर यांनी तत्कालीन परिस्थितीचे वेधक वर्णन केले आहे. ते म्हणतात, "स्वतंत्र मजूर पक्ष हा जातीय वा विभागीय पक्ष मुळीच नव्हता. खरे तर या पक्षात दलित आणि समविचारांच्या शोषित हिंदू जाती एकत्रित येणे अपेक्षित होते. दलितांसहित सर्वच कष्टकरी लोकांच्या उद्धारासाठी या पक्षाचे कार्य होते. याच काळात जातीय शक्ती प्रबळ झाल्या. १९२५ साली उच्चवर्णीय हिंदूची राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही लढाऊ संघटना अस्तित्वात आली. १९३० साली मोहम्मद इकबाल यांनी मुस्लिमांच्या स्वतंत्र राष्ट्राचे समर्थन करणाऱ्या आणि पाकिस्तानच्या निर्मितीस प्रेरक ठरणाऱ्या द्विराष्ट्राचा सिद्धांत मांडला. मुस्लिम, शीख, ख्रिश्चन या सारख्या अल्पसंख्याक समाजांसाठी स्वतंत्र मतदारसंघ करण्यात आले. अशा जातीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीनिरपेक्ष, वर्गीय आधारावर स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली.जे कोणी या पक्षाचा तिकिटावर निवडणूक लढण्यास तयार असतील त्या सर्वांकरीता या पक्षाचे दार मोकळे आहे आणि त्यांना या पक्षाचा जो कार्यक्रम आहे, त्याकरिता कायदे कौसिलात कार्य करावे लागेल. अशी डॉ. बाबासाहेबांनी सुचना केली "ज्या वर्गाच्या (मजूर) हितसंबंधाना आमचा पक्ष महत्व देतो, त्याच वर्गाच्या उद्धारार्थ योग्य अशाच ध्येयधोरणांवर आमची श्रद्धा आहे.असे स्पष्ट वक्तव्य करतात: त्या काळीही जातीच्या, समाजाच्या नावावर राजकीय पक्षाची उभारणी न करता या देशातील समग्र कामगाराच्या, शोषितांच्या न्याय हक्कासाठी डॉ. बाबासाहेबांनी 'स्वतंत्र मजूर पक्षाची' स्थापना केली.कामगार भूमिहीन, शेतमजूर, आदिवासी, मागास जातीचे प्रश्न, त्याचप्रमाणे लोकशाही, नागरिक, ट्रेड युनियन हक्क वगैरे प्रश्नांवर या पक्षाच्या प्रचाराचा व आंदोनाचा भर होता.या बहुजन समाजात इतके दारिद्र्य होते की, त्यांना स्वातंत्र्यप्राप्तीपेक्षा उद्याच्या भाकरीची चिंता असायची. अशा वर्गाला डॉ. बाबासाहेबांनी एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. त्याद्वारे "अस्पृश्य व अस्पृयतेतर यांच्यामध्ये राजकीय बाबतीत तरी सहकार्य घडून येण्यास हा पक्ष उपकारक होईल". अशी डॉ. बाबासाहेबांना आशा वाटत होती.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

पद्दलित, गोरगरीब अशा श्रमजीवी वर्गाचे हितरक्षण व संवर्धन करणे हे या पक्षाचे मुख्य कार्य होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे की हिंदूस्थानातील बहुसंख्य लोकांना म्हणजे जवळजवळ शेकडा ८० टक्के लोकांना रात्रंदिवस काबाडकष्ट करून आयुष्य कंठावे लागते. कोट्यावधी लोकांना रक्ताचे पाणी करून देखील पोटाची खाडगी भरता येत नाही की, अंगभर वस्त्र मिळत नाही. जमीनदारी, मालगुजारी, खोती, तालुकदारी, सावकारी, इनामदारी, भांडवलशाही इत्यादी सारख्या ज्या जुलमी पद्धती देशात रुढझाल्या आहेत या पद्धतीमुळे केलेल्या कामाचा पूर्ण मोवदला शेतकरी किंवा मजूर यांच्या पदरात पडत नाही म्हणून देशातील ८० टक्के लोकांवरील होणारा जुलूम समूळ नष्ट करून त्यांचे जीवन सुखाचे करणे हेच खरे राजकारण होय.

सारांश :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाच्या माध्यमातून तत्कालीन राजकारणात दबदबा निर्माण करून काँग्रेस पक्षासमोर दुसरा बलाढ्य पक्ष म्हणून पर्याय निर्माण केला होता. त्या निवडणूकीत उभे केलेल्या एकुण अठरा उमेदवारांपैकी मुंबई विध ीमंडळासाठी तेरा तर केन्द्रीय प्रांत (सेन्ट्रल पॉव्हीन्स) व बेरारसाठी एक असे एकुण चौदा उमेदवार निवडून आले. दलित बहुजनांच्या राजकीय ऐक्याचे ध्येय समोर ठेवून अतिशय व्यापक दृष्टिकोनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विचार केलेला दिसतो. बहुजन समाजाला दडपणातून मुक्त करणे हेच संपूर्ण स्वातंत्र्य त्यांच्या डोळ्यासमोर होते.

संदर्भसूची :

(१) डॉ. जाधव नरेन्द्र, प्रज्ञासूर्य डॉ. आंबेडकर, समग्र वैचारिक चरित्र, ग्रंथाली प्रकाशन मुंबई, प्र.आ. २ फेब्रुवारी २०१४, पृ. २९८

(२) डॉ. अनाव्रत विनोद, नव–रिपब्लिकन आणि बहुजन वादाचे अंतर्द्वंद्व, सुगावा प्रकाशन पुणे, प्र.आ. ३१ जुलै २०१५, पृ. २५

(३) डॉ. लिंवाडे शरणकुमार (संपादक), रिपब्लिकन पक्ष वास्तव आणि वाटचाल, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि. पुणे, दिनांक २६ जानेवारी २००९, पृ. ५

(४) प्रा. धांडे भगवान एस., डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बहुजन समाज, कौशल्य प्रकाशन औरंगाबाद, पुनर्मुद्रण ६ डिसेंबर २००७, पृ. ९९, १०१, १२४, १२५

(५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई, प्र.आ. २५ डिसेंबर १९९३, पृ. ४९

(६) कोसारे एच.एल., विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास, नेहा प्रकाशन, गुरूनानकपूरा नागपूर–१७, द्वि.आ. २०१२, पृ. ३३२

(७) खरात शंकरराव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार, इंद्रायणी साहित्य प्रकाशन पुणे, दिनांक ६ मार्च २००८, पृ. १९

(८) डांगळे अर्जुन, आंबेडकरी चळवळीचे अंतरंग, लोक वाङ्मय गृह मुंबई, तृ.आ. नोव्हेंबर २००१, पृ. ५५

(९) गायकवाड प्रदीप (संपादक), कामगार चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निवडक भाषणे व लेख, क्षितीज पब्लिकेशन, लष्करीबाग नागपूर, आठवी आवृत्ती, २६ जानेवारी २०१६, पृ. २२

(१०) वैद्य प्रभाकर, महात्मा फुले आणि त्यांची परंपरा, लोक वाङ्मय गृह मुंबई, प्र.आ. ऑक्टोबर १९७४, पृ. १३१

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

A Proceedings of 2nd National Conference on

Buddhist Philosophy

-A Present Day Need

NCBP-2018

February 02-03, 2018

Chief Editor

Murlidhar G. Chandekar

Editors

Rajesh S. Jaipurkar

Ajay P. Deshmukh

Gajanan G. Muley

Vinod K. Nagale

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

BUDDHIST STUDIES CENTER

SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY

AMRAVATI-444602 MS INDIA

NCBP- 2018

Proceedings of 2nd National Conference on

BUDDHIST PHILOSOPHY

- A Present Day Need

February 02-03, 2018

ISBN 978-93-84021-75-7

Chief Editor

Dr. Murlidhar G. Chandekar
Hon'ble Vice-Chancellor
Sant Gadge Baba Amravati University, Amravati

Editors

Dr. Rajesh S. Jaipurkar
Hon'ble Pro-Vice-Chancellor
Sant Gadge Baba Amravati University, Amravati

Dr. Ajay P. Deshmukh
Registrar
Sant Gadge Baba Amravati University, Amravati

Dr. Gajanan G. Muley
Coordinator, Buddhist Studies Center
Assistant Professor, Department of Physics
Sant Gadge Baba Amravati University, Amravati

Mr. Vinod K. Nagale
Co-coordinator, Buddhist Studies Center
Assistant Professor, Department of Zoology
Sant Gadge Baba Amravati University, Amravati

Published by

Registrar
Sant Gadge Baba Amravati University
Amravati-444602, MS, INDIA

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Publishers assume no responsibility for the statements, opinions and subject matter advanced by contributors.

No part of this publication may be reproduced or utilized in any form or by any means without permission in writing from the publisher.

Marathi Section

Sr. No.	Title	Page No
32.	बौद्ध धम्माचे स्त्री विषयक विचार बाबुराव भिमराव जाधव	134-136
33.	महिला सशक्तिकरनाच्या अनुषंगाने बुद्धांचे कुटूंब विषयक विचार वेदप्रकाश डोणगावकर	137-140
34.	भगवान गौतम बुध्दाचे तत्वज्ञान व आक्रमक राष्ट्रवाद बि. डी. जामनेकर	141-143
35.	बुद्ध विचारधारा व वैचारिक लेखन स्वाती विठ्ठलराव चोरे	144-148
36.	बौध्द धर्मात स्त्रियांचे स्थान शिवप्रसाद पंजाबराव वायाळ	149-150
37.	विश्वशांतीसाठी बौद्ध धम्म राजेश व्ही. चौरपगार	151-154
38.	व्यावहारिक जिवनात - धम्मपद सुनिल रामभाऊ थोरात	155-156
39.	बौद्ध तत्वज्ञान काळाची गरज चंद्रशेखर लक्ष्मणराव कोरे	157-160
40.	BUDDHIST PHILOSOPHY OF PRESENT DAY -NEED सुरेश पी. आटोटे	161-163
41.	भारतातील बौद्ध धम्माचा इतिहास :एक चिकित्सक परिक्षण किशोर शेषराव चौरे	164-173
42.	बौद्ध धर्मांतील वैज्ञानिक दृष्टिकोन पांडुरंग गुलाबराव सवडदकर	174-177
43.	बुद्ध धम्म दीक्षा आणि स्त्रियांचे उत्थान कुंदन शहारे .	178-181

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

भारतातील बौद्ध धम्माचा इतिहास :एक चिकित्सक परिक्षण

किशोर शेषराव चौरे
इतिहास विभाग, म.ज्यो. फुले महाविद्यालय, बल्लारपूर, जि. चंद्रपूर
chaurekishor12@gmail.com
Mob.No. 8421884760

सारांश :

कोणत्याही राष्ट्राचा इतिहास हा त्याच्या वास्तविक इतिहासावर अवलंबून असतो. प्राचीन भारताच्या इतिहासाचे प्रत्येक कालखंडाचे अवलोकन केले तर एकसमान संस्कृती कधीच दिवस नाही. आर्याच्या आगमनानंतर भारतामध्ये जी अराजकता माजली होती त्यातून समाजाला बाहेर काढण्याचे काम तथागत गौतम बुद्धांनी केले. बुद्धाच्या समकालीन अनेक राजे होऊन गेले, त्या राज्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला. त्यानंतर ज्या–ज्या काळामध्ये बौद्धधर्मिय राजे होऊन गेले त्या–त्या काळात भारत देश उच्च शिखरावर, प्रगतीपथावर पोहचलेला होता. समाजात सुख, शांतता होती. तथागत बुद्धाच्या तत्वज्ञानाला ती राजे आदर्श मानत होती. अशा या प्रगत धम्माचा भारतातील इतिहास संशोधकाने प्रस्तुत शोधनिबंधात मांडण्याचा अल्पसा प्रयत्न केलेला आहे.

प्रस्तावना :

प्राचीन भारतीय इतिहासाचे जर वास्तव चित्रण करावयाचे असेल तर भारतात कोणतीही एकमेव व एकसमान संस्कृती कधीच नव्हती. [१] त्यासाठी इतिहासाला चार विभागात विभाजीत करून प्रत्येक कालखंडाचा सविस्तर अभ्यास करावा लागेल.

(१) अतिप्राचीन काळाचा भारताचा इतिहास.
(२) प्राचीन काळातील भारताचा इतिहास
(३) मध्ययुगीन भारताचा इतिहास
(४) आधुनिक भारताचा इतिहास

अशा रितीने विभाजन केल्यास प्रत्येक कालखंडाचा सविस्तर अभ्यास समजून येईल.

भारतात आर्याच्या आगमनापूर्वी श्रमण परंपरा अस्तित्वात होती. हे रावी नदी काठी मोहेंजोदडो आणि हडप्पा येथील उत्खननातून प्रकाशात आले.[२] यावरून इतिहासाचीच पान सांगतात की, "या भूमीचा इतिहास पाच हजार वर्षे इतका जुना आहे, सिंधु संस्कृतीतील लोकांनी पाच हजार वर्षापूर्वी खंदकांनी परिकृत दरवाजे असलेली मोठ्ठी शहरे बांधली. ते सुखी, समृद्ध व त्या काळी उत्कर्षाच्या परमोच्च शिखरावर होते. सोने, मौल्यवान दगड, गाई यांची अगणित संपत्ती जमवली होती. कला उच्च शिखरावर पोहोचली होती. व्यापाराचा विस्तार मेसोपोटेमिया पर्यंत गेला होता. ते नौकानयन जाणत असून त्यांनी बांधलेले धक्के (बंदरे) उत्खननात उपलब्ध झाले आहे. इतका वैभवशाली समृद्ध सिंधू संस्कृती निर्माण करणारे कोण होते? हडप्पा, मोहेंजोदडो सारखी संपन्न शहरे वसविणारे लोक कोणत्या वंशाचे होते हा प्रश्न स्वाभाविकच मनात येतो. उत्तर इतिहासाची पानच देतात ते होते द्रविड वंशी [३] आर्य आक्रमकांनी सिंधू संस्कृतीचं अपरिचित वैभव सहन झालं नाही आणि त्यांनी ते नष्ट केले व एक ग्रामीण नागरी संस्कृती लयाला गेली.

नाग संस्कृतीचा आणि बौद्ध संस्कृतीचा अतिशय निकटचा संबंध असल्याचे आता इतिहासकार मान्य करू लागले आहेत. तेव्हा बौद्धाच्या शासनाचा विचार तीन भागात करता येईल.

(१) बुद्धपूर्वकालीन राजे.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

(२) बुद्धकालीन राजे.

(३) बुद्धोत्तरकालीन राजे. (डहांट, धनराज, पृ. ६९)

भारतातील बौद्ध धम्माचा इतिहास :

खिस्तपूर्व सहाव्या शतकात भारत देशात सोळा 'महाजनपदे' नांदत होती. त्यापेकी महाजनपद अणि जनपदाचे, म्हणजे कृषिक वसाहतीचे, बनलेले होते. जुन्या वाङ्मयात या महाजनपदाची नावे येतात ती अशी (१) गांधार (२) कंबोज (३) असक (४) वत्स (५) अवंती (६) शूरसेन (७) चेदी (८) मल्ल (९) कुरू (१०) पांचाल (११) मत्स्य (१२) वज्जी (१३) अंग (१४) काशी (१५) मगध [४] यापैकी काशी, कोसल, मगध व वज्जी ही चार राज्ये महत्वाची होती. आपले राजकीय वर्चस्व स्थापन करण्यासाठी सुमारे शंभर वर्षे लढत होती. शेवटी मगध विजयी झाले व उत्तर भारतातील राजकीय घडामोडीचे केंद्र बनले.[५] मगधाचे प्रजाजन चातुर्वर्ण्य व याज्ञिक कर्मकांड पाळत नव्हते, म्हणून ब्राह्मणी ग्रंथ मगधाबद्दल तुच्छतेने बोलतात उलट बौद्ध ग्रंथ मगधाला फार महत्व देतात. बिंबिसार व अजातशत्रू हे मगधाचे राजे बुद्धाचे मित्र व शिष्य होते.[६] मगध राज्याची स्थापना ही बुद्धपूर्व काळात झाली व ते गणराज्यातील सोळावे राज्य होते.

ब्राह्मणांनी आपल्या श्रेष्ठत्वाच्या प्रस्थापनेसाठी काही मंत्राची रचना केली आणि त्या मंत्राद्वारे ते ब्राह्मणांची उत्पत्ती ब्रह्माच्या मुखातून, क्षत्रियांची बाहूंतून वैश्यांची मांड्यांतून व शूद्रांची उत्पत्ती ब्रह्माच्या पायातून झाली. असा प्रचार करू लागले. यामुळे ब्राह्मण सर्व वर्गाचे गुरु व सर्वश्रेष्ठ आहेत असे त्यांचे सांगणे होते.[७]

परंतु गौतम बुद्धानी आपल्या तत्वज्ञानातून ब्राह्मणी विचारधारेविरूद्ध सर्वप्रथम विद्रोह केला. बुद्धानी स्पष्ट सांगितले, मानवी जीवनांची उन्नती कुणी देव, दैव, नियती नव्हे तर माणूस करतो, बुद्धाचे तत्वज्ञान इतके प्रभावी होते की, ऋग्वेदाने 'पुरुषयुक्तां'तून सांगितलेला चातुर्वर्ण्य आणि जाती व्यवस्थाही लुळीपांगळी झाली. आपण आक्रमक वैदिक ब्राह्मणाच्या गुलामगिरीतून नागवंशी लोकांनी स्वत:ची सुटका करून घेतली. व बौद्ध धर्माचा स्वीकार केला. नुसता स्वीकारच केला नाही तर त्या धम्माचा प्रचार प्रसारही केला.[८] चातुर्वर्ण्य व्यवस्था नाकारून सर्व माणसे समान आहेत असं सांगणारे बुद्ध त्या काळात महान क्रांतीकारक ठरले.[९]

सिद्धार्थ, गौतम हा २८ वा बुद्ध आहे. त्याच्या आधी २७ बुद्ध झालेत. त्यांचा उल्लेख नहावंश व बुद्ध वंशामध्ये आहे. मात्र या बुद्धांचे कार्य सिद्धार्थ गौतमाच्या कार्याच्या तुलनेत गौण आहे. सिद्धार्थ गौतमाने विविध पायऱ्या पार करून भिक्खूपासून अर्हत, अर्हतापासून बुद्धत्वापर्यत पोहचलेला असा ज्ञानी धम्मधर व्यक्ती स्वत:मध्ये धम्माचे सर्व गुण आणि नियम पूर्णपणे उतरवलेले आहेत. असा धम्मधर, धम्मचक्र गतिमान करणारा तो बुद्ध याचा अर्थ श्रेष्ठ धम्म आहे. म्हणून बुद्धाने सुध्दा आनंदाला धम्मच उत्तराधिकारी आहे असे सांगितले होते. आधीच्या २७ बुद्धांनी सुध्दा धम्माचेच चक्र गतिमान ठेवण्याचा प्रयत्न केलेला होता. मात्र सिद्धार्थाने सर्व ज्ञानाचे एकत्रित आणि सुव्यवस्थित असे संकलन भिक्खूंसाठी २५० हून जास्त नियम इत्यादीची सुरचना केली. त्यांचे प्रमुख कार्य म्हणजे संघाची निर्मिती आणि जीवन मरणाच्या रहस्याचा उलगडा करणारे प्रतीत्य समुत्पादाचे सिद्धांत. हे काम सिद्धार्थ गौतम बुद्धाचे आहे. जगाचे कार्य कसे सुनियोजीत चालविता येईल यासाठी ते महत्वाचे आहे.[१०]

२७ बुद्धांचा काळ म्हणजे बुद्धाच्या आधी कमीत कमी २७००० वर्ष मागे नेतो. सिंधू नदीच्या काठी सापडलेल्या मोहेंजोदाडो, हडप्पा, लोथल, धोलविरा, कालींगन, मेहेरगढ या ७ शहरापैकी मेहेरगढ हे शहर सुनियोजित चांगले रस्ते, भिंती, कोठारे, कक्ष बांधलेले असे शहर होते. उत्खनन वैज्ञानिकांच्या मते हे शहर इस

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

पूर्व ७००० अर्थात आजपासून १०००० वर्षापूर्वीचे शहर सुनियोजित होते.[११] याचा अर्थ भारतामध्ये फार पूर्वी पासून बौद्ध संस्कृती अस्तित्वात होती. ज्याला नाग संस्कृती सुध्दा म्हणतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "भारताचा इतिहास म्हणजे ब्राह्मणवाद आणि बौद्ध धर्म यामधील संघर्षाचा इतिहास होय" दुसऱ्या शब्दात असेही मांडता येईल की, "भारताचा इतिहास हा क्रांती आणि प्रतिक्रांतीचाच इतिहास होय". "बौद्धधर्म हे क्रांतीचे तर ब्राह्मणवाद हे प्रतिक्रांतीचे प्रतिक आहे. बौद्ध धम्माची धुरा एकीकडे नागवंशीय चळवळीने आपल्या खांद्यावर घेतली होती तर दुसरीकडे ब्राह्मणवादाची धुरा ब्राह्मणवादी पुरोहितांनी आपल्या शिरावर घेतली होती. याचाच अर्थ असा की, नागवंशीय चळवळीतील नागपुत्र हे क्रांतीचे तर ब्राह्मणवादी चळवळीतील ब्राह्मण पुरोहित हे प्रतिक्रांतीचे प्रतीक होते.[१२]

प्राचीन भारतात नागवंशीय क्रांतीकारी चळवळीच्या माल्लीकेत शिशुनागा पासून बिंबिसार, महानंद, चंद्रगुप्त मौर्य, सम्राट अशोक, कुषाण, बृहदरथ, सातवाहन आणि हर्षवर्धन यांनी या चळवळीचे नेतृत्व केले. या उलट नंद, पुष्यमित्र शुंग, कण्व, आंध्र यांनी प्रतिक्रांतीच्या माल्लीकेतील चळवळीचे नेतृत्व केले.[१३]

बायबलमध्ये येशू ख्रिस्ताने स्वत:ला परमेश्वराचा खास पूत्र म्हणवून घेतले व जो कोणी त्याला मानणार नाही अशा व्यक्तिस आकाशातील देवांच्या राज्यात प्रवेश करता येणार नाही. तर महंमद पैगबराने ख्रिस्तापेक्षा एक पाऊल पुढे टाकले आहे. त्याने स्वत:ला अल्लाचा (परमेश्वराचा) प्रेषित किंवा दूत म्हणवून घेतले आणि तो सुध्दा शेवटचाच. त्यांच्यानंतर कोणीही ईश्वराचा प्रेषित असणार नाही किंवा होणार नाही. आणि म्हणून ज्या कोणाला संसारापासून मुक्ती हवी असेल व जन्नत (स्वर्ग) पाहिजे असेल त्याने महमंद पैगबरालाच मानले पाहिजे असे सांगितले. तर श्रीकृष्णाने येशू ख्रिस्त व महमंद पैगंबर ह्या दोघांपेक्षाही पुढे पाऊल टाकले आहे. ईश्वराचा पुत्र किंवा शेवटचा दूत वगैरे असे काही एक न म्हणवून घेता किंवा मी देव आहे असेही न म्हणवून घेता श्रीकृष्णाने स्वत:लाच परमेश्वर म्हणजेच देवाधिदेव (देवांचा देव) म्हणून घेतले आहे. यास्तव सर्वांनी केवळ त्याचीच पूजा करावयास पाहिजे. त्यालाच भजावयास पाहिजे म्हणजे सगळ्यांना मुक्ती प्राप्त होऊन स्वर्गलाभ होईल असे त्याने सांगितले.[१४] यांच्यासारखी भगवान बुद्धांनी अशी भूमिका कधीच घेतली नाही. बुद्ध हा साधासूधा मानव पूत्र असून तो शेवटपर्यंत साधा मनुष्यच राहिला व त्याने पद्दलित जनतेला आपल्या धर्माचे दरवाजे खूले केले. बुद्धानी जन्मत: अलौकिक असण्याचा आव आणला नाही, की अलौकिक चमत्कार करण्याची शक्ती आपल्या अंगी असल्याचे भासवून जनतेला केव्हाही पसरविले नाही. भगवान बुद्धाचा धर्म हा विचार व अनुभव यावर आधारलेला आहे.[१५] बुद्ध म्हणतो मी मुक्तिदाता नाही, मार्गदाता आहे. बुद्धानंतर जन्मास आलेले धर्म माणसाचे पाप माफ करण्याचा ठेका घेतात. मुर्ख जन्नतमध्ये पाठवितात. स्वर्गाचा किंवा जन्नतचा ठेका यांना दिलेला आहे अशा भ्रामक कल्पनाचे जंगलात माणसाला भटकट ठेवतात. पण बुद्धाने हा स्वर्ग किंवा जन्नत अस्तित्वात नाही असे सांगितले आहे.[१६]

भगवान बुद्धाने ज्ञान प्राप्त करून समाजाचा सखोल अभ्यास केला. समाजाला व माणसाला कशाची गरज आहे याचा विचार केला. भगवान बुद्धाने जो विचार जगासमोर मांडला त्याला मध्यम मार्ग म्हणतात.[१७] त्यावेळी बौद्ध धर्माची व्याख्या गौतम बुद्धाने शिष्यास सांगितली ती अशी 'बहुजनहिताय, बहुजनसुखाय, लोकनुकंपाय, देवमनुस्सानं आदिकल्याणं, मध्यकल्याणं, अंतिकल्याणम' बौद्ध धर्म हा बहुजन लोकांच्या हिताकरीता, सुखाकरीता त्यांच्यावर प्रेम करण्याकरीता आहे. ज्याप्रमाणे ऊस हा मुळातही गोड असतो, मध्येही गोड असतो व शेंड्यासही गोड असतो, त्याचप्रमाणे बौद्ध धर्म सुरूवातीलाही कल्याणकारक आहे, मध्येही कल्याणकारक आहे व शेवटीही कल्याणकारक आहे. या धर्माचा आदी, मध्य, अंत सर्व गोड, हितकारक व कल्याणकारी असे आहेत.[१८] बुद्धाने आपले विचार जगावर कधीच लादले नाहीत किंवा कोणावर कधीच सक्ती केलेली नाही. बुद्ध म्हणतो माझे विचार

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

आधी अनुभवा नंतर स्वीकारा.[१९] 'एहि पास्किको' म्हणजे या आणि पहा येथे अंधश्रद्धेला मुळीच वाव नाही तसेच धम्म हा 'ओपनायिको' म्हणजे प्रगतिशील आहे.[२०] अशी दुसऱ्या कोणत्याही धर्मात मनोविकासासाठी इतकी सखोल योजना आखलेली नाही.[२१] डॉ. बाबासाहेब म्हणतात, बौद्ध धर्म सोडून जगाच्या पाठीवर कोणताही धर्म घ्या. प्रत्येक धर्मानुयायी व त्याचे प्रमाण ग्रंथ तो धर्म ईश्वराने सांगितला आहे असेच प्रतिपादन करतात.[२२]

तथागत गौतम बुद्धाच्या महापरिनिर्वाणानंतर इ.स. पूर्व २३० मध्ये सम्राट अशोकांच्या राज्यकाळात बौद्ध धम्माला पुन्हा एकदा राजाश्रय लाभला. सम्राट अशोकाने संपूर्ण मानव जातीला न्याय, समता आणि बंधुत्वाचे अधिष्ठान प्राप्त करून देण्याकरीता भारतातच नव्हे तर संपूर्ण जगामध्ये बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार केला.[२३] सम्राट अशोकाच्या प्रयत्नाने जीझसचा जन्म झालेल्या ठिकाणी इसराईल येथील बेथेलहेम येथे बौद्ध धम्म पोहचला होता. नार्वे स्वीडनमध्ये स्तुपांचे अवशेष सापडलेत. युरोपमधील पुष्कळशा देशात उत्खननांमध्ये मूर्त्या सापडतात. अमेरिकेचा शोध कोलंबसने १५ व्या शतकात लावण्याच्या पुष्कळ आधीपासूनच ४ थ्या शतकातच चीनचे सुमारे ४०० भिक्खू फुशांगमध्ये राहत होते. फुशांग हे शहर अमेरिकेच्या कॅलिफोर्निया शहराजवळ आहे.[२४] त्या काळात बौद्ध धम्माच्या या मानवतावादी चळवळीला अगदी बहर आला होता. बुद्धाने हिंदूस्थानावरच नव्हे तर सर्व जगावर उपकार करून ठेवले आहेत. बौद्ध धर्माने ब्रह्मदेश, चीन, जपान, तिबेट, सयाम वगैरे देशांना नीतीचा मार्ग दाखविला.[२५] पण दुसरीकडे इथली सनातनी ब्राह्मणी धर्मव्यवस्था मात्र अशोकाच्या राजसत्तेवर चिडून गेली होती. कारण तथागत गौतम बुद्धाच्या यज्ञविरोधी, ईश्वराविरोधी, प्राणीहत्या विरोधी, आत्माविरोधी, कर्मकांडविरोधी तत्वज्ञानाला सम्राट अशोकांनी राजाज्ञेचे स्वरुप दिले. त्यामुळे ब्राह्मणी धर्माला घरघर लागल्यामुळे आपला धर्म वाचविण्याकरिता त्यांचा तडफडाट सुरू होता, पण सम्राट अशोकांच्या धम्मशासनापुढे त्यांचे काहीच चालत नव्हते.[२६] सम्राट अशोकाचे आदर्श इतके श्रेष्ठ होते की, ब्राह्मणांच कट कारस्थान सफल झाले नाही. सम्राट अशोकानंतर महेन्द्र कुणाल, जलौक दशरथ, संप्रती, शालिशुक, देववर्म, शधन्वन आणि शेवटचा मौर्य सम्राट बृहद्रथ या महान पराक्रमी व आदर्शवान अशोकाच्या वारसदारांनी हे साम्राज्य यशस्वीरित्या सांभाळले.[२७]

मौर्य वंश जो ब्राह्मणांनी या आशेने स्थापित केला होता की, ब्राह्मण धर्माला त्याच्या समृद्धीसाठी पूर्ण संधी मिळेल, त्यात ते निराश झाले, म्हणून ते प्रसिद्ध राजघराणे ज्याने भारताला प्राचीन जगतात महान राष्ट्र बनविले. ते लवकरच पुष्यामित्राने कपटीपणाने शेवटच्या मौर्य सम्राटाचा खून करून बळकावले. अशाप्रकारे ब्राह्मणांनी पुन्हा त्यांचा विशेषाधिकार गाजविला.[२८] या कटाचा मुख्य सुत्रधार योगगुरु पतंजलीने पुष्यमित्राला प्रोत्साहन देऊन त्याच्याकडून हे विश्वासघातकी पातक घडवून आणले. प्राचीन भारताच्या इतिहासात घडलेली ही एक षडयंत्रकारी घटना होय.[२९]

महर्षि पतंजलीच्या नेतृत्वाखाली पुष्यमित्र शुंगाला सत्तेच्या गादीवर बसवून ज्या प्रतिक्रांतीला सुरुवात झाली तिने सर्वप्रथम 'मनुस्मृती' ची रचना करून समाजरचनेची नव्याने प्रतिष्ठापना केली. ब्राह्मणत्वाचा गुणकर्माशी काहीही संबंध नसून तो केवळ ब्राह्मण कुळात जन्माला आल्याबरोबर संपत्ती प्रतिष्ठेचा उत्तराधिकारी बनतो, अशी 'मनुस्मृती'त व्यवस्था करून ठेवली.[३०] व येथूनच अस्पृश्यतेची बीजे पेरल्या गेली.

मौर्य सम्राटानी बौद्ध धम्माचा राजधर्म म्हणून मान्यता दिली. त्यामुळे तलवारी ऐवजी प्रेम, करुणा, मैत्री आणि अहिंसेच्या बळावर ते प्रजेच्या हृदयसिंहासनावर शासन करीत होते. त्याचवेळी मौर्य साम्राज्यात राज्य किंवा राष्ट्राची कल्पना मूळ धरू लागली आणि ही संकल्पना जर रुजली असती तर भविष्यात जे राष्ट्र उदयास आली असते. ते बौद्ध राष्ट्र म्हणूनच उदयास आले असते. नेमके हेच इथल्या ब्राह्मणी धर्मव्यवस्थेला नको होते.[३१] म्हणून बौद्ध राजवटीचा निःपात करण्यासाठी ब्राह्मण संचालकांनी वरील रक्तरंजीत क्रांती घडवून आणली. अशाप्रकारे चंद्रगुप्त मौर्यापासून ते सम्राट अशोक मौर्य, सम्राट अशोक मौर्य ते महेन्द्र मौर्य आणि महेन्द्र मौर्य ते बृहदरथ मौर्य

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

(बळीराजा) पर्यंत म्हणजे इ.स. पूर्व ३३० ते इ.स. पूर्व १८५ पर्यंत म्हणजेच जवळ जवळ १४५ वर्षापर्यंत जे सार्वभौम बौद्ध साम्राज्य होते त्या बौद्ध मौर्याच्या, बौद्ध साम्राज्याचा ब्राह्मण प्रणेता मनुद्वारा अंत झाला.[३२]

पुष्यमित्राने वैदिक धर्माला आश्रय दिला. वैदिक धर्मालाच ब्राह्मणधर्म किंवा वर्णाश्रमधर्म म्हणत. नंतरच्या काळात हिंदूधर्म असे नाव पडले. त्याच्या आश्रयामुळेच वैदिक हिंदुधर्माचे पुनरूस्थान झाले.[३३] त्यांनी साम, दाम, दंड, भेद या कुटनीतीचा वापर करून बौद्ध अनुयायांच्या सामूहिक कत्तली केल्या. शांती आणि संदाचाराची शिकवण देणाऱ्या बौद्ध–भिक्खूंचे अत्यंत अमानवीय पद्धतीने खून केलेत.[३४] एकेक बुद्ध भिक्खू पकडून मारण्याचा सपाटा चालविला होता. विश्वातून या धम्माचे उच्चाटन व्हावे या विचाराने त्याने बुद्ध भिक्खू मारणाऱ्यास सुवर्ण मुद्रा बक्षिसी म्हणून वाटल्या. बौद्ध विहार व मठ नष्ट केले. तरी विश्वांच्या पाठीवर त्यातील चेतनत्व देणारी सत्वशील समतावादी धारणा जिवंत असल्यामुळे न्यायप्रिय बुद्ध धम्म टिकून राहिला.

पुष्यमित्राने बृहद्रथाचा केलेला खून ही इतिहासकारांना अगदी साधी बाब वाटली, परंतु या देशाचा इतिहास नव्याने रचणारे इतिहास संशोधक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या घटनेला नवीन आयाम दिला. ते म्हणतात की, "बौद्धाच्या क्रांतीला दडपणारी ती प्रतिक्रांती होती. ती युगांतरकारी घटना होती. ती राज्यक्रांती फ्रान्सच्या राज्यक्रांतीपेक्षा मोठी नसली तरी तिच्या बरोबरीची होती. या क्रांतीने रक्तरंजित मार्गाने आणि कपटाने सांस्कृतिक बदल घडवून आणला. समतेच्या जागी विषतेची पायाभरणी केली".[३५]

पुष्यमित्र शुंगाने इ.स. पूर्व १८५ ते इ.स. पूर्व १५९ पर्यंत २६ वर्षे ब्राह्मणवादी विचारधारेनुसार राज्यकारभार केला. त्यानंतर त्यांचा मुलगा 'अग्निमित्र शुंग' याने इ.स. पूर्व १५९ ते इ.स. पूर्व १४५ पर्यंत, अग्निमित्र शुंगानंतर त्याचा मुलगा 'वस्तुमित्र शुंग' ने इ.स. पूर्व १४५ ते इ.स. पूर्व १३३ पर्यंत. अशाप्रकारे शुंग वंशाच्या ब्राह्मण राजवटीने इ.स. पूर्व १८५ ते इ.स. पूर्व १३३ पर्यंत म्हणजे जवळ जवळ ५२ वर्षे मगध राज्यावर ब्राह्मणवादी विचारधारेनुसार राज्यकारभार करून मगध राज्यातील बौद्ध संस्कृती पूर्ण नष्ट केली.[३६] याच काळात पुष्यमित्र शुंगाद्वारा मगधमध्ये केलेल्या रक्तरंजीत क्रांतीला शह देण्याकरीता ग्रीक राजा मिएँडर उर्फ मिलींद आणि बौद्ध भिक्खू नागसेन यांनी शुंगाची सत्ता समाप्त करण्यासाठी बौद्ध राज्यांच्या राजांची आघाडी निर्माण केली. व राजा मिलींदने मगध राज्यात रक्तरंजीत क्रांती करण्याच्या आणि मगधचे बौद्ध राज्याला उद्ध्वस्त करण्यामध्ये ज्या ज्या राज्यांच्या ब्राह्मण मनुवादी सहकार्य दिले होते त्या सर्वांवर हल्ला चढविला. त्यानंतर मगधवर आक्रमण केले. व वसुमित्र शुंग या शेवटच्या ब्राह्मण राजाचा पराभव करून मिलींदने मगध मध्ये इ.स. पूर्व १३३ मध्ये 'कनवल' नामक बौद्ध घराण्याची स्थापना केली.[३७] व बौद्ध संस्कृतीचे संवर्धन केले. बौद्ध राजा मिलिंदनंतर ७६ वर्षाच्या कालावधीत चार ग्रीक बौद्ध राजे होऊन गेले.

त्यानंतर इ.स. ७८–१०१ मध्ये कुशाण सम्राट कनिष्क यांनी बौद्ध धम्मासंबंधी अतिशय महत्वपूर्ण कार्य केले.[३८] त्याचे साम्राज्य चिनपासून भूमध्य सागरापर्यंत होते.[३९] कनिष्काने बौध भिक्षूसाठी अनेक स्तूप आणि विहार बांधले. चिनी प्रवाशांच्या मते कनिष्काने पुरुषपुरु येथे स्तूप बांधून येथे बुद्ध प्रतिमेची प्रतिष्ठापना केली.[४०] हा स्तूप चारशे फुट उंचीचा भव्य स्तूप बांधला होता. फाहियानने आतापर्यंत पाहिलेल्या स्तुपात कोणताच स्तूप कनिष्काने बांधलेल्या स्तुपाची भव्यतेत बरोबरी करू शकत नव्हता. सर्व जम्बुदीपात हा स्तूप भव्य आणि सुंदर आहे असे फाहियानने नमूद केले आहे.[४१] कनिष्क हा बौद्ध धर्माचा थोर प्रचारक होता. त्याने इतिहासातील महत्व, त्याने मिळविलेल्या विजयांपेक्षा बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी त्याने जे महान कार्य केले त्यावर अवलंबून आहे.[४२] त्याच्या काळात चतुर्थ बौद्धधर्म परिषद काश्मीरमध्ये श्रीनगरजवळ कुंडलवनात आयोजित केलेली गेली.[४३] व याच परिषदेत 'महायान' या नवीन धर्म पंथाचा उदय झाला. हा धर्म जगभर पसरला व अत्यंत लोकप्रिय झाला. महायान पंथीय

ISBN: 978-93-84021-75-7

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

बौद्ध धर्माचा जगभर प्रचार करण्यात कनिष्काचा फार मोठा वाटा आहे.[४४] त्याने सर्व जगात बुद्ध मूर्ती पोहचत केल्या. हाच इतिहासाचा निर्णायक आहे.[४५]

सम्राट कनिष्काबद्दल इतर पुढे त्यांचे म्हणतो, 'तथागताच्या महापरिनिर्वाणा नंतर भारतीय वर्णाने बौद्ध धर्माचा प्रचार देशाचा राजा झाला, त्याचे साम्राज्य खूप दूरवर पसरले होते. राज्यकारभारातून त्याला जेव्हा जेव्हा वेळ मिळत असे तेव्हा तेव्हा तो धम्मचर्चेचा अभ्यास करीत असे. परदेश तो विद्वान भिक्खूंना आपल्या राजधानीत बोलावून त्यांचा धम्माचे तत्त्वज्ञान शिकण्याविषयास सांगत असे.[४६] कुशाण साम्राज्याचा शेवट इ.स. २३० मध्ये झाला.[४७]

कुशाणानंतर गुप्त सत्तेवर आले. इ.स. ३०० च्या आसपासचा कालखंड हा गुप्तवंशाच्या कारकिर्दीचा आहे. गुप्त हे ब्राह्मण असून ते वैदिक धर्माचे कट्टर अनुयायी होते. त्यामुळे त्या काळात बौद्ध धर्माची मोठ्या प्रमाणात पिछेहाट होऊन वैदिक ब्राह्मणी धर्माचा प्रभाव वाढला.[४८] गुप्त काळातील बौद्ध तत्त्वज्ञांनी, पंडितांनी संस्कृत भाषेचा स्वीकार करून मूर्तिपूजा व भक्तिमार्ग यांचा अवलंब करून बौद्ध धर्म कसाबसा टिकून धरण्याचा प्रयत्न केला.[४९] स्कंदगुप्तापर्यंतचे गुप्तराजे ब्राह्मण धर्माचे होते, परंतु स्कंदगुप्तानंतरच्या तथागत गुप्त, बुधगुप्त, बालादित्य गुप्त यांनी बौद्ध धर्म स्वीकारल्याचे बौद्ध धर्मातील अहिंसातत्त्वामुळे परकीय आक्रमकांना, विशेषतः हुणांना तोंड देण्यास गुप्तसाम्राज्य असमर्थ ठरले.[५०] हुण लोकांच्या अगोदर शक आणि यूचि लोक हिंदुस्थानात आले. शकांनी पश्चिमेकडील सत्ता काबीज केल्या आणि शेवटी हिंदूधर्माच्या विश्वव्यापक स्वरूपाने आणि सिद्ध प्रभावाने विपुल जाऊन त्यांनी हिंदू धर्माचा स्वीकार केला आणि ते अल्पकालातच हिंदूधर्म झाले. हुण लोकांची अशीच अवस्था झाली. राजपुतान्यात स्थानिक झाल्यानंतर त्यांनी हिंदूधर्म स्वीकारला व अगदी थोड्या काळात ते हिंदूधर्म झाले. ज्या जमातीच्या किंवा कुलाच्या लोकांनी राज्ये स्थापन केली त्या लोकांना ब्राह्मणांनी हिंदूधर्मात सहजासहजी घेतले व त्यांना क्षत्रिय किंवा राजपूत नाव दिले.[५१]

तथागत गौतम बुद्धाच्या महापरिनिर्वाणानंतर प्राचीन भारतातील महान बौद्ध सम्राट हर्षवर्धन होय. सम्राट हर्षवर्धनचा कार्यकाल इ.स. ६०६ ते ६४७ होय. त्याने अशोकासारखे आदर्श राजपद निर्माण केले होते. 'सम्राट हर्षवर्धनाचे बुद्ध धम्माच्या सर्व पवित्र ठिकाणी संघाराम बांधले,[५२] तो दर पाच वर्षांनी प्रयागास एक मोठा मोक्ष दानाचा दरबार भरवीत असे व आपल्या खजिन्यातील सर्वस्व दान करून स्वतः भिक्षुची वस्त्रे धारण करी. राजा बौद्ध श्रमणांचा इतका मान देतो हे या पाखंडी ब्राह्मणांना आवडले नाही. कट रचून श्रीहर्षाचा खून करण्याचा प्रयत्न केला. परंतु हर्षवर्धन त्यातून बचावला. या कटात पाचशे विद्वान ब्राह्मण होते,[५३] त्या घटनेच्या कारस्थानाच्या परिणाम स्वरूप पाचशे ब्राह्मणांना साम्राज्यातून बाहेर हाकलण्यात आले.[५४]

हर्षवर्धन तो आपल्या साम्राज्यातील भिक्खूंची एक सभा बोलावीत असे आणि चर्चासत्र सुरू असताना तीन आठवड्यापर्यंत त्यांना चार प्रकारचे दान करीत असे, चर्चेमध्ये भाग घेणाऱ्या भिक्खूंत जर एखादा खरोखरच विद्वान भिक्खू असला आणि तो विनयाप्रमाणे आचरणात आणि तत्त्वशुद्ध विचारात इतरांपेक्षा विशेष तेजस्वी असला तर सम्राट स्वतः त्याला आपल्या सिंहासनावर बसवीत असे आणि त्याच्याकडून धम्मदान घेत असे,[५५] हर्षवर्धनने धार्मिक वादविवादासाठी कनौज येथे एक सर्व धर्मपरिषद बोलाविली. या परिषदेला चिनी प्रवासी ह्यूएनत्संग हजर होता. ह्यूएनत्संग एक बौद्ध विद्वान होता. 'हिम्मत असेल तर ह्यूएनत्संगशी वादविवाद करून त्याची बौद्ध मते खोडून काढावीत आणि त्यास हरवावे' असे हर्षवर्धनाने आव्हान दिले, पण ह्यूएनत्संगला विरोध करण्यास पुढे कुणीही आला नाही. हर्षवर्धनाने अनेक प्रकारे बौद्ध धर्माला उत्तेजन देणे सुरू केले. बौद्धविहार, चैत्य व स्तूप बांधले. अहिंसेला महत्त्व देऊन बौद्धमताचा धुमधडाक्याने प्रचार सुरू केला. म्हणून त्याला 'दुसरा अशोक' असेही म्हणतात.[५६] प्राचीन भारताचा शेवटचा बौद्ध सम्राट म्हणून हर्षवर्धनाचा उल्लेख करता येईल.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

ISBN: 978-93-84021-75-7

ब्राह्मणांनी बौद्ध संस्कृती नष्ट करण्यासाठी राजपूतांना हाताशी धरले आणि जेथे जेथे राजपूत शासक बनले तेथे तेथे बौद्ध आज्ञापत्र फाडण्यात आले आणि हिंदूची मंदिरे उभारली.[५६] प्रबोधनकार ठाकरे लिहितात की, दुसऱ्या तिसऱ्या शतकापर्यंत हिंदुजगात व हिंदूस्थानात देवळे घुसलेली नव्हती. इ.स. ७–८ च्या शतकात भिक्षूकशाहीचे उद्धारक आद्य शंकराचार्य यांचा अवतार झाला. त्यांनी राजपूतांच्या पाठबळाने बौद्धांच्या भयंकर कत्तली करविल्या. ठिकठिकाणाच्या बौद्ध विहारातल्या पवित्र वस्तूंचा आणि बौद्ध मूर्तीचा उच्छेद केला. आणि तेथे शंकराच्या पिंड्या आपल्या कित्येक ठिकाणी तर बुद्धाचे मूर्तीनाच थोडा बहुत फरक करून शंकराचे मूर्तीचा बाप्तिस्मा दिला. उरल्या सुरल्या बौद्धाना देशोधडीला लावले. अशारितीने हिंदुस्थानात हिंदू समाजात अगदी पहिल्यानेच आद्य शंकराचार्यांनी अस्पृश्यता निर्माण केली.[५७] दहाव्या शतकाच्या शेवटपर्यंत बौद्ध धर्म खऱ्या अर्थने भारतातून बाहेर हाकलला गेला. पुढे बौद्ध संस्कृती नष्टठ करण्याचे काम राजपूतानंतर आरूढ झालेल्या मुस्लिम शासकाने पूर्ण केले.[५८] त्यांनी बऱ्याच भिक्खूंची कत्तल केली. काही उरलेल्या भिक्खूंनी देशांतर केले. त्यामुळे बौद्ध अनुयायांना आपण कोणाचे अनुसरण करावे ते कळेनासे झाले. बौद्ध अनुयायी अंध:कारात चाचपडत होते. बौद्ध अनुयायांना मार्गदर्शक उरले नसल्यामुळे पुढे बरेच बौद्ध हिंदू धर्मात विलीन झाले.[५९] तसेच ज्या प्राचीन बौद्ध विद्यापीठाची देश–विदेशात ख्याती होती. त्याकाळी भारत हा शिक्षण, ज्ञान आणि विज्ञानाचे केंद्र बनला होता. त्या तक्षशिला, नालंदा, विक्रमशीला, वल्लभी, उदन्तपुरी, जगद्दल या जगप्रसिद्ध भारतातील बौद्ध विद्यापीठानी स्वत:च्या कर्तुत्वाचा इतिहास निर्माण केला होता. तो या मुस्लिम आक्रमकांनी नष्ट केला. व तलवारीच्या बळावर मुस्लिम धर्माचा प्रसार केला. अशारीतीने भारतातून बौद्ध धर्म लुप्त झाला.

निष्कर्ष :

मुस्लिमांच्या आक्रमणामुळे भारतातून बौद्ध धम्म नष्ट झाला असला तरी भारताबाहेरील अनेक देशात बौद्ध धम्म टिकून होता.

सम्राट अशोक, सम्राट कनिष्क, सम्राट हर्षवर्धन, सम्राट मिलिंद अशा बौद्ध सम्राटांनी बुद्ध तत्वज्ञानावर आधारीत जी समाज आणि राज्यव्यवस्था निर्माण केली, ती उच्चकोटीची होती. इथल्या उच्चवर्णीयांनी बौद्ध धम्माचे उच्चाटन केले नसते तर आजही भारत देशाचे स्थान जगात सर्वोच्च दिसू शकले असते.

भारतातून संपूर्णपणे हद्दपार झालेला असा भारत निर्मिती प्राचीन काळात लाभलेल्या समृद्धावस्थेतील बौद्ध धम्म आदरणीय भिक्खू महास्थवीर चंद्रमणी यांच्या हस्ते नागपूर येथे १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारून या धम्माचे पुनरूज्जीवन केले.

आज जागतिक परिस्थिती बघितली तर, जगामध्ये दहशतवादाने व भारतामध्ये जातीयवादाने रूप धारण केले आहे. भोगवाद वाढलेला आहे. अशा या भोगवादातून बौद्ध धम्मच माणसाला योग्य दिशा देऊ शकतो.

संदर्भसूची :

१) गायकवाड डॉ. महेन्द्र, 'मा. कांशीराम यांचे धम्मकार्य',नेहा प्रकाशन, नागपूर, प्र.आ. ३ अक्टूबर २०१४,पृ. १

२) जाधव आर.डी., 'बौद्ध धर्माचे भारतीय संस्कृतीला योगदान', सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ. नोव्हेंबर २०१२, पृ. ८

३) दैनिक सम्राट, गुरुवार दिनांक ६ डिसेंबर २००७, पृ. १३

४) प्रा.डी.एन. झा,'प्राचीन भारत ऐतिहासिक रुपरेषा',अनुवाद मा.कृ. पारधी, के.सागर पब्लीकेशन, पुणे, पृ. ७१

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

५) प्रा.डी.एन. झा,'प्राचीन भारत ऐतिहासिक रुपरेषा', अनुवाद मा.कृ. पारधी, के. सागर पब्लीकेशन, पुणे, पृ. ७३

६) प्रा.डी.एन. झा,'प्राचीन भारत ऐतिहासिक रुपरेषा', अनुवाद मा.कृ. पारधी, के. सागर पब्लीकेशन, पुणे, पृ. ७१

७) डॉ. नरेन्द्र जाधव, 'प्रज्ञासूर्य डॉ. आंबेडकर', पृ. ६९६

८) दैनिक सम्राट, गुरुवार दिनांक ६ डिसेंबर २००७, महापरिनिर्वाण दिन विशेषांक २००७, पृ. १३

९) सुरवाडे दिलीप (संपा.), 'धर्मांतरच का?', लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. १४ एप्रिल २००८, पृ. मनोगतातून

१०) डॉ. परम आनंद, 'बौद्ध व्यक्तिची परिभाषा', प्रकाशक प्रदीप गायकवाड, समता प्रकाशन, दीक्षाभूमी संदेश, लष्करीबाग, नागपूर, स.आ. ११ ऑक्टोबर २०१६, पृ. ३०

११) डॉ. परम आनंद, 'बौद्ध व्यक्तिची परिभाषा', प्रकाशक प्रदीप गायकवाड, समता प्रकाशन, दीक्षाभूमी संदेश, लष्करीबाग, नागपूर, स.आ. ११ ऑक्टोबर २०१६, पृ. ३०

१२) आवळे दीक्षित, 'नागवंशीय—आंबेडकरी चळवळीत महाराचे योगदान', पृ. ४०

१३) आवळे दीक्षित, 'नागवंशीय—आंबेडकरी चळवळीत महाराचे योगदान', पृ. ४०

१४) तागडे श्याम, 'बोधिसत्व आंबेडकरांचे बुद्ध धम्म मिशन', प्रज्ञा मैत्री प्रतिष्ठान, नागपूर, पुनर्मुद्रण आ. २०१५, पृ. १३, १४

१५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, 'जगाला बौद्ध धर्माशिवाय तरणोपाय नाही', संपादक चं.पु. इलमे गुरुजी, नेहा प्रकाशन, नागपूर, आ. २१ ऑक्टोबर २०१७, पृ. ५, ६

१६) गुरु गोपाळ चक्रनारायण, 'बौद्धमंय जगत का संदेश', पृ. २७

१७) गुरु गोपाळ चक्रनारायण, 'बौद्धमय जगत का संदेश', पृ. ४४

१८) डॉ. प्रकाश खरात (संपा.), 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे', खण्ड—१, पृ. ५८

१९) गुरु गोपाळ चक्रनारायण, 'बौद्धमय जगत का संदेश', पृ. ५२

२०) मोरे मा.श., 'महाराष्ट्रातील बुद्धधम्माचा इतिहास', पृ. ७०

२१) डहाट डॉ. धनराज, पृ. २२०

२२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, 'लेखन आणि भाषणे', खण्ड—१८, भाग ३, प्रकाशक डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र—साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, प्र.आ. १५ ऑक्टोबर २००२, पृ. ४३९

२३) बाभळे बाबाराव, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या चळवळीचा दृष्टिकोण', समता सगर प्रकाशन, नागपूर, प्र.आ. १४ ऑक्टोबर २०१६, पृ. ३

२४) डॉ. परम आनंद, 'भारत लेणी संवर्धन समिती', बौद्ध व्यक्तिची परिभाषा, पृ. ३०

२५) मनोहर पाटील, 'फुले—आंबेडकरी चळवळीचे क्रांतीशास्त्र', पृ. २४६

२६) बाभळे बाबाराव, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या चळवळीचा दृष्टिकोण', समता सगर प्रकाशन, नागपूर, प्र.आ. १४ ऑक्टोबर २०१६, पृ. ३

२७) बाभळे बाबाराव, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या चळवळीचा दृष्टिकोण', समता सगर प्रकाशन, नागपूर, प्र.आ. १४ ऑक्टोबर २०१६, पृ. ३

२८) स्वामी धर्मतीर्थ, अनुवादक शशिकांत हुमणे, 'हिंदू साम्राज्यवादाचा इतिहास', सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ. मे २०१२, पृ. ८६

ISBN: 978-93-84021-75-7

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

२९) बाभळे बाबाराव, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या चळवळीचा दृष्टिकोण', समता सगर प्रकाशन, नागपूर, प्र.आ. १४ ऑक्टोबर २०१६, पृ. ४
३०) धनराज डहाट, पृ. ५५
३१) धनराज डहाट, पृ. ५
३२) मून, 'धम्मानुगामी कांशी/माया' पृ. २५
३३) मा.म. देशमुख, 'प्राचीन भारताचा इतिहास', पृ. १६०
३४) बाभळे बाबाराव, पृ. ६
३५) डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, 'अस्पृश्य मूळचे कोण?', प्रकाशक प्रदीप रोडगे, लष्करीबाग, नागपूर, द्वि. आ. २०१३–१४, पृ. १४७
३६) मून, 'धम्मानुगामी कांशी/माया', पृ. २६
३७) मून, 'धम्मानुगामी कांशी/माया', पृ. २७
३८) बाभळे बाबाराव, पृ. ६
३९) गुरु गोपाळ चक्रनारायण, पृ. ३४
४०) सपकाळ प्रभा, 'भारताचा इतिहास', पृ. २६२
४१) मोरे मा.श., 'बुद्ध धम्माचे संदेशवाहक' भाग–१, तीन चिनी प्रवासी, कौशल्य प्रकाशन औरंगाबाद, च.आ. ९ एप्रिल २००६, पृ. १५
४२) सपकाळ प्रभा, 'भारताचा इतिहास', पृ. २६८
४३) बाभळे बाबाराव, पृ. ६
४४) सपकाळ प्रभा, 'भारनाचा इतिहास', पृ. २६८
४५) गुरु गोपाळ चक्रनारायण, 'बौद्धमय जगत का संकेत', पृ. ३४
४६) मोरे भा.श., 'बुद्ध धम्माचे संदेशवाहक' भाग–१, तीन चिनी प्रवासी, कौशल्य प्रकाशन औरंगाबाद, च.आ. ९ एप्रिल २००६, पृ. ५०
४७) बाभळे बाबाराव, पृ. ६
४८) बाभळे बाबाराव, पृ. ६
४९) सपकाळ प्रभा, शब्बीर एस., मार्डीकर मदन, 'भारताचा इतिहास', एस. चांद अॅन्ड कंपनी लि. दिल्ली, प्र. आ. १९९४, पृ. २९५
५०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, 'शुद्रपूर्वी कोण होते?' प्रबुध्द भारत प्रकाशन, नागपुर–१७, २४ ऑक्टोबर २०१२, पृ. १९७
५१) मोरे मा.श., 'तीन चीनी प्रवासी', पृ. ६५, ६६
५२) आचार्य धर्मानंद कोसंबी, 'भारतीय संस्कृती आणि हिंसा', कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, द्वि.आ. २४ जून २०१३, पृ. १४०, १४१
५३) (स्वामी धर्मतीर्थ, अनुवादक शशिकांत हुमणे, 'हिंदू साम्राज्यवादाचा इतिहास', पृ. ८९
५४) मोरे मा.श., पृ. ६६
५५) देशमुख मा.म., 'प्राचीन भारताचा इतिहास', पृ. २२६
५६) स्वामी धर्मतीर्थ, अनुवादक शशीकांत हुमने, 'हिंदू साम्राज्यवादाचा इतिहास', पृ. ८२

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

५७) प्रबोधनकार ठाकरे के.सी., 'देवळाचा धर्म आणि धर्माची देवळे', कौशल्य प्रकाशन औरंगाबाद, दुसरे पुनर्मुद्रण १९ फेब्रुवारी २०१४, पृ. १२, १३

५८) स्वारी धर्मतीर्थ, अनुवादक शशीकांत हुमणे, 'हिंदू साम्राज्यवादाचा इतिहास', पृ. ८२

५९) मोरे मा.श., 'महाराष्ट्रातील बुद्धधम्माचा इतिहास', पृ. ११७

❋❋❋

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

ISBN: 978-93-84021-75-7

5.1

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL
October-2019 Special Issue – 201(B)

Nature Resources Based Sustainable Development
With Special Reference to Tribal Community Rights



Guest Editor :
Dr. N. K. Phadke
Principal
Dr. S. D. Devsey Arts College & Commerce & Science College, Wada,
Dist. Palghar (M.S) India

Executive Editors -
Dr. Dilip Telang
Dr. Surendra Khandekar
Dr. Rajendra Mane
Mr. Anup Pansare

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-2019 Special Issue – 201(B)

Nature Resources Based Sustainable Development
With Special Reference to Tribal Community Rights

Guest Editor :
Dr. N. K. Phadke
Principal
Dr. S. D. Devsey Arts College & Commerce & Science College,
Wada, Dist. Palghar (M.S) India

Executive Editors -
Dr. Dilip S. Telang
Dr. Surendra Khandekar
Dr. Rajendra S. Mane
Mr. Anup Pansare

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 800/-

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 201(B) : Nature Resources Based Sustainable Development With Special Reference to Tribal Community Rights
ISSN :
October-2019

Editorial Board

Chief Editor -
Dr. Bharat T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. [illegible], Nashikroad (English)
Dr. [illegible], Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. [illegible], Goa (Konkani)

Co-Editors -
- **Prof. Mohan S.** - Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva** - Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju** – Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath**- Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.] India**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**

Advisory Board -
- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

Review Committee -
- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali** , HOD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

Published by –
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, **Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
Email : swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

fficiating Principal
ahatma Jyotiba Fule
avidyalaya, Ballarpur

अनुक्रमणिका

अ.क्र.	शीर्षक	लेखक / लेखिका	पृष्ठ क्र.
	मराठी विभाग		
1	पालघर जिल्ह्यातील आदिवासींच्या शाश्वत विकासातील आदिवासी सेवा मंडळाचे योगदान	डॉ.बळीराम चव्हाण	5
2	दळणवळणाच्या साधनात मागरी मार्गाचे महत्त्व	डॉ.एस.एल.म्हात्रे	16
3	वाढत्या शहरीकरणामुळे आदिवासी समाजावर होणाऱ्या दुष्परिणावर भाष्य करणारे नाटक : 'राणी माशी'	डॉ. संदिप बनसोडे व सुनील कांबळे	19
4	आदिवासी जमातीच्या हक्क आणि अधिकारासंदर्भात आंवेडकरी चळवळीची भूमिका	सुनिता सावरकर	23
5	आदिवासी समुदायाच्या शाश्वत विकासात कला, लोकसाहित्य, नृत्य, लोकगीते, पर्यटन, विज्ञान आणि तंत्रज्ञानाची भूमिका	प्रा. उद्धव खोमणे	27
6	आदिवासी समाज आणि शिक्षण	डॉ.व्ही.पी.फाळके	34
7	आदिवासी वर्गाच्या विकासाचे प्रयत्न	डॉ. वासुदेव डोंगरदिवे	38
8	तारपा वाद्याचे अस्तित्व : एक चिकित्सक अभ्यास	डॉ. विनोद सोनवणे	43
9	समाज माध्यमांचा पालघर जिल्ह्यातील आदिवासी जीवनावर पडलेला प्रभाव : एक भौगोलिक अभ्यास	श्री. विशाल सोनकांबळे व श्री. मुकेश कुलकर्णी	48
10	सहकारातून आदिवासी समुदायाचा शाश्वत विकास	सौ.योगिनी पाटील	54
11	आदिवासी जमातींच्या शाश्वत विकासात आदिवासी लोकसंस्कृतीची भूमिका	प्रा. कैलास कळकटे	58
12	आदिवासींच्या हक्कांच्या संदर्भात 'निसर्ग संसाधन आधारीत शाश्वत' आदिवासी धोरणे व त्यांची अंमलबजावणी	डॉ. रवींद्र घागस	62
13	महादेव कोळी जमातीच्या स्त्रियांची आर्थिक स्थिती – विशेष संदर्भ –देगलूर तालुका	स्वप्ना संगमवर	68
14	पर्यटक निघाले आदिवासींच्या भेटी करिता	डॉ. सौ. हेमलता मुकणे	73
15	कृषी पर्यटनातून आदिवासी लोकांचा चिरस्थायी विकास विशेष संदर्भ : पालघर जिल्हा	डॉ. जयवंत पाटील	79
16	आदिवासींच्या विकासात शासकीय योजनांचे योगदान	डॉ. ज्योती पोटे	83
17	महाराष्ट्रातील आदिवासींचे वैविध्यपूर्ण नृत्य प्रकार	डॉ. ज्योती रामोड	92
18	सेंद्रीय शेती काळाची गरज	श्री. कांतीलाल पाटील व डॉ. अनिल पाटील	96
19	आदिवासी स्त्री सक्षमीकरण : सामाजिक स्थिती	कविता लोखंडे व डॉ. विनायक शिंदे	101
20	आदिवासींच्या शाश्वत विकासामाठी कला, लोकसाहित्य, पर्यटन, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची भूमिका व सरकारचे धोरण	प्रा. किशोर चौरे	105
21	आदिवासी रामायण : एक लोककथा	डॉ. अंजली मस्करेन्हस	110
22	नैसर्गिक शेतीतून आदिवासी समाजाच्या शाश्वत विकासाचा अभ्यास (संदर्भ : पालघर जिल्हा)	अंकिता वर्तक	115
23	आदिवासी वारली चित्रकलेचे महत्त्व	प्रा.बाळासाहेब चकोर	121
24	आदिवासींचे जीवन व विवाहसंस्था	डॉ.संजय बेंद्रे	124
25	आदिवासी (कोळी) बोली भाषेतील शब्द	डॉ.एस.एस.भैरगुंडे	127
26	आदिवासी कलांची वैश्विकता	डॉ.भीमराव वानोळे	133

Officiating Principal
Mahavidyalaya, Ballarpur

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 201(B) : Nature Resources Based Sustainable Development With Special Reference to Tribal Community Rights
ISSN :
October-2019

आदिवासींच्या शाश्वत विकासासाठी कला, लोकसाहित्य, पर्यटन, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची भूमिका व सरकारचे धोरण

प्रा. किशोर शेषराव चौरे
इतिहास विभाग प्रमुख
म.ज्यो. फुले महाविद्यालय,
बल्लारपूर, जि. चंद्रपूर
chaurekishor12@gmail.com
Mob.No. 8421884760

प्रस्तावना :

भारत देशात विविध वंश, धर्म, संस्कृती, विविध जाती आणि बोलीभाषा बोलणारे लोक राहतात. सहा हजारापेक्षा जास्त जाती आणि उपजाती आपल्या देशात आहेत. त्याचप्रमाणे जवळजवळ ५५० आदिवासी जमाती आहेत.[१] जगातील सर्वच देशामध्ये आदिवासी जमातीचे लोक कमी–जास्त प्रमाणात राहतात. जगातील काही देशातील आदिवासींचा विकास जलद गतीने झाला. परंतु भारतातील आदिवासी मात्र त्यांच्या तुलनेत बरेच मागासले आहेत.[२]

स्वातंत्र्य आंदोलनात राजकीय स्वातंत्र्याकडे बहुतेक सर्व समाजसुधारकांचे लक्ष असल्याने भारतीय ग्रामीण समाजरचनेत सामाजिक विकासावर फारसे लक्ष केंद्रित झाले नाही.[३] मात्र आज देशाला स्वातंत्र्य मिळून जवळ–जवळ ७१ वर्षे पूर्ण झालेले आहेत. तरीही आजपावतो ग्रामीण, दुर्गम भागातील आदिवासी समुदायाच्या जीवनामध्ये जो शाश्वत विकास घडून यायला पाहिजे होता तो झाल्याचे दिसून येत नाही. सरकारने आदिवासी समाजाची आवश्यकता व गरजा ओळखून तशी धोरणे आखूण आणि त्यांची अमलबजावणी केली तरच आदिवासींचा शाश्वत, चिरकाल विकास घडून येईल.

कला, लोकसाहित्य, पर्यटन, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची भूमिका :

चौदाव्या शतकापूर्वीचा गोंड आदिवासींचा इतिहास फारसा ज्ञात नाही. त्यावेळी 'गोंडवन' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मध्य भारतातल्या प्रदेशात आदिवासींची अनेक राज्य होती. या काळात गोंडवनात अनेक किल्ले बांधण्यात आले. गोंडराजाचे राजप्रासाद संपत्तीने भरलेले होते. शेती उत्पादनात या काळात बरीच वृद्धी झाली होती. गोंडराजाकडे संघटन कौशल्याचा अभाव होता. नागपूरकर भोसल्यांच्या आक्रमणापुढे गोंड साम्राज्य भुईसपाट झाले आणि गोंड७आदिवासी मोठ्या प्रमाणावर घनदाट अरण्यात ढकलले गेले. बिंटिशांच्या विरोधातील १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामात गोंड जमीनदारांनीही भाग घेतला होता. याच काळामध्ये गोंड आदिवासींच्या छोट्या–मोठ्या टोळ्या निर्माण झाल्या. चार महिने शेती तर उर्वरित जीवन वनौपजावर अवलंबून असे. व्यापारी, सावकार, जंगल अधिकारी, सनदी अधिकारी यांच्या व्यवहारातून पुढे आदिवासींच्या शोषणाचे चक्र वेगाने फिरू लागले. काही जणांनी आदिवासींच्या जमिनी बळकावल्या, त्यामुळे गरिबीला भरभक्कम विळखा त्यांच्याभोवती पडला.[४] म्हणजे एकेकाळी राज्य स्थापन करणारा हा समाज गरिबी, अज्ञात, अंधश्रद्धा यांच्या विळख्यात आज अडकून पडला आहे. स्वातंत्र्यानंतर आदिवासींचा जंगलावरील हक्क पूर्णपणे नाकारला गेला. आदिवासींच्या वनजमिनी वनखात्याने हिरावून घेतल्या गेला.

देशाच्या विविध राज्यात आदिवासींची संख्या भरपूर आहे. आपण महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रातील एकूण जिल्ह्यांपैकी गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया या भागात सर्वात जास्त आदिवासी जनता

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

राहत आहेत. तेथील आदिवासींचे जीवनमान हे अतिशय हालांखीचे आणि दैनिय स्वरूपाचे असलेले आजही आढळते. तेथील आदिवासी हा समाजाच्या प्रवाहापासून दुरावलेला दिसतो आणि प्रशासकीय अधिकारी याचाच फायदा घेत त्यांना लुटत राहिले. त्यांच्यावर अन्याय करीत राहिले. त्याचबरोबर तेथील आदिवासी जननेचे जीवन तेंदू पत्ता आणि बांबू कटाईवर आधारीत आहे. त्याचा फायदा मोठे व्यापारी वर्ग आणि कंत्राटदारांना अधिक झाला, अशारितीने आदिवासींच्या अशिक्षिततेचा फायदा घेत त्यांना लुटत राहिले. स्वातंत्र्य प्राप्तीपूर्वी राज्याच्या दडपशाही आणि शोषणाला बळी पडलेला या भागातील आदिवासी स्वातंत्र्यप्राप्ती नंतरही पोलीस, पटवारी आणि वन अधिकाऱ्यांच्या दडपशाहीला बळी पडला आहे.[५] आदिवासींचा खरच शाश्वत विकास सरकारला घडवून आणायचा असेल तर आदिवासींच्या पुढील गोष्टीकडे लक्ष द्यावयास पाहिजे.

कला :

परंपरेने आदिवासी समाज दूर दऱ्या, खोऱ्यात राहून आपले जीवन जगत आहे. स्वातंत्र्यानंतर आदिवासींच्या सर्वांगीन विकासाच्या दृष्टिने आदिवासी उपाययोजना लागू करण्यात आली. तेव्हापासून हा समाज प्रगत समाजाच्या जसा जवळ येत आहे. तसे त्यांची सांस्कृतिक मुल्ये लोप पावत चालली आहेत.[६] आदिवासींच्या समाज जीवनाची खास वैशिष्ट्ये आहेत. साधे आणि सरळ जीवन पद्धती, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, लोकव्यवहार या सर्वांचे प्रतिबिंब त्यांच्या कलांमध्ये दिसून येते. आदिवासींची स्वत:ची भाषा असून, भाषांसोबतच आदिवासींनी अनेक कला पारंपारिक पद्धतीने जोपासल्या आहेत. नृत्यकला, वाद्य, गायन, हस्तकला सर्व त्यांच्या संस्कृतीचे अंग आहेत.[७] त्यांच्या कलांना उत्तेजन व संरक्षण देणे सरकारचे कर्तव्य आहे. त्यांच्या कला जागतिक स्तरावर पोहचविणे, त्यांच्या कलाकारांना प्रोत्साहन देणे, आर्थिक सहाय्य देणे, ज्यामुळे आदिवासींच्या कलांचे जतन होईल व आदिवासी संस्कृती टिकून राहिल.

लोकसाहित्य :

भाषिक व सांस्कृतिक मूल्य जोपासणारा समाज म्हणजे आदिवासी समाज आहे. आदिवासी साहित्य हे मुख्यप्रवाहातून वेगळे साहित्य आहे. आदिवासी बोली भाषेविषयी अनेक थोर विचारवंतांनी आपली मते नोंदवत गोंडी बोली भाषेचे प्राचीनत्व दाखविले आहे. गोंडी भाषा व साहित्याचे पुरस्कर्ते व्यंकटेश आत्राम यांनी 'गोंडी' ही केवळ भाषा नव्हे तर गोंडवन राज्याची राज्यभाषा आणि ऋग्वेद काळापूर्वीची 'युयवा' राष्ट्राची राष्ट्रभाषा असून तिला लिपी होती.[८] काहींच्या मते सिंधु संस्कृतीतील लोकांची लिपी चित्रलीपी ही गोंडलिपी होय.[९]

आदिवासींच्या समाज जीवनाची खास वैशिष्ट्ये आहेत. आदिवासींचे जीवन, संस्कृती व समस्यांचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यातून उमटते. आदिवासी साहित्य अलिखित स्वरूपाचे असून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे तोंडी स्वरूपात हस्तांतरित केले जाते. ते मौखिक आहे. गोटूल अशा ठिकाणी साहित्याची देवाण–घेवाण व निर्मिती होतांना आढळते.[१०] जागतिकीकरणात आदिवासी बोली कालबाह्य होण्याच्या मार्गावर असून हे वास्तव कटूसत्य आहे. आदिवासी जमातीमधील जे काही साहित्यिक आहेत ते आजही आपल्या समाजाला चिकटून आहेत ते आपल्या लोकांपासून तुटले नाही. हे त्यांच्या साहित्यातून प्रतिबिंबीत होताना प्रकर्षाने जानवते.[११] अशा आदिवासी साहित्यांना सरकारने संरक्षण देऊन ते साहित्य प्रादेशिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचविणे जेणे करून आदिवासी साहित्य आहे ते बाहेर येईल व नवीन आदिवासी साहित्यिकांना या माध्यमातून आपले मौखिक साहित्य पुस्तकी स्वरूपात आणणे सोपे जाईल. त्यामुळे आणखी नवनवीन आदिवासी साहित्यिक घडतील व त्या माध्यमातून आदिवासींची सामाजिक व आर्थिक उन्नती घडून येईल.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Phule
Mahavidyalaya, Ballarpur

12	Synergistic Effect of Herbicides on *Alternaria* Colony Growth **Dr. Smita S. Harane**	46-49
13	Solvency Analysis of Select Private Factoring Companies In India-An Empirical Study **Vilas Hangargi & Dr. Shivakumar Deene**	50-54
14	Social Aspect of Amenities Provision in Rehabilitation Colonies of Mumbai Metropolitan Region **Mrs. Rachana AtulIndurkar & Dr. Sameer Pralhad Narkhede**	55-58
15	Effect of Temperature and Storage Containers on Seed Mycoflora **Dr. Smita S. Harane**	59-61
16	Major obstacles in the Sustainable Development of India **Dr. Misal Mohan Kashinath**	62-64
17	Gender Equality Through Micro-Finance in Karnataka - With Reference to Kalaburagi District **Puttaraj & Vilas Hangargi**	65-69
18	Reservations in Promotions For SCs and STs: Recent Judicial Trends **Dr. M. Srinivas**	70-72
19	Spatio-Temporal Analysis And Hotspot Mapping of Leptospirosis Disease In Kerala **Resna Reghu**	73-76
20	Role of Science and Challenges in the use for Sustainable Development **Gyanaranjan Sahoo**	77-80
21	Psychology for Wellness of Modern Society **Dr. Atul Tanaji Lakde**	81-82
22	Digital India: Challenges and Opportunities **Dr. Balaji Shivraj Hokarne & Dr. Sulochana S. Dengale**	83-87
23	Study Of Physical Parameter Of Bori Tank At Chikundra Site TalukaTuljapur, Dist.Osmanabad (MS) India **G.T. Rathod & C. V. Pawar**	88-90

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

24	Investors' Perception Towards Equity Share With Special Reference To Coimbatore District ***Dr. R. Geetha & Dr. Mrs. S. Nirmala***	91-94
25	Impact of Forests in Achieving Sustainable Development **Gyanaranjan Sahoo & Afaq Majid Wani**	95-98
26	Assessment by using Regular pen and paper Vs. Digital Pen and Digital Pad **Sachin S. Zende & Ankush P. Surve**	99-101
27	Indian GDP & Crises: Sub-Prime & COVID 19 **Dr. Nivrutti Pistulkar**	102-106
28	Current Pandemic, Challenges And Impacts On Rural Life And Role Of Social Work Teacher In Handling Such Issues **Dr. Rama Achyut Pande**	107-109
29	Sustainable Development to Build Back a More Resilient Society in the Post COVID-19 World **Dr. S. R. Pagare**	110-114
30	The study of Socio-Economic Transformation in Jalna District **Mr. Pramod Deshmukh & Dr. S B Ashture**	115-118
31	Crop Diversification: A case study of LaturTahsil (1990-91 to 1994-95 & 2010-11 to 2014-15) **Dr. Birajdar S.G.**	119-121
32	Climate Change & Sustainable Development **Dr. Raut Radheshyam Kisanrao**	122-125
33	Socio-economic Attributes of Farmers on their Adoption System of Rice Intensification (SRI) method in Puri District, Odisha, India **Ajay Kumar Prusty, Radha Shyam Panigrahi, Bibhuti Prasad Mohapatra & Sandeep Rout**	126-133
34	Drone (UAV) Technology For Modern Geospatial Solution: A Case Study Of WakurdeLis Project **Dr. Ganesh K. Madhe**	134-138
35	Assessment of Vegetation Using Landsat Data **Dr. V. S. Pawar-Patil & Shri S. A. Patil**	139-142
36	Digital Entrepreneurship and Sustainable Development: Evidence from India **Sharfa Hassan & Dr. Ajaz Akbar**	143-146
37	A Study of Effectiveness of Concept Mapping Teaching Strategy in Geography Subject **Dr. Anand D. Shinde**	147-149
38	Environmental Awareness and Practices among College Students in K.B.P. Mahavidyalaya **Dr. Jadal M. M.**	150-155
39	A Debate over the Replication Crisis **Yashika Poddar**	156-158
40	*Blood Brothers- A Family Saga*: A Search for India's Identity **Ashutosh Manohar Popate**	159-162
41	मार्क्सवाद – एक सैध्दांतीक मांडणी **डॉ. संभाजी संतोष पाटील**	163-165
42	चंद्रपूर जिल्हयातील सेंद्रिय व जीवाणू खतांचे महत्व, वापर व लोकप्रीयतेतील वाढीचे अध्ययन **डॉ. लक्ष्मंण टि. कामडी**	166-167
43	मा. कांशीरामजी यांचे पुणे करार धिक्कार आंदोलन **प्रा. किशोर शेषराव चौरे**	168-171
44	चिमूर तालुक्यातील अनुसूचित जातीमधील माला जगंम समाजाची वर्तमानकालीन स्थिती सबल्टर्न इतिहासाच्या दृष्टीकोनातून: एक आकलन **प्रा. प्रफुल एम. राजुरवाडे**	172-174
45	वृध्दांच्या सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक व आरोग्यविषयक समस्याबाबत वृध्दांच्या मताचे अध्ययन **प्रा. पितांबर विठोबाजी पिसे**	175-178

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

मा. कांशीरामजी यांचे पुणे करार धिक्कार आंदोलन

प्रा. किशोर शेषराव चौरे
इतिहास विभाग प्रमुख, म.ज्यो. फुले महाविद्यालय, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

पुणे करार धिक्कार आंदोलन

गोलमेज परिषदेत डॉ. आंबेडकरांनी पूर्ण ताकदीने संघर्ष करूनअस्पृश्यासाठी स्वतंत्र मतदार संघ दुहेरी मतदानाचा अधिकार संयुक्त मतदान संघातील मतदानाचा अधिकार मिळविले होते, परंतु महात्मा गांधींच्या विरोधात स्वतंत्र मतदारसंघावर अस्पृश्यांना पाणी फेरावे लागले. २४ सप्टेंबर १९३२ ला म. गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्यात पुणे करार झाला. त्यानुसार दलितांना वाढीव राखीव जागा देण्यात आल्या अशा रितीने बाबासाहेबांनी अस्पृश्यांसाठी मिळविलेला दोन मतांचा अधिकार पुणे कराराने हिरावून घेतला. बाबासाहेब त्यावेळी म्हणाले, "अस्पृश्यांसाठी मी लंडनहून फळे आणली होती. गांधीनी त्यातील रस काढून आपल्या लोकांना पाजला आणि माझ्या लोकांच्या तोंडावर टरफले फेकली.[१] म्हणजे "पीडितांनी केवळ सवर्ण हिंदूच्या दयेवरच रहावे यासाठी म. गांधीनी उपोषण केले. गांधीच्या या आमरण उपोषण मध्ये आदरणीय असे काहीच नव्हते ती एक प्रकारची घाणेरडी आणि नियमाविरुद्ध केलेली कृती होती."[२]

पुणे करार करतेवेळी अस्पृश्यांसाठी असलेल्या राखीव जागांवर काँग्रेस आपले उमेदवार उभे करणार नाही, असे आश्वासन काँग्रेसने दिले होते तेहीत्यांनी पाळले नाही. कांशीरामजी म्हणतात की, "५० वर्षामध्ये सामाजिक, आर्थिक गैरवाजवी संपविण्यासाठी ज्या लोकांनी उभे व्हायला पाहिजे होते ते उभे झाले नाही, कारण त्या लोकांना मनुवादी समाज आणि त्यांच्या पक्षांनी मॅनेज केले गेले त्या लोकांचा प्रबंध केला गेला आणि या प्रबंधाची कहाणी पुणे करारात' लिहिली आहे."[३]

१९४६ मध्ये कास्टिटयुशन असेम्बली (संविधान सभा) ची निवडणूक त्यावेळी काँग्रेसच्या लोकांनी म्हटले की, "कोई भी चुनकर आ जाये झाली, लेकिन आंबेडकर चुनकर नहीं आने चाहिए, हम लोगों ने प्रबंध' कर दिया है, आंबेडकर के लिये सारे दरवाजे और खिडकिया बन्द कर दी गयी हैं वो कॉन्स्टीट्युशन असैम्बली में चुनकर नहीं आ सकते हैं[४] तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मुंबई सोडून कलकत्ता ओलांडून भारताच्या सीमा क्षेत्रातील जैसोर आणि खुलना या क्षेत्रातून (जो फाळणीच्या वेळेस पाकिस्तानाला दिला आज हा प्रदेश बांगला देशात आहे) निवडून संविधान सभेत यावे लागले. त्यांना या क्षेत्रातील ५२ टक्के लोकसंख्या असलेल्या चांडाळांनी (नमोशूद्रांनी) निवडून दिले, डॉ. बाबासाहेब या क्षेत्रातून संविधान सभेत निवडून आले म्हणून म गांधी, पं. नेहरू व त्यांच्या काँग्रेसनी जैसोर, खुलना, फरीदपूर आणि पडीसाल हे चार जिल्हे, जेथे चांडाळ लोकांची ५२ टक्के लोकसंख्या होती, बहुसंख्य हिंदू होते. जे विभाजन करताना भारताचाच भाग होता. परंतु नेहरू सरकारनी काँग्रेस जाणूनबुजून पाकिस्तानला देऊन टाकले. कारण काय तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर तेथून संविधान सभेवर निवडून आले म्हणून.

१९५२ ला जी निवडणूक भारतीय संसदेसाठी झाली. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुंबई येथून रिजर्व सीटवर उभे होते. परंतु काँग्रेस पार्टीने काजोळकर (जो बाबासाहेबांचा सेक्रेटरी होता त्याला त्यांच्यापासून तोडून) ला समोर करून बाबासाहेबांचा पराभव केला त्यानंतर १९५४ ला जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर भंडाऱ्यातून उभे राहिले तेव्हा काँग्रेस पार्टीने एका बोरकरया माणासाला बाबासाहेबांच्या विरोधात उभे करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पराभव केला. आणि राखीव मतदार संघाला अंगुठा दाखविला. या आंसीट विषयी आपले मत स्पष्ट करताना कांशीरामजी म्हणतात की, "ले लो आरक्षण, आपने आरक्षण तो ले लिया है, अंग्रेजों ने आपको रिजर्वेशन दे कि है लेकिन रिजर्व सीट से चुनकर आना आपके लिए असंभव है और आपके लोगों के लिए असंभव है।"[५] मागासवर्गीयांची खरी बाजू मांडण्याकरिता जो खरा प्रतिनिधी संसदेत जावयास पाहिजे होता, तो या पुणे कराराद्वारा गेला नाही कारण मनुवादी लोकांना त्या राखीव जागेवर मागासवर्गीयांमधील कांशीरामच्या भाषेत सांगावयाचे झाल्यास चमचे उभे केले होते अस्पृश्यांचे प्रतिनिधी आमचे चमचेच असले पाहिजे, म्हणून म. गांधीर्नीने जबरदस्तीने पुणे करार करायला बाबासाहेबांना भाग पाडले. राखीव जागेवरून स्वाभिमानी माणसं किंवा नेता निवडून येणे पसंत करीत नाही. त्यांना त्याच समाजातले गुलामी करणारे गुलाम पाहिजे. म्हणूनच काँग्रेसनी मुंबईच्या व भंडाऱ्याच्या निवडणुकीत याच समाजातले मेंढरे उभे करून या स्वाभिमानी माणसाचा पराभव केला.

पुणे कराराचा वाईट परिणाम हा झाला की, "जेव्हा दलितांचे नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलितांना अंधकारमय युगातून प्रकाशमय युगाकडे घेऊन जात होते. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संपूर्ण प्रयत्नांना म. गांधी व त्यांच्या काँग्रेसने बाजूला सारून दलितांना पुन प्रकाशमय युगातून काढून अंधकारमय युगात अथवा चमचा युगात ढकलून दिले. तेव्हापासून चमच्या युगाची सुरुवात झाली.[६]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या लुधियाना (पंजाब) येथे २८ ऑक्टोबर १९५१ ला दिलेल्या जाहीर सभेत बोलताना म्हणतात, "मला तुम्हा लोकांना राखीव जागांवरून काँग्रेसच्या तिकिटावर पार्लमेंटमध्ये निवडून गेलेल्या लोकांबद्दल एक बाब सांगावयाची आहे की, पार्लमेंटमध्ये काँग्रेसच्या तिकिटावर राखीव जागेवरून निवडून गेलेले जवळपास तीस खासदारहोते, पण मागील चार वर्षापासून त्यांच्यापैकी एकानेही अनुसूचित जातींच्यालोकांच्या संबंधाने एकदेखील प्रश्न संसदेमध्ये मांडला नाही."[७] आपल्या समाजबांधवांचा एकही प्रश्न संसदेमध्ये उपस्थित केला नाही, म्हणूनच भविष्यात असे धोके आणि विश्वासघाताचे संकट अस्पृश्यावर वारंवार ओढवू नयेत म्हणून बाबासाहेब २ एप्रिल १९४६ रोजी दिल्ली येथे अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या बैठकीत भारताच्या नव्या संविधानामध्ये

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघच मिळावेत म्हणून बैठकीच्या ठराव क्र. ७ मध्ये सविस्तर कारणे देऊन स्वतंत्र मतदार संघाचीच मागणी रास्तपणे उचलून धरतात, आणि आरक्षित जागांनी अस्पृश्यांचे कसे नुकसान केले, ते विस्तृतपणे मांडतात.[८]

भारताच्या संसदेत आज राखीव मतदार संघातून निवडून आलेल्या खासदाराची संख्या१३९ आहे, परंतु ते सर्व कुठल्या न कुठल्या (काँग्रेस, भाजप इ.) पक्षांशी संबंधित आहेत त्यांना दलितांच्या हितापेक्षा पक्षहित, स्वहित व त्यांच्या मतदार संघातील उच्च जातीचेच हित महत्वाचे आहे.[९] अशी लाजीरवाणी स्थिती आहे. आम्ही स्वत:च डॉ. बाबासाहेबांचा केलेला राजकीय पराभव आहे. पुणे करारातील राखीव जागांमुळे आपल्याच रक्ताशी गद्दारी करणाऱ्यांची जमात तयार झाली. येथील शोषित मागासवर्गीयांच्या अधोगतीबद्दल आणि त्यांच्या लाचारीबद्दल बोलताना कांशीरामजी म्हणतात की, "या सर्व अधोगतीचे आणि लाचारीचे मूळ पुणे करार आहे. या पुणे करारानेच दलित-शोषित मागासवर्गीय समाजाचे खरे आणि प्रामाणिक प्रतिनिधी शासनात पोहचू शकले नाही. इतरांचे तर दूरच परंतु प्रत्यक्षात पुणे करार घडवून आणणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना देखील पुणे कराराने निर्माण केलेल्याराखीव मतदार संघातून निवडून जाता आले नाही, तर या राखीव मतदारसंघातून तेच लोक निवडून जाऊ लागले, जे लोक येथील प्रस्थापितमनुवाद्यांच्या हातचे खेळणे आहेत किंवा त्यांचे चमचे आहेत. याच पुणेकराराने येथील दलित व शोषित मागासवर्गीयांना लाचार आणि परावळ बनविले. आज हे दलित-शोषित मागासवर्गीय समाजातील चमचेच समाजाचे शत्रू बनले आहे. म्हणून आता या चमच्यांना खेळवणाऱ्या हातावरच आपणास प्रहार करावा लागेल. जेंगे करून त्यांना खेळणारे हात खिळखिळे होऊन त्यांच्या हातचे 'चमचे' आपोआप गळून पडतील.[१०]

१९८२ ला पुणे कराराला ५० वर्षे पूर्ण झाली होती. त्यावेळे काँग्रेसच्या माध्यमातून पुणे कराराच्या सुवर्ण जयंतीचा (Golden Jubilee) कार्यक्रम करण्यासाठी एक समिती नियुक्त करण्यात आली होती.त्या समितीचे चेअरमन आर.आर. भोळे यांना बनविण्यात आले होते. १९८० ला झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये मुंबईमध्ये आर.आर. भोळेनी काँग्रेसच्या तिकिटावरून निवडणूक लढविली होती. त्यामुळे काँग्रेसनी अशी एक योजना बनविली की, ज्या आर.आर. भोळेंनी बाबासाहेबांच्या सांगण्यावरून पुणे कराराच्या विरोधात जेल भरो आंदोलन सुरू केले होते. 'आर.आर. भोले करें पुकार, पुणे करार का करो धिक्कार' असे नारे पुणे कराराचा धिक्कार करतांनी आर.आर. भोळेच्या नेतृत्वात लोकांनी लावलेले होते. त्याच आर.आर. भोळेला स्वागत समितीचे अध्यक्ष बनविले.प येथे आर.आर. भोळे बिना अकलेचे निघाले. बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली ज्या भोळेंनी पुणे कराराचा धिक्कार केला होता. त्याच कराराची सुवर्ण जयंती साजरी करण्यासाठी तेच अध्यक्ष बनले. इतका बेशरम माणूस कदाचित दुसरा नसेल."[११] असे योगराज मेश्राम 'महानायकाचा महाप्रवास' या पुस्तकात लिहितात.

कांशीरामजींना ही गोष्ट कळली तेव्हा कांशीरामजी दिल्लीला होते ते दिल्लीवरून पुण्यात आले. पुण्यात आल्यानंतर अशा परिस्थितीमध्ये आणि अशा बिकट प्रसंगी पुणे कराराला बळी पडलेल्या लोकांनी त्वरित स्वबळावर उठून उभे राहून ह्याला अव्हान द्यावयाचे ठरविले. त्यानुसार कांशीरामजींनी डीएस. फोर या लढाऊ संघटनेच्या माध्यमातून विस्तारपूर्वक कार्यक्रम आखले. आणि या दीर्घकाळ चालणाऱ्या संघर्षाकरिता स्वत:ची तयारी सुद्धा केली. "२४ सप्टेंबर १९८२ हा दिवस 'धिक्कार दिवस' म्हणून पाळण्याचे ठरविले आणि त्यानंतर कार्यक्रमाची पुण्यापासून सुरुवात करून २४ ऑक्टोबर १९८२ ला जालंधर येथे या कार्यक्रमाचे समापन करण्यात येईल.[१२] अशाप्रकारे पुणापक्टच्या धिक्काराचा कार्यक्रम ठरविण्यात आला.

सी.पी. थोरात कांशीराम मनुवादापुढे आव्हान या पुस्तकात लिहितात, "आम्ही येरवड्याच्या सेन्ट्रल जेलला भेट दिली. आजूबाजूला पहाणी केली. कांशीरामजींना असे आढळून आले की, जेलमध्ये ज्या झाडाखाली हा करार झाला तेथे गांधी व बाबासाहेबांचा पुतळा बसविण्यात येणार आहे. म. गांधी खाटेवर बसलेत व बाबासाहेब खाली बसलेत, असा पुतळा तेथे बसविण्यात येणार होता. बाबासाहेब खाली बसलेत असा पुतळा म्हणजे आपला भयंकर अपमान होता. त्यानुसार कांशीरामजींने प्लॅन बनविला 'पुणे करार धिक्कार' असे शीर्षक देऊन कार्यक्रम घ्यावे; असा सी.पी. थोरातांनी आग्रह धरला. कांशीरामजींनी तो स्वीकारला. भारतातील २० प्रमुख शहरात हा कार्यक्रम करायचे कांशीरामजींनी ठरविले. आम्ही भराभर कामाला लागलो. पुण्यात आम्ही ३०० कोपरा बैठका घेतल्या. ५ हजार पोस्टर्स लावली १० हजार हस्तपत्रिका वाटल्या. सर्व शहरातल्या भिंती रंगविल्या, ठिकठिकाणी कापडी बॅनर्स लावले. पोलिसांनी आधी परवानगी दिली. त्यानुसार बी.जे. मेडिकल कॉलेजचे ग्राऊंड बुक केले. सर्व पुण्यात त्यावेळी चर्चेचा एकच विषय म्हणजे 'पुणे करार धिक्कार' होता."[१३]

In 1982, Kanshi Ram organised a long road show, on Dr. Ambedkar's life and work. When the road show reached Pune, a rally was organised at the BJ Medical College ground. Over three lakhpeople, attended the rally, and it was an indicator of Kanshi Ram acceptability as a leader.[१४]

मा. कांशीराम या पुणे करार धिक्कार परिषदेला मार्गदर्शन करतात म्हणतात, "आम्ही पुणे करार धिक्काराचा कार्यक्रम बापूजींच्या विरोधात घेतलेला नाही. समाजात या करारामुळे हुजुरेगिरी सुरू झाली. हुजुरेगिरीचा रोग समाजातून घालवून टाकण्यासाठी समाजाला सशक्त बनविण्यासाठी, चळवळ मजबूत करण्यासाठी पुणे करार धिक्कार कार्यक्रम आयोजित केला आहे."[१५] पुणे करार अस्पृश्य समाजालाच नाही, तर संपूर्ण बहुजन समाजालाच कसा घातक आहे, या बहुजन समाजाची पुणे करारामुळे चळवळ कशी नेस्तनाबूत झाली, चमच्यांची परंपरा कशी निर्माण झाली. हे ही आपल्या भाषणातून सिद्ध करून दिले. अलीकडे बहुजन समाजात दिसून येणाऱ्या हुजुरेगिरी सुळसुळाटाबद्दल बोलताना मा. कांशीरामजी म्हणतात की, बहुजन समाजात सक्षम आणि समर्थ नेतृत्व निर्माण होऊ नये म्हणून मनुवादी लोक या समाजातील

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

चमच्यांना पुढे करतात, परंतु आपण या चमच्यांशी मुळीच भांडता कामा नये. मात्र "Hit the hands which oprate the chamcha."[१६] (अर्थात, या चमच्यांना प्रत्यक्ष चालविणारे हातच आम्ही तोडून टाकले पाहिजे) जेणेकरून हुजुऱ्यांना चालविणारे हे हातच निकामी ठरतील. दलितांच्या राजकीय जीवनाला उद्ध्वस्त करणाऱ्या आणि प्रकाशमय युगातून अंधकारमय चमच्या युगात नेणाऱ्या या कराराच्या विरोधात मा. कांशीरामजी यांनी 'The Chamcha Age' (An Era of the stooge) नावाचे पुस्तक लिहून पुणे कराराच्या दुष्परिणामावर प्रकाश टाकला आहे. व या चमचा युगातून बाहेर पडण्याचे उपायही सांगितले आहेत

या पुणे करारामुळेच १९४६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जैसोर आणि खुलना ला चाण्डाळाच्या ५२ टक्के लोकसंख्या असलेल्या भागात जावे लागले. या पुणे करारांमुळेच १९५२ ला बाबासाहेबांना मुंबईत पराभव पत्करावा लागला, या पुणे करारामुळेच १९५४ ला भंडारा निवडणुकीतसुद्धा पराभवस्वीकारावा लागला. जेव्हापर्यंत या चमचा युगाला समाप्त करीत नाही तेव्हापर्यंत या अंधकारमय युगातून प्रकाशमय युगात (Bright Age) प्रवेश करू शकत नाही.

पुणे करार धिक्कार कार्यक्रम खूप गाजला, पुणे कराराचे स्वागत करण्याचा जो मनसुबा काँग्रेसने रचला होता, तो रद्द केला व त्याची कोणतीही अधिकृत अशी घोषणा केली नाही. येरवड्याच्या सेन्ट्रल जेलमध्ये बसविण्यात यपतळा कधी बसलाच नाही. बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे म्हणतात, "पुणा च्या धिक्काराचा कार्यक्रम कांशीराम राबवत आहे तो कार्यक्रम खरे तर, रिपब्लिकन पक्षाने राबवायला पाहिजे होता. यावरून असे लक्षात येते की, रिपब्लिकन नेत्यांना पुणे कराराच्या दुष्परिणामाची पूर्वकल्पना होती."[१७]

२४ ऑक्टोबर १९८२ पर्यंत सतत ३० दिवस ३० जागी धिक्कार परिषदाचे आयोजन केल्या गेले. "महाराष्ट्रामध्ये पुणे २४ सप्टेंबर १९८२, मेडिकल ग्राऊंड, पुणे, २५ सप्टेंबर १९८२ अहमदनगर, २६ सप्टेंबर १९८२ औरंगाबाद, २७ सप्टेंबर १९८२ अंबेजोगाई, २८ सप्टेंबर १९८२ नांदेड, २९ सप्टेंबर १९८२ अकोला, ३० सप्टेंबर १९८२ अमरावती, १ ऑक्टोबर १९८२ यवतमाळ, २ ऑक्टोबर १९८२ चंद्रपूर, ३ ऑक्टोबर १९८२ नागपूर."[१८] इत्यादी शहरामध्ये पुणे करार धिक्कार परिषदा भरवून कांशीरामजीने त्यांचे सफल आयोजन केले. दलित-शोषित समाजाला आपल्या स्वत:च्या सामर्थ्यावर उभे होण्याची महत्वाकांक्षा निर्माण केली. डी.एस.फोर व कांशीराम हे नाव खेड्यापाड्यापर्यंत जाऊन पोहचले. देशाच्या राजकारणात व समाजकारणात मा.कांशीरामजींचे नाव तळपूलागले.

३ ऑक्टोबर १९८२ ला नागपूर येथे पुणे करार धिक्कार कार्यक्रम :

३ ऑक्टोबर १९८२ ला बेझनबाग मैदान, नागपूर येथे डी.एस.फोरचीधिक्कार परिषद आयोजित केली गेली. डी.एस.फोर द्वारा सामाजिक आंदोलना(Social Action) ची सुरुवात २४ सप्टेंबर १९८२ पासून पेशव्यांची (ब्राह्मणांची) राजधानी पुण्यावरून केली गेली. या ब्राह्मण आणि अन्य उच्चवर्णीयांनी दलितांचे संपूर्ण भारतात शोषण केले. ज्या पुणे शहरात पुणे करार झाला क पुण्यावरून प्रारंभ करून सामाजिक आंदोलन (Social Action) न थांबणारा (Non Stop) संघर्ष होईल. २४ ऑक्टोबर १९८२ ला जालंधरमध्ये समाप्त को धिक्कार कार्यक्रम आहे. नागपूर येथे होणारा धिक्कार कार्यक्रम याचाच एक आहे. हा एक महिन्याचा कार्यक्रम आहे. "या सामाजिक कार्यवाहीचा उद्देश मूलभूत समस्यांकरिता लोकांना जागृत करणे आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतः या करारापासून आनंदित नव्हते. २४ सप्टेंबर १९३२ ला पुणे करारावर हस्ताक्षर केल्यानंतर दुसऱ्या दिवशीच त्यांनी याचा धिक्कार केला. ऐवढेच नाही तर त्यांनी आपल्या समर्थनात; आपल्या अग्रलेखातून कराराचा प्रखरपणे धिक्कार केला. यांच्या समर्थनात त्यांनी आपल्या तीनपुस्तकांत 'काँग्रेस आणि गांधीने अस्पृश्यांकरिता काय केले?, स्टेट्स एंड माइनॉरिटीज, गांधी व अस्पृश्यांची मुक्ती? यातून काही उदाहरण दिले. महाराष्ट्रात आर.आर. भोळे व उत्तर भारतात मास्टर मानसिंहाच्या नेतृत्वात पुणे कराराच्या विरुद्ध संघर्ष प्रारंभ करण्यासाठी बाबासाहेबांनी आपल्या अनुयायांना १९४६ ला आदेश दिला.[१९]१९३२ पासून १९४७ पर्यंत १५ वर्षापर्यंत केवळ आपल्या भाषणातूनच नाही तर पुस्तकातून आणि लेखातून याचा धिक्कार केला म्हणून कांशीराम म्हणतात की, "जेव्हा बाबासाहेबांनीच स्वतः त्याचा धिक्कार केला तर आम्हाला त्याचा धिक्कार केला पाहिजे" असे ते नागपूर येथील जनसभेला संबोधतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुणे कराराचा धिक्कार करीत असताना त्यांना असे जाणवले की, धिक्कार याचा काही उपयोग होत नाही तेव्हा त्यांनी यातून १९४७ ते १९५६ पर्यंत पूर्ण १० वर्षापर्यंत आपल्या लोकांकरिता मार्ग काढण्यासाठी संघर्ष करीत राहिले. त्यांनी आम्हाला स्पष्ट दिशा व निर्देश दिले.कांशीरामजी म्हणतात की, "त्यानुसार ही वास्तविक जिम्मेदारी आपली समजून काढण्याच्या दिशेने काही करावे लागेल. आम्हाला विचारपूर्वक योजना बनवाव्या लागतील आणि या दिशेने कार्यवाहीची सुरुवात करावी लागेल.[२०]

आज आमच्या शिकल्या सवरल्या व्यक्तींची संख्या भरपूर आहे. एवढेच नाही तर शासकीय नोकरीतसुद्धा आमचे लोक भरपूर आहेत. जेव्हा हे लोक देशासाठी योजना बनवू शकतात, प्रशासन सांभाळू शकतात तर आपल्या लोकांसाठी योजना का बनवू शकत नाही? यावर कांशीरामजी म्हणतात की, "मी असे समजतो की जर आमची इच्छा खरी आहे तर आम्ही निश्चित योग्य मार्ग काढू शकतो. ते येथे बाबासाहेबांनी कथन केलेले उदाहरण देतात. संयुक्त मतदान पद्धती ही एक दूषित पद्धती आहे. ज्यामुळे हिंदूना अधिकार प्राप्त झालेला आहे, की ते एक अस्पृश्यांना नाममात्रसाठी प्रतिनिधी निवडतात, परंतु वास्तविकतेमध्ये तो हिंदूचा एक औजार(Tools) आहे' १९४७ मध्ये संविधान सभेसाठी तयार केलेल्या आपल्या स्मृतिपत्रात त्यांनी म्हटले पुणे करारांनी अनुसूचित जातींच्या मताधिकाराला पूर्णता निरर्थक बनविले. प्राथमिक निवडणुकीत ज्या उमेदवाराला अस्वीकार केले जात होते तोच अंतिम निवडणुकीत सवर्ण हिंदूच्या मतांनी निवडून येत होता.[२१] जेव्हापर्यंत इंग्रज भारतात होते, तेव्हा पर्यंत बाबासाहेबांना वाटत होते की, ते आम्हाला न्याय देतील, परंतु तसे झाले नाही. राजकीय, आर्थिक, जमीनदारी आणि सांस्कृतिक सर्व अधिकार मुठ्ठीभर ब्राह्मण, क्षत्रिय व मोठ्या जमीनदारांच्या हातात आली होती. जे की आमचे

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

मागील १००० वर्षांपासून शोषन करीत आलेले आहेत. अशा लोकांकडून न्यायाची अपेक्षा करणेच व्यर्थ होते, तेव्हा यावर उपाय शोधण्याच्या दिशा कार्य करू लागले. त्यांचे संपूर्ण प्रयत्न दलित व शोषित लोकांना मोठे करण्यासाठी होते. हे लोक आपल्या स्वतःच्या बहुमतावर भारताचे शासन करू शकतील असा बाबासाहेबांना विश्वास होता. दुर्भाग्यवशबाबासाहेबांच्या महापरिनिर्वाना नंतर त्यांच्या सहकार्यांनी काही केळ याविषयी कांशीराम म्हणतात की, "कदाचित बाबासाहेबांच्या अनुयायांकडून चांगले प्रयत्न केले असतील परंतु ते त्या उंचीपर्यंत पोहचू शकले नाही बाबासाहेब आम्हाला पाहू इच्छित होते, परंतु आम्ही त्यांना दोष देणायासाठी स्वतःला तयार करायला पाहिजे. सुरुवातीला मी व माझ्या सहकाज रिपब्लिकन पार्टीच्या नेत्यांना सर्व प्रकारची मदत केली, परंतु जेव्हा ते क परिणाम दाखवू शकले नाही तर आता ही जिम्मेदारी स्वतः घेतो.[१२]कांशीराम बहुजनांच्या उत्थानासाठी आम्ही असेच करून दाखवा बाबासाहेबांना अपेक्षित होते असा ते संकल्प करतात, आणि या दिशेने पहिल्या पायरीच्या रूपात शीघ्र आपली 'जन संसद' (People's Parliament) च्या नावाने सुरू करतात. मा. कांशीरामजी शेवटी म्हणतात की, "कदाचित आमचे पुढारी यापेक्षाही चांगले करत असतील तर त्यांचे स्वागत करू व त्यांना आम्ही पूर्ण सहयोग व समर्थन देऊ. आम्ही त्यांच्या रस्त्यात आड येणार नाही.[१३]परंतु कांशीरामजी येथे हेही स्पष्ट करतात की, जर ते समयबद्ध कार्यक्रमानुसार उद्देश प्राप्त करण्यात असमर्थ असतील तर त्यांनी आमच्या रस्त्यात आडवे येऊन आमच्या कार्यात अडथळा आणू नये. जर अशाप्रकारचा अडथळा आमच्या कार्यात आला नाही तर आम्ही उद्देशांना ठरविलेल्या वेळेपूर्वीच प्राप्त करून घेऊ, या संमेलनाचे अध्यक्ष मा. डी.के. खापर्डे यांनी भूषविले, नागपूर जागृती जथ्याचे प्रसिद्ध गायक विजय वाकपैजनच्या गीताच्या माध्यमातून संघर्षाची तयारी करण्याचे आव्हान केले. सभेला मधुकर उके, कु. चंदा कांबळे (विदर्भ), एकनाथ साळवे (माजी आमदार चंद्रपूर), कु. मायावती (दिल्ली), एस. आर. बौद्ध (हरियाना) व अनंतराव फुले (म. ज्योतिबा फुले यांचे नातू) यांनी संबोधित केले व राम कोडारे यांनी आभार व्यक्त केला.

संदर्भ ग्रंथसूची:

(१) थोरात, सी.पी., 'कांशीराम मनुवादापुढे आव्हान', शिवम प्रकाशन, पुणे, प्र.आ. १५ मार्च २००५,पृ. १५७
(२) अकेला,ए.आर. (संकलन/संपादन), अनुवादक, विजेन्द्र सिंह विक्रम, दि. आ.इ.मा.कां.सा.के.से.ले., पूर्वोक्त, पृ. १७६
(४) सिंह, सतनाम (सपा), बहुजन मसीहा कांशीराम के भाषण', खंड १, सम्यक प्रकाशन, दिल्ली,प्र.आ. २००८, पृ.३९
(५) सिंह, सतनाम (संपा.), खंड १, पूर्वोक्त, पृ. ४१
(६) जी.एम., 'धम्मानुगामी कांशी-माया', युगसाक्षी प्रकाशन, नागपूर,प्र.आ. २४ऑक्टोबर, २०१२,पृ. १६७
(७) भालेकर, आचार्य सन्देश, 'आबेडकर विरुद्ध आंबेडकर', विजन पब्लिकेशन, वैशाली नगर, नागपूर, प्रकाशन तिथी १९ जुलै २०१४, पृ.८६

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

IFSIJ IMPACT FACTOR: 5.565 E-ISSN : 2455-1511

SANSKRUTI

International Multidisciplinary Research Journal
PEER REVIEWED, REFEREED & INDEXED JOURNAL

Special Issue: 007 Octobar -2020

Special Issue Editor: Dr. Snehal Rajhans
Convener: Principal, Dr. C. B. Salunkhe
Editor-in-Chief: Prof. Santosh Bongale

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Asstt. Professor
Mahatma Jyotiba Fule Mahavidyalaya
Ballarpur, Dist. Chandrapur (M.S.)

IFSIJ IMPACT FACTOR: 5.565 E-ISSN: 2455-1511

SANSKRUTI

International Multidisciplinary Research Journal
PEER REVIEWED, REFEREED & INDEXED JOURNAL
Special Issue: 007 Octobar -2020

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे
कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु.।।
ता. कराड जि. सातारा ४१५११०८ फोन (०२१६४) २६६३४६
email - kmr_sspm@yahoo.co.in
नॅक मानांकन – B+ (2.65)

कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु.।।
आणि
लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासन,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
यांचे संयुक्त विद्यमाने एक दिवशीय आंतरविद्याशाखीय

राष्ट्रीय परिषद

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे वाङ्मय: पुनर्वाचनाच्या दिशा

Special Issue Editor: Dr. Snehal Rajhans
Convener: Principal, Dr. C. B. Salunkhe
Editor-in-Chief: Prof. Santosh Bongale

Sanskruti Multidisciplinary Research And Development Training Institute (SMRDTI)
© All rights reserved with the authors.
Published by –© Mr. Santosh Bongale, President, Sanskruti Multidisciplinary Research And Development Training Institute (SMRDTI) At-Post: Pimpalkhunte Tal: Madha Dist: Solapur. Maharashtra Mobile: 9923900840 Email id: editorsimrj@gmail.com www.simrj.org.in
Disclaimer: The views expressed herein are those of the authors. The editors, publishers do not guarantee the correctness of facts, and do not accept any liability with respect to the matter published in the Special Issue. However editors and publishers can be informed about any error or omission for the sake of improvement. All rights reserved.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

INDEX

Sr. No.	Paper Title	Page No.
1	उपेक्षितांचे मुक्तीचे भाष्यकार : अण्णा भाऊ साठे *प्रा.डॉ. प्रभाकर रामचंद्र पवार*	1-6
2	अण्णाभाऊ साठे यांची साहित्य व कलाविषयक भूमिका साहित्यातील तेजस्वी तारा — अण्णाभाऊ साठे *प्रा.सौ. लक्ष्मी विष्णु भंडारे*	7-10
3	Depiction of Oppressed and Underprivileged in the Short-Stories of Anna Bhau Sathe *Mr. Suresh T. Telvekar*	11-14
4	शाहीर आण्णाभाऊ साठेजी और मुंशी प्रेमचंदजी के कहानी साहित्य में सामाजिक यथार्थ *संगिता संजय देशमुख*	15-18
5	लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जीवन परिचय *सुनंदा वसंतराव जगताप*	19-20
6	MANIFESTATION OF CASTE AND CLASS IN ANNA BHAU SATHE'S MARXIST IDEOLOGY *AJAY HATESING SOLANKE*	21-26
7	लोकशाहिर अण्णा भाऊ साठे यांच्या कथा वाङ्मयाचे वेगळेपण *श्री. कांबळे शितल शशिकांत*	27-31
8	आण्णा भाऊ साठे यांचे कथात्म साहित्य *प्रदीप मधुकर वाघ*	32-37
9	वंचितांना साहित्यक्षेत्रात मानाचे स्थान देणारा पहिला साहित्यिक लोकशाहीर अण्णा भाऊ साठे *प्रा. नरेश आंबिलकर*	38-43
10	अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील नायिका *योगिता कालिदास चोडणकर*	44-48
11	अण्णा भाऊराव साठे यांच्या कादंबरीतील बंडखोर नायक *डॉ. सविता अशोक व्हटकर*	49-52
12	अण्णा भाऊ साठे : व्यक्तित्त्व आणि कृतित्त्व *प्रा. अमोल अरुण थोरात*	53-57

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

13	अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य व कला विषयक भूमिका *डॉ. लहू भाऊसाहेब घोरपडे*	58-60
14	अण्णाभाऊंच्या कादंबरीतील 'नायिका' *डॉ. प्रा. रविंद्र मधूकर कांबळे*	61-66
15	अण्णाभाऊ साठे सामाजिक सुरक्षेचे एक समग्र विद्यापीठ *प्रा. रमेश राऊत*	67-73
16	अण्णाभाऊंच्या साहित्याचा बोध *सुनिल जाधव*	74-75
17	लोकविलक्षण प्रतिभेचा भूमिपुत्र लोकशाहीर अण्णाभाऊ साठे *ॲड. संभाजीराव हणमंतराव मोहिते*	76-78
18	अण्णाभाऊसाठे यांच्यासाहित्य कृतीतून व्यक्त होणारा मानवमुक्तीचा दृष्टीकोन *प्रा. डॉ. हिरालाल सोमा पाटील*	79-83
19	साहित्यरत्न अण्णाभाऊ साठेच्या साहित्यातील स्त्री व्यक्तीरेखा *डॉ. स्नेहल गकरंद राजहंस*	84-90
20	लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या खुळंवाडी कथासंग्रहातील राष्ट्रभक्ती व लोकभक्तीचे चित्रण *प्रा. माधवी सुरेंद्र पवार*	91-97
21	आण्णाभाऊ साठे यांचे विद्रोही साहित्य *दिपमाला निवास मोहिते*	98-102
22	आण्णाभाऊ साठे: मानव मुक्तीचा शिलेदार *लता अंकुशराव चव्हाण*	103-106
23	अण्णाभाऊ साठे व त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांच्या मुखपृष्ठावरील चित्रांकने *रामचंद्र नारायण चौरे, प्रा. डॉ. शिरिष अंबेकर*	107-111
24	अण्णा भाऊ साठे यांचे प्रेरणादायी विचार आणि डिजीटल जनरेशन यांचे संयोजन-- काळाची गरज *प्रा. इंद्रजित नितीनराव बंगाळे*	112-115
25	ग्रामीण जनजीवन जगासमोर मांडण्यासाठी अण्णा भाऊ साठे यांच्या लेखणीतून मानवी भावनांचा सकारात्मक वापर *प्रा. कृष्णा गणपत सावंत*	116-121
26	कादंबरीकार आण्णाभाऊ साठे साठे यांच्या 'फकिरा' व 'वारणेचा वाघ' या कादंबऱ्यातील उपेक्षित समाजाचा इतिहास *प्रा. सौ. माधुरी उत्तम शिंदे*	122-130

Officiating Principal
Mahatma Jotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

27	अण्णाभाऊ साठे यांच्या ठराविक कादंबऱ्यांच्या मुखपृष्ठावरील चित्रांकनाचा अभ्यास *प्रणय रामदास कुंवर*	131-137
28	मानवमुक्तीचा शिलेदार अण्णा भाऊ साठे *प्रा. किशोर शेषराव चौरे*	138-142
29	लोकशाहीर अण्णाभाऊ साठे *श्री. संजय रामचंद्र पाटील*	143-145
30	अण्णाभाऊ साठे यांच्या 'फकीरा' कादंबरीतील जीवनसंघर्षाचे चित्रण *सौ. हर्षदा अनिल पवार*	146-150
31	अण्णाभाऊ यांचे प्रवास वर्णन *प्रा. बी. बी. गायकवाड*	151-153
32	अण्णाभाऊ साठे यांच्या लोकनाट्यातील सामाजिक दृष्टीकोन *प्रा. गायकवाड नरेंद्र विठ्ठल*	154-157
33	साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे लिखित कथा साहित्यातील सामाजिक, राष्ट्रीय विचार संपदा *प्रा. डॉ. विश्वनाथ काशिनाथ सोनवणे*	158-167

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Sanskruti International Multidisciplinary Research Journal
IMPACT FACTOR - (IFSIJ) - 5.565 (2020), (CIF)- 4.186 (2018)
Special Issue 007 - 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे वाङ्मय: पुनर्वाचनाच्या दिशा'
E-ISSN: 2455-1511
October- 2020

मानवमुक्तीचा शिलेदार अण्णा भाऊ साठे

प्रा. किशोर शेषराव चौरे

इतिहास विभाग प्रमुख, म.ज्यो. फुले महाविद्यालय, बल्लारपूर, जि. चंद्रपूर
Email: chaurekishor12@gmail.com Mob.No. ८४२१८८४७६०

प्रस्तावना :

उपेक्षित समाजातून जन्माला आलेले अण्णा भाऊ साठे यांनी जो संघर्ष केला; जे साहित्य लिहिले ते समाज परिवर्तनाच्या लढ्यातील मानव मुक्तीसाठी एक प्रभावी हत्यार होते. त्यांचे साहित्य हे वास्तववादी जीवनावर अवलंबून होते. समाजातील बुरसटलेल्या विचारांना, सनातनी रूढी—परंपरांना छेद देणारे, क्रांतीची मशाल पेटविणारे असे होते. अण्णा भाऊंना आपल्या जीवनात जे अनुभव आले त्याचे हुबेहुब चित्रण त्यांनी आपल्या साहित्यातून प्रकट केले. अण्णा भाऊंचा विरोध एका व्यवस्थेविरूद्ध होता. श्रीमंतांच्या, सत्ताधिशांच्या व्यवस्थेविरूद्ध आपल्या साहित्यातून वैचारीक बंड उभारले. या साहित्यातून कार्ल मार्क्सच्या नाहीरे वर्गाचे जनजागरण केले. विषमतेवर हल्ला चढवून बहुजनवादी साहित्य निर्माण केले. त्यातून फार मूलगामी वर्णन केले. अण्णा भाऊ शाळेत गेले नाहीत, परंतु प्रतिभावंत अण्णा भाऊने आपल्या लेखणीद्वारे कादंबऱ्या, कथासंग्रह, लोकनाट्ये, प्रवासवर्णन तसेच लावण्या, गाणी, पोवाडे व कविता लिहिल्या. अण्णा भाऊंनी कथा, कादंबऱ्यामधून उभे केलेले नायक—नायिका बदलाची, परिवर्तनाची, मानवमुक्तीची मागणी करणारे होते. त्यांच्या कथा जगण्यासाठी लढणाऱ्या पराक्रमी माणसाच्या कथा आहेत. या कथा, कादंबऱ्यातून तळागाळातील माणसाच्या अवस्थेच्या वेदनेचे हुंकार व्यक्त केले. त्यांचे साहित्य म्हणजे समाज परिवर्तनाच्या लढ्यातील धारधार शस्त्रच होते.

मानवमुक्तीचा शिलेदार :

अण्णा भाऊ साठे यांचा जन्म १ आगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे मांगवाड्यात श्री. भाऊ शिधोजी साठे व सौ. वालुबाई साठे यांच्या पोटी झाला. "मांग जात ही शूद्र जातीपैकी एक होती. त्या जातीतील लोकांना उत्पन्नाचे

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

कुठलेही खात्रीशीर साधन नव्हते. ब्रिटिश सरकारच्या नोंदीनुसार मांग ही जात एक गुन्हेगार जात म्हणून ओळखली जात असे."

उत्पन्नाचे असे खात्रीशीर साधन नसल्यामुळे उदरनिर्वाहासाठी अण्णा भाऊंच्या वडीलांनी वाटेगाव सोडून कामासाठी परिवारासह उन्हातानात उपाशीपोटी पायी चालत मुंबई गाठली. त्यावेळी अण्णा भाऊ यांचे वय ११ वर्षाचे होते. मुंबईत आल्यावर अण्णा भाऊंनी पोटाची खळगी भरण्यासाठी हमाली केली; घरघुती काम केले; फेरीवाल्याचे गाठोडी वाहुन नेण्याचे कामेही अण्णा करू लागले. ही कामे करीत असतांना मुंबईतील रस्त्याच्या कडेला लागून असलेले सिमेमाचे, दुकानाचे फलक वाचू लागले. येथेच त्यांच्या प्रतिभेला आकार मिळाला; वैचारिक, तात्विक बैठक मिळाली. पोरगा शिकावा सवरावा म्हणून अण्णा भाऊंच्या वडीलांनी अण्णा भाऊंना वाटेगावच्या शाळेत दाखल केले होते. आई—वडिलांच्या आग्रहास्तव अण्णा भाऊ पहिल्या दिवशी शाळेत गेले तेथे त्यांना जातीयेतेचा अनुभव आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सुद्धा शाळेच्या बाहेरच बसून शिकावे लागले तोच अनुभव अण्णा भाऊ यांच्या वाट्याला आला. अण्णा भाऊ स्वत:च्या मनाशी यावेळी संवाद साधत असतील की, "माणसासारखी आम्ही माणसं असतानासुद्धा इतरांपेक्षा वेगळे कसे ठरू शकतो? माणसामाणसात भेद ठरवणारी ही कुठली धर्म पद्धत? असे प्रश्न बाल्यावस्थेतील अण्णा भाऊंना पडले होते. शाळेत प्रवेश केल्यावर त्यांना हा जातीयतेचा अनुभव आल्यानंतर अण्णा भाऊ पेटून उठले." व एक दिड दिवसातच त्यांची शाळा संपुष्टात आली. शाळेतील शिक्षण दिड दिवसातच अण्णा भाऊ साठेंचे जातीअंतामुळे जरी शिक्षण संपुष्टात आले तरी जन्मतातच उपजत गुण असल्यामुळे कोणत्याही प्रकारचे औपचारिक शिक्षण घेऊ न शकलेल्या अण्णा भाऊंनी साहित्य क्षेत्रात नावलौकिक केले. शाहिर, कामगार, नेता, कादंबरीकार, समाजसुधारक अशा विविध भूमीका त्यांनी आपल्या जीवनात पार पाडलेल्या दिसतात. वडिलांनी पाहिलेले अण्णा भाऊच्या शिक्षणाचे स्वप्न खऱ्या अर्थांनी अण्णा भाऊने व्यावहारिक जीवनातील अनुभवातून पूर्ण केले.

Officiating Principal
Mahatma Jotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

अण्णा भाऊनी 'वैचारीक क्रांती शिवाय समाजक्रांती शक्य नाही' हे सुत्र डोळ्यासमोर ठेवून त्यांनी अनेक साहित्याची निर्मिती केली. त्यात "सुमारे ३५ कादंबऱ्या, १३ कथासंग्रह, १४ लोकनाट्य तमाशे, ३ नाटके, १ प्रवास वर्णन, १ शाहिरी पुस्तक, ७ चित्रपटकथा आणि १५ प्रसिद्ध पोवाडे इतकी प्रचंड ग्रंथसंप्रदा, नव्हेत साहित्याचा खजिनाच अण्णा भाऊ आपल्यासाठी ठेवून गले."

विषम समाजव्यवस्थेमुळे दलित समाजातील विविध जातीधर्मातील लोकांना या भांडवलदार वर्गाकडून, श्रीमंताकडून, सत्ताधाऱ्यांकडून कोणकोणत्या संकटांना सामोरे जावे लागते. हे आपल्या साहित्यातून साकार केलेल्या पात्रातून दाखविण्याचा प्रयत्न केला. ही पात्रे अन्यायाला बळी पडत नाहीत तर अन्यायाविरूद्ध झुंजतात, प्रसंगी बंडही करून उठतात. "नायक–नायिका व इतर पात्रे ही सर्वसामान्यांतील आहे. त्यांच्या सर्व कथा, कादंबऱ्या यातून उभ्या केलेल्या नायिका, नायक हे कष्टकरी, आदिवासी, दलित, कामगार वर्गातील आहेत. त्यांच्या साहित्यात विषमता अन्याय याविरूद्ध चीड आणि त्या विरोधातील बंड पहायला मिळते. अन्याय सहन करणाऱ्या वंचितांना त्यांनी अन्यायाची जाण करून दिली, इतकेच नाही तर त्या विरूद्ध लढण्याची प्रेरणाही दिली." या पात्रांच्या माध्यमातून अण्णा भाऊंनी सामाजिक न्यायाची मागणी केलेली दिसते.

वारणेच्या खोऱ्यात, फकिरा, वारणेचा वाघ, मास्तर, अग्निदिव्य या कादंबऱ्यामधून अण्णा भाऊने साहसाचे, पराक्रमाचे चित्रण केले. कादंबरीतील पात्रानी साकारलेला लढा हा मानवमुक्तीचा लढाच वाटतो. महिलांच्या समस्येवरील महत्वाच्या कादंबऱ्या चित्रा, वैजयंता, चंदन, चिखलातील कमळ, फुलपाखरू, आवडी आणि रत्ना या कादंबऱ्यातून महिलांच्या साहसाचे, पराक्रमाचे चित्रण अण्णा भाऊंनी केलेले आहे. विज्ञान युगात स्त्रियांच्या सबलीकरणासाठी अनेक कायदे तयार झाले असले तरी; स्त्रियांवरील अत्याचार काही कमी झालेले नाही. आजही स्त्रीचे गुदमरलेपण विचार करायला लावणारे आहे. ग्रामीण पार्श्वभूमीवर असलेल्या कादंबऱ्या माकळीचा माळ, वैर, डोळे मोडीत राधा चाले, रानबोका, कुरूप, पाझर आणि केवड्याचे कणीस या कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनाचे यथार्थ दर्शन अण्णा भाऊने घडविले आहे. ज्या–ज्या लोकांची पिळवणूक झाली आहे, त्या लोकांच्या नायकांच्या–नायिकेच्या माध्यमातून अण्णा भाऊंनी वरील कादंबऱ्यांच्या माध्यमातून मांडलेली आहे.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

समकालीन लेखकांनी दलित, वंचित, भटक्या, कामकार, मजूर वर्गाच्या शोषणाची व्यथा आपल्या साहित्यात मांडलेली दिसून येत नाही, परंतु अण्णा भाऊंनी या उपेक्षितांचा, वंचितांचा इतिहास, सर्वसामान्याचे, कामगारांचे, कष्टकऱ्यांचे, दलितांचे प्रश्न आपल्या साहित्यातून मांडलें आहे. त्यांच्या साहित्यात वेगवेगळा प्रवाह जाणवतो. त्यांचे साहित्य परिवर्तनवादी, विज्ञानवादी तसेच विद्रोह करायला लावणारे आहे.

फकिरा ही कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनीला समर्पीत केली आहे. ज्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगीतले 'शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा' तसाच संदेश फकिरा या कादंबरीतून अण्णा भाऊंनी दिला, 'जग बदल घालूनी घाव, सांगून गेले मला भिमराव' या गीतातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रत असलेल्या समाजनिर्मितीसाठी बहुजनांनी एकत्रित यावे असे शाहिरीतून आवाहन केले. आपल्या धर्मग्रंथात सांगीतले आहे की, पृथ्वी ही शेषनागावर तरली आहे. परंतु अण्णा भाऊ सांगतात की, ही पृथ्वी कष्टकरी, कामगार, श्रमीक यांच्या तळहातावर तरलेली आहे. म्हणजे वर्षोनुवर्षे धर्मग्रंथ सांगीत असलेला चूकीचा संदेश ते खोडून काढतात व विज्ञानवादी दृष्टिकोन मांडतात. यामधून अंधश्रद्धेच्या आहारी गेलेल्या समाजाला सत्याकडे, वैज्ञानिक दृष्टिने वाटचाल करण्याचा इशारा दिला.

आजही शेतकऱ्यांचे कसे शोषन होते तो राबराब राबतो कष्ट करतो देशाला अन्नधान्य पुरवितो, परंतु त्याच्या उत्पन्नाला भाव नसल्यामुळे तोच मात्र अन्नाविना उपाशी राहतो. मोठ–मोठ्या इमारती बांधणारा मजूरही उघड्यावरच किंवा टिनाच्या झोपडीतच राहतो. तसेच कापड गिरणीत काम करणारा कामगार कापड तयार करतो मात्र त्याचाच परिवार कपड्याविणा राहतो. हे सर्व वास्तव अण्णा भाऊंनी आपल्या साहित्यातून मांडून या दुदैवी जीवनातून एक नवीन मार्ग जीवन जगण्यासाठी लेखणीच्या बळावर समाजाला देतात.

सारांश :

अण्णा भाऊने दैववाद, अंधश्रद्धा अशा गोष्टीला आपल्या साहित्यात कोठेच थारा दिला नाही. माणसाने वास्तववाद, प्रयत्नवाद व विज्ञानवाद स्वीकारावा हेच साहित्याच्या माध्यमातून बहुजन समाजाला दिलेले हत्यार होते. त्यांच्या या हत्याराची आजही समाजाला गरज आहे. 'दया नको न्याय पाहिजे' हे डॉ. बाबासाहेब

Officiating Principal
Mahatma Jotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

आंबेडकरांचे तत्व त्यांनी साहित्याच्या माध्यमातून पेरून गुलामीत खितपत पडलेल्या लोकांमध्ये स्वाभिमान जागृत करण्याचे कार्य केले.

कथा, कादंबऱ्या, पोवाडे, नाटके इत्यादी साहित्यच नाही तर संयुक्त महाराष्ट्र व्हावा यासाठी आपल्या शाहिरीद्वारे जनजागृती केली व लाल बावटा या कला पथकाची स्थापना करून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत महत्वाची कामगीरी बजावली. त्यांनी लिहिलेल्या लेखणीद्वारे व कार्याद्वारे जे समाजाला योगदान दिले त्या कार्यावरून ते मानवमुक्तीचे खरे शिलेदार शोभून दिसतात. ते महाराष्ट्राच्या इतिहासातच अजरामर नाहीत तर ते जगाच्या इतिहासातही अजरामर आहेत. अशा या बहुजनवादी मानवमुक्तीच्या लढ्यासाठी आपली लेखणी झिजविणाऱ्या महान साहित्यिकास माझे त्रिवार अभिवादन!

संदर्भसूची :

(१) कोरडे बजरंग, अनुवादक विलास गीते, 'भारतीय साहित्याचे निर्माते अण्णा भाऊ साठे', साहित्य अकादमी प्रकाशन, पृ. १,१६,१९

(२) प्रा. करडे रमेश, 'साहित्यसूर्य', प्रतिमा पब्लिकेशन्स, पुणे, प्र.आ., ३ जानेवारी २०१७, पृ. १२

(३) वाघ विलास (संपा.), सुगावा मासिक, ऑगस्ट २०१८, वर्ष ४५, अंक बारावा, राहूल कैलास पमारे यांच्या लेखातून, 'शोषितांच्या अन्यायाविरूद्ध लेखणी उभारणारे : लोकशाहीर कॉ. अण्णाभाऊ साठे', पृ. १

(४) डांगळे अर्जुन (संपादक मंडळ), 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङ्मय', प्रकाशन, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र.आ., १ ऑगस्ट, १९९८, पृ. संपादकीय

(५) गौरव ग्रंथ, 'लोंकशाहीर साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे', प्रकाशन : महासंचालक डॉ. आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे, द्वि.आ., जुलै २०१५, पृ. ६९,७२,७३,७४,७९

(६) डॉ. ताडेराव डी.बी.; डॉ. कामत सतीश (संपादक), 'प्रबोधशिल्पी अण्णा भाऊ साठे', शिवानी प्रकांशन, पुणे, प्र.आ., १ जून २०२०, पृ. ३५,३६,३२९,३३०,३३२,३३३

(७) अण्णा भाऊ साठे साहित्य परिषद, महाराष्ट्र राज्य संयोजन समिती तर्फे दिनांक १८ जुलै ते ३१ ऑगस्ट ऑनलाईन फेसबूक लाईव्ह व्याख्यानमालेतील विविध व्याख्यात्यांचे भाषणे

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

RNI MAHMAR
36829-2010

ISSN- 2229-4929

Peer Reviewed

Akshar Wangmay

International Research Journal

UGC CARE LISTED

Special Issue – II
Multidisciplinary Perspectives on Health, Society, Environment & Sustainable Development

December 2020









Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi

Executive Editor : Prof. Manoj S. Kamat

Principal,
DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju
Desai College, Canacona-Goa

Co-Editor : Prof. F. M. Nadaf

Address
'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist- Latur 413515 (MS)

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

AKSHAR WANGMAY

International Peer Reviewed Journal

UGC CARE LISTED JOURNAL

December 2020

Special Issue -Volume-II

On

Multidisciplinary Perspectives on Health, Society, Environment & Sustainable Development

Chief Editor

Dr. Nanasaheb Suryawanshi

Pratik Prakashan, 'Pranav, Rukmenagar, Thodga Road Ahmedpur,
Dist. Latur, -433515, Maharashtra

Executive Editor

Dr. Manoj S. Kamat

Professor & Principal
DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa

Co-Editor

Dr. F. M. Nadaf

Vice Principal & Professor of Geography
DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa

Editorial Board

Prof. Camena Guneratne (Sri Lanka)		Dr. RiaAerts (Australia)
Dr. Mohamed Izhar Hasan (Rohtak)	Prof. S. I. Biradar (Dharwad)	Dr. Bindhy Wasini Pandey (New Delhi)
Dr. Biswajit Roy Chowdhury (Kolkata)	Dr. Shyam Khinchi (Ganganagar)	Dr. Keya Das Ghosh (Kolkata)
Dr. Suryawanshi M V (Aurangabad)	Dr. C. P. Hiremath (Goa)	Dr. Sucheta Naik (Goa)
Shri. Vividh Pawaskar (Goa)	Dr. Pramada Gauns Desai (Goa)	Dr. Monika Kannan (Ajmer)
Dr. Arvind Haldankar (Goa)	Dr. L. T. Nayak (Dharwad)	Dr. Rupa Chari (Goa)

Published by- Dr. Manoj S. Kamat, Professor & Principal DPM's Shree Mallikarjun & Shri. Chetan Manju Desai College, Canacona-Goa

The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers . The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.

© All rights reserved with the Editors

Price :Rs.1000

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

24	Handigodu Disease Syndrome and its Health Problems of Weaker Section Communities **Vinay K. U. Hanamagouda C.**	84-89
25	Health Care Facilities on Handigodu Disease Syndrome in Karnataka: Some Observations **Vinay K. U., Hanamagouda C.**	90-93
26	Impact Of Covid-19 on Banjara Women Workers in Unorganized Sectors **V. B. Hipparagi, Dr. N .Veerendrakumar**	94-95
27	New Income Tax Policy- An overview **Smt. Gayatri Dadmi**	96-97
28	Consumer Awareness And Purchasing Habits Towards Brand Equity: An Empirical Analysis **Dr. S. Muralidhar, Anil. N**	98-101
29	Customer Satisfaction and Loyalty Towards Suzuki" A Study on Ballari District in Karnataka State **Jyothilinga V**	102-106
30	Green Accounting Practices in India-A Motive for Sustainable Development **Jyothilinga V**	107-111
31	An Analysis of Major Fruits Purchased and Sold by Hopcoms in Karnataka **Ganesha. K. R., Dr. S. Muralidhar**	112-116
32	Tax Evasion and Fiscal Deficit **Shantkumar A. Bangundi**	117-118
33	Relevance of Gandhian Concept of Grama Swaraj during Covid-19 **Dr. Nithya N. R.**	119-121
34	Emerging Trends in Banking-Increasing Role of Information Technology **Ganesha B**	122-124
35	Women in Agriculture: A Sociological Study in Western Ghats of Karnataka **Dr. Malini Revankar, Dr. Hanamagouda C.**	125-128
36	An Ethno-Botanical Study of Medicinal Plants of Odisha-A Review **Saikh Sartaj Mohammed, Dhirendra Kumar Nayak, Sandeep Rout and Krishna Priya Sahoo**	129-132
37	Spatial-Temporal Variation of Biogas in Kolhapur Distract **Krishna B. Patre, Dr. Sambhaji Shinde, Santosh P Mane**	133-135
38	Impact of COVID-19 on the sports industry **Dr. Ashok M. Kamble**	136-138
39	Role of Coastal Vegetation in Protecting Coastal Erosion **Dr. F. M. Nadaf**	139-143
40	In Modern India Exploitation of Dalit women: As a Dalit and as a women **Nanda Sheshrao Korde, Seema Sheshrao Korde**	144-145
41	बिहार विधानसभा निवडणूक- २०२० : प्रादेशिक पक्षांचे प्रभावशाली राजकारण ***शरद बाबुराव सोनवणे***	146-148
42	महाराष्ट्राच्या कृषी सुधारणेत शेततळ्यांची भूमिका व जलसिंचनाचे महत्व एक अभ्यास **प्रा. डॉ. बी. एम. वाघमोडे**	149-150
43	वैश्विक मानव एकता स्थल 'अरोविल' (पोंडेचेरी) :एक ऐतिहासिक धरोहर **डॉ व्यास सी. पी.**	151-153
44	महिलांकरिता ब्युटी पार्लर कौशल्य संपादन- एक संधी **उर्मिला खोत, डॉ. मंजुषा मोळवणे**	154-157
45	आंबेडकरी चळवळीतील बहिष्कृत भारताचे योगदान व वर्तमानकालीन स्थित्यंतरे **प्रा. किशोर शेषराव चौरे**	158-160
46	ग्रामीण भागातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून केला जाणारा ई-लर्निंगचा वापर व त्यामध्ये येणाऱ्या समस्यांचे अध्ययन **डॉ. लक्ष्मीकांत शिवदास हुरणे**	161-164
47	आम्ल पर्जन्य : कारणे, परिणाम आणि उपाययोजना **डॉ. हरी साधू वाघमारे**	165-168
48	प्रादेशिक पक्षांचे राजकारण प्रभावित करणाऱ्या घटकांचा परामर्श **शरद बाबुराव सोनवणे**	169-171

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidya... ..., Ballarpur

आंबेडकरी चळवळीतील बहिष्कृत भारताचे योगदान व वर्तमानकालीन स्थित्यंतरे

प्रा. किशोर शेषराव चौरे
इतिहास विभाग प्रमुख, म.ज्यो. फुले महाविद्यालय, बल्लारपूर, जि. चंद्रपूर
chaurekishor12@gmail.com

प्रस्तावना :

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रामुख्याने ओळख आहे, ती भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून जगात आजही भारताची राज्यघटना एक आदर्श राज्यघटना म्हणून समजली जाते, असे जरी असले तरीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक अष्टपैलू व्यक्तीमत्वाचे धनी होते. धर्मशास्त्र, अर्थशास्त्राचे अभ्यासक होते. कामगार नेते, राजकीय पक्षाचे संस्थापक द्रष्टे, विचारवंत विविध सामाजिक चळवळीचे जनक याचबरोबर त्यांनी केलेली पत्रकारीता आजही प्रेरक ठरते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाच्या वेदना आणि विद्रोह प्रकट करण्यासाठी 'मुकनायक' हे पाक्षिक काढले. मुकनायकचा जन्म म्हणजे आंबेडकरी चळवळीचा प्रारंभ होता. त्यानंतरचे बहिष्कृत भारत हे सामाजिक समतेच्या लढ्यातील महत्त्वपूर्ण वर्तमानपत्र होते. बहिष्कृत भारत म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनेक विचारांचा मूलभूत गाभा होय. समता हे केंद्रबिंदू होते. त्यात वर्तमान समाजाचे कठोर मंथन केले आहे. बहिष्कृत भारत या वृत्तपत्रातून समाज, धर्म, संस्कृती, राजकारण, अर्थ, शिक्षण आणि वाङ्मय या विषयावर लिहिलेले अग्रलेख आणि स्फूट लेख हे त्यांचे वैचारिक निबंधच होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले बहुतांश वैचारिक लेखन इंग्रजीतूनच केले; पण बहिष्कृत भारत, मूकनायक या वृत्तपत्रांचे लेखन मराठीतूनच केले आहे. वर्तमानकालीन आव्हानांचा विचार करताना बहिष्कृत भारत या वृत्तपत्रांचा अभ्यास करणे स्वातंत्र्य, समता, बंधुतावादी समाज निर्मितीसाठी महत्त्वाचे आहे.

विषयाची ओळख :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मूनायकपासूनचा सुरू झालेला वृत्तपत्रीय लेखनाचा प्रवास बहिष्कृत भारतापर्यंत विशाल रूप धारण करतो. 3 एप्रिल 1927 पासून बहिष्कृत भारताची सुरवात झाली. बहिष्कृत भारत म्हणजे आंबेडकरी चळवळीचे मुखपत्र होय. बहिष्कृत भारतात अस्पृश्यांच्या तत्कालीन सामाजिक समस्येबरोबर मूलभूतहक्कांची व राजकीय अधिकारांची चर्चा केली आहे.

संशोधनाचे अभ्यासक्षेत्र :

उपरोक्त संशोधनाचे क्षेत्र बहिष्कृत भारत या वृत्तपत्रातील पत्रकारिता होय. बहिष्कृत भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जातिव्यवस्थेचे समग्र शास्त्रीयतेने व सर्वसामान्यपणे सुबोध व परखड विश्लेषण करतात. या वर्तमानपत्रातून व्यक्त केलेली निर्भिडता, स्पष्टवक्तेपणा, सत्यप्रतिपादन आजच्या वर्तमानपत्रकारितेला लागू आहे.

संशोधनाची ध्येय व उद्दिष्टे :

(1) डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे तत्कालीन तर्कशुद्ध विचारांचा वर्तमानकाळासाठी अभ्यास करणे.
(2) बहिष्कृत भारतातून समाजजीवनाचे व्यापक पण शास्त्रीय भूमिकेतून केलेले कठोर परिक्षण उलगडणे.
(3) बहिष्कृत भारतामधील स्वराज्य, राष्ट्रहितांची व्यापक भूमिका, त्यांची सांगोपांग चर्चा करणे.

संशोधनाची गृहितके :

(1) प्रस्तुत संशोधनातून मानवी मूल्यांवर आधारलेल्या नवसमाजाची उभारणी करण्याचा आग्रह अभ्यासने गरजेचे आहे.
(2) बहिष्कृत भारतातील एकुण लेखातील शास्त्रीय विश्लेषणाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रत्येक विषयाचे विवेचन करतात. त्यात त्यांच्या सत्यान्वेषी चिकित्सक बुद्धीचा प्रत्यय येतो.
(3) समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या लोकशाही मूल्यांना नकार देणारी नकारात्मक समाजव्यवस्था नाकारून मनुष्याचे अर्थपूर्ण व न्यायधिष्टीत नवसमाज स्वीकारण्याची वाटचाल हे डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे जिवित ध्येय होते. वर्तमानकाळात त्यावर अभ्यास होणे गरजेचे आहे.

संशोधन पद्धती :

बहिष्कृत भारत व वर्तमानकाळातील आव्हाने या शोधनिबंधासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला आहे. मुळ ग्रंथ, तत्कालीन मासिक वर्तमानपत्रे, संकलीत माहितीच्या आधारे योग्य मांडणी करण्यात आली.

विषयप्रवेश :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पददलित अस्पृश्यांच्या आणि बहिष्कृत वर्गाच्या आत्मप्रतिष्ठेसाठी आणि स्वातंत्र्यासाठी एका मोठ्या लढ्याचे नेतृत्व 1920 पासून करीत होते. वृत्तपत्र हे समाजप्रबोधनाचे माध्यम, समाजक्रांतीचे साधन आहे. वृत्तपत्र बहुजन, अस्पृश्य समाजाची दास्यशृंखला तोडण्यासाठी[1] यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चार वृत्तपत्रे सुरू केली. त्यापैकी 'मूकनायक' आणि 'बहिष्कृत भारत' या दोन पत्रांचे संपादन स्वतः केले. 'जनता' आणि 'प्रबुद्ध भारत' या दोन पत्रांचे संपादन त्यांनी आपल्या सहकाऱ्यावर सोपविले. त्यातून त्यांनी भाषणे, लेख व चळवळीचे वृत्तांत देत राहीले.[2]

मूकनायक सुरू केले तेव्हा बाबासाहेबांचे वय 29 वर्ष आणि बहिष्कृत भारत सुरू केले (1927) मध्ये त्यांचे वय 36 वर्ष होते. बहिष्कृत भारताच्या प्रत्येक अंकात शिरोभागी ज्ञानेश्वरीची ओवी छापलेली होती. 'आता कोदंड घेऊनि हाती। आरूढ पाइये रथी। देई

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

आलिंगन वीरवृत्ती समाधाने जगी किर्ति रूढवी। सज्ज झाली आहेत हा लढा स्वकीयांविरूद्ध आहे. हिंदू धर्मातील चातुर्वर्ण्य विरोधात आहे.[3] बाबासाहेबांना 'अस्पृश्यता' यांची फेरमांडणी करून ब्राम्हण, ब्राम्हणेतर आणि बहिष्कृत अशी वर्गवारी करून बहिष्कृत समाजाचे, बहिष्कृत भारताचे नेतृत्व करायचे होते.

बहिष्कृत भारत हे त्यांना वृत्तपत्र करायचे नव्हते तर बहिष्कृत समाजाच्या चळवळीचे मुखपत्र बनवायचे होते. त्याचप्रमाणे 'मनुस्मृतीचे दहन' आणि चवदार तळ्याचा सत्याग्रह यांच्यासाठीच 'बहिष्कृत भारत' त्यांनी सुरू केले. चवदार तळ्याच्या सत्याग्रहाची तुलना त्यांनी फ्रेंच जाहीरनाम्याशी केली आहे.[4] म्हणजे चवदार तळ्याची कृती नियोजनबद्ध आणि कशी ऐतिहासिक आहे दाखवायचे होते.

बहिष्कृत भारताचे नायक म्हणून ओळख :

बहिष्कृत भारत या वृत्तपत्राचे संपूर्ण महाराष्ट्र ढवळून काढला. 3 फेब्रुवारी 1928 च्या अंकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, "बहिष्कृत भारताच्या झंझावताने हिंदू समाजातएक प्रकारचे तुफान आले होते."[5]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बहिष्कृत भारतात निवळ स्थानिक व प्रादेशिक प्रश्नांचा उहापोह नव्हता तर अनेक राष्ट्रीय प्रश्नांना सुद्धा हात घातला होता. गिरणी कामगारांच्या संपावर जसे आपले मत प्रकट केले तसेच मोतीलाल नेहरू कमिटीने ब्रिटिश सरकारला सादर केलेल्या रिपोर्टवर आपली स्पष्ट प्रतिक्रिया व्यक्त केली. या प्रतिक्रियेने आपले मुस्लीम मित्र रूष्ट होतील याची जाणीव असूनही "निवळ राष्ट्रहित डोळ्यांसमोर ठेवून आम्ही हा इषारा देत आहोत." असे ते म्हणाले. इतिहासाच्या घटनांचा अर्थ ते बुद्धीवादी भूमिकेतून लावीत आणि शेवटी या विचारांचा अंतिम हेतू राष्ट्रहिताकरिता कसा आहे हे स्पष्ट करीत.[6]

राष्ट्रीय स्तरावरील इंग्रजी व प्रादेशिक भाषातील वृत्तपत्रानी सुद्धा बहिष्कृत भारताची दखल घेतली.

सर्वांगिण हिताचा विचार :

मूकनायक वृत्तपत्राच्या वेळी सारे सूत्रसंचालन पडद्याआड राहून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना करावे लागले. बहिष्कृत भारताच्या वेळेस सर्व संपादकीय जबाबदारी स्वतः स्वीकारली. बहिष्कृत भारतासाठी अतोनात परिश्रम घेतले. त्यांच्या लेखनीतील विचार परिपक्व लेखकांचे होते. त्यांची पत्रकारिता लोकजागृती घेतलेली स्वयंदीक्षाच होती.[7]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरात लढाऊ पत्रकारितेची अचाट क्षमता होत्या. थेट मुद्याला हात घालण्याचे व वाचकांना धरून ठेवण्याचे कसब होते. भाषेच्या प्रभूत्वाबरोबरच वादविवादाना तर्कशुद्ध उत्तर देण्याची क्षमता होती. उदारमतवाद आणि समदर्शि मार्ग हा त्यांच्या विचारांचा व कृतीशीलतेचा गाभा होता. रानडे, गांधी आणि जीवना या आपल्या भाषणात त्यांनी म.गो. रानडे यांना गौरविले तर 'बहिष्कृत भारत' च्या दुसऱ्या वर्षापासून प्रत्येक अंकात 'लोकहितवादींची शतपत्रे' पुनर्मुद्रीत केली. जेवढा त्यांनी पाश्चात्य तत्वज्ञानांचा अभ्यास केला तेवढाच मुलगामी अभ्यास हिंदू, ख्रिश्चन, मुस्लीम व बौद्ध धर्माचाही अभ्यास केला.[8] म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समाज आणि धर्मविषयक चिंतन आत्मप्रत्ययी आहे. समाज कार्य, राजकारण, शिक्षण, अर्थ व वाङ्मयाचा मूलभूत शोध त्यांनी घेतला. म्हणूनच बहिष्कृतांच्या सर्वांगिण हितांचा मूलगामी हिताचा विचार प्रदर्शित करणारे 'बहिष्कृत भारत' हे नवसमाज निर्मितीचा प्रभावी अविष्कार होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे धार्मिक व सामाजिक विचाराइतकेच राजकीय विचारानाही महत्व होते. हिंदू समाजात धार्मिक सुधारणेबरोबर सामाजिक सुधारणा होणे शक्य नाही.[9]

परखड आणि विचारप्रवर्तक:

दिनांक 18 जानेवारी 1929 च्या बहिष्कृत भारताच्या अंकात नेहरू कमिटीची योजना व हिंदूस्थानचे भवितव्य त्यावर लेख लिहिला. त्यात ते म्हणतात की, नेहरू कमिटीने सर्वव्यापी अस्तित्व राज्यघटनेत नमूद केले नाही. प्रथम राष्ट्रहिताला प्राधान्य देण्यात यावे. नेहरू कमिटीने हिंदूसाठी असलेला व व्यापारी वर्गासाठी असलेला मतदारसंघ टाकून त्यापेक्षा सर्वत्र स्थलवाचक मतदारसंघाची स्थापना करण्यात यावी. हिंदूसाठी स्थलवाचक संघ निर्माण करताना मुस्लीमासाठी तीच पद्धती असावी.[10] अस्पृश्य वर्गाकडे पूर्णतः दुर्लक्ष केले असा नेहरू कमिटीवर त्यांनी आरोप लावला.

- प्रांतिक व मध्यवर्ती सरकार यांच्या परस्पर सबंधाचा विचार करताना बाबासाहेबांनी मध्यवर्ती सरकारवर प्रांतिक सरकारवर अंकुश हवा असे रोखठोकपणे सांगितले. बाबासाहेबांनी ईशारा दिला की, मध्यवर्ती सरकारचा अंकुश नसेल तर प्रांतिक सरकार अनियंत्रित होतील आणि त्याचा परिणाम देशावर होईल. बाबासाहेब आंबेडकरांचे द्रष्ट्रेपण येथे प्रतीत होते.[11]

अर्थ, शेती, शिक्षण आणि वाङ्मय या विषयीचे लेखन चिरतंन आहे. शेती सुधारणेचा सबंध देशाच्या अर्थव्यवस्थेशी जोडला.[12]

वर्तमानकाळातील उपयुक्तता:

बहिष्कृत भारतामधील त्यांची भाषा ओजस्वी होती. समाजातील उपेक्षित वर्गाविषयी कळवळा होता. त्यांची लेखनी तलवारीसारखी तळपत होती. दुर्गा भागवतींनी त्यांच्या मराठी भाषेचे तोंडभरून कौतुक केले.[13] लोकशाही संविधानात्मक नितिमत्ता, राजकीय नितिमत्ता, अल्पसंख्याकांचे संरक्षण, प्रभावी विरोधी पक्ष, राजकीय शिक्षण यासारख्या अनेक प्रश्नावर डॉ. बाबासाहेब आंबेडकराची भूमिका स्पष्ट, सडेतोड, प्रभावी आणि देशहिताची होती. 'भारतात संपतीची वाटणी विषम केल्यास राष्ट्रीय आपत्ती निर्माण होईल'हे वाक्य आजच्या काळाला लागू आहे. शेती सुधारली तर देश सुधारेल हे वाक्य वर्तमान काळाच्या कसोटीवर शेती करावी. पारंपारिक शिक्षणापेक्षा आधुनिक शिक्षक प्राध्यापक परिश्रम, संशोधन आणि चिंतन करणारा असावा हे विचार काळाच्या पुढे होते. त्यांनी

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

ठेवलेली सामामाजिक न्यायमूल्याची जाणीव आजही विविध माध्यमातील पत्रकाराना खुणावते.[14] बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या काळातील विरोधी व जातीयवादी पत्रांच्या व पत्रकारवृत्तीच्या पत्रकाराचा दंभस्फोट वेगवेगळ्या उदाहरणानी मोडून काढला तेच युक्तीवाद आजच्या पत्रकारात व संपादकात येणे गरजेचे आहे.

निष्कर्ष :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचीलेखनी स्वयंभू व स्वयंसिद्ध होती. वक्तृत्व आणि प्रवाहित्व ही त्यांच्या लेखनशैलीची वैशिष्टे होती. संत वाङ्मयातील नैतिक शिकवणुकीचा भाग सामाजिक सौहार्दाला उपयुक्त आहे. देशाच्या भूगोलापेक्षा देशाचा इतिहास त्यांच्या चिंतनाचा विषय होता आणि इतिहासाची कारणमीमांसा बुद्धी प्रामाण्यवादातून करणे हे बहिष्कृत भारतातून प्रतित होते. त्या वर्तमानपत्रातून त्यांनी नवसमाज उभारणीचा आग्रह धरला आणि हा समाज स्वातंत्र्य, समता, बंधुताआणि न्याय या मूल्यांचापुरस्कार करेल अशी अपेक्षा होती.

संदर्भ ग्रंथसाधने :

(1) खैरमोडे चां.भ., 'डॉ. आंबेडकर चरित्र', खंड-02, पृ. 132
(2) साधना साप्ताहिक (संपा.), 'अभिवादन बहिष्कृत भारताच्या नायकाला', 31 जानेवारी 2020
(3) पूर्वोक्त
(4) पूर्वोक्त
(5) मून वसंत; नरके हरी (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक (प्रस्तावना शरद पवार) उच्च व तंत्रशिक्षण महाराष्ट्र शासन, मुंबई, 2008, पृ. 01
(6) पूर्वोक्त
(7) सबनीस श्रीपाल, 'भारतरत्न आणि बहिष्कृत भारत', कोल्हापूर, प्र.आ., 1991, पृ. 8
(8) साधना साप्ताहिक (संपा.), 'अभिवादन बहिष्कृत भारताच्या नायकाला', 31 जानेवारी 2020
(9) बहिष्कृत भारत, 15 मार्च 1929
(10) बहिष्कृत भारत - नेहरू कमिटीची योजना व हिंदूस्थानचे भवितव्य, 18 जानेवारी 1929
(11) लाकराज्य (संपा.), मन्वतर घडविणारी पत्रकारिता - डॉ. गंगाधर पानतावने यांचा लेख, 2017, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, पृ. 82
(12) पुर्वोक्त, पृ. 82
(13) कांबळे विवके, 'पत्रकार डॉ. आंबेडकर' द वायरमधील लेख 1 फेब्रुवारी 2020
(14) लोकराज्य (संपा.), महामानव - मन्वतर घडविणारी पत्रकारिता - डॉ. गंगाधर पानतावने यांचा लेख, 2017, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, पृ. 82

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

5.9

ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

तिफण

वर्ष १२ वे अंक १ ला
एप्रिल, मे, जून २०२१

महामानव
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
अभिवादन विशेषांक

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

तिफण

वर्ष १२ वे, अंक - पहिला एप्रिल ते जून २०२१

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

(भाग—०३)

• संपादक •
डॉ. शिवाजी हुसे
पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३,
मो. ९४०४०००३९८.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyal..., Ballarpur

UGC Care Listed Journal|ISSN 2231 - 573X

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांक

वर्ष १२ वे, अंक - पहिला एप्रिल ते जून २०२१

• संपादक •

डॉ. शिवाजी हुसे

• अतिथी संपादक •

प्रा. कार्तिक रा. पाटील प्रा. प्रफुल एम. राजुरवाडे

• संपादक मंडळ •

डॉ. सर्जेराव जिगे
डॉ. फुला बागूल
डॉ. अनिल गर्जे
डॉ. संजय भालेराव
डॉ. ताहेर पठाण
डॉ. वंदना महाजन
डॉ. प्रकाश खेत्री
डॉ. ममता इंगोले
डॉ. वामन जाधव
डॉ. यशवंत सोनुने
डॉ. रामचंद्र झाडे

मूल्य : १७५ रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९४०४०००३९८

Officiating Principal
Mahatma Jotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

26	चंद्रपूर जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीचे ऐतिहासिक अध्ययन – प्रा. प्रफुल राजुरवाडे	151
27	डॉबाबासाहेब आंबेडकर व दलित चळवळ . – प्रा. किशोर चौरे	158
28	डॉ. बाबासाहेब आंबेडकर – एक द्रष्टे विचारवंत डॉ. पी. एस. माहोरे	163
29	डॉ. बाबासाहेब आंबेडकांचे शैक्षणिक कर्तृत्व – छत्रपाल लामकाने	169
30	डॉबाबासाहेब आंबेडकरांची भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाविषयी भूमिका . प्रा नरेंद्र नरसिंग सुर्यवंशी .	147
31	विदर्भ शेतीविषयक प्र"ने आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषीविषयक विचार : एक समिक्षात्मक वि"लेषण – प्रा. राजु लिपटे	179
32	महिलांचे कैवारी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर – प्रा. डॉ. निवासराव अधिकराव वरेकर	184
33	भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजाभिमुख कार्य : ऐतिहासिक अभ्यास - डॉ व्यास सी पी	187
34	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार – प्रा. जगदी"ा रामभाऊजी वाटमोडे	192
35	भारताच्या परराष्ट्रीय धोरणासंदर्भात डॉ बाबासाहेब आंबेडकाराची भूमिका – डॉ पदमाकर प्रेमदास दारोंडे	199
36	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार – डॉ. उज्वला तेजराम कापगते	207

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

" डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दलित चळवळ"

प्रा.किशोर भोशराव चौरे

भारतीय समाजात अनेक अनिष्ठ रूढी व परंपरा होत्या. अस्पृश्यता त्यापैकी एक रूढी होती. या रूढीमुळे मानवी मुल्यांचे अवमुल्यन झाले. माणूस म्हणून जगण्याचा अधिकार सुध्दा नाकारल्या गेला. भारतात जातीव्यवस्था आणि चार्तुवर्ण व्यवस्था या पध्दतीतून अस्पृश्यतेचा उदय झाला. प्राचीन व मध्ययुगीन काळात बुध्द व महावीरांचा काळ सोडला तर अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी फारसे प्रयत्न झाले नाही. पंरतु ब्रिटीशांच्या आगमनानंतर बरेच बदल झाले. त्यांनी अस्पृश्यता व जातीव्यवस्थेच्या प्रश्नावर विचार करायला लावले. परिणामी दलित चळवळीची निर्मीती झाली.

दलित चळवळ ही प्रामुख्याने पददलित अस्पृश्य व हरिजनांची चळवळ आहे. या वर्गावर झालेल्या अन्यायातून ही चळवळ उभी राहिलेली दिसते. दलित हा शब्द चातुर्वर्णाशी निगडीत आहे. चार्तुवर्णरूपी जात्यात भरडले गेलेले व दळले गेलेले किवा जात असलेले अशी शब्दाची व्युत्पत्ती सांगता येईल. हा शब्दप्रयोग सर्वप्रथम महात्मा फुले यांनी उपयोगात आणला होता. त्यांच्या मते तळागाळात रूतून बसलेला सर्वच उपेक्षित समाज म्हणजे दलित होय. दलित समाजातील अज्ञान. अंधश्रध्दा दूर करण्याचे काम, त्यांच्यात शैक्षणिक जागृती व कायदेशीर अधिकारी देण्याचे ऐतिहासिक कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले.

डॉ. आंबेडकर पुर्वी दलित चळवळीचे स्वरूप :–

दलित चळवळीच्या कार्याचा विचार करता तिचा प्रारंभ 1852 पासून झाला असेच म्हणावे लागेल. 170 वर्षापासून चालत आलेल्या दलित चळवळीचे चार टप्पे दिसतात. त्यात डॉ. आंबेडकरपुर्व दलित चळवळीचे दोन टप्पे सांगता येतील. पहिल्या टप्यात 1850 ते 1900 पर्यंतचा प्रथम कालखंड महात्मा फुले आणि ईतर समकालीन दलित्तेतर समाज सुधारकांनी दलितांचे शोषणापासुन मुक्ती मिळविण्यासाठी

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

केलेले प्रयत्न तर दुसऱ्या टप्यात 1900 ते 1924 पर्यंतच्या दुसऱ्या कालखंडात दलित समाजातील लोकांचे प्रयत्न आपणास सांगता येतील.

1850 पासुन ते डॉ. आंबेडकर साहेबांच्या उदयापर्यंत महात्मा फुले, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, न्या. रानडे, आगरकर, गोपाळकृष्ण गोखले, वि.रा. शिंदे इत्यादी समाजसुधारकांची नावे घेता येतील.

अस्पृश्यतेच्या प्रश्नाला केवळ प्रश्न न मांडता तो सोडविण्यासाठी संपुर्ण समाजाची पुर्नमांडणी करणे आवश्यक आहे असा विचार महात्मा फुलेंनी प्रथम मांडला. 1851 साली पुण्यात नानापेठ येथे अस्पृश्यासाठी प्रथम शाळा सुरू केली. 1853 साली महार मांग इत्यादी लोकांस विद्या शिकविण्याकरीता मंडळी नावाची संस्था सुरू केली. 1886 साली पाण्याचा हौद अस्पृश्यासाठी खुला केला. फुलेंच्या कार्यामुळे अस्पृश्यांना प्रेरणा मिळाली. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा फुलेंना आपले गुरू मानले.

बडौदा संस्थानाचे राजे सयाजीराव गायकवाड हे परिवर्तनवादी विचारांचे होते. त्यांनी आपल्या संस्थानात अस्पृश्यता विरोधी कायदा केला. त्यांनी बहजन अस्पृश्य वर्गात शिक्षण प्रसार घडवून आणण्यास प्राधान्य दिले. विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृहे व वाचनालये सुरू केली. त्यांच्या अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी होणाऱ्या सर्व प्रयत्नांना डॉ. बाबासाहेबांचा पाठींबा होता.

शाहु महाराजांवर महात्मा फुलेंचा प्रभाव होता. त्यांनी कोल्हापूर संस्थानात अस्पृश्यता विरोधी कायदा अंमलात आणला. प्रत्येक जातीच्या लोकांसाठी वस्तीगृह काढले. 1908 मध्ये अस्पृश्यांसाठी मिस क्लार्क होस्टेल सुरू केले. माणगांव येथे भरलेल्या अस्पृश्य परिषदेचे अध्यक्षपद भुषविले. दलित नेता म्हणून बाबासाहेबांना त्यांनी पाठींबा दिला. आपल्या संस्थानामध्ये 50 टक्के जागा मागासलेल्या जातीसाठी राखीव ठेवल्या. अनेक अस्पृश्य समाजातील लोकांना मदत केली. अस्पृश्यांना व्यवसाय व नोकरी मिळविण्यास सहकार्य केले.

अस्पृश्य वर्गाची सुधारणा व्हावी म्हणून विठ्ठल रामजी शिंदे यांनी आयुष्यभर कार्य केले. त्यांच्या कार्यास सयाजीराव गायकवाड आणि प्रार्थना समाजाचे सहकार्य होते. अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी 18 ऑक्टोबर 1960 रोजी डिस्प्रेड क्लासेस मिशन सोसायटीची स्थापना केली. या संस्थेचा उद्देश अस्पृश्य समाजात शिक्षणप्रसार, अस्पृश्यांना नौकरी संधी निर्माण करणे, त्यांच्या अडीअडचणीचे निराकरण करणे आणि अस्पृश्य बांधवांना धर्माची खरी शिकवण देणे हा प्रमुख उद्देश होता. मुंबई व वऱ्हाड प्रातांत अस्पृश्यांसाठी शाळा काढल्या. अस्पृश्यांच्या प्रश्नासंबंधी हिंदू लोकांत जाणीव जागृती केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरपुर्वीच्या दलित समाज सुधारकांचे कार्य :–

दलितेत्तर समाजातील लोकांनी केलेल्या कार्याने प्रभावित होऊन काही दलित समाजातील सुधारकांनी कार्य केले. त्यात 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात गोपाळबुवा वलंगकर यांनी कार्य केले. त्यांना दलित चळवळीतील प्रथम नेता व समाजसुधारक म्हटले जाते. त्यांच्यावर महात्मा फुलेंच्या कार्याचा प्रभाव

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

होता. 1890 मध्ये त्यांनी 'अनार्य दोष परिहार' नावाची संघटना स्थापन करून किर्तनाच्या माध्यमातून अस्पृश्यामध्ये जाणीव जागृती केली. 'बिटाळ विध्वंसन' हे पुस्तक लिहून ज़ातीभेद व अस्पृश्यतेबद्दल अनेक प्रश्न उपस्थित केले. दलितांच्या दुखाला वाचा फोडली. त्याच बरोबर शिवराम जानबा कांबळे यांनी सुध्दा पुणे शहरात अस्पृश्योध्दारांची चळवळ सुरू केली. 51 गावातील अस्पृश्यांची सभा घेऊन सरकारला निवेदन सादर केली. अस्पृश्यांना शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी, सैन्य, पोलीस दल, आणि सरकारी नोकरीत संधी मिळावी म्हणून प्रयत्न केले. मुरळीच्या प्रथेविरूध्द आवाज उठविला. वि.रा. शिंदे यांनी सुरू केलेल्या निराश्रीत साह्यकारी मंडळाच्या पुणे शाखेचे ते अध्यक्ष होते. त्याचबरोबर किसन फागुजी बन्सोड यांनी वऱ्हाड प्रातांत अस्पृश्यता उध्दारकांचे कार्य केले. त्यांच्या सोबत विठोबा रावजी मुनपांडे, मुकुंदा शेट्ये, करणुजी विठ्ठल मालगुजार, गोमा गणेश सावकार, कालीचरण नंदागवळी, नानासाहेब गवई, जाणोजी खंदारे, फत्तुजी शेंडे यांच्या सोबत कार्य केले. त्यांनी चोखामेळा कन्या शाळा सुरू केलीं. अनेक विद्यार्थी वस्तीगृह काढली. आंबेडकरपुर्व काळात सामाजिक समतेच्या विचारप्रवाहाची साखळी निर्माण केली. त्यांच्या कार्यातुन दलितांमध्ये आत्मभान निर्माण केले.

दलित वळवळीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान :–

अस्पृश्यांना होणाऱ्या अत्याचाराविरोधात हक्क मिळवून देण्यास, त्यांच्यात स्वाभिमान जागृत करण्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. दलितांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी शाहु महाराजांच्या प्रोत्साहनाने मुकनायक हे मासिक सुरू केले. त्यांनंतर जनता प्रभुत्व भारत ही वर्तमानपत्रे सुरू केली. Cstes in India, Thoughts on Pakistan, Untouchables, Budha and Karl Marks, Budha and his Dhamma, Who were the Shodras, State and Minoritities इ. ग्रंथ त्यांनी लिहून दलित प्रश्नाला वैचारिक चौकट उपलब्ध करून दिली. दलितांमध्ये आत्मभान व स्वाभिमानाची भावना निर्माण करण्यासाठी बाबासाहेबांच्या योगदानाचा विचार करता त्यांचा महामानव म्हणून गौरव केला जातो.

विविध सामाजिक धार्मिक चळवळी :–

अस्पृश्यांचा आर्थिक व राजकीय विकास घडवूण आणण्यासाठी आणि भारतीय समाजापुढे जातीय संस्थेने ऊभे केलेले आव्हान मोडून काढण्यासाठी 20 जुलै 1924 रोजी बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना केली. या संस्थेचे 'शिका व संघटीत व्हा व संघर्ष करा' हे ब्रिद वाक्य होते. या संस्थेमार्फत अस्पृश्य समाजात समाज सुधारणा व जागृती आणि शिक्षण प्रसारावर भर दिला. दलित समाजातील तरूण व प्रौढ व्यक्तींना रात्रीच्या शाळा, वाचनालये या संस्थेनी काढली. दलित समाजात जागृती घडवुन आणणे, शिक्षणाचा प्रसार करणे, दलित समाजाची आर्थिक स्थिती सुधारणे यासाठी ही संस्था कार्यरत होती.

1926 मध्ये बाबासाहेबांनी दलित शोषितांची एक गैर राजकीय व सामाजिक संघटना म्हणून समता सैनिक दलाची स्थापना केली. या दलाव्दारे दलित तरूणांमध्ये शारिरीक व मानसिक जागृती व्हावे

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

यासाठी विविध कार्यक्रम राबविले. युवकांचे ऐक्य व कल्याणासाठी ही संघटना कार्यरत होती. अस्पृश्यांना आपला हक्क बजावण्यासाठी संघटीत करून 20 मार्च 1927 रोजी सत्याग्रह करून महाडचे चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले करण्यात आले. दलित समाज आपले हक्क आता स्वबळावर मागतील हे दाखवून दिले. 25 सप्टेंबर 1927 ला मनुस्मृतीचे जाहीर दहन करून अन्यायकारक ग्रंथाला कायमची मुठमाती मिळावी म्हणून प्रयत्न केले. सामाजिक विषमता व उच्चनीच भेदभावांचे समर्थन करणाऱ्या ग्रंथाचे दहन करून प्रतिकात्मक कृती केली. या घटनेतून अस्पृश्य वर्गाचे मनोबल वाढण्यास मदत झाली. हिंदू धर्मातील उच्च वर्गीयांनी अस्पृश्य जातीतील लोकांना अनेक हक्कापासून वंचित केले होते. अस्पृश्यांना साधा मंदिर प्रवेशाचा अधिकार नाकारला होता. अस्पृश्यांना मंदिर प्रवेशासाठी बाबासाहेबांनी 02 मार्च 1930 ला नाशिक येथे काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह व अमरावती येथील अंबादेवी मंदिर सत्याग्रह केला. नंतर बाबासाहेबांच्या प्रेरणेने महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मंदिर प्रवेश चळवळी सुरू झाल्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या राजकीय हक्कासाठी सायमन कमिशन समोर साक्ष ठेऊव अस्पृश्यांना राखीव जागांची मागणी केली. लंडन येथे भरलेल्या गोलमेज परिषदेत अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून सहभाग घेतला. या परिषदेत अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली.

गोलमेज परिषदेनंतर इग्लंडच्या पंतप्रधानांनी म्हणजे रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी जातीय निवाडा जाहीर करून अस्पृश्यांची स्वतंत्र मतदार संघाची मागणी मान्य केली. पण गांधीनी पुणे येथील येरवडा तुरूंगात त्या मागणीविरोधात उपोषण केले. उपोषणामुळे देशभरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. हा तणाव कमी करण्यासाठी महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात जडजोड घडवून आणली. दोघांत पुणे करार घडून आला. अस्पृश्यांना स्वंतत्र मतदार संघाऐवजी राखीव मतदार संघ देण्यात आले. त्यानंतर त्यांनी स्वतंत्र मजुर पक्षाची स्थापना केली. 1937 च्या प्रांतिक विधीमंडळात या पक्षाला चांगले यश प्राप्त झाले. मुंबई विधिमंडळात बाबासाहेब विरोधी पक्षनेता म्हणून प्रसिध्द झाले. अनुसुचित जातीच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी, स्वातंत्र्य प्राप्ती नंतर दलितांची उपेक्षा होऊ नये म्हणून 1942 मध्ये शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाची स्थापना केली. या पक्षाने घटना समितीला निवेदन देऊन अस्पृश्यांचे हित व हक्क सुरक्षित राहावेत त्याकरीता विशेष संवैधानिक तरतुदी करण्याचा फेडरेशनने आग्रह धरला.

स्वातंत्र्य भारतातील दलितांचे नेतृत्व :–

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा प्रभाव भारतीय राज्य घटनेवर पडलेला दिसतो. भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समिती अध्यक्षपदामुळे त्यांना राज्यघटनेचे शिल्पकार मानले जाते. घटनेने 20 नोव्हेंबर 1948 रोजी सतरावे कलम संमत करून अस्पृश्यतेची रूढी कायद्याने नष्ट केली. अस्पृश्यता पाळणे कायद्याने गुन्हा मानला गेला. डॉ. बाबासाहेब स्वंतत्र भारताचे पहिले कायदेमंत्री बनले. त्यांनी हिंदू कायद्यात बदल व्हावा, स्त्रियांना समानतेचा हक्क मिळावा म्हणून हिंदू कोड बिलाचा मसुदा तयार करून लोकसभेत मांडला, पण हे बिल मंजुर होऊ शकले नाही. त्यामुळे त्यांनी कायदा मंत्रीं पदाचा राजीनामा दिला.

हिंदू धर्माने न्याय न दिल्यामुळे 14 ऑक्टोबर 1956 ला लाखो दलित बांधवासह नागपूर येथे बौध्द धर्माची दिक्षा घेतली. पुढे 1952 च्या निवडणूकीत शेड्युल्ड कास्ट फेडरेशनला अपयश आले. स्वतः बाबासाहेब आंबेडकरांचा पाडाव झाला. म्हणून निव्वळ दलितांची संघटना उभारून चालणार नाही तर सर्व

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

अस्पृश्य, गरीब, अनुसुचित जाती, जमातीची एकत्र ताकद करून अमेरिकेतील रिपब्लीकन पक्षासारखा एखादा पक्ष असावा यादृष्टीने त्यांनी वाठचाल केली. पण त्यांच्या महापरिनिर्वाणामुळे त्यांचे स्वप्न पुर्ण झाले नाही. त्यांच्या अनुयायांनी रिपब्लीकन पक्षाची स्थापना केली. त्यांचे स्वप्न पुर्ण करण्याचा प्रयत्न केलां परंतु हा पक्ष राजकारणात फारसा प्रभाव पाडू शकला नाही.

निष्कर्ष :–

दलित चळवळ ही भारतातील एक महत्वपुर्ण चळवळ मानली जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे दलित समाजात आत्मभान निर्माण झाले. महाराष्ट्रातील इतर समाज घटकांना प्रेरणा मिळाली. आदिवासी, भटक्या जमाती व इतर समाजघटकांना प्रेरणा मिळाली. आदिवासी भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय जातीमध्ये चळवळी विकसित झाल्या. बौध्द धर्माच्या स्विकारामुळे सांस्कृतिक परिवर्तन घडून आले. पण या चळवळीच्या अनेक मर्यादा सुध्दा आहे, कारण या चळवळीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर वगळता योग्य नेतत्व मिळाले नाही. चळवळीची उभारणी वैचारिक भक्कम पायावर झाली नाही. परिणामी समाजपरिवर्तन लढ्याकडे दुर्लक्ष झाले. म्हणून आजही अनेक समस्यांचे निराकरण झाले नाही.

संदर्भ ग्रंथ :–

1. भोसले नारायण – महाराष्ट्रातील स्त्रिविषयक सुधारणावादांचे राजकारण, 17 सप्टेंबर 2008, – 4 ताईची प्रकाशन, पुणे.
2. मेश्राम योगराज – आंबेडकरी चळवळीतील चेहरे प्रथम आवृत्ती, गोंदिया पृ.223, 224.
3. किर धनंजय – डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. 2006, पृ.300.
4. क्षिरसागर रा.का. – भारतीय रिपब्लीकन पक्ष, कैलास प्रकाशन, औरंगपुरा, औरंगाबाद, 6 डिसेंबर 1978, पृ. 57.
5. पानतावने गंगाधर – दलितांचे प्रबोधन, विचार ग्रंथमाला प्रकाशन, औरंगाबाद 1978.
6. गाठाळ एस.एच. – आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद 2018.
7. योजना मासिक – एप्रिल 2011.
8. ठोसर रत्नपाल – आंबेडकर आणि चळवळीची अस्सल स्त्रोत, साधने : खंड – 1–2018– मुबई.
9. मनोहर यशवंत – आंबेडकरवादी मराठी साहित्य, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर

इतिहास विभाग प्रमुख

म.ज्यो. फुले महाविद्यालय,

बल्लारपूर, जि. चंद्रपूर

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

राष्ट्रहिताय संस्कृतम्

Shodhsamhita
शोधसंहिता

ISSN No. 2277-7067

CERTIFICATE OF PUBLICATION

This is to certify that

किशोर शेषराव चौरे
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, बल्लारपूर, जि चंद्रपूर.

For the paper entitled

लोकसंख्या आणि पर्यावरण

Volume No. VIII, Issue 4, 2021-2022

in

Shodhsamhita

UGC Care Group 1 Journal

Officiating Principal
Mahatma [illegible]ba Fule
Mahavid[illegible]ya, Ballarpur

Editor-in-Chief

5.2

ISSN -2277-7067

राष्ट्रहिताय संस्कृतम्

Peer Reviewed

Journal of Fundamental & Comparative Research

Vol. VIII, Issue 4, 2021-2022

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

शोधसंहिता

A Bi-annual Interdisciplinary Research Journal of KKSU
Peer Reviewed Journal of Fundamental & Comparative Research

Volume- VIII, Issue 4, 2021-2022

ISSN 2277-7067

शोधसंहिता

Editor in Chief : **Prof. Shrinivasa Varkhedi**
Hon'ble Vice Chancellor

General Editor : **Prof. Madhusudan Penna**

Executive Editor : **Dr. Dinakar Marathe**

Editorial Board : **Prof. Nanda Puri** **Prof. C.G.Vijaykumar**
Prof. Lalita Chandratre **Prof. K. K. Pandey**
Dr. Deepak Kapde (Secretary)

Published by : **Registrar,** KKSU, Ramtek

KAVIKULAGURU KALIDAS SANSKRIT UNIVERSITY
RAMTEK

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur.

Index

1 **"SYNTHESIS OF DERIVATIVE OF 3- METHYL – 4 –ARYLMETHYLENE ISOXAZOLE-5(4 H) CATALYZED BY ENVIROCAT EPZG USING ULTRASONIC METHOD"**
Rajiv Khobare, Ramkrushna P Pawar, Khandu D Warad, Chandrakant B Mane Amit Tayade 1-8

2 भारत में उच्च शिक्षा के समक्ष चुनौतियां
डॉ अशोक, डॉ राजेश कुमार जांगिड 9-20

3 **IMPACT OF COVID-19 ON E-BANKING IN INDIA**
Dr. Pawan Kumar Verma, Dr. Archna Tanwar 21-33

4 **THE IMPACT OF ELECTRIC VEHICLE ON OIL DEMAND AND GCC NATIONS: WHY IT BENEFITS INDIA?**
Dr. Papinder Kumar 34-38

5 **FOR MODIFYING THE CORROSION RESISTANCE MILD STEEL COATED BY METAL OXIDE NANOPARTICLES CONSTRUCT NANOCOMPOSITE: A REVIEW**
Saraswati Kumari Ola, Ishita Chopra, Priyanka, Jaya Rai, Veena Dhayal 39-54

6 **SHAGUN AND ISHITA'S STRUGGLE FOR IDENTITY IN MANJU KAPUR'S NOVEL 'CUSTODY'**
Dr. Madhvi Rathore, Shobha Banshiwal 55-58

7 **STUDY OF ICHTHYOFAUNNAL DIVERSITY OF GANDAK RIVER FLANKING SONPUR**
Amit Kumar Solanki, Braj Bhusan Prasad Singh 59-64

8 **ROLE OF SWARNAJAYANTI GRAM SWAROZGAR YOJANA (SGSY) IN SOCIO-ECONOMIC DEVELOPMENT OF THE BENEFICIARIES IN KARNATAKA – WITH REFERENCE TO KALABURAGI DIST.**
Dr. Sangappa. S. Rampure, Mahadevappa 65-73

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

9 A CASE REPORT ON AYURVEDIC MANAGEMENT OF STANA VIDRADHI / LACTATIONAL BREAST ABSCESS
Dr. Archana Maan Kaushik, Dr. Shrinivas Gujjarwar, Dr. Vikash Kaushik 74-79

10 प्राचीन भारत में सार्थवाह
डॉ0 राजकुमार 80-91

11 कोविड–19 का भारतीय अर्थव्यवस्था के परिप्रेक्ष्य में एक विश्लेषणात्मक अध्ययन
डॉ.सत्येन्द्र सिंह, राजकुमार यादव 92-95

12 A CRITICAL ANALYSYS OF LAWS COMBATING THE COVID-19 PANDEMIC IN INDIA : AN OVERVIEW OF STATUTORY PROVISIONS
Dr. Amit Singh, LakshLata Prajapati 96-106

13 EXTRAVERSION/SURGENCY TEMPERAMENT IS A FUNCTION OF RESILIENCE, GENDER AND BIRTH ORDER AMONG YOUNG ADULTS
Jangjeet, C.P. Khokhar 107-116

14 POLITICS OF THE CYBERSPACE: A STUDY OF SELECT DALIT ACTIVIST BLOGS AND WEBSITES
Dr Ravinder Kaur 117-127

15 पत्ताखोर : नशाखोरी के चक्रव्यूह में उलझा युवा वर्ग
पुनम कुमारी, डा माया मलिक 128-136

16 पर्यावरण संरक्षणासंदर्भात भारतीय संविधानातील कायदेशीर तरतुदी
डॉ. पद्माकर प्रेमदास दारोंडे 137-141

17 पर्यावरणाचा मानवी आरोग्याशी संबंध : एक अध्ययन
प्रा. डॉ. शरद बेलोरकर 142-147

18 वारकरी संप्रदाय : ऐतिहासिक दृष्टीक्षेप
डॉ. श्रीकांत डी. पानघाटे 148-160

19 खेळ सुविधांचा वातावरणावर होणारा परिणाम
Pushpanjali Bhojraj Kamble 161-165

20 लोकसंख्या आणि पर्यावरण
किशोर शेषराव चौरे 166-171

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

SHODHSAMHITA
शोधसंहिता

ISSN 2277-7067
UGC CARE Group 1

लोकसंख्या आणि पर्यावरण

किशोर शेषराव चौरे
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, बल्लारपूर, जि चंद्रपूर.

Abstract :

सोळाव्या शतकापर्यंत जागतिक लोकसंख्येची वाढ मंद गतीने होत होती. 1950 नंतरच्या काळात मात्र जागतिक लोकसंख्येची वाढ प्रचंड गतीने झालेली आढळते. जगात वाढत्या लोकसंख्येच्या मूलभूत गरजा पूर्ण व्हाव्यात म्हणून निसर्गातील घटकांचा जमिन,पाणि, खनिजे इत्यादी पर्यावरणातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा अनियोजित, अमर्याद वापर होवू लागला. त्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास, पर्यावरणाची हानी किंवा पर्यावरणाचे शोषण होवू लागले. लोकसंख्या वाढझाल्यामुळे पर्यावरणात टाकावू पदार्थांची संख्या वाढली त्यामुळे प्रदूषणाचे प्रमाण वाढले, पर्यावरणातील प्रदूषणामुळे अनेक शारिरीक आजार वाढले. वाढत्या लोकसंख्येमुळे पर्यावरणात अनेक महत्वाचे प्रश्न निर्माण झाले अमर्याद जंगलतोड झाली, पाण्याचा तुटवडा निर्माण झाला जमिनिचे लहान आकारात तुकडीकरण झाले, शेतजमिनिची उत्पादकता घटली, तापमाण वाढले, बेरोजगारीत वाढ, वैद्यकिय मदत, निवास यावर पडणारा भार या सर्व गोष्टींचा पर्यावरणावर गंभीर परिणाम होवू लागला . मानवाच्या अतिरेकी हस्तक्षेपामुळे पर्यावरणाची शुध्दता नष्ट होवू लागली आहे. पर्यावरण बदलाचा परिणाम काही विशिष्ट देशाला व समाजालाच भोगावे लागतात असे नाही तर या बदलाचे संपूर्ण मानव जातीला गंभीर परिणाम भोगावे लागतात. लोकसंख्या आणि पर्यावरण यामध्ये समन्वय साधण्यासाठी पर्यावरण व्यवस्थापन व लोकसंख्या नियंत्रण महत्वाचे आहे. याबद्यलची जाणिव, जगृती समाजात मोठया प्रमाणावर करण्याची आवश्यकता आहे. त्याकरीता मिडिया, स्वयंसेवीसंस्था ,कलाकार आणि विद्यार्थी यांच्या मार्फत विविध कार्यक्रम आयोजित करून प्रचार व प्रसार करण्यात यावा.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

ISSN 2277-7067
UGC CARE Group 1

प्रस्तावना :

पर्यावरण हि एक व्यापक संकल्पना असून त्यात निसर्गातील सर्व सजीव व निर्जिव घटकांचा समावेश होतो. अश्मयुगात मनुष्य भटकंती अवस्थेत टोळया–टोळयांनी राहत होता. तो पूर्णतः निसर्गावर अवलंबून राहत होता. निसर्गातून जे मिळेल त्याच्यावर त्याचा उदरनिर्वाह सुरू होता. कालांतराने मनुष्य नदीकाठी स्थायी झाला, शेती करू लागला. शेती लागवडीसाठी त्याने जंगले साफ केली. शेतीच्या क्रांतीनंतर काही वर्षांनी औद्योगिक क्रांती झाली. औद्योगिकरणामुळे पर्यावरणीय संपदांच्या वापराला वेग आला. वाढत्या लोकसंख्येला लागणाऱ्या आवश्यक वस्तू वाहने, खते, रसायने कारखान्यात उत्पादित होवू लागले. मानवाच्या गरजा व मागण्या याच्यांत वाढझाली. त्यांमुळे पर्यावरणातील नैसर्गिक साधनसंपत्तीवर मानवाचा अतिरेक वाढला. लोकसंख्या वाढीमुळे निसर्गातील मानवाचा हस्तक्षेप वाढल्याने जीवसृष्टी धोक्यात आली आहे. जैविक विविधतेवर मानवाने स्वार्थापायी आघात केले. निसर्गात कार्य सुरू राहणे आणि पर्यावरणाचा समतोल राखणे हे जैवविविधतेचे महत्वाचे कार्य आहे. वन्यजीवांची शिकार यामुळे मानवी स्वार्थापोटी नैसर्गिक साधनसंपत्ती लोप पावत आहे.मानवी चुकामूळेच वन्यजीवांचे व सृष्टीचे अस्तीत्व नष्ट होत आहे. पर्यावरणाचे शोषण होवू नये निसर्गाचे मानवाने कल्याण साधावे त्यासाठी लोकसंख्या नियंत्रण करणे काळाची गरज आहे. कारण आपण जर योग्य नियोजन केले नाही,तर देशाचे भावी चित्र कसे असेल याची कल्पणाच न केलेली बरी. प्रस्तुतशोध निबंधात लोकसंख्या वाढ व त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम, पर्यावरणाच्या बचावासाठी उपाययोजना याचा अल्पसा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

लोकसंख्या आणि पर्यावरण :

अनादी काळापासून मानव पर्यावरणावर अवलंबून होता. सुरूवातीला लोकसंख्या कमी असल्यामुळे पर्यावरणातून प्रदुषणविरहित वस्तू प्राप्त होत होत्या. परंतु जसजशी लोकसंख्या वाढू लागली तसतसा पर्यावरणावर ताण पडू लागला. हे पुढील वाढीव लोकसंख्येवरून स्पष्ट जाणवते. 1927 मध्ये जगाची लोकसंख्या बघितली तर ती दोन अब्ज होती नंतर ती पुढे वाढतच गेलेली दिसते, 1960 मध्ये 3 अब्ज, 1974 मध्ये 4 अब्ज, 1987 मध्ये 5 अब्ज, 1999 मध्ये 6 अब्ज, 2011 मध्ये 7 अब्ज आणि आता लोकसंख्या शिरगिनती होईल तर निश्चितच जगाची लोकसंख्या आणखी वाढलेली दिसेल. आज जगाची लोकसंख्या

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

जवळ–जवळ 800 कोटीच्या जवळपास आहे. जगातील लोकसंख्येच्या 17.70टक्के लोक भारतात राहतात. भारत देशाचा विचार केला तर वाढती लोकसंख्या हा एक मोठा गंभीर प्रश्न देशासमोर निर्माण झाला आहे. 1950–51 मध्ये देशाची लोकसंख्या 36.1 कोटी होती, ती 2011 च्या जनगणनेमध्ये 121.02 कोटी झाली. आज देशाची लोकसंख्या 135 कोटीच्या वर गेलेली आहे. हा लोकसंख्येचा विस्फोट पर्यावरणासमोर मोठी समस्या आहे. जगामध्ये सर्वात जास्त लोकसंख्या वाढीचा दर भारतात आहे. थोर अर्थशास्त्रज्ञ माल्थस म्हणतो, भारताच्या लोकसंख्येत गुणोत्तर श्रेणीनी तर अन्नधान्य उत्पादनात अंकगणिती श्रेणीने वाढ होत आहे म्हणजे लोकसंख्या 2,4,8,16,32 या प्रमाणात वाढते. तर धान्योउत्पादन 2,4,6,8,10 या प्रमाणे वाढते. मग खाणारी तोंडे जास्त झाली की, सर्वप्रथम त्यांच्या अन्नपाण्याची सोय करावी लागते. वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येचा ताण मग पर्यावरणावर पडतो व नैसर्गिक साधनसंपत्तीची दुर्मिळता जाणवू लागते. लोकसंख्या आणि पर्यावरण यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी पर्यावरण व्यवस्थापन महत्वाचे आहे. पर्यावरणाचे संतूलन बिघडू न देता प्रदूषणविरहित पर्यावरण राखून मानवाचे हित साधता येईल.

लोकसंख्या वाढीचे पर्यावरणावर होणारे परिणाम :

पूर्वी लोकसंख्या मर्यादित असल्यामुळे लोकांच्या भूमिविषयक गरजाही मर्यादित होत्या. परंतु अलिकडे लोकसंख्या झपाटयाने वाढत असल्याने त्यांच्या भूमिविषयी गरजाही वाढल्या. शेतीमध्ये अन्नधान्यांचे उत्पादन वाढविण्यासाठी किटकनाशकांचा सातत्याने वापर वाढला. त्याचा मातीत असणाऱ्या अतिसूक्ष्म जीवजंतूवर विपरित परिणाम होवून ती नष्ट होत आहे. तसेच किटकनाशकांचे विषारी द्रव्यघटक अन्नपदार्थात मिळल्याने त्याचा मानवी आरोग्यावरही विपरित परिणाम होत आहे व पर्यावरणही बिघडत आहे.

औद्योगिकरणामुळे देशात अनेक उद्ययोगधंदे अस्तित्वात आले. या उद्योगाच्या इमारतीच्या बांधकामासाठी डोंगर,जमीन खोदण्यात आली. जंगले नष्ट करण्यात आली. शेतीखाली असणाऱ्या जमिनी कारखाना उभारण्यासाठी खरेदी करण्यात आल्या. त्यामुळे आजुबाजूच्या जमिनीही खराब झाल्या. कारखान्यातून दूषीत पांणी व धूर यामुळे जलप्रदूषण व वायूप्रदूषण होवू लागले. या प्रदूषणामुळे मानवाला विविध आजाराने ग्रासलेले दिसतात. म्हणजेच औद्योगिकरणामुळे जंगला खालील जमिनिचे क्षेत्र कमी होवून पर्यावरण बिघडले व प्रदूषणामुळे मानवाचे आरोग्य बिघडले.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

लोकसंख्या वाढल्यामुळे भारतात रेल्वे, बस स्थानक, दवाखाने , चित्रपटगृहे, हॉटेल, सरकारी स्वस्त धान्याची दुकाने इत्यादी जागो–जागी लाबंच लांब रांगा लागलेल्या दिसून येतात. असंख्य हूशार विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहतात. देशामध्ये बेकारी, महागाई, शहरीकरण, प्रदूषण, वाढती रोगराई असे समस्यांचे चक्र वेगाने सुरू झाले आहे.

वाढत्या लोकसंख्येमुळे बालकांच्या शिक्षणाच्या खर्चात वाढ होत आहे. त्यामुळे शासनाला शिक्षणावर फार मोठा खर्च करावा लागतो. याशिवाय सार्वजनिक आरोग्यास वैद्यकिय सोयी सुविधांचा पुरवठा वाढवावा लागतो. स्वच्छ आणि प्रदूषण विरहित निवासाच्या सोयी निर्माण करण्यासाठी बराच खर्च करावा लागतो यामुळे शासनाच्या खर्चात प्रचंड वाढ होते. आज कोरोना संक्रमनाच्या काळात वाढत्या लोकसंख्येला वैद्यकिय सेवा पुरविणे कठिन होवून बसलेले आहे. त्यामुळे असंख्य लोकांना मृत्युला सामोरे जावे लागत आहे. अन्न, पाणी, आरोग्य, शिक्षण, निवारा सर्व सोयींचा तुटवडा मोठमोठया शहारांमध्ये निर्माण झालेला आज आपणास दिसत आहे, हा लोकसंख्या वाढिचाच परिणाम होय.

उपाययोजना :

पर्यावरण संरक्षण व संवर्धनास मानवाकडून पूर्वी ज्या चूका झाल्या त्या चूका भविष्यात होवू नये याची दक्षता घेणे काळाची गरज आहे. कारण त्या काळात पर्यावरणाची जाणीव कमी प्रमाणात होती. परंतु आज पर्यावरणाचे संतुलन बिघडून नैसर्गिक आपत्तीचे प्रमाण खूप वाढले आहे. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन हा ज्वलंत विषय मानवासमोर आहे. म्हणजे आपणच आपले शिल्पकार आहोत, आपणच आपले नष्टकार आहोत हे समजून घेण्याची वेळ आली आहे.

आज जगामध्ये केवळ अर्धविकसीत देशांनाच नव्हे तर विकसीत देशांनाही वाढत्या लोकसंख्येच्या समस्येने ग्रासले आहे. वाढलेल्या लोकसंख्येमुळे भारतात अनेकप्रकारच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. भारताच्या आर्थिक विकासातील वाढती लोकसंख्या हि अडसर समस्या ठरली आहे. अन्नधान्याची समस्या, शेतजमिनीचे विभाजन , लागवडीखालील क्षेत्रफळातील घट, दरडोई उत्पन्नात मंद गतीने वाढ, अनुत्पादक उपभोक्त्यांचा भार, बेकारीची समस्या, भांडवल निर्मितीची समस्या हे सर्व वाढत्या लोकसंख्येचा प्रताप आहे.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

याकरीता सक्तीने कुटूंबनियोजनाची अमलबजावनी करणे व मर्यादित कुटूंब ठेवण्यासाठी शासनाकडून सवलती देण्यात याव्या.

भारत हा कृषीप्रधान देश असूनही अन्नधान्याच्या बाबतीत आत्मनिर्भर होवू शकला नाही. मागणी इतका पुरवठा नसल्याने वस्तुच्या किंमतीत मोठया प्रमाणात वाढझालेली आहे. देशातील 135 कोटी पेक्षाही जास्त लोकसंख्येची मांगणी पूर्ण करणे कठीण झाले आहे. कारण नैसर्गिक साधनांचा पुरवठा मर्यादित असतो, ह्यात मानवी प्रयत्नाव्दारे वाढ किंवा घट करता येत नाही. त्यामुळे जमीन, नदया, जंगले, वनस्पती, खनिजे, वारा इत्यादी नैसर्गिक साधनांची वाढत्या लोकसंख्येमुळे कमतरता भासू लागते. परिणामतः पर्यावरणाचे नैसर्गिक संतुलन बिघडून प्रदूषणाची समस्या निर्माण होते.

वाढत्या लोकसंख्येमुळे पर्यावरण प्रदूषण ही आज जागतिक स्तरावरिल एक प्रमुख समस्या बनली आहे, कारण या समस्येने संपूर्ण मानवजातीला ग्रासले आहे. परंतु या पर्यावरण प्रदूषणाला मानव स्वतःच जबाबदार आहे. त्याने आपल्या जगण्याच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी जल, वायु, जमीन, जंगले यांचे प्रदूषण घडवून आणले. यामुळे जीवसृष्टीत जीवनदान देणाऱ्या विविध घटकांचा ;जैवविविधतेचा ह्रास झाला. त्याचा संपूर्ण जीवसृष्टीवर प्रतिकूल परिणाम घडून येत आहे. पर्यावरणाचे शोषण होवू नये, पर्यावरणाचे मानवाने कल्याण साधावे त्यासाठी लोकसंख्या नियंत्रण करणे काळाची गरज आहे. तसेच लोकांना पर्यावरणाचे महत्व पटवून देवून त्याबाबत समाजात जागृती करणे आवश्यक आहे. प्रतिकूल परिणाम टाळायचे असतील तर पर्यावरण आणि लोकसंख्या यात योग्य ताळमेळ ठेवणे आवश्यक आहे.

निष्कर्ष:

1 आज निर्सगाचा समतोल मानवी चुकांमूळे ढासळत आहे.
2 मानवी हस्तक्षेपामुळे आज नैसर्गिक आपत्तीचे प्रमाण खूप वाढलेले दिसून येते.
3 पर्यावरणावर आपली संपन्नता, आपले भविष्य अवलंबून आहे.
4 पर्यावरण संवर्धन हि काळाची गरज आहे, याकडे प्रत्येक सुजान नागरिकाने लक्ष देणे नितांत गरजेचे आहे.
5 सातत्याने प्रगती हवी असेल तर लोकसंख्या नियंत्रण व पर्यावरणाकडे लक्ष द्यायला हवे. आतापर्यंत या प्रश्नाकडे झालेल दूर्लक्ष भविष्यात खूपच महागात पडणार आहे. त्याकरिता या प्रश्नांकडे गांभिर्याने पहाने गरजेचे आहे.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

संदर्भ ग्रंथसूची :

1. वासेकर, प्रा. एस. पी. ; काकडे, प्रा. जे. एम., 'भारतीय अर्थव्यवस्था , विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र ', पायल प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती – ऑगष्ट 2006,पृ 18,26,39,40,48,351, 355,378,379.
2. सावंत, प्रा. डॉ. प्रकाश,'पर्यावरण शिक्षण', फडके पब्लिकेशन्स,कोल्हापूर, प्र. आ. जुलै,2006, पृ. 25,27,29,30,33.
3. झामरे, डॉ. जी.एन.,' भारतीय अर्थशास्त्र, विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र', पिंपळापूरे ॲन्ड कं. पब्लिशर्स ,नागपूर,प्र. आ. जून2004, पृ. 427, 430.
4. पेडणेकर हेमंत,पेंडसे सचिन,डोंगरे प्रकाश,' पर्यावरण आणि शाश्वत विकास*] Sheth Publishers Pvt. Ltd., Mumbai,Frist Edition, Sep. 2006 i`- 12]22]23
5. संपूर्ण सामान्यज्ञान स्वयंपूर्णतेकडे वाटचाल,नाथे पब्लिकेशन लिमिटेड, प्र. आ. 5ऑगस्ट 2016, पृ. 38
6. दैनिक देशोन्नती,साधू सदानंद,' लोकसंख्यावाढ 'गंभीरः पण दुर्लक्षित समस्या', शुक्रवार दि. 07 / 02 / 2020, पृ. 4
7. Akshar Wangmay,International Research Journal UGC-CARE LISTED,special Issue-II, Environmental Changes, Biodiversity And sustainable Resource Management, Sep- 2020, P.N.257,418.
8. घायवान अरूण ;मुख्यसंपादकद्ध साप्ताहिक ,पीपल नायक,डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेषांक, दि. 11 एप्रिल ते 17 एप्रिल 2012, बल्लारपूर.

Officiating Principal
Mahatma Jyo[illegible]a Fule
Mahavidyalaya, [illegible]ur

निष्पृह

वर्ष ... अंक ... सं. ...
... २०२१



लोकनायक बापूजी कर्तृक विशेषांक

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

तिफण

वर्ष १२ वे, अंक – दुसरा; जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

UGC Care Listed Journal

ISSN 2231 - 573X

● संपादक ●

डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,

हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३.

मो. ९९०४००३९९८

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

UGC Care Listed Journal ISSN 2231 - 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

लोककवी वामनदादा कर्डक विशेषांक (भाग-४)

वर्ष १२ वे, अंक – दुसरा; जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

● संपादक ●

डॉ. शिवाजी हुसे

● अतिथी संपादक ●

डॉ. युवराज धबडगे
मराठी विभागप्रमुख

प्रा. नागेश बोन्तेवाड
मराठी विभाग

दगडोजीराव देशमुख महाविद्यालय, वाळूज, जि. औरंगाबाद

● संपादक मंडळ ●

डॉ. सर्जेराव जिगे
डॉ. फुला बागूल
डॉ. अनिल गर्जे
डॉ. संजय सांभाळकर
डॉ. ताहेर पठाण
डॉ. वंदना महाजन
डॉ. रामचंद्र झाडे
डॉ. ममता इंगोले
डॉ. वामन जाधव
डॉ. यशवंत सोनुने

मूल्य : ३५० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड,
जि. औरंगाबाद – ४३११०३. मो. ९९०४००३९९८

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

अनुक्रमणिका

अ. क्र.	शीर्षक / लेखक-संशोधक	पृ. क्र.
1.	**वामनदादा कर्डक यांच्या गीतातील शैक्षणिक जाणिवा** - प्रा. नागेश बोंतेवाड	1 - 4
2.	**वामनदादा कर्डक : आंबेडकरी गीतकार** - प्रा. विजयश्री विठ्ठल गवळी	5 - 8
3.	**डॉ. बाबासाहेबांचे बुद्धत्व विशद करणारी वामनदादांची कविता** - प्रा. डॉ. विश्वजित कांबळे	9 - 15
4.	**वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील शैक्षणिक तत्त्वज्ञान** - डॉ. मारोती गायकवाड	16 - 23
5.	**लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतातील स्त्री-जाणिवा** - प्रा. डॉ. रामकिशन दहिफळे	24 - 26
6.	**लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतातील आंबेडकर दर्शन** - डॉ. संतोष देशमुख	27 - 31
7.	**लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान (शैक्षणिक)** - प्रा. कातकडे केशव श्रीरंग / प्रा.डॉ. रमाकांत का. गजलवार	32 - 36
8.	**आंबेडकरी ऊर्जा पुरवणारे समर्थ लोककवी वामनदादा कर्डक** - प्रा. डॉ. दादाराव गुंडरे	37 - 41
9.	**लोककवी वामनदादा कर्डक यांचे गीतलेखन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर** - मंगल कचरु सांगळे	42 - 47
10.	**वामनदादा कर्डक यांच्या गीतातून प्रकट झालेले आंबेडकरी विचार** - प्रा. डॉ. लालबा दुमटकर	48 - 50
11.	**वामनदादा कर्डकांचे काव्य : आंबेडकरी विचार चळवळीची शिदोरी** - प्रा. कैलाश माणिकराव मुटकुळे	51 - 54
12.	**'माझ्या जीवनाचं गाणं' : एका लोककलावंताचा जीवन संघर्ष** - प्रा. डॉ. आनंद वारके	55 - 59
13.	**वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान** - डॉ. महालक्ष्मी मोराळे	60 - 65

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

29.	आंबेडकरी चळवळीत वामनदादा कर्डक यांचे योगदान - प्रा. डॉ. किशोर शेषराव चौरे	126 - 129
30.	वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील परिवर्तनवादी विचार - डॉ. नंदकुमार माने	130 - 132
31.	महाकवी - वामनदादा कर्डक आणि कार्य - प्रा. डॉ. राहुल यशवंतराव निकम / प्रा.डॉ.मारोती निवृत्ती गायकवाड	133 - 137
32.	बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची पेरणी करणारा महाकवी वामनदादा कर्डक - प्रा. डॉ. उत्तम जकोजी सोनकांबळे	138 - 142
33.	वर्ग लढ्याची जाणीव देणारे महाकवी वामनदादा - डॉ. समाधान इंगळे	143 - 146
34.	वामनदादा कर्डक यांची आंबेडकरी गीते - डॉ. रामलीला सुदामराव पवार	147 - 152
35.	लोककवी वामनदादा कर्डक यांच्या लोकगीतातील सामाजिकता - डॉ. यशवंत सोनुने	153 - 155
36.	प्रतिभावंत लोककवी शाहीर वामन (दादा) कर्डक - प्रा. डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी	156 - 159
37.	वामनदादा कर्डक - व्यक्ती आणि वाङ्मय - प्रा.डॉ. बाबासाहेब पिरगोंडा नाईक	160 - 162
38.	महाकवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरवाद - प्रा. डॉ. शिवदास कान्हुजी इंदोरकर	163 - 168
39.	लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि वाङ्मयातील काव्याचे स्वरूप - प्रा. सिद्धार्थ इंगोले	169 – 172
40.	मूल्यदृष्टीचा कवी : वामनदादा कर्डक - प्रा. संतोष लोंढे	173 - 175
41.	भीमशाहीर : वामनदादा कर्डक - ललिता मानसिंग गोपाळ	176 - 178
42.	वामनदादा कर्डकांच्या लेखनातील सामाजिकता व मानवता विषयक विचार - राहुल संभाजी पंडित	179 - 182
43.	वामनदादा कर्डक यांच्या गीतांमधून झालेले समाजप्रबोधन - प्रा. डॉ. गणपत काशिबा हराळे	183 - 188

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur



आंबेडकरी चळवळीत वामनदादा कर्डक यांचे योगदान

- प्रा.डॉ.किशोर शेषराव चौरे
इतिहास विभागप्रमुख
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, बल्लारपूर, जि.चंद्रपूर
E-mail : chaurekishor12@gmail.com
Mobile : 9028616685

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे दीन-दलितांचे मसिहा आहेत. त्यांनी आपल्या हयातीमध्ये वेगवेगळ्या चळवळी केलेल्या आहेत. त्या पूर्णतः यशस्वी झाल्यात. बाबासाहेबांनंतरही चळवळीचे सत्र सुरूच राहीले. या चळवळींमध्ये ज्या-ज्या योद्ध्यांनी योगदान दिले त्यामध्ये वामनदादा कर्डक यांचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यांनी स्वतःला आंबेडकरी चळवळीसाठी वाहून घेतले. आपल्या जीवाची, कुटुंबाची पर्वा न करता बाबासाहेबांची चळवळजीवंत राहावी यासाठी अतोनात प्रयत्न केले. त्यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर त्यांच्या चळवळीवर निष्ठा होती. वामनदादा कर्डक यांच्या साहित्याचा, कवितेचा नायक युगपुरूष डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आहेत. बाबासाहेबांच्या कार्य-कर्तृत्त्वाचे, त्यांच्या चळवळीचे दर्शन आपल्या साहित्यातून/गीतातून घडविले. बाबासाहेबांनंतर चळवळीची झालेली अवनती वामनदादांना स्वस्थं बसू देत नव्हती आंबेडकरी चळवळीतील स्वार्थासाठी विखुरलेल्या नेत्यांनी-अनुयायांनी एकत्र यावे आणि बाबासाहेबांच्या स्वप्नातील चळवळीला जिवंत करावे असा सल्ला ते देतात. कवितेतून स्वार्थी नेत्यांवर ताशेरे ओढतात. भांडवलदार वर्ग हा गरिबांचे-श्रमिकांचे शोषण करतो, बहुजनांचे शोषण करतो हे त्यांचे शोषण थांबले पाहिजे त्यांना प्रगतीच्या वाटेवर आणले पाहिजे असेही ते काव्यातून मांडतात वामनदादा कर्डकांनी आपल्या कवितेतून वेगवेगळ्या प्रश्नांचा उहापोह केलेला आहे. सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक, राजकीय प्रश्नांवर कवितेतून भाष्य केले आहे चळवळीला जिवंत ठेवायचे असेल तर आंबेडकरी जनतेनी आणि नेत्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आत्मसात करावे स्वार्थाच्या पलिकडे जाऊन बाबासाहेबांच्या स्वप्नातील चळवळ उभी करण्यासाठी झटावे. आज आपण हे काही आहोत ते केवळ डॉ.बाबासाहेबांमुळेच आहोत, हे आंबेडकरी जनतेला आपल्या गीतातून पटवून सांगितले. आंबेडकरी विचारांचा अग्नी घराघरात पोहचविला अशाप्रकारे बाबासाहेबांच्या विचार व कार्याला पुढे नेण्यासाठी वामनदादा कर्डक यांनी संपूर्ण आयुष्यं खर्ची घातले

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

जीवन परिचय :

वामनदादा कर्डक यांचा जन्म १५ ऑगस्टं १९२२ रोजी देशवंडी, ता.सिन्नरं, जि.नाशिक येथे झाला. वडील तबाजी कर्डक, आई सईबाई, मोठा भाऊ सदाशिव तर धाकटी बहिण सावित्री असा वामनदादांचा परिवार होता. वामनदादा लहान असतांनाच वडीलांचा मृत्यु झाला त्यानंतर घरची जबाबदारी आई व मोठा भाऊ यांच्यावर आली वामनदादांनीही कुटुंबाला हातभार लावण्यासाठी लहानपणापासूनच छोटी-मोठी कामे केलीत. पुढे १९-२० व्या वर्षी त्यांचे अनुसया नावाच्या मुलीशी लग्नं झाले. पुढे त्यांना एक मुलगी झाली तिचे नांव मीरा होते. वामनदादांचे जीवन सुखात गेले नाही पत्नी त्यांना सोडून गेली आणि पुढे आजारपणात मुलगी मीराचेही निधन झाले. मुलगी मीराच्या निधनानंतर पोटाची खडगी भरण्याकरीता वामनदादा मुंबईत आले. त्यांनी तेथे गिरणी कामगार, खडी फोडण्याचे काम, कोळशाच्या वखारीत काम, टाटा कंपनीत काम, कधी आईस्क्रीम विकणे असे छोटे-मोठे कामधदे करीत होते. मुंबईत वडाळा येथे बी.डी.डी.चाळीत ते राहत होते. वडाळ्याच्या बी.डी.डी.चाळीत राहत असतांनाच मोठे बंधु सदाशिव कर्डक व स्वंतः वामनदादा समता सैनिक दलात सामिल झाले समता सैनिक दलात भाऊ कॅप्टंन होते तर वामनदादा साधे सैनिक होते. या दलात ते लेझिम व काठी उत्तम शिकले. पुढे वामनदादा समता सैनिक दलातील मुलांना लेझिम शिकवित त्यामुळे त्यांना सारे मास्तर संबोधू लागले पुढे त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारा एक प्रसंग घडला तो असा, एक अडाणी गृहस्थं त्यांच्याकडे एक पत्र वाचण्यासाठी घेऊन आला व म्हणाला मास्तर एवढे पत्र वाचून दाखवा. पण वामनदादाही अशिक्षित होते. त्या गृहस्थावर रागावून त्यांनी ती वेळ कशीतरी मारून नेली. परंतु ही गोष्टं त्यांच्या अंतर्मनावर घाव करून गेली. नंतर त्यांनी लगेच चाळीतल्या देहलवी शिक्षकाकडे शिकवणी लावली. पुढे ते शिक्षित झाले, हळूहळू वामनदादांचे लेखन-वाचन वाढू लागले. त्यावेळी आंबेडकरी चळवळीचा वेग सर्वत्र पसरत चाललेला होता. डॉ.बाबासाहेबांचे अनुयायी बाबासाहेबांसोबत समतेच्या लढ्यात उतरले होते वामनदादा कर्डकही बाबासाहेबांच्या सभेला जात. समता सैनिक दलातील तरूणांबरोबर काठीला काठी लावून डॉ.बाबासाहेबांना सभास्थानी जायला रस्ता करून देत.

आंबेडकरी चळवळीत योगदान :

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचा वामनदादा कर्डक यांच्यावर प्रभाव पडला बाबासाहेबांच्या विचारांवर वामनदादांचा प्रखर विश्वास होता, निष्ठा होती. डॉ.बाबासाहेबांचे विचार हे जग बदलणारे आहेत. हे त्यांनी जाणले होते. याच विचारांच्या तेजातून उद्याचे राष्ट्र घडणार आहे पुढे भारताला राष्ट्र बनविण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले योगदान हे कोणीही नाकारू शकत नाही. वामनदादांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर १०,००० हून अधिक गीते रचली आहेत. त्यांच्या साऱ्या कवितेचा नायक युगपुरूष डॉबाबासाहेब आंबेडकर होते. डॉ.बाबासाहेबांना आपला ऊर्जास्त्रोत मानून पायाला भिंगरी बांधून आपल्या ओजस्वी वाणीतून आणि समर्थ लिखाणातून महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेरही खेड्यापाड्यापर्यंत बाबासाहेबांचा विचार पोहचविण्याचे कार्य केले. वामनदादा कर्डक आंबेडकरी चळवळीचा चालता-बोलता इतिहासच होते. 'दूर हटो ऐं काँग्रेसवालो फेडरेशन हमारा हैं' या गीताने १९४३ साली वामनदादांच्या गीताचा प्रवास सुरू झाला पुढे वामनदादा आयुष्यंभर लिहीत व गात राहीले समाजात आंबेडकरी विचारांची ज्योत विझ न देता चळवळीचा विचार पोटतिडकिने समाजात पोहचवित राहिले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या आयुष्याच्या शेवटच्या काळात रिपब्लिकन पक्षाची घटना लिहून ठेवली होती. डॉ.बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर दहा महिन्यांनी त्यांच्याअनुयायांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाची स्थापना केली. मात्र रिपब्लिकन पक्ष स्थापनेनंतर राजकीय नेतृत्वं कुणी करावयाचे या मुद्यांवर कधी उघड तर कधी छुप्या

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

पध्दतीने त्यांच्यात धुसफुस सुरू झाली वैयक्तिक अहंभाव, गैरसमज, हेवेदावे यामुळे पक्षात कलह आणि उघड भांडणे सुरू झालीसामंजस्याची भूमिका स्विकारण्याऐवजी नेतेमंडळीत वैयक्तिक सत्तालाभाची आकांक्षा प्रबळ होऊन ती प्राप्त . नेत्यांमधील .करण्यासाठी स्पर्धा सुरू झाली एकजूट लोप पावलीपुढे एकाचे दोन ., दोनाचे तीन, तीनाची एकजूट करण्यासाठी आणखी नवा एक असे करता करता रिपब्लिकन पक्षाचे तुकडे तुकडे झालेबाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर आंबेडकरी.डॉ . .ती भरून काढणे आंबेडकरी नेत्यांचे काम होते.समाजात पोकळी निर्माण झालेली होतीपरंतु त्यांनी आंबेडकरी चळवळ सोडून वेगवेगळ्या पक्षात काम करणे सुरू केले .मुळे वामनदादांना अतिशय वाईट वाटत होतेसमाजातील अशा या मतलबी लोकां . म्हणून महाकवी वामनदादा कर्डक आपल्या काव्यातून भीमाचे नांव घेऊन पोट भरणाऱ्या नेत्यांना खडे सवाल विचारतात मनातील वेदना आपल्या गीतातून व्यक्त करतात.त्या गीतातील पुढील ओळी येथे तंतोतंत लागू पडतात.

"भीमा तुझ्या मताचे जर पाच लोकं असते,
तलवारीचे त्यांच्या न्यारेच टोक असते,
वाणीत भीम आहे, करणीत भीम असता,
वर्तन तुझ्या पिलांचे सारेच चोख असते'

अशाप्रकारे या गीतातून वामनदादांनी आंबेडकरी चळवळीची शोकांतिका स्पष्ट केली आहे महाकवी वामनदादा कर्डक हे आंबेडकरी नेत्यांना आव्हान करतात, अरे तुम्ही भीमाचे सैनिक आहात, तुम्हाला खुप मोठी परंपरा आहे माझ्या भीमाने तुमच्यासाठी तेजाचा, लढण्याचा इतिहास निर्माण केला आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया नावाचा आपल्या स्वप्नातील एक पक्षही दिला आहे. त्याच्यासाठी वाट दिली आहे. वाटेवर रथही आणून सोडला आहे. तो जपा, पुढे हाका, महाकवी वामनदादा यांचे चिंतन खरोखर आंबेडकरी समाजाला दिशा देणारे आहेत. आपण फक्त त्यांचे गाणे ऐकत राहिलो, त्यावर चिंतन केले नाही, त्यामुळे अपेक्षित परिवर्तन झाले नाही.

५ जानेवारी १९९५ ला नाशिक येथे डॉ.आनंद यादव यांच्या अध्यक्षतेखाली कामगार साहित्य संमेलन भरले होते. संयोजकांनी विचारमंचाला जेआर.डी.टाटा यांचे नांव दिलेले होते सकाळी कामगार मंत्र्यांच्या उपस्थितीतील उद्घाटन सोहळ्यानंतर परिसंवाद कथा-कथन इत्यादी कार्यक्रम पार पडले होते. दिवसभरात कुणीही विचारमंचाच्या नावाचा उल्लेख व त्यास आक्षेप घेतला नाही. याच विचारमंचावर वामनदादा कर्डक यांच्या अध्यक्षतेखाली रात्रीला कवीसंमेलन होते रात्री कवीसंमेलनाच्या अध्यक्षीय समारोप करतांना वामनदादा म्हणतात

'सांगा आम्हांला बिर्ला बाटा-टाटा कुठाय हो
सांगा धनाचा साठा न आमचा वाटा कुठाय हो..'

या काव्यातून वामनदादांनी भांडवलशाहीवर ताशेरे ओढवून तळागाळातील लोकांना(बहुजनांना) जागृत केले. भांडवलशाही वर्ग बहुजन समाजाचे शोषण कसा करतो हे त्यांनी या गीतातून मांडले

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही वामनदादाचा सहभाग दिसतो संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उभी राहीली त्यात अनेकांचा सहभाग होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनीही'महाराष्ट्र एक भाषिक प्रांत या ग्रंथात एकभाषिक महाराष्ट्र प्रांताचा मुद्दा ठामपणे मांडला मध्यप्रांत आणि व-हाडातील मराठी भाषिक संलग्नं जिल्हे त्यात सामिल करून मुंबई शहर राज्याची राजधानी असावी अशी सूचना बाबासाहेब करतात. मुंबई ही महाराष्ट्राला मिळावी यासाठी अण्णाभाऊ साठे यांनीही आपल्या शाहिरीद्वारे जनजागृती केली. त्याचप्रमाणे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत वामनदादा कर्डक यांनीही सहभाग घेतला संयुक्त महाराष्ट्र चळवळीची महती सांगणाऱ्या गीतात वामनदादा लिहीतात,

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

'मुंबई आमची थोरं महाराष्ट्राची पोरं,
मुंबई वरती हक्कं सांगती कोण कुठले चोरं,

अशाप्रकारे संयुक्त महाराष्ट्राचा लढा आपल्या गीतातून जनमानसांपर्यंत वामनदादा पोहचवितात अशाप्रकारे वामनदादा कर्डक यांनी आंबेडकरी विचार जनमानसांत पोहचविण्याचे कार्य आपल्यागीताद्वारे केले. त्याचबरोबर तत्कालीन गंभीर विषयाला त्यांनी हात घातलेला दिसून येतो

सारांश :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वचनाशी खरे नाते जपणारे महाकवी वामनदादा कर्डक होत त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनकार्य व त्यांचा समग्रं समतावादी संघर्षमय दलितमुक्तिलढ्याचे अचूक वास्तववादी दर्शन आपल्या काव्यातून १९४३ पासून तर जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत लोकांपुढे मांडले आपल्या गीत गायनाने खेडोपाडी समाजप्रबोधनाचे कार्य केले. आंबेडकर विचारांचा अग्नी घराघरात पोहचविला त्यांच्या गाण्याने समाजाला संस्कारीत केले डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनंतर आंबेडकरी चळवळीतील नेत्यांनी एकत्रित राहून चळवळ चालवावी असाही सल्ला आपल्या काव्यातून आंबेडकरी नेत्यांना देतात अशाप्रकारे आंबेडकरी विचाराने झपाटलेल्या वामनदादांनी घरदार-संसाराची पर्वा न करता सर्व जीवन बुध्दं-फुले-आंबेडकर यांचे विचार पेरण्यासाठी वाहून घेतले.

संदर्भ-ग्रंथसूची:

1. जाधव प्रा.सागर, 'महाकवी वामनदादा कर्डक : चरित्रकाव्यं', अलोक - संबोधी प्रकाशन, यवतमाळ, द्वितीय आवृत्ती, १५ ऑगस्ट २००९, पृ. ३४, ३५, ४१, ४८, ४९, ५०, ८२
2. कांबळे उत्तमं, 'वामनदादांच्या गीतांतील भीमदर्शन, सुगावा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती १४ मे २०१४, पृ. २२, २५, २६
3. भगत आचार्य सूर्यकांत (संपादक), 'महान लोककवी वामनदादा कर्डक', उत्कर्ष प्रकाशन, वर्धा, प्र.आ. दि.३१/०६/२०१७ पृ. संपादकीय
4. अनाव्रत विनोद, 'नव-रिपब्लिकन आणि बहुजन वादाचे अंतद्वंद्व, सुगावा प्रकाशन, पुणे, ३१ जुलै २०१५, पृ. ४७
5. वैद्य प्रभाकर, 'महात्मा फुले आणि त्यांची परंपरा, लोक वांड्मय गृह, मुंबई प्र.आ. ऑक्टोबर १९७४, पृ. १३३
6. https://mr.m.wikipedia.org>wiki, दिनांक १५/१०/२०२१
7. https://lib.unipune.ac.in, दिनांक १२/१०/२०२१
8. https://www.marathiebatmya.com, दिनांक १२/१०/२०२१
9. https://shodhgangotri.inflibnet.ac.in, दिनांक १२/१०/२०२१
10. https://roudtableindia.com.in>marathi, दिनांक ०५/१०/२०२१

◆◆◆◆◆

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

ISSN : 0974-3065

द्वितीय अंक

इतिहास दर्पण
ITIHAS DARPAN

विक्रमाब्ध २०७९, युगांब्ध ५१२४
जानेवारी २०२२

अखिल भारतीय इतिहास संकलन योजना की शोध पत्रिका
आपटे भवन, केशव कुंज, झंडेवाला, नई दिल्ली - ११० ०५५

RESEARCH JOURNAL OF AKHIL BHARTIYA ITIHAS SANKALAN YOJANA
Apte Bhawan, Keshav Kunj, Jhandewala, New Delhi - 110 055

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

इतिहास दर्पण

नाम	-	इतिहास दर्पण
आई.एस.एस.एन.	-	0974-3065
पृष्ठ आकार	-	डबल डिमाई (8.5 X 11)
पृष्ठ संख्या	-	160-200
प्रधान सम्पादक	-	**प्रो. सतीशचन्द्र मित्तल** **(सेवानिवृत्त, इतिहास विभाग, कुरूक्षेत्र विश्वविद्यालय)** **2 सी / 2631, विवेक विहार, शास्त्री नगर, सहारनपुर**
सम्पादक	-	**डॉ. रत्नेश कुमार त्रिपाठी** **सह आचार्य, इतिहास विभाग** **सत्यवती महाविद्यालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली** **डॉ. नरेन्द्र शुक्ल** **शोध प्रमुख,** **नेहरू स्मारक संग्रहालय एवं पुस्तकालय, तीनमूर्ति चौक, दिल्ली**
प्रकाशन तिथि	-	वर्ष प्रतिपदा एवं विजयदशमी (अर्द्धवार्षिक शोध-पत्रिका)
प्रकाशन वर्ष	-	1994
प्रकाशन माध्यम	-	हिन्दी, संस्कृत एवं अंग्रेजी
प्रकाशक	-	अखिल भारतीय इतिहास संकलन योजना
स्थान	-	बाबा साहेब आपटे स्मृति भवन, केशव कुंज, झण्डेवाला, नई दिल्ली-110055
दूरभाष	-	011-23385670
ई-मेल	-	darpan.itihas@gmail.com, abisy84@gmail.com, info@abisy.org
वेवसाइट	-	www.abisy.org www.abisy.org/itihas-darpan/
सदस्यता	-	आजीवन सदस्यता
सदस्यता राशि	-	संस्थागत राशि रू. 5000/- एवं व्यक्तिगत राशि रू. 3000/-

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Journal Recommendation Form	
Name of the Journal	**Itihas Darpan**
ISSN Number	**0974-3065**
Nature of Publication	**Hard Copy**
Periodicity	**Half Yearly**
Publisher	**Akhil Bharatiya Itihas Sankalan Yojan, 10196/A, Apte Bhawan, Keshav Kunj, Jhandewala Mandir, New Delhi - 110055, Bharat**

Criteria	Answer	Score
The journal has a website which provides full postal and email addressesof Chief Editor and Editors, and at least some of these addresses are verifiable official addresses	**Yes**	
		Select score
The website provides complete instructions to authors/reviewers	**Yes**	**+1**
The journal has a well-defined peer-review and publication policy	**Yes**	**+1**
The journal has a well-defined Ethics policy	**Yes**	**+1**
The journal has a declared frequency of publication each year	**Yes**	**+1**
The journal is published regularly and in time following its declared frequency	**Yes**	**+1**
The journal claims that it is indexed in a given database and this claim is verified	**yes**	**+1**
Journal levies submission/publication charges	**No**	
Since when is the journal being regularly published (select any one)	**> 6 Years**	**+2**
Final Score (taking into consideration scores of points 1-8)		**08**

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

ISSN: 0974-3065

अनुक्रमणिका

अ. क्र.	शोधनिबंधांचे नाव	लेखकाचे नाव	पृष्ठ क्रमांक
१	यशवंतराव होळकर यांची लष्करी व्यवस्था	महेशकुमार भगवानराव चौरे	१-८
२	जनाबाई माधवराव रोकडे कार्य आणि कर्तृत्व	डॉ. सपकाळ रामेश्वर विक्रम	९-१४
३	बंगालचा नवाब सिराजउद्दौला आणि ब्रिटीश	डॉ. सचिन उत्तमराव हंचाटे सहयोगी	१५-२८
४	महाराष्ट्रातील स्त्रियांचे नेतृत्व आणि स्त्रीवादी चळवळीचे योगदान	डॉ. पी. बी. सिरसट	२९-३३
५	भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महाराष्ट्रातील वृत्तपत्रांचे योगदान	श्री. दराडे नवनाथ एकनाथ डॉ. सविता गंगाधरराव मुंढे	३४-४०
६	महानुभाव संप्रदायाच्या भाषिक व सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास	सतिष उत्तमराव रिंढे	४१-४५
७	भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महिलांचे योगदान विशेष संदर्भ : बीड जिल्हा	प्रा. डॉ. प्रशांत साबळे	४६-५४
८	मुंबईतील ब्रिटिश कालीन कामगार क्षेत्रातील स्त्रियांची स्थिती	प्रा. दिलीप भिमराव गिऱ्हे	५५-६०
९	भक्ती चळवळीची सामाजिक फलश्रुति	डॉ. नवनाथ ज्ञानोबा पवळे	६१-६४
१०	भारतीयांचे इंग्रजांविरुद्ध सशस्त्र लढे एक : ऐतिहासिक अध्ययन	प्रा. डॉ. नाईक एन. डी.	६५-६९
११	रायगड जिल्यातील आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे कार्य	प्रा. डॉ. पाथरकर एस. व्ही.	७०-७५
१२	स्वातंत्र्यपूर्व काळातील शेतकरी चळवळ : विशेष संदर्भ पारनेर तालुका	गवारी विश्वास रोहिदास डॉ. उत्तम अप्पासाहेब पठारे	७६-८३
१३	1857 चा स्वातंत्र्य समर आणि मराठवाडा	प्रा. डॉ. शिंदे अनंत नामदेवराव	८४-८८
१४	क्रांतिगुरू लहुजी साळवे यांचे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान	प्रा. डॉ. ताडेराव राज भुजंगराव	८९-९७
१५	राष्ट्रीय आंदोलनातील महाराष्ट्राचा सहभाग	प्रा. डॉ. सखाराम मारुती वांढरे	९८-१०५
१६	लोकशाहिर अण्णा भाऊ साठे आणि	डॉ. बादलशाहा डोमाजी चव्हाण	१०६-११३

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

	संयुक्त महाराष्ट्राची चळवळ		
१७	संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत कामगार चळवळीचे योगदान	डॉ. संजय काशिनाथ पाटील	११४-१२०
१८	महाराष्ट्रातील क्रांतीकारांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान	डॉ. किशोर शेषराव चौरे	१२१-१२८
१९	१९४२ च्या चिमूर क्रांतीमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे तात्विक योगदान	डॉ. पल्लवी स. ताजने	१२९-१३७
२०	स्वातंत्र्य संग्रामातील जानकीबाई आपटेंचे योगदान	डॉ. नम्रता दिलीप भोसले	१३८-१४१
२१	क्रांतिवीर उमाजी नाईकचे युध्दतंत्र	डॉ.सदाशिव दंदे	१४२-१४६
२२	क्रांतीरत्न विष्णू गणेश पिंगळे	प्रा. डॉ. दिगंबर सोनवणे	१४७-१५४
२३	डॉ. आंबेडकरांच्या भक्ती पंथविषयकविचारांचे नवे आयाम	डॉ. पुष्पा गायकवाड	१५५-१६२
२४	महाराष्ट्रातील स्त्रियांचे नेतृत्व आणि स्त्रीवादी चळवळीचे योगदान	डॉ. पी. बी. सिरसट	१६३-१६७
२५	जनाबाई माधवराव रोकडे कार्य आणि कर्तृत्व	डॉ. सपकाळ रामेश्वर विक्रम	१६८-१७३
२६	महाराष्ट्रातील पूर्वसुरींचे अर्थचिंतन (१८४० ते १८५५)	प्रा. डॉ. उत्तम अप्पासाहेब पठारे	१७४-१७९
२७	भारतीय स्वातंत्र चळवळीत महाराष्ट्रांतील महिलांचे योगदान	डॉ राजाराम रा पिंपळपल्ले	१८०-१८५
२८	स्त्रियांची सामाजिक स्थिती सुधारण्यामध्ये 'सती बंदी कायदा – १८२९' आणि 'विधवा पुनर्विवाह कायदा – १८५६' चे योगदान	किशोर गणेश गोरडे	१८६-१८९
२९	भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील प्रमुख महिलां	प्रा. सुनीताबाई भगवान पाटील	१९०-१९७
३०	महाराष्ट्रातील स्वातंत्र्यानंतरची शेतकरी चळवळ: एक चिकित्सक अभ्यास	प्रा. डॉ. बाबासाहेब केशवराव शेप	१९८-२०४
३१	डॉ. आंबेडकर पूर्व विदर्भप्रांत का दलित अस्पृशोध्दार आंदोलन	प्रा. प्रफुल राजुरवाडे	२०५-२१०
३२	भारतीय स्वतंत्रता आंदोलन में यूसूफ मेहर अली की सक्रिय सहभागीता का	डॉ. सैय्यद मुजाहिद सै. वासित	२११-२१५

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

महाराष्ट्रातील क्रांतीकारांचे भारतीय स्वातंत्र्य लढयातील योगदान

डॉ. किशोर शेषराव चौरे
इतिहास विभाग प्रमुख,
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,
बल्लारपूर जि. चंद्रपूर
chaurekishor12@gmail.com
9028616685

ABSTRACT :(गोषवारा)

सशस्त्र क्रांतीकारी चळवळीला भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महत्त्वपूर्ण स्थान आहे . भारताचा स्वातंत्र्यलढाहा ब्रिटीशांचे अधिपत्य घालवून देण्यासाठी होताया स्वातंत्र्य लढ्यात . देशातील .देशातील अनेक क्रांतीकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली क्रांतीकारकांबरोबरच महाराष्ट्रातीलही अनेक क्रांतीकारक या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होते . 1857 साली ब्रिटीशांच्या विरोधात झालेल्या संघर्षात अनेक स्वातंत्र्य वीरांनी कर्तब दाखविला . 1857 च्या स्वातंत्र्य समरानंतर पुढे इ .स.1947 सालापर्यंत भारतीय नागरिकांनी ब्रिटीशांचे वर्चस्व झुगारून देण्यासाठी ९० वर्ष संघर्ष केलाया भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्रातील . वासुदेव ,उमाजी नाईक बळवंत फडकेविनायक दामोदर ,चाफेकर बंधु ,अनंत कान्हेरे , सावरकर इत्यादी क्रांतीकारकांचे योगदानमहत्वपूर्ण आहेश प्रस्तुत शोधनिबंधात ब्रिटी . .विरोधात त्यांनी केलेल्या कार्याचा व संघर्षाचा अल्पसा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे

प्रस्तावना :

1453 ला कॉन्स्टेटिनोपाल शहराचा तुर्कानी ताबा घेतल्यानंतर युरोप खंडाचा आशीया खंडांशी चालणारा स्थल मार्ग व्यापार बंद झाला. व्यापार करण्यासाठी आता नवीन मार्गाची आवशकता भासू लागली आणि तो म्हणजे जलमार्ग होय, त्याद्दष्टीने भारतात पोहचलेले पहिले युरोपीयन म्हणजे पोर्तुगीज होय. 1498 मध्ये पोर्तुगीज खलाशी 'वास्को द गामा' भारतात पश्चिम किनाऱ्यावरील कालिकत बंदरात उतरला व युरोपीयन लोकांना व्यापाराचा मार्ग मोकळा झाला. पोर्तुगीज पाठोपाठ भारतात व्यापार करण्याच्या निमित्ताने डच, फ्रेंच, इंग्रज याही युरोपीयन सत्ता भारतात आल्या. व्यापार करण्यासाठी या चारही युरोपीयन सत्तांमध्ये स्पर्धा लागली होती. यातूनच फ्रेंच व ब्रिटीश यांच्यात तीन कर्नाटक युद्धे झाली. ब्रिटीशांचा यात विजय झाला.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

ब्रिटीशांनी व्यापाराबरोबरच साम्राज्य विस्तार केला. 23 जून 1757 रोजी प्लासीच्या लढाईत बंगालचा नवाब सिराजउद्दौला याचा पराभव ब्रिटीशांनी केला. या लढाईने ब्रिटीश सत्तेचा पाया भारतात घातला गेला. पुढे २२ ऑक्टोबर 1764 मध्ये बक्सारच्या लढाईत मीर कासीम, शुजाउद्दौला, शहाआलम यांच्या तीन्ही संयुक्त फौजांचा पराभव ब्रिटीशांनी केला. या लढाईने ब्रिटीश सत्तेचा पाया भारतात मजबूत झाला. येथून पुढे इंग्रजांनी भारतातील जी छोटी मोठी राज्य होती, त्या सर्वांचा पराभव केला. महाराष्ट्राला पारतंत्र्याच्या गुलामीतून बाहेर काढून मराठी राज्याची स्थापना लोकराजा छत्रपती शिवाजी महाराज यांनी केली होती. पुढे मराठी साम्राज्याची धुरा पेशव्यांकडे आली. 1818 साली तिसऱ्या इंग्रज-मराठे युद्धात ब्रिटीशांनी पेशवाईचा अस्त केला. आता भारतात ब्रिटीशांना विरोध करणारी मोठी सत्ता राहिली नाही. पुढे लॉर्ड डलहौसी या गव्हर्नर जनरलनी दत्तक वारसा नामंजूर करून सातारा, नागपूर, झशी इत्यादी संस्थाने खालसा करून ब्रिटीश साम्राज्यात विलीन केली. ब्रिटीशांच्या विरोधात भारतीयांकडून इ.स. 1757 से 1856 या कालखंडात छोटी-मोठे उठाव घडून आले. ते सर्व उठाव ब्रिटीशांनी मोडून काढले. ब्रिटीशांच्या विरोधात सर्वात मोठा उठाव म्हणजे चा उठाव 1857 हा उठाव म्हणजे भारतीयांनी ब .होय रिटीशांवर केलेला सर्वात मोठा आघात होय .1857 चा उठाव म्हणजे आधुनिक भारताच्या इतिहासातील क्रांतीकारी घटना होय. मध्ये ब्रिटीशांना 1857 तरी त्यातून नव्या पिढीला बऱ्याचशा प्रेरणा ,न हाकलून लावण्याचा प्रयत्न जरी फसलाभारतातू राणीच्या जाहीरनाम्यातील .मिळाल्याआश्वासने ब्रिटीशांनी पाळली नाहीउलट भारतीय . ब्रिटीशांच्या आर्थिक शोषणामुळे आपला देश दरिद्री .जनतेची आर्थिक पिळवणूक सुरू ठेवली या अत्याचारी धोरणाचा तरुण भारतीयांवर प्रभाव पडला त्यातूनच क्रांतीकारी इंग्रजांच्या .बनला चळवळीचा उदय झाला. क्रांतीकारी तरुणांना देशात सशस्त्र क्रांती घडवून आणून ब्रिटीशांची सत्ता उलथून टाकावयाची होतीगुलामगिरीपेक्षा .तरुणांमध्ये प्रखर राष्ट्रवाद भरलेला होता . जुल्मी राज्यकर्त्यांची हिंसा .जाणे त्यांना अधिक प्रिय वाटत होते मरणाला सामोरे करणे पाप नसून ते मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी केलेले एक पवित्र कर्तव्य होय .अशी त्यांची श्रध्दा होती , त्यातूनच भारताच्या विविध प्रांतामध्ये क्रांतिकार्यास सुरुवात झालेली दिसतेबंगालमधील . महाराष्ट्रातील क्रांतीकार्य ,उत्तर भारतातील क्रांतीकार्य ,तीकार्यक्रां आढळले त्यात अनेक शूर क्रांतीकारकाने वीरमरण पत्करले ,वासुदेव बळवंत फडके ,महाराष्ट्रामध्ये उमाजी नाईक , कुलकर्णी .डी .के ,विनायक दामोदर सावरकर ,चाफेकर बंधू अनंत कान्हेरे, गोविंद नारायण पोतदारसेनापती पांडुरंग महादेव बापट इत्यादी क्रांतीकारकांचा भारतीय स्वातंत्र्य लढ्यात , महत्त्वपूर्ण योगदान आहे.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

ISSN: 0974-3065

महाराष्ट्रातील क्रांतीकारकांचे भारतीय स्वातंत्र्य लढयातील योगदान :

महाराष्ट्रात इंग्रजी सत्तेच्या कालखंडाला विशेष महत्व आहे इंग्रजांनी येथील मराठा . इंग्रजांच्या अन्यायी धोरणामुळे .सत्तेला पराभूत करून राजकीय सत्तेतच बदल घडवून आणला त्यांच्या विरोधात महाराष्ट्रात अनेक उठाव झालेत्यात उमाजी नाईक यांच्या उठावाचा उल्लेख . उमाजी नाईक हे .करता येईल रामोशांचे नेते होते .स.त्यांचा जन्म पुरंदरमधील भिवरी गावात इ , 1791 मध्ये झालाकिल्ल्यांचा ,ते शेती पशुपालन .रामोशी लोक धाडसी व स्वतंत्र प्रवृत्तीचे होते . बंदोबस्त आणि मोठ्या वाड्यांवर पहारेकरी इत्यादी कामे करत उमाजी अकरा वर्षाचा . किल्ल्याच्या ' पुरंदर' वडिलांच्या काळापासूनच उमाजी .असतानाच वडीलांचा मृत्यू झाला उमाजीने अनेक .रामोशी लोक जुलमी सावकारांवर दरोडे टाकत असत .त होताबंदोबस्ता लुटलेली संपत्ती गोरगरिबांना दक्ष ,धनिकांना लुटलेि ण्णा देणे, दाण देणे अशी तो मदत करीत असेत्याने इंग्रजांना आव्हान .इंग्रजांच्या विरोधातील कारस्थाने उमाजीने वाढविली होती . रॉबर्टसन .डी.कलेक्टर एच देण्यासाठी पुण्याचा यांच्याकडे ला अनेक मागण्या 1827ठेवल्या. कलेक्टर रॉबर्टसनने रोजी जनतेसाठी 1827 डिसेंबर 15जाहिरनामा काढून जाहीरनाम्याव्दारे उमाजीला पकडून देणाऱ्यास बक्षिस दिले जाईलउमाजीला .असे जाहीर केले होते . इंग्रजांना .प्रयोग करून पाहिले परंतु उपयोग होत नव्हता पकडण्यासाठी ब्रिटीशांनी वेगवेगळे वर्षे सळो 14 सलग की पळो करून सोडणारे व सर्व प्रथम क्रांतीचे स्वप्न पाहणारे महाराष्ट्रातील निधड्या छातीचे वीर आद्यक्रांतिकारक 'राजे उमाजी नाईकशेवटी .होत ' विश्वासघाताने उमाजीला उमाजीला ,लुक्यातील उत्तोळी या गावी इंग्रजांनी पकडलेला भोर ता 1931 डिसेंबर 15 ए ,ला फाशी देण्यात आली 1934 फेब्रुवारी 3 गुन्हेगार ठरवून उमाजीलाका तळागाळातील मराठी नायकाचा हा ब्रिटीश विरोधी लढा होताजो , तत्कालीन काळात आणि पुढील काळात महाराष्ट्रातील क्रांतीकारकांना प्रेरणादायी ठरला.

महाराष्ट्रातील रंगो बापूजी गुप्ते यांनी ब्रिटीशांच्या विरोधात सशस्त्र लढा दिलारंगो . बापूजी हे सातार संस्थानचे छत्रपती प्रतापसिंह भोसले ह्यांचे कारभारी आणि वकील होते. सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांचे गेलेले राज्य परत मिळविण्यासाठी त्यांनी अविरत प्रयत्न केला . परंतु तेथून .त्यासाठी ते इग्लंडला गेले हताश होऊन परत यावे लागले याच काळात महाराष्ट्रात . च्या उठावाची सुरुवात 1857झाली होतीयाचा फायदा रंगो बापूजी गुप्ते यांनी घेऊन . युरोपीयन अधिकाऱ्यांना ठार करायचेसरकारी , खजिने लुटायचेकैद्यांची सुटका करायची , कोळी यांना एकत्र ,रामोशी त्यासाठी करून सैन्य उभारलेपरंतु त्यांच्या हालचालीचा सुगावा ,

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

ISSN: 0974-3065

रंगोबापूजी भूमीगत झाल .इंग्रजीना लागला .पुढे रंगो बापूजी बैरागी बनले .'बैरागी बाबाया ' .स.इ .नावाने ते प्रकट झाले1885 मध्ये दारव्हा येथे मृत्यू झाला.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये आद्य क्रांतीकारक म्हणून वासुदेव बळवंत फडके यांना ओळखले जाते क्रांतिकारी चळवळीची खरी सुरुवात यांनी महाराष्ट्रात ,केलीब्रिटीशांच्या . .स.इ .विरोधातील त्यांचा उठाव महत्त्वपूर्ण म्हणून ओळखला जातो1857 च्या स्वातंत्र्य युध्दानंतर ब्रिटीश विरोधात जो पहिला सशस्त्र उठाव झाला तो वासुदेव बळवंत फडके यांचा होता वासुदेव बळवंत फडके यांचा जन्म कुलाबा येथे एका मध्यमवर्गीय कुटूंबात झाला . वासुदेव बळवंतानी थोडे इंग्रजी शिक्षण घेतल्यानंतर उदरनिर्वाहासाठी प्रथम रेल्वे खात्यात तेथे ,र ते लष्करी खात्यात नोकरीला लागलेत्यानंत .लिपीक म्हणून कामाला सुरुवात केली ब्रिटीश अधिकाऱ्यांनाकडून मिळणाऱ्या अपमानकारक वागणूकीमुळे त्यांच्यात राष्ट्रीय भावना जागृत झालीया . नोकरीमुळे ते आईच्या अंत्यविधीस पोहचू शकले नाहीआणि याचवेळी अशा . अमानुष परकीय सत्तेची गुलामगीरी न करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. शस्त्रबळाचा वापर केल्याशिवाय इंग्रज या देशातून जाणार नाहीत असे त्यांना वाटत होते, यासाठी पुण्यातील तरुणांमध्ये देशप्रेम व स्वदेशी बद्दल आस्था निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी सुरु केलाफडके . यांनी पुणे येथेच इंग्रजी राजवटी विरुद्ध भाषणे द्यावयास सुरुवात केलीवैराग्याचा वेश धारण . करून गावोगावी ब्रिटिशांविरोधात जनजागृती करू लागले याच सुमारास महाराष्ट्रावर दुष्काळाची भीषण छाया पसरली होतीदुष्काळामुळे जनतेच्या होत असलेल्या हालअपेष्टांच्या . तत्या वाचून बळवंतांच्या डोक्या .बातम्या वृत्तपत्रातून येऊ लागल्या विचारमंथन सुरू झाले. नंतर त्यांनी रामोशीगेळी „ मांगमुसलमान इत्यादी सहकाऱ्यांच्या मदतीने पुण्याच्या ,महार , परिसरात धनिकांच्या घरावर दरोडे घालू लागले. आपल्या क्षेत्रातील दळणवळणाचे मार्ग उद्ध्वस्त करायचेजिल्हयात ब्रिरीश संदेशवाहक तारा तोडायच्या अशाप्रकारे त्यांनी पुणे , वस्तू व पैसा ,धनिकांच्या घरावर दरोडे घालून हाती आलेले धान्य ,विरोधी कारवाया सुरू केल्या वासुदेव बळवंत दुष्काळग्रस्त भागात गोरगरिबांना वाटतत्यामुळे दारिद्री जनता त्यांना परमेश्वर . स इंग्रज सरकारने जाहीर फडके यांना पकडून देणाऱ्यास चार हजार रुपयाचे बक्षी .मानू लागली त्याला प्रतिउत्तर म्हणून फडके यांनी मुंबईचे गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल यांचे शीर आणून ,केले देणाऱ्यास दहा हजार रुपये बक्षीस दिले जाईल असे जाहीर केलेफडके यांचा उत्साह फार . .फडके पकडले गेले शेजी वासुदेव बळवंत १८७९ जुलै २३ शेवटी .काळ टिकून राहिला नाही त्यांना एडन च्या तुरुंगास .त्यांना जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली ठेवण्यात आले .17 फेब्रुवारी मध्ये ह 1883 या महान देशभक्ताची प्राणज्योत मावळली.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

ISSN: 0974-3065

वासुदेव बळवंत फडके नंतर महाराष्ट्रातील क्रांतीकार्य कमी झालेले आढळतेयाच . त्यांनी केसरी आणि ,महाराष्ट्रातील जहाल प्रचाराचे कार्य लोकमान्य टिळकांचे सुरु होते काळात मराठा या वृत्तपत्रातून ब्रिटीशांच्या धोरणावर टिका शस्त्र सोडले होतेयाचकाळात महाराष्ट्रात . लाखों लोग प्लेगनी .त्याचबरोबर प्लेगनी थैमान घातले होते ,भयानक दुष्काळ पडलेला होता .ब्रिटीश अधिकाऱ्यानी प्लेग निवारण्याच्या नावाखाली दडपशाही सुरू केली होती .मरण पावले लोकांच्या घरात घुसून स्त्रियांवर अत्याचार करीपर्यंतब्रिटीश अधिकाऱ्यांच्या अत्याचारांची मजल गेली२२ अशा परिस्थितीत .त्यामुळे जनतेत प्रचंड असंतोष निर्माण झाला . जून 1897 पुण्याचा प्लेग अधिकारी रँड आणि त्याचा सहकारी आयर्स्टन यांच्यावर दामोदरपंत रोजी चाफेकर, बाळकृष्ण चाफेकर आणि वासुदेव चाफेकर या चाफेकर बंधूनी गोळ्या झाडल्या . यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात आश्चर्याची आणि आनंदाची प्रतिक्रिया व्यक्त झाली स्वतः टिकळांनी रँड वधाचे नैतिक समर्थन केले. रँडच्या वधाची तुलना अफजलखानाच्या वधाबरोबर केलीइतका . कड़क बंदोबस्त असतांना सुद्धा ब्रिटीश अधिकाऱ्यांचे खून व्हावेत ही गोष्ट ब्रिटीशांना नामुष्कीची वाटलीब्रिटीश आशिकाऱ्यांनी खुनाचा तपास लावून दामोदर ., बाळकृष्ण व वासुदेव ह्या चाफेकर बंधूंना सरकारने पुण्यात फाशी दिली.

चाफेकर बंधूची उज्ज्वल परंपरा महाराष्ट्रात सावरकर बंधूनी चालविलीमहाराष्ट्रीयन . क्रांतीकारकांमध्ये विनायक दामोदरसावरकर यांचे कार्य महान व उल्लेखनीय आहेशालेय . शिक्षण घेत असतांना चाफेकर बंधूंना झालेल्या फाशीचा त्यांच्यावर प्रभाव पडलाविद्यार्थीदशेत . असतानाच सावरकरांनी'मित्र-मेळा' ही संस्था स्थापन केली .स.तर इ .1904 मध्ये वडील बंधू गणेश उर्फ बाबाराव सावरकर यांच्या सहकार्याने ही क्रांतीकारी संघटना 'अभिनव भारत' या संघटनेद्वारे .स्थापन केली महाराष्ट्रात क्रांतीकार्य सुरू होतेसत्ता उलथून टाकणे हे ब्रिटीशांची . संस्थेचे मुख्य उद्दिष्ट ह ोतेसावरकर बंधूनी नाशिक परिसरात ब्रिटीश विरोधी वातावरण तयार . .केले होते1906 मध्ये सावरकर इंग्लंडला गेलेत व तेथून भारतातील क्रांतीकारकांना गुप्तपणे पिस्तुले व काडतुसे पुरवू लागले190 सावरकरांनी .7 मध्ये 'भारतीय स्वातंत्र्य संग्राम 1957' अशा शिर्षकाचा ग्रंथ लिहून प्रकाशित केलासावरकरांनी गुप्तपणे कार्य करून लोकांमध्ये . स्वातंत्र्यवीर सावरकरांनी पिस्तुल चालविण्याचे शास्त्र शुद्ध .चळवळीची जाणीव निर्माण केली मदनलाल धिंग्रा या तरुणाने सावरकरांपासून .शिक्षण तरुणांना देण्याचे कार्य लंडन मध्ये केले प्रेरणा घेऊन1 जुलै स्वातंत्र्यवीर सावरकर इंग्लंडमध्ये .रोजी कर्झन वायलीचा खून केला 1909 गेल्यावर अभिनव भारतची धुरा त्यांचे थोरले बंधू बाबाराव सावरकर साभांळीत होतेत्यांनी . अभिनव भारत संघटने' नीत्यां .क्रांतीकार्याचा चांगलाच प्रसार केला होता' च्या विविध शाखांना

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

भेटी देऊन त्यामध्ये सुसूत्रता आणली ,अभिनव भारतच्या सदस्यांना लष्करी शिक्षण देणे . विनायक .अशाप्रकारे त्यांनी अभिनव भारत चे कार्य जोमाने पुढे चालविले .शस्त्रास्त्रे पुरविणे री कार्याची चाहूल तेथील गुप्तहेर खात्याला दामोदर सावरकरांच्या लंडन येथील क्रांतीका आल्याने नाशिकला त्यांच्या बंधूवरही ब्रिटीश गुप्तहेरांची नजर होतीच म्हणून ब्रिटीश सरकारने जून 1908 मध्ये बाबाराव सावरकरांच्या घराची झडती घेतलीत्यात आक्षेपार्ह . त्याच्यावर खटला ,झाली बाबाराव सावरकरांना अटक .कागदपत्रे सरकारच्या हाती पडली नाशिक खटला' तो ,भरण्यात आला' म्हणून प्रसिद्ध आहेत्यांना काळ्या . पाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली .

विसावरकरांचे भाऊ बाबाराव सावरकर यांना ब्रिटीशांनी जन्मठेपेची शिक्षा .दा . नले वठोठावली त्यामुळे अनंत कान्हेरे हे क्रांतीकारक अत्यंत संतप्त ब त्याने नाशिकचा मॅजिस्ट्रेट जॅक्सनला डिसेंबर 1 1909 रोजी ठार मारलेकारण जॅक्सनने . स्वातंत्र्यवीर सावरकरांचे मोठे बंधू गाबाराव सावरकर यांना शिक्षा देऊन अंदमानात पाठविले होतेकान्हेरेला , पकडण्यात आले व फाशीची शिक्षा देण्यात आली.

जॅक्सनच्या खूनाचा संबंध स्वातंत्र्यवीर सावरकरांशी जोडण्यात आला आणि त्यांना पकडण्याचे मुंबई सरकारचे वॉरंट इंग्लंडला पाठविण्यात आले 1810 मार्च 13 सावरकरांना . त्यांना भारतात आणण्यात आले .मध्ये व्हिक्टोरिया स्टेशनवर पकडण्यात आले. नाशिक कटाचा आरोप ठेवून त्यांच्यावर खटला भरला व त्यात त्यांना दोषी ठरवून 1910 डिसेंबर 23 ला जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली. पुढे त्यांची अनंदमानात रवानगी करण्यात आली 1924 पुढे . त्यांना .त्यांच्या हालचालीवर निर्बंध घालण्यात आले .मध्ये सशर्त सुटका करण्यात आली .रत्नागिरी येथे ठेवण्यात आले10 मे .रोजी सावरकरांना पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले 1937 त्यानंतर त्यांनी सक्रियराजकारणात भाग घेतला आणि हिंदू महासभेचे कार्य मोठ्या नेटाने केले. शेवटी रोजी त्यांचे मुंबईत निधन झाले 1966 फेब्रुवारी 26.

महाराष्ट्रातील वरील क्रांतीकारकांव्यतिरिक्त आणखी काही क्रांतीकारकांचा उल्लेख करता येईल त्यात कोल्हापुरचे केहे (केडबा) कुलकर्णी .डी . जपानला जाऊन बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण घेऊन आले. परंतु त्यांना ला पोलीसांनी पकडून सात 1919 वर्षाची शिक्षा दिलीत्यानंतर सोलापूरचे गोविंद नारायन . पोतदार जपानला जाऊन बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण घेऊन आलेत्यांनी अनेक गुप्त संघटनांच्या सदस्यांना बॉम्ब तया .र करण्याचे तंत्रज्ञान शिकवले होते.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

ISSN: 0974-3065

सेनापती पांडुरंग महादेव बापट याही क्रांतीकारकांचा येथे उल्लेख करता येईलबापट . हे अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर गावचे होते घेत असतांना त्यांनी हे महाविद्यालयीन शिक्षण . 'माझ्या परतंत्र मातृभूमीला स्वतंत्र करण्यासाठी मी आजपासून आजीवन कायावाचामनाने झटेन आणि तिची हाक येताच तिच्या सेवेसाठी धावत येईन' अशी शपत घेतली होतीसेनापती बापट . संबंधीची पुस्तिका त्यांनी त्या .यांनी बॉम्ब तयार करण्याचे तंत्र पॅरिसाला जाऊन आत्मसात केले सेनापती बापट भारतात बॉम्ब बनवण्याचे तंत्रज्ञ .भारतात पाठविली ान घेऊन परतलेही , पुढे त्यांनी सशस्त्र क्रांतीचा मार्ग सोडला .बातमी ब्रिटीश सरकारला मिळाल्याने त्यांना कैद केले .आणि ते विधायक कार्याकडे वळले

ब्रिटीश सरकारने सावरकरांना पकडल्यानंतर महाराष्ट्रात क्रांतीकारकाने फारसे डोके वर काढले नाही .18 मे 1911 रोजी सातारा येथील एका घरात दोन बॉम्ब व काडतुसे सापड़ली . परंतु या घटनेनंतर महाराष्ट्रात विशेष काही घडले .त्यासाठी लोकांना अटक करण्यात आले नाही.

अशाप्रकारे भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्रातील तरुण मंडळींनी क्रांतीकारकांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहेया तरुण मंडळीनी मा .तृभूमीला स्वातंत्र्य करण्यासाठी सर्व सुखांचा व भोगांचा त्याग करून आपल्या प्राणांचे बलिदान दिलेजन्मठेप स्विकारली कोणी , .फासावर चढले

निष्कर्ष :

इ. स. 1835 नंतरच्या काळात भारतात पाश्चिमात्य शिक्षण प्रणालीचा लक्षणीय पद्धतीने प्रसार झाला. भारतामध्ये मुंबई, मद्रास, कलकत्ता या ठिकाणी विश्वविद्यालयाची स्थापना होवून भारतीयांना उच्च शिक्षणाची दारे खुली झाली. अनेक भारतीय तरुण या विद्यापीठातून पाश्चिमात्य तत्वज्ञान, आधुनिक जगाचा इतिहास, आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान इत्यादी शिक्षण प्राप्त केले. त्यामुळे हा तरुण वर्ग भारावून गेला. त्यांच्या मनात राष्ट्रवादी, लोकशाही, वैज्ञानिक दृष्टि मानवतावाद इत्यादी गोष्टीविषयी जिज्ञासा निर्माण झाली. जोपर्यंत देशाला स्वातंत्र्य मिळणार नाही तोपर्यंत आपल्या आशा-आकांक्षा, महत्वाकांक्षा पूर्ण होणे शक्य नाही, अशी त्यांना पूर्ण खात्री होती. त्यातूनच क्रांतीकारी तरुणांचा वर्ग उदयास आला.

1885 ला भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. राष्ट्रीय सभेने आपल्या मागण्यासाठी सनदशीर अर्ज विनंत्याचा मार्ग स्विकारला, परंतु अन्यायी सरकारचे हृदय परिवर्तन अर्ज विनंत्यानी व निदर्शनांनी होणार नाही, असा क्रांतीवादी तरुणांचा दृष्टिकोण होता, जुल्मी

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

ISSN: 0974-3065

राज्यकर्त्यांची हिंसा करणे पाप नसून ते मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी केलेले एक पवित्र, कर्तव्य होय, अशी त्यांची श्रद्धा होती.

एखादया ब्रिटीश अधिकाऱ्याला मारून, खून करुन देशाला स्वातंत्र्य मिळणार नाही हे क्रांतीकारकांनाही पटत होते. परंतु निद्रिस्त झालेल्या भारतीय मनाला जागे करण्याकरीता हा त्यांचा प्रयत्न होता.

संदर्भ ग्रंथसूची :

1) देशपांडे, प्रा. श्रीकांत, 'महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुख्य परिक्षा इतिहास विभाग अ, आधुनिक भारत 1757-1947', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, आवृत्ति 1992, पृ. 75, 76, 77, 73,79
2) रोडे, डॉ. सोमनाथ, 'आधुनिक भारत (1813 ते 1975) ' पिंपळापुरे ॲण्ड क. पब्लिशर्स नागपूर, ' पहिली आवृत्ती : जुलै 1998 पृ. 266, 267, 276 277, 278
3) वैद्य, डॉ. सुमन; कोठेकर डॉ. शांता, ' आधुनिक भारताचा इतिहास (1857 ते 1920)', श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर, प्रथमावृत्ती 21 ऑक्टोबर 1996, पृ. 297, 298, 299, 302, 303, 304
4) दीक्षित, नी. सी., 'भारताचा इतिहास (1761- 1771), पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर, 1 ली आवृत्ती: जून 2009, पृ. 226, 227, 228, 229
5) पवार, डॉ, जयसिंगराव, पवार, सौ. वसुधा, ' आधुनिक हिंदूस्थानचा इतिहास' विद्या प्रकाशन नागपुर, प्रथमावृत्ती जून 1991, पृ. 214, 215, 216, 217
6) महाराष्ट्राचा इतिहास इयत्ता ,11 वीमहाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ , प् ,पुणेरथमावृत्ती 2012. पृ.56 , 57, 58, 59,

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ba...pur

त्रिफुण

वर्ष : १३ वे । अंक १ ला । एप्रिल-मे-जून - २०२२

कुळवाडीभूषण

छत्रपती शिवाजी महाराज

विशेषांक

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

तिफण

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे
पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३
मो. ९९०४००३९१८

KP
Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

UGC Care Listed Journal ISSN 2231 - 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज विशेषांक

[भाग-३]

● संपादक ●

डॉ. शिवाजी हुसे

● अतिथी संपादक ●

डॉ. सर्जेराव जिगे डॉ. यशवंत सोनुने

● संपादक मंडळ ●

डॉ. सुभाष बागल
डॉ. सुभाष शेकडे
डॉ. एकनाथ शिंदे
डॉ. ताहेर पठाण
डॉ. रामचंद्र झाडे
डॉ. दत्तात्रय डुंबरे
डॉ. राज मुसणे
डॉ. दिलीप बिरुटे
डॉ. प्रेमला मुखेडकर
डॉ. रंजना कदम
डॉ. सुखदेव इधारे

मूल्य : २५० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

अनुक्रमणिका

अ. क्र.	लेखाचे शीर्षक / लेखकाचे नाव	पृ. क्र.
१.	छत्रपती शिवाजी महाराजांची शेती व शेतकऱ्यांविषयीची भूमिका - डॉ. पी. एन. डापके	१ - ३
२.	छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यापारविषयक व अर्थविषयक धोरणे - डॉ. एस. जी. मद्रेवार व डॉ. आर. ई. मारवाडी	४ - ६
३.	शिवाजी महाराजांचे प्रशासन - डॉ. विलास खुणे	७ - ९
४.	छत्रपती शिवाजी महाराजांचे अर्थ नियोजन - डॉ. सुभाष राठोड	१० - १३
५.	छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ - सुवर्णा ज्ञानेश्वर हजारे	१४ - १८
६.	छत्रपती शिवाजी महाराज आणि भावनिक बुद्धिमत्ता - एक चिकित्सक अभ्यास - डॉ. महेश भास्कर[*१], रुस्तुम दराडे[*२], स्मिता सातपुते[*१*३]	१९ - २४
७.	छ. शिवरायांच्या स्वराज्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी - डॉ. वासुदेव भाऊसाहेब उगले	२५ - २७
८.	छत्रपती शिवाजी महाराज व त्यांची व्यवस्थापनशास्त्रविषयक भूमिका - स्मिता सातपुते[*१] व डॉ. महेश भास्कर[*२]	२८ - ३१
९.	छत्रपती शिवाजी महाराज यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व - मारोती ज. कंधारे	३२ - ३५
१०.	सभासदाची बखर : छत्रपती शिवाजी महाराजांचे समकालीन वास्तव - डॉ. शिवराज काचे	३६ - ३९
११.	शिवकालीन कृषी व्यवस्थापन आणि विकास - रुस्तुम दराडे व डॉ. महेश भास्कर	४० - ४३
१२.	छत्रपती शिवाजी महाराज : व्यक्तित्व - डॉ. निवृत्ती विनायक मिसाळ	४४ - ४६
१३.	नाटककार वसंत कानेटकर यांच्या ऐतिहासिक नाटकातील शिवाजी - डॉ. मीनाक्षी विठोबा भोयर	४७ - ५४
१४.	छत्रपती शिवाजी महाराज – व्यक्तिमत्त्व - प्रियांका विनायक पाटील	५५ - ५८
१५.	छत्रपती शिवाजी महाराज : व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व - डॉ. दत्ता उद्धव जाधव	५९ - ६२

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

१६.	छत्रपती शिवाजी महाराज – तर्कशुद्ध आणि सर्जनशील व्यक्तिमत्त्व - डॉ. महेश भास्कर व डॉ. शिरीष गवळी	६३ - ६७
१७.	छत्रपती शिवाजी महाराजांची शेती व शेतकऱ्यांविषयीची भूमिका - डॉ. गणेश शिंदे व डॉ. लहू घोरपडे	६८ - ७०
१८.	छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन - सुशीला लक्ष्मण जगधने	७१ - ७२
१९.	छत्रपती शिवाजी महाराजांचा धार्मिक दृष्टिकोन : चिकित्सक मांडणी - डॉ. विकास मोहन सरनाईक	७३ - ७६
२०.	शिवरायांचे आरमार आणि दूरदृष्टी - डॉ. श्वेता बा. चौधारे	७७ - ७९
२१.	शिवकालीन भाषा व लेखनपद्धती - डॉ. सायली आचार्य	८० - ८४
२२.	मराठी कादंबरी व ग्रंथांमध्ये आलेले छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याचे संदर्भ - डॉ. सखाराम डाखोरे	८५ - ८८
२३.	मराठी कवितेत शिवाजी महाराजांचे चित्रण - योगिता चोडणकर	८९ - ९३
२४.	शिवकालीन अर्थव्यवस्था : एक अभ्यास - डॉ. कैलास अर्जुनराव ठोंबरे व डॉ. राजाभाऊ गायकवाड	९४ - ९६
२५.	स्वराज्याचे अधिष्ठान : मुलकी शासनव्यवस्था - अविनाश सुदाम भालेराव	९७ - १००
२६.	शिवरायांचा स्त्रीविषयक क्रांतिकारी धोरण - शहेनाज देशमुख	१०१ - १०४
२७.	सभासद बखर : महापुरुषांच्या जीवनाच्या उज्ज्वल दीप्तीमध्ये शोकांतिकेची एक अनाकलनीय किनार - कृष्णा रतन बनसोडे	१०५ - १०८
२८.	छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन - किशोर शेषराव चौरे	१०९ - १११
२९.	महात्मा जोतिबा फुले यांच्या पोवाड्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तित्व - डॉ. युवराज धबडगे व नागेश बोंतेवाड	११२ - ११५
३०.	छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यकारभार आणि देशातील आजच्या लोकशाहीची झालेली अवस्था - ईश्वर रावसाहेब आडसूळ	११६ - ११९
३१.	छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती - डॉ. सुषमा देशपांडे व कविश्री देशमुख	१२० - १२३

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन

- प्रा. किशोर शेषराव चौरे
इतिहास विभागप्रमुख
म.ज्यो. फुले महाविद्यालय, बल्लारपूर, जि. चंद्रपूर
ई-मेल : Chaurekishor12@gmail.com, मो. ९०२८६१६६८५

प्राचीन महाराष्ट्रातील शेवटचे महत्त्वाचे घराणे म्हणजे यादव घराणे होय. यादवांनी चांदा, भंडाऱ्यापासून गोवा वेंगुर्ल्यापर्यंत आणि खान्देशापासून नांदेड-उस्मानाबादपर्यंत सगळा महाराष्ट्र आपल्या ताब्यात घेतला. तेराव्या शतकाच्या अखेरीस महाराष्ट्रातील आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन सर्वांगांनी बहरले होते. अशावेळी इ.स. १२९६ मध्ये अल्लाउद्दीन खिलजी याने यादवांच्या देवगिरीवर आक्रमण केले. मुसलमानांनी दक्षिणेवर केलेली ही पहिली स्वारी होय. अशाप्रकारे महाराष्ट्रावर दिल्लीची मुस्लीम सत्ता प्रस्थापित झाली. देवगिरीवरील आक्रमण मध्यकालीन भारतीय इतिहासातील एक महत्त्वपूर्ण घटना होती. या आक्रमणामुळे दक्षिण भारताला निव्वळ आर्थिक हानीच पत्करावी लागली नाही, तर त्यामुळे मुसलमानांना दक्षिण विजयाचा मार्ग मोकळा झाला. पुढे दिल्लीच्या सुलतानशाहीचा नाश झाल्यानंतर दक्षिण भारतात जी मुसलमान राज्ये उदयास आली, त्या सर्व राज्यांमध्ये बहामनीचे राज्य अतिशय सामर्थ्यवान ठरले. पुढे १४९० ते १५२२ या काळात बहामनी राज्याचे तुकडे होऊन पाच स्वतंत्र राज्ये अस्तित्वात आली. वऱ्हाडातील इमादशाही, अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही, बीदरची बरीदशाही व गोवळकोंड्याची कुतूबशाही या पाच राज्यांपैकी अहमदनगरची निजामशाही व विजापूरच्या आदिलशाहीचे महाराष्ट्राच्या प्रदेशावर दीर्घकाळ वर्चस्व होते.

या इस्लामी सत्तांनी मराठा सरदारांच्या मदतीने आपल्या साम्राज्याचा विस्तार केला. निजामशाही व आदिलशाही यांच्यात प्रदेशव्याप्तीकरिता सतत संघर्ष चालला होता. शहाजीराजांनीसुद्धा कधी निजामशाही, तर कधी आदिलशाही, मुघलशाही यांचा आश्रय घेऊन स्वबळावर आपले अस्तित्व निर्माण केले. छत्रपती शिवाजी महाराज शहाजीराजेंसारख्या प्रबळ सरदाराचे सुपुत्र असले तरी वडिलांच्या पुढे जाऊन त्यांनी स्वराज्याची संकल्पना विकसित केली. शिवाजीराजांनी अठरापगड जाती-जमातींच्या मावळ्यांच्या शौर्यातून, त्यागातून व बलिदानातून स्वराज्य उभारणी केली. शिवाजी महाराजांच्या उदयाच्या काळात महाराष्ट्रात विविध शाह्या, त्यांचे सरदार, सिलेदार इत्यादींमधील सतत चढाओढ व संघर्षामुळे येथील कायदा व सुव्यवस्था कोसळून पडली होती. सामान्य माणसाच्या जीवनातील शांती-शाश्वती, सुरक्षितता यांचा भंग झालेला होता. स्त्रियांवरील अत्याचार वाढलेले होते. महाराष्ट्राची प्रजा अगदी हैराण झाली होती. अशा परिस्थितीत शिवाजीराजांचा जन्म झाला आणि आपल्या कर्तृत्वाने कोंडीत सापडलेल्या महाराष्ट्राची सुटका करून तेथे आनंदवन निर्माण केले. प्रजेची गरज ध्यानात घेऊन त्यांनी अनेक क्षेत्रांत अनेक तऱ्हेने बदल घडवून आणले. प्रस्तुत शोधनिबंधात छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनाचा अल्पसा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

स्त्रीविषयक दृष्टिकोन -

स्वराज्याची स्थापना ही काही सहजासहजी झाली नाही. शिवाजी महाराजांना मुसलमानांविरुद्धच नव्हे, तर मराठ्यांविरुद्धही संघर्ष करावा लागला. अनेक हिंदू-मराठा सरदार शिवाजीराज्यांच्या विरोधात होते. मराठ्यांची जी लष्करी ताकद विखुरलेली होती, जे मराठे सरदार मुघलशाही, आदिलशाही, निजामशाहीमध्ये राहून पराक्रम गाजवीत होते. त्यांना शिवाजी महाराजांनी एका छत्राखाली आणून मराठा साम्राज्य निर्माण करण्यात त्यांचा उपयोग केला. त्यांनी उत्तरेत मुघल व दक्षिणेत निजामशाही, आदिलशाही, पोर्तुगीज व इंग्रज अशा प्रबळ सत्तांशी संघर्ष करीत मराठा साम्राज्याच्या सीमा वाढविल्या.

शिवाजी महाराजांचा उदय होण्यापूर्वीची समाजव्यवस्था

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

बघितली, तर सरंजामशाही व्यवस्था दिसून येते. या मध्ययुगीन कालखंडात उत्तरेकडील सुलतानशाही, मुघलशाही, दक्षिणेमध्ये आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही यांच्या राजवटीत स्त्रियांच्या अब्रूला किंमत नव्हती. राजेरजवाडे व राजपुत्र तर सोडाच, पण सरदार, वतनदार, जमीनदार, देशमुख, पाटील यांच्या दृष्टीने गोरगरिबांच्या लेकी-सुना म्हणजे त्यांना हव्या त्यावेळी उपभोगण्याच्या वस्तू होत्या. दिवसाढवळ्या त्यांची अब्रू लुटली जात होती आणि त्याविरुद्ध कुणाकडे दाद मागता येत नव्हती. ज्यांच्याकडे दाद मागायची तेच अब्रू लुटत होते. असे हीन प्रकार स्त्रियांबाबत घडत होते. स्त्री म्हणजे एक उपभोगाची वस्तू समजून तिचा हवा तसा वापर करीत होते. अनेक राजांचे, बादशहांचे, सरदारांचे अनेक जनानखाने होते. पण याच काळात जन्मलेल्या शिवरायांकडे मात्र एकही जमानखाना नव्हता. स्त्रियांबद्दल शिवाजीराजांची भूमिका उदात्त होती. त्यांनी स्त्रियांचा सन्मान केला. मग या स्त्रिया कोणत्याही जाती-धर्मांच्या असोत किंवा शत्रूपक्षातील असोत. सर्वांना त्यांनी समान न्याय, समान वागणूक दिली. त्यांनी स्त्री जातीला संरक्षण दिले होते. असे अनेक पुरावे इतिहास देतो. पुढील घटनांवरून शिवाजीराजांचा स्त्रीविषययक दृष्टिकोन स्पष्ट होतो.

रांझेगाव प्रकरण -

रांझेगावच्या वतनदार पाटलाने गरीब शेतकऱ्याच्या तरुण मुलीला दिवसाढवळ्या सर्वांसमक्ष उचलून नेले आणि तिच्यावर अत्याचार केला. मुलीने जिण्यापेक्षा मरण पत्करले. शिवाजी महाराजांच्या कानावर ही गोष्ट आली तेव्हा पाटलाच्या मुसक्या बांधून पुण्याला आणले गेले आणि हातपाय तोडण्याची शिक्षा सुनावली. निव्वळ शिक्षा सुनावली नाही, तर ती अमलात आणली. अशाप्रकारे बालवयातच २८ जानेवारी १६४५ रोजी रांझ्याच्या पाटलाचा न्यायनिवाडा करतात. गरीब रयतेच्या पोरीची अब्रू घेतली म्हणून वतनदार पाटलाला जबर शिक्षा झाल्याचे पाहून प्रजा शिवाजीराजांवर खूश झाली.

माहूरची रायबाघन -

माहूर संस्थानची संस्थानिक व मुघलांची मांडलिक रायबाघन देशमुख तिचे मूळ नाव सावित्रीबाई होते. 'रायबाघन' हा किताब तिला औरंगजेबाने दिलेला होता. ही रायबाघन शिवरायांच्या विरोधात उमरखिंडीत लढली. त्यात तिचा पराभव झाला. ती पकडली गेली. तेव्हा शिवाजीराजांनी तिला हुद्यानुसार सन्मानाची वागणूक दिली. तिचा आदर-सत्कार, साडी-चोळीचा आहेर करून तिला तिच्या छावणीत सुखरूप पोहोचविले. अशाप्रकारे मोठी सन्मानपूर्वक वागणूक शिवाजीराजांनी रायबाघन या योद्धा स्त्रीस दिली.

सुभेदाराच्या सुनेला दिलेली वागणूक -

कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेचा किस्सा जगजाहीर आहे. कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेच्या कथेची माहिती आपल्याला ऐतिहासिक बखरीत सापडते. स्वराज्यवृद्धीसाठी कल्याणच्या सुभ्यावर मराठ्यांनी हल्ला करून अमाप संपत्ती हस्तगत केली. या आक्रमणात मराठा सरदारांनी कल्याणच्या सुभेदाराची सुंदर सून उचलून आणली व ही सुंदर भेट शिवरायांना उपहार म्हणून पाठविली. शत्रूची सून जेव्हा शिवरायांसमोर आली, तेव्हा शिवाजी महाराज तिच्या सौंदर्याचे तोंडभरून कौतुक करतात व तिला सन्मानपूर्वक परत पाठवतात. इतरांना आदर्शवादाचे धडे देताना आपण स्वतः चारित्र्यसंपन्न राहावे लागते. हे शिवाजीराजांनी स्वतः दाखवून दिले.

सतीप्रथेला विरोध -

सतीप्रथा ही प्राचीन काळापासून चालत आलेली प्रथा होती. या प्रथेमुळे स्त्रियांवरती अन्याय होत होता. म्हणून शिवाजीराजांनी या प्रथेला विरोध केला. शहाजीराजांच्या मृत्यूनंतर जिजाबाई सती जाण्याच्या तयारीत होत्या; परंतु शिवाजीराजांनी त्यांचे सांत्वन करून व समजावून त्यांना सती जाण्यापासून परावृत्त केले. ही त्या काळातील सामाजिक क्रांतीच होती. अशाप्रकारे शिवरायांनी सतीप्रथेला विरोध करून स्वराज्यातील स्त्रियांवरील जाचक बंधनांना, परंपरांना बंद केले व स्त्रीला महत्त्वाचे स्थान दिले. हे करत असताना शिवाजीराजांना अनेक धर्मकंटकांचा रोष पत्करावा लागला; परंतु शिवाजीराजे थांबणाऱ्यांपैकी नव्हते. शिवरायांनी सतीप्रथेबरोबरच अनेक रूढी-परंपरांना लाथाडले होते.

मल्लाबाई ऊर्फ सावित्री देसाई प्रकरण -

शिवाजीराजे दक्षिण दिग्विजय करून स्वराज्यात परत येत असतानाची घटना आहे. वर्ष १६७८ असावे. कर्नाटकातील बेलवड्याच्या येसाजी प्रभू देसाई याने राजांचे अन्नधान्य वाहून नेणारे बैल पळवून नेले. याला धडा शिकविण्याची जबाबदारी शिवाजी महाराजांनी सखूजी गायकवाड या सरदारावर सोपवली. सखूजी गायकवाड शिवाजीराजांचे सख्खे मेव्हणे होते. राणीसाहेब सकवारबाई यांचे बंधू होत. या लढाईत देसाई मारला गेला; परंतु त्याची

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

मल्लाबाई हिने लढा सुरूच ठेवला होता. या बहादूर स्त्रीने २१ दिवस किल्ला लढविला. शेवटी सखूजीने किल्ला जिंकला आणि विजयाच्या उन्मादात सूडभावनेने मल्लाबाईवर अत्याचार केला. ही बातमी ऐकताच शिवाजीराजे संतापले. त्यांनी सखूजी गायकवाडचे डोळे काढावयास लावले व त्यास आजन्म तुरुंगात डांबले. शिवाजीराजांनी मनात आणले असते तर तंबी देऊन, माफीनामा घेऊन त्याला सोडले असते; पण आजच्या पुढाऱ्यांसारखे किंवा सरकारसारखे ते नव्हते. फक्त कायदे करून चालत नाही, तर त्याची कडक अंमलबजावणी करावी लागते, हे महाराजांनी दाखवून दिले. मल्लाबाईची मुक्तता करून सावित्री या नावाने गौरविले. राजकीय संघर्षात महिलांचा अनादर होणार नाही याची दक्षता शिवाजीराजांनी घेतलेली दिसते.

अशाप्रकारे शिवरायांच्या मनात स्त्रीजातीबद्दल उच्च प्रतीचा मानसन्मान होता. हे त्यांच्या कृतीतून वेळोवेळी जगापुढे आले. शिवाजी महाराजांच्या महिलांविषयक धोरणामुळेच नंतरच्या काळात महाराणी येसूबाई, महाराणी ताराबाई या स्वराज्याच्या रक्षणासाठी निर्भीडपणे पुढे आल्या.

सारांश -

सतराव्या शतकात शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात केलेली स्वतंत्र राज्याची निर्मिती ही महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनात बदल घडवून आणणारी एक क्रांतिकारक घटना होती. प्रजेकडे त्यांच्या इतक्या आस्थेने व बारकाईने लक्ष पुरविणारा दुसरा राज्यकर्ता महाराष्ट्रात दिसून येत नाही. त्यांनी रयतेची गरज ध्यानात घेऊन विविध क्षेत्रांत विविध तऱ्हेचे बदल घडवून आणले. शिवाजी महाराज सिंहासनावर बसणारे हुकूमशाही राजे नव्हे, तर कर्तृत्वाने स्वराज्य निर्माण करणारे रयतेचे राजे होते. सामान्य प्रजा, शेतकरी, मजुरांची आतापर्यंत आदिलशाही, निजामशाही, मुघल यांच्या काळात या वर्गाची लूट झालेली असते, तसेच या जुलमी राजवटीत स्त्रियांवर सर्रास अन्याय, अत्याचार, बलात्कार होत होते. आज एकविसाव्या शतकातही हे अत्याचार कमी झालेले नाहीत. आजही दररोजचे न्यूज पेपर वाचत असाल, टीव्हीवरील बातम्या बघत असाल, तर स्त्रियांवरील अत्याचारांची माहिती आपणास मिळते. विदर्भातील हिंगणघाट येथील प्रकरण असेल. उत्तर प्रदेशातील उन्नावमधील बलात्कार प्रकरण असेल, दिल्लीचे निर्भया कांड असेल, अशा कितीतरी घटना आपण न्यूजवर बघितल्या आहेत. मात्र, शिवराज्यात परस्त्री मातेसमान मानण्याचा हुकूम काढला जातो. शिवशाहीमध्ये एखादा पाटील, सरदार, श्रीमंत अन्याय करीत असेल तर जातीधर्माचा, नातेवाइकांचा विचार न करता त्याचे हातपाय छाटल्याचे, डोळे काढल्याची उदाहरणेही मिळतात. स्त्रियांना पहिल्यांदाच एवढी सुरक्षितता प्रदान झालेली शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात पाहावयास मिळते.

संदर्भ ग्रंथ सूची -

१) पुनियानी राम (संकलन/प्रस्तावना), 'सर्वधर्म समभावी छत्रपती शिवराय', प्रकाशक ऑल इंडिया सेक्युलर फोरम, मुंबई, प्र.आ., १ मे २०१०, पृ. १४, १६, ३१, ३६, ४२, ४३

२) दीक्षित नी. सी., 'भारताचा इतिहास', १५२६ ते १७६१, मनोहर पिंपळापुरे, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, प्र. आ., ऑक्टोबर २०१२, पृ. १२५

३) मोहिते वीर उत्तमराव, 'शिवशाहीचा उदय आणि अस्त', जिजाई प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण १९ फेब्रुवारी २०१३, पृ.१०

४) पानसरे कॉ. गोविंद, 'शिवाजी कोण होता?' लोकवाङ्मय गृह, मुंबई, पंचावन्नावी आवृत्ती, सप्टेंबर २०१६, पृ. १२, १३

५) https://www.lokmat.com, 30.03.2022

६) https://www.esakal.com (महिलांचा आदर करणारे शिवराय - श्रीमंत कोकाटे), ३० मार्च २०२२

७) https://www.mahamtb.com (स्त्रीदाक्षिण्य आणि शिवराय - रविन्द्र पाटील, दिनांक १९ फेब्रुवारी २०२०, मुंबई, तरूण भारत), ३० मार्च २०२२

८) Sindhurastra news.in (30 March 2022, 12:38 pm). (छत्रपतींच्या स्त्रीविषयक धोरणाचा उत्तम नमुना यादवाडचे शिल्प; इतिहास संशोधक इंद्रजित सावंत)

९) बाबर सरोजिनी, 'महाराष्ट्राचे शिल्पकार', डायमंड पब्लिकेशन, पुणे, पुनर्मुद्रण २००९, पृ. १२

१०) भिडे जी. एल.; पाटील एन. डी., 'महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, पाचवी आवृत्ती, जुलै १९९८, पृ. ४

◆◆◆◆◆

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

GURUKUL INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Published Quarterly Issue

Dec – 2017 | Issue – IV | Volume – VI

ISSN No. 2394-8426
UGC Approved Journal Sr. No. 48455
International Impact Factor 3.325



Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Published By

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ) *with* International Impact Factor 3.325
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Dec – 2017
Issue–IV, Volume–VI

Index

Paper No.	Title	Author	Page No.
1	Political Exclusion of Muslims in Panchayat Raj Institutions: A Case Study of Telangana State	Dr.Mohammed Ghouse	1-8
2	Elections and Indian Democracy: An Analysis	Dr. Bhupinder Singh	9-13
3	Prose Poem and Lyric Awareness in the stories of Mulak Raj Anand	Prof.Dr.S.K.Singh	14-16
4	"Effect of Demonetization on India's Internal Security"	Dr. Kapender Singh	17-21
5	"Role ICT in India's Rural Development"	Dr. Hanumanthappa D. G	22-24
6	GIS Methods in Crime Analysis: A Concept Note	Amit Mukherjee	25-31
7	Caste: A Theoretical Interpretation	Dr.VILOK SINGH	32-52
8	Challenges To Kerala's Sustainable Development: Question Of Solid Waste Management In Thiruvananthapuram, Kerala (India)	Subair Kalathil	53-59
9	Relation between India and Bhutan with the Special Reference of Doklam	Rinku Sharma and Dr. Jyoti Vats	60-63
10	Impact Of Subsidies On Agriculture Sector In India	Vijay Janrao Pathak	64-66
11	Globalisation And Liberalisation In Micro, Small. And Medium Enterprises In India, R&D	Ratheesh R	67-73
12	Relevance of Gandhism in Today's World	Dr. N. R. Chimurkar	74-78
13	"Special Characteristics of C. K. P. Community"	Dr. Mohan Laxman Kamble	79-84
14	Regional Disparity and Sustainable Development in North- Eastern States: A Policy Perspective	*SN Singh*	85-94
15	Social Exclusion in India and the Role of Rural Development	Siddharth Shrihari Maske	95-98
16	Physicochemical Analysis Of Water To Access Its Quality Of Drinking Use	Vikas D. Umare	99-102
17	Issues on sustainability of Income Generating Activities (IGAs) Run by SHGs: An Empirical Analysis from Purba Meinipur District in West Bengal, India	Dr. Swapan Kumar Barman	103-108
18	Study on comparison of Fund transfer through mobile banking pre and post Demonetization	Dr.J.Joseph Durai Selvam	109-112
19	Does Aging Community Vulnerable To Non-Communicable Diseases In Slums In Mumbai?	Dr. V. M. Sarode	113-124
20	Exploratory Study of "Employee Retention Policies of Financial Institutions in Private Sector (With Special Reference to Nagpur Region for the Year 2004-2013)"	Ranjana Pratik Ghode	125-131

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

21	Global Opportunities For Banking Sector & Its Future Growth	Dr. Raju N. Dhabale	132-137
22	Impact Of GST On Agricultural Sector	Dr. H. M. Kamdi	138-142
23	Employee involvement as a key factor in achieving Total Quality Management	Miss. Monali N. Musale	143-146
24	Rationalizing a mechanism to develop, monitor and ensure a quality culture at the institutional level-a QFD case study for engineering institute	Chandrashekhar K. Patil, M. Husain, N.V. Halegowda	147-160
25	English for the Marginalised: A Case Study of A Municipal Corporation School in Nagpur City	Nidhee Meshram	161-169
26	Communication: the key element of business success	Pro. Dr. Suresh A. Bhagwat	170-172
27	A Study of Emotional Intelligence among under-graduate Student in Aurangabad	Vitore Kalpana Ramrao	173-178
28	Innovations in Teaching and Learning English as a Foreign Language Through Literature	Mr. Hussein Ahmed Abdo Rajhy	179-185
29	Romanticising Indian Railways In Hindi Cinema	Rashmi Condra	186-195
30	Review On Long Afterglow Phosphors	Gurjeet Talwar	196-198
31	Gender, Sex Work and HIV&AIDS: Analysing Risks and Vulnerabilities in Female Sex Workers of Rajasthan	Alok Kumar Mathur, Soibam Nepola	199-211
51	नारी सुरक्षा की जरूरत न कि सशक्तीकरण की	डॉ. प्रेमलता परसोया	401-409
52	महिला एवं शिक्षा – समसामयिक संदर्भ में	डॉ. लालिमा सिंह	410-413
53	नक्षलवाद – भारतासमोरील एक आव्हान	डॉ.प्रा.विजया एच.राऊत	414-418
54	भटके विमुक्त त्यांचे प्रश्न व बदलते जीवन	धारा श्रीहरी पंचभाई, डॉ.विद्याधर बन्सोड	419-425
55	मराठवाड्यातील शेतमजूरः एक दृष्टीक्षेप	प्रा. एस. एम. कोल्हापूरे	426-431
56	भटके विमुक्त गुन्हेगार जमातीः-समाजशास्त्रीय विष्लेशण	धारा श्रीहरी पंचभाई, डॉ.विद्याधर बन्सोड	432-438
57	ग्राहकांच्या मनोवृत्तीचा वीद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन स्नातक व स्नातकोत्तर अभ्यासक्रमात समावेश करण्याची गरज : एक समिक्षण	डॉ. प्रशांत म. पुराणिक	439-445
58	प्रा.बा.ह.कल्याणकर यांची विद्रोही कविता	डॉ.सुषमा शंकरराव प्रधान/घेवंदे	446-448
59	नटसम्राट : एक शोकांतिका	प्रा. संतोष सदाशिव देठे	449-454
60	महाराष्ट्रातील पशूधन आणि दुग्ध व्यवसाय	डॉ. एस. एस. अंभोरे	455-457
61	साहित्यशास्त्रीय संशोधनात प्रमेयाचे स्थान व महत्व	प्रा. संतोष सदाशिव देठे	458-461
62	संत साहित्याची सामाजिक बंडखोरी	प्रा. डॉ.सूर्यकांत हरिश्चंद्र गिते,प्रा. डॉ. व्यंकटी वाल्मीक नागरगोजे	462-465
63	भारत की विदेशी नीति लुक ईस्ट से एक्ट ईस्ट की ओर	चन्द्रदीप नंदलाल यादव	466-472
64	राष्ट्रसंत तुकडोजी महाराजानी 1942 च्या स्वातंत्र्य लढयात	प्रा.धनराज डी. मुरकुटे	473-477

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

	भजनाच्या माध्यमातून केलेली राष्ट्र जागृती (क्रांती)		
65	साठोत्तरी दलित कथांचा सामाजिक आशय	प्रा. बादलशाहा डोमाजी चव्हाण	478-480
66	चंद्रपूर जिल्ह्यातील वनक्षेत्राचा भौगोलिक अभ्यास	डॉ. वनश्री लाखे	481-484
67	बहुजन समाजातील महिलांच्या उत्थानात मा. कांशीरामजींचे योगदान	प्रा.किशोर शेषराव चौरे	485-489
68	वैराग्यमुर्ती संत गाडगे बाबांचे समाजकार्य – एक दृष्टीक्षेप	डॉ. राजेंद्र ओ. बेलोकार	490-493
69	पश्चिम विदर्भातील आर्थिक विकासात सोयाबीन उत्पादन शेतकऱ्यांच्या योगदानाचे विश्लेषणात्मक अध्ययन	बबन काशिनाथ कदम, डॉ.महेश चं. डाबरे, डॉ.श्रीप्रभू जी. चापके	494-499
70	जाहिरात आणि शिक्षण	श्रीमती कदम मिरा लिंबाजीराव, डॉ.बनाळे यु.व्ही.	500-503
71	शोमन राजकपूर	पंकज मोहरीर, डॉ. डी. के. पोखरापूरकर	504-506

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ) *with* International Impact Factor 3.325
UGC Approved Journal Sr. No.48455

ISSN No. 2394-8426
Dec – 2017
Issue–IV, Volume–VI

साठोत्तरी दलित कथांचा सामाजिक आशय

प्रा. बादलशाहा डोमाजी चव्हाण
मराठी विभाग,
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, बल्लारपूर.

साहित्य व जीवन यांचे अतुट नाते आहे. त्यातल्या त्यात 'कथा' हा वाङ्मयप्रकार सर्वाच्याच परिचयाचा व जिव्हाळयाचा आहे. मनोरंजनाच्या दृष्टीने कथेला महत्वपूर्ण स्थान असले तरी ती सत्याचा शोधही घेते. या गुणांमुळेच कथा हा वाङ्:मयप्रकार लोकप्रिय ठरला. मनोरंजन आणि लोककल्याण यांचा सुरेख संगम कथेशिवाय दुसऱ्या वाङ्मयप्रकारात नाही.

दलित साहित्यात कथा या वाङ्:मयप्रकारामध्ये अत्यंत कलासंपन्न कथा लिहिल्या गेल्या आहेत. दलितांना पशुपातळीवरचे जीवन जगावे लागत आहे. त्याला समाजरचनाच कारणीभुत आहे. विषमतेमूळे दलितांना भोगावी लागणारी गुलामगिरी आणि आंबेडकरी चळवळीमूळे निर्माण झालेला विद्रोह हा दलित कथेतून होतांना दिसतो. अनेक दलित कथाकारांनी मराठी कथेच्या इतिहासात मानाचे स्थान भूषविले आहे. त्यात बंधूमाधव, शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, वामन होवाळ, सुखराम हिवराळे, योगिराज वाघमारे, अमिताभ, अविनाश डोळस, प्रकाश खरात, जालंदर सोनुने, योगेन्द्र मेश्राम, केशव मेश्राम व धर्मराज निमसरकर, चंद्रकांत वानखेडे व जालंधर सोनुने इत्यादी कथाकारांचा यात समावेश आहे. दलित कथाकारांनी आपल्या कथेत दलितांच्या वेदना मांडल्या दलितांच्या जीवनातील संघर्ष चितारला.

बाबुराव बागुल यांनी दलितांचे खरेखुरे वास्तव जग कथेत रंगविले. विद्रोहापेक्षा त्यांची मानवतावादी दृष्टी व सहानुभुती हीच त्यांच्या कथांमध्ये प्रभावी वाटते. त्यांनी आपल्या 'जेंव्हा मी जात चोरली' व 'मरण स्वस्त होत आहे'.या कथातून सामाजिक वास्तव मांडले. डॉ. प्रकाश खरात बागुलांच्या कथेविषयी म्हणतात. "बागुलांच्या कथेतील वैचारिक जाणिव ही देव, पुनर्जन्म व आर्थिक शोषण यांच्या विरोधात आहे. सामाजिक विषमतेच्या विरोधात बंड करुन उठली आहे. त्यात जसे जीवनाचे वास्तव असते त्याचप्रमाणे वैचारिकताही आहे." बागुराव बागुल यांचे स्थान महत्वाचे आहे.

शंकरराव खरात यांनी आपल्या 'बारा बलुतेदार' 'तडिपार', 'दौंडी', 'सांगावा' या कथासंग्रहामधून गावकुसाबाहेरचे जीवन साकार केले आहे. वामन होवाळ यांनी दलित वेदना कथारुपाने प्रकट केल्या आहेत. दलितांच्या वास्तवाचा शोध घेत असतांना, बदलत्या राजकीय, सामाजिक, धार्मिक वातावरणामूळे निर्माण होणारे संघर्ष त्यांनी चितारले आहेत. त्यांचा 'बेनवाड' हा कथासंग्रह उल्लेखनीय आहे. 'उद्रेक', 'बेगड' या कथासंग्रहांनी प्रसिध्दीच्या झोतात आलेले कथाकार योगिराज वाघमारे होत. जातिव्यवस्थेमूळे दलितांना शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात कशी वागणूक मिळते. ऐन वेळी मुलगी बाळंतपणात आजारी पडून मरले. परंतु मास्तर तिला वाचवू शकत नाही. परिस्थिती विरुध्दचा संघर्ष 'महार मास्तर' या कथेमध्ये योगिराज वाघमारे यांनी मोठया ताकदीने मांडलेला आहे. समाजव्यवस्थेने लादलेल्या जीवनासंबधी भीमराव शिवराळेची 'पोळा' ही कथा आहे. या कथेत महार मांगांना दिलेल्या कामाची विभागणी बिनतक्रार अंमलबजावणी करावयाची हा नियम आहे. आपणसुध्दा इतर सवर्णीयांसारखे राहावे ही चुडा मातंगाच्या मनातील खळखळ भीमराव शिवराळे यांनी मांडली आहे.

, लेखक, कवी म्हणून नावारुपाला आलेले श्री. अर्जून डांगळे हे यशस्वी कथाकार आहेत त्यांचा 'ही बांधावरची माणसं' हा पहिला कथासंग्रह आहे. त्यांनी आपल्या कथेतून दलित जाणिवा साकार केल्या आहेत. जीवन कलहाचे भिषण दर्शन घडविणारी 'गारदी' ही कथा परिणामकारक वाटते. कथाकारात मान्यता पावणारे अमिताभ पूदमपाणी (डॉ. वामन नगराळे) यांचा 'पड' हा कथासंग्रह आहे. त्यातील कथा जीवनानुभुतीपूर्ण असून तीव्र सामाजिक जाणिव व्यक्त करतात. 'सत्येकाम वल्द जाबाली' ही कथा एका दलित असहाय्य स्त्रीवर झालेल्या बलात्काराचे बिकट पक्षोभक चित्र उभे करते. कथा वाचून पाहिली तर त्यांची बोली कथेला अधिकच जीवंत करतांना दिसते.

प्रकाश खरात यांचे 'अंधाराचा अस्त', 'अक्षरांची पहाट' व प्रवर्तनाचा युगस्पर्श हे तीन कथासंग्रह आजवर प्रसिध्द झालेले आहेत. त्यांची कथा दारिद्रयात जीवन जगणाऱ्या माणसांचे जीवन साकार करते. खरातांच्या कथा माणसांच्या वेदनांची

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

जाणिव करुन देतात. अन्यायाविरुध्द संघर्ष करणारी विद्रोह करणारी माणसे इथे आढळतात. डॉ. यशवंत मनोहर म्हणतात, "वर्तमानातील सामाजिक संघर्षाची लेणी खोदणारी प्रकाश खरातांची कथा इतिहासातील घटितांनाही नव्या प्रतिकांच्या रुपात उभी करते इतिहासातील घटनांचे आजच्या संदर्भात नवे अन्वर्थन सादर करण्याचे लक्षणीय कौशल्य ही कथा प्रकट करते"[१]. खरातांची कथा जशी ऐतिहासिक, पौराणिक लोककथांचा विचार संशोधनात्मक करते तसेच ग्रामीण जीवनावरही भाष्य करते. ग्रामीण–दलित–पिडीत–दुःखी मनाचा व्यापक विस्तार त्यांनी आपल्या कथेतून अधोरेखांकित केलेला आहे. मानवी मनाची विविध स्पंदने त्यांनी शोधलेली आहेत. दलित माणसाचे प्रेम आदर्श जाणिवेतून निर्माण झालेले आहे.

मराठी कथासाहित्यांत दलित कथाकार म्हणून प्रकाश खरात यांचे नाव चिरकालीन टिकणारे आहे. कारण त्यांच्या कथेत विविध वैशिष्टये ही आशयाच्या जाणिवेच्या पातळीवर निर्माण झालेली आहेत. डॉ. आंबेडकरांच्या आंदोलनातील संघर्ष असो की दलितांवर स्पृश्यांकडून होणारे अत्याचार असो. यात भरडली जाणारी कुटुंबाची चित्रे, वस्तीची चित्रे, गावाची चित्रे, साधेसूधे पण भयानक रुप घेऊन प्रगट झालेले आहे.

योगेन्द्र मेश्राम हे दलित कथा क्षेत्रातील एक तोलामोलाचे नाव आहे 'रक्ताळलेली लक्तरे' व 'जगण्याचा प्रश्न' हे दोन त्यांचे कथासंग्रह व 'हाहाःकार' हा दोन दीर्घ कथांचा संग्रह आहेत. त्यांच्या कथासंग्रहामधील गाजलेल्या कथा हया अनेक प्रतिनिधिक कथासंग्रहामध्ये समाविंष्ट झालेल्या आहेत. त्यांच्या कथेतील सामाजिक, आर्थिक क्षेत्रात उपेक्षित, वंचित ठेवला गेलेला माणूस गुदमरुन अगतिकतेत पडून राहत नाही. तर तो 'जगण्याचा प्रश्न' सोडविण्यासाठी धडपडतो आहे. योगेन्द्र मेश्रामांच्या कथांच्या संदर्भात डॉ. वि. स. जोग लिहितात "आजच्या द्रकश्राण्य माध्यमाच्या काळात मेश्रामांच्या कथांना एक विशेषच महत्व आहे. कारण या कथांचे लेखन इतके जिवंत आणि प्रत्ययकारी आहे की आपण ही कथा केवळ वाचत नसून कथानकातील घटना पहात आहेत, पात्रांचा आक्रोश आणि आव्हान ऐकत आहोत असाच पदोपदी भास होतो. मेश्रांमाची कथा ही रोरावत, धोंगावत येणारी आणि थरथरुन सोडणारी आहे."[२]

योगेन्द्र मेश्राम यांच्या कथांमधून व्यक्त होणारे सामाजिक जीवन अतिशय व्यापक, सर्वस्पर्शी व समृध्द झालेले आहे. त्यांच्या कथांमधील मायबोलीचे लेणे लेवून आलेली अनुभव संपन्न भाषा त्यातील दुःख वेदनेची जाणिव करणारी आहे. जालंदर सोनुने 'कथाकार' म्हणून मान्यता प्राप्त लेखक आहेत. त्यांचे 'भाबडी', 'संवेदना', 'मी झक मारली' ही त्यांची कथासंग्रह आहेत. त्यांच्या कथेतील पात्रे ग्रामीण व शहरीही आहेत. त्यामधील पात्रांची प्रवृत्ती ही जशी विनोदी तशीच करुण भावनेने साकारलेली आहे. माणुसकीने ओतप्रोत भरलेली आहेत. त्यांच्या कथेतून भारतीय समाजातील जातियता दारिद्रय भोगणारी असंख्य माणसे भेटतात. जातीसंस्थेने निर्माण केलेले दुःख या देशातील सुशिक्षित माणसालाही भोगावे लागते व अशिक्षित माणसाला तर भोगावेच लागते. नागपूर सारख्या शहरात अवर्ण संबोधणाऱ्या जातीतील माणसाला सवर्ण वस्तीत भाडयाने घर मिळत नाही हा त्यांना आलेला अनुभव ते कथेत मांडतात स्वातत्र्य उलटून सत्तर वर्ष झाली तरी अस्पृश्यता गेली नाही मनामनातून ती जिवंत आहे हा प्रत्यय त्यांची कथा देते असे विषय साहित्याचा समाजशास्त्रीय अभ्यासासाठी कथालेखन म्हणुन मौलिक ठरले आहेत.

चंद्रकांत वानखेडे यांचे आजपर्यन्त 'विटाळ', 'मयतीची फुल', 'भूक' हे कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत या तिनही कथासंग्रहातील कथांची संख्या एकून चौतिस आहे. त्यांच्या कथांनी मराठी कथेला योगदान दिले. त्यांनी आपल्या कथेतून समाजदर्शन घडविले सामाजिक जाणिव प्रखरपणे मांडली विटाळ या कथासंग्रहातून त्यांनी अस्पृश्यता हा विषय विद्रोही स्वरुपात मांडला. त्यांच्या कथेचे रुप एकाच वेळेस जीवनानूभवाचे आहे अणि कथानुभावाचे आहे. दलितांचेच दुःख, अनुभव निवडणे व कथाविषय करुन मांडणे हे या कथांचे निराळेपण आहे. भारतीय समाजात जातियता ही वर्णव्यवस्थेच्या उत्तरंडीसारखीच रचलेली आहे. एकाच वर्णसमुहातील जातीमध्ये ही श्रेष्ठ–कनिष्ठता आहे. स्पर्श–अस्पर्शतेची जाणीव आहे. भारतीय माणसाचे मन हिंदू धर्माचे श्रेष्ठ–कनिष्ठतेचा संस्कार करुन पोखरुन काढले आहेत. त्यांनी जीवनदर्शनाच्या आणि व्यक्तिदर्शनाच्या माध्यमातून कथन केले आहे. हे सगळेच समाजवास्तव हजारो वर्षे जोपासले गेले या अमानवी वास्तवावर प्रखर प्रहार दलित कथासाहित्याने केला आणि सामाजिक जाणिवांचे वस्तुनिष्ठ दर्शन मराठी वाङमयात साकार झाले तीच सामाजिक वास्तवता चंद्रकांत वानखेडे यांच्या मनाचे अंतरंग घेऊन कथेत साकारली आहे.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

एकविसाव्या शतकातील साहित्याचे व मराठी कथासृष्टीचे स्वरुप विविध अंगांनी विकसित झाले आहे. भारतातील सामाजिक स्तरातून लेखकांचा एक मोठा वर्ग साहित्यात दाखल झाला. त्याने आपले स्वत:चे अनुभव विविध वाङ:मय प्रकारांच्याव्दारे मांडले. त्या अनुभवाचे जे वाङ्मय रुप आहे ते मराठी साहित्यात क्रांतिकारी व नवे ठरले. कारण या वाङ:मयाच्या प्रेरणा मानवतावादी तत्वज्ञानातून उदयास आल्या. समतेच्या व बंधूभावाच्या संकल्पनेतून जन्मास आल्या. त्यामूळे या वाङ्मयाचे जीवनदर्शन सर्वसामान्य माणसाला केंन्द्र ठरवून आकारास आले. मराठी कथेत सहानुभूतीने दलितांचे चित्रण जरी झाले असले तरी त्या दारिद्रयाच्या मुळाशी जाऊन त्या समस्यांच्या उगमाचे स्थळ सांगितले नाही. दलित जीवनातील आर्थिक, सामाजिक प्रश्नांची निर्मिती येथील विवक्षित संस्कृतीच्या कशी जवळची आहे याची चिकित्सा प्रथमच साठोत्तरी दलित कथाकारांनी केली आहे.

संदर्भ ग्रंथ :–

१) प्रकाश खरात, दलित कथा उगम आणि विकास, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९२, पृष्ठ ९९
२) यशवंत मनोहर, आंबेडकरवादी मराठी साहित्य, बी. एम. टी कॉम्प्युटर, नागपूर, १९९९, पृष्ठ २४३
३) वि. स. जोग, जगण्याचा प्रश्न (प्रस्तावना), प्रचार प्रकाशन कोल्हापूर. १९८९

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

सहाय्यक प्राध्यापक
म. ज्यो फुले महाविद्यालय,
बल्लारपूर

5.2

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319-9318

International Multilingual Research Journal

Vidya Bharati

Issue-21, Vol-7 Jan. to March 2018

Research

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Editor
Dr Bapu C Cholap

14) IFRS AND THEIR IMPLICATIONS
Dr. Bhavna B. Dabhi, Vallabh Vidyanagar, Gujarat || 69

15) Comparison in Presentation of a Similar Theme: T. S. Eliot's The .....
Dr. Nilima Deshmukh, Khamgaon || 72

16) "A Case study of industrial Pollution in Beed City"
Dr. Ghuge S.P., Gadhi, Dist. Beed. || 74

17) AIR POLLUTION AND ITS ADVERSE EFFECTS ON HUMAN HEALTH
GULBHILE V. D. PARLI-VAIJNATH, DIST. BEED || 79

18) INTEGRATION OF INFORMATION AND COMMUNICATION .....
Dr Vijay Laxmi, Dr Gobind Singh Gure || 82

19) An Overview on the structural Characteristics of MnO_2
Mrs. Deepa M Audi || 91

20) IMPACT OF E-COMMERCE AND DIGITALIZATION ON INDIAN GLOBAL.....
Dr. Ch. Chandra Shekar, Hyderabad || 92

21) "सिंधूताईच्या संघर्षशील जीवनाचे चित्रण करणारे आत्मचरित्र : मी वनवासी"
प्रा.डॉ.यशवंत आश्रुबा हाके, बदनापूर, जि.जालना. || 105

22) वैदिक वाङ्मयातील शैक्षणिकविचार
डॉ.शशिकांत नवनाथ बांगर, संगमनेर || 109

23) प्रकाश खरात यांच्या कथांचे मुल्यमापन
प्रा. बादलशाहा डोमाजी चव्हाण, बल्लारपूर, जि. चंद्रपूर || 111

24) "गोंदिया नगरपालिकेच्या वित्तीय प्रशासनाचा (उत्पन्नाच्या संदर्भात) ....
डॉ. मनोज एम. तेलरांधे, रामटेक, जि. नागपूर || 115

25) कबीर की प्रासंगिकता
डॉ. शेख शहेनाज अहेमद, हिमायतनगर, जि. नांदेड || 119

26) हरदोई जनपद के परिप्रेक्ष्य में पौराणिक दैत्य हिरण्यकशिपु की ऐतिहासिकता
डॉ. श्याम प्रकाश, लखनऊ उ.प्र. || 121

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

23

प्रकाश खरात यांच्या कथांचे मुल्यमापन

प्रा. बादलशाहा डोमाजी चव्हाण
महात्मा जोतिबा फुले महाविद्यालय,
बल्लारपूर, जि. चंद्रपूर

विसाव्या शतकाच्या उतरार्धातील साठोत्तरी मराठी साहित्य हे क्रांतीकारी जीवनजाणिवांनी ठवळून निघालेले आहे. वेगवेगळया आंदोलनांना कवेत घेत या साहित्याने नव्या वाटा नव्या वळणांच्या विषय आशयांना कवेत घेतलेले आढळते. याच काळात दलित साहित्य, आंबेडकरी साहित्याने मराठी साहित्याचा चेहरा मोहराच बदलविला आहे. आंबेडकरी प्रेरणेतून उदयास आलेल्या या प्रवाहाचे वेगवेगळे जाणीव विश्व तयार झाले आहे. या साहित्याला भारतीय साहित्याची ओळख मिळालेली आहे. समाजात भेडसावणाऱ्या विविध प्रकारच्या सामाजिक समस्या, प्रश्न, सत्य असल्याचे चित्रण मराठीतील दलित साहित्यातून चित्रीत झाल्याचे जाणवते. याच प्रवाहातील एक ग्रामीण दलित कथा लेखक म्हणून प्रकाश खरात यांची ओळख साहित्यक्षेत्रात केली जाते.

विदर्भातील नैसर्गिक साधनसंपत्ती जशी आहे तशीच सांस्कृतिक वैविधता आहे. वेगवेगळया विचारसरणी आणि दृष्टिकोण जपणारे अनेक लेखक, कवी याच विदर्भाची देण आहे. आर्थिक दारिद्रयाने दुर्बल असलेल्या या विदर्भाला कला गुणांची देण लाभलेली आहे. विदर्भात दलित साहित्याची मुहुर्तमेठ रोवणारे डॉ. यशवंत मनोहर, वामन निंबाळकर, डॉ. योगेंद्र मेश्राम, डॉ. भाऊ लोखंडे, डॉ. सुशीला ढगे, ज्योती लांजेवार, किंवा कुमुद पावडे आणि असंख्य कवी, लेखक, कथाकार, विचारवंत येथे निर्माण झाले आहेत. प्रकाश खरातांचा वाटा कथालेखक तसेच विचारवंत म्हणून आहे. दलित साहित्याला कवेत घेऊन सांभाळण्याचा मान डॉ. प्रकाश खरातांकडे येतो. म्हणूनच डॉ. योगेंद्र मेश्राम म्हणतात, "प्रारंभीच्या मूलभूत विद्रोहाच्या वादळी माऱ्याने प्रस्थापित सामाजिक, सांस्कशतिक वास्तव घाबरले, गुदमरले. आपल्या बदनाम धर्मसंस्कशतीची लक्तरे आणखी उघडी—नागडी होऊन ती जगाच्या वेशीवर टांगली जाऊ नयेत, म्हणून मग लबाड प्रस्थापिताने प्रेरणापुरुषावरच चिखलफेक करणे 'दलित साहित्य' तथाकथित आवर्तनात सापडल्याची आवई उठवणे यासारखे बुध्दिभेदी संभ्रम समाजमनात पेरण्याचा प्रयत्न केला. पण सत्वतेज लाभलेल्या बाणेदार दलित कथेने असल्या भूलभुलैयाला बळी न पडता आपला विद्रोही बाणा कायमच ठेवला. अशी युध्दकथा लिहिणाऱ्या विद्रोही कथाकारामध्ये प्रकाश खरात हे एक आघाडीच्या शिलेदाराचे नाव आहे."[१] एका कथाकाराने दुसऱ्या कथाकराची दिलेली ही पावती खराताच्या कथेची पावती आहे.

साहित्य निर्मिती

साहित्य क्षेत्रात खरातांचे स्थान महत्वपूर्ण आहे. कथा, कविता, वैचारिक निबंध, समीक्षा या सर्वच प्रकारावर त्यांनी लेखन केल्याचे जाणवते. त्यांची पहिली कविता त्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षी प्रकाशित झाल्याचे ते सांगतात. शिवाय कवितेच्या माध्यमातून त्यांचे साहित्यिक वळण घडत गेले. मे १९७८ या वर्षी 'झड' ही कथा त्यांनी प्रथम लिहिली. त्यांनी ती 'मायमराठी' मासिकाने आयोजित केलेल्या ग्रामीण कथा स्पर्धेसाठी पाठविली. आणि उत्कश्ष्ट कथेचा पहिला क्रमांक त्या कथेला मिळाला. विद्यार्थी दशेपासून मिळालेले हे त्यांचे प्रोत्साहन आहे.

प्रकाशित साहित्य

१) अंधाराचा अस्त, १९९३
२) अक्षरांची पहाट, २००४
३) प्रवर्तनाचा युगस्पर्श, २००९

त्यांचे हे तीन कथासंग्रह प्रकाशित आहेत. याशिवाय 'दलित कथा शोध आणि बोध', 'दलित कथा : उद्गम आणि विकास' हे वैचारिक ग्रंथ ही त्यांनी लिहिलेले आहेत. खरातांनी 'कथा' हा वाङ्:मयप्रकार मोठया डौलाने रंगवून कथेचे दालन

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

समृध्द केले आहे. खरातांचे वैचारिक लेखनही विपूल आहे. वैचारिक लेखन विशेषत: 'निबंध' हा वाङ्मयप्रकार हाताळलेला आहे. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा साहित्यविचार', 'बहुजन समाज आणि साहित्यजीवन', 'आंबेडकरवाद आणि बहुजन विकास', 'आंबेडकरवादी साहित्य वारसा आणि दिशा' इत्यादी ग्रंथ निर्मिती त्यांच्या नावावर आहे. याशिवाय 'मराठी साहित्य : प्रवाह आणि समीक्षा' 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे बुध्दधम्मविषयक' या ग्रंथाचे संपादनही त्यांनी केलेले आहे. आंबेडकरी साहित्याला नवी दिशा देण्याचा खरातांचा प्रयत्न आहे. त्यांची वृत्ती मूळात बुध्दधम्म विषयक जाणिवात आहे. किंवा बुध्दधम्मांच्या तत्वांना आणि बुध्दाला सुध्दा ते पूजणीय आणि वंदनीय आहेत.

सामाजिक व्यथांचे प्रकटीकरण

साहित्य हा समाजाचा आरसा आहे. साहित्यातून समाजाचे दर्शन होत असते. कथा हा साहित्यप्रकार समाजजीवनावरच लिहिल्या जात असते. त्यामूळेच समाजाच्या विविध पैलुचे दर्शन कथेतून होत असते. कथाकार ज्या विशेषत्वाने ज्या समाजाचे प्रतिनिधित्व करीत असतो. त्या समाजाच्या भावभावना सुखदु:ख, चालीरिती, रुढी परंपरा, धार्मिक व्यवस्था, आर्थिकता, कष्ट, समस्या, या सर्वांचा विचार कथेतून क्रमाक्रमाने केल्या जात असतो. खरातांनी ज्या ग्रामीण, दलित जीवनाच्या जगण्याचे चित्रण कथेतून मांडलेले आहे. बालपणापासून ज्या ग्रामीण व्यवस्थेचे प्रतिनिधित्व त्यांनी केले असल्यामुळे त्यांच्या कथेने समाजवास्तवतेला प्राधान्य दिलेले आहे. जातिव्यवस्थेच्या चटक्यांनी होरपळलेले अंत:करण कथेतील व्यथातून जाणवते. ज्या भौगोलिक वातावरणात ते जगले ज्या समाजाला जवळ अनुभवले जे भोगले आणि जे सहन केले त्या सामाजिक व्यथांना कथेतून व्यक्त करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. अनुभवाचे जग आणि त्या अनुभवाने पोखरलेले अंत:करण याचा संगम सामाजिक व्यथाच्या स्वरुपातून प्रकट होताना दिसतो. भयाण वास्तवातिक जगण्याला साकारताना त्याची तीव्रता परिणामकारक होत असल्याचे निदर्शनास येते. म्हणूनच त्यांच्या कथासंग्रहाचे नाव 'अंधाराचा अस्त', 'अक्षरांची पहाट', 'प्रवर्तनाचा युगस्पर्श' असल्याचे जाणवते. या कथासंग्रहाच्या नावातूनच सामाजिक व्यथा स्पष्ट जाणवते.

'भुक' कथेचे केंद्रस्थान

प्रत्येक सजीव प्राणी, मनुष्य आणि निसर्गाने निर्माण केलेली सजीव सृष्टी, त्यात अस्तित्वात असलेली झाडे, झुडपे, आपापले जीवन फुलविण्यासाठी त्यांना बहरविण्यासाठी अन्न, तसेच जीवनसत्व आपापल्या पध्दतीने घेत असतात. पाहिजे ती आवश्यक जीवनतत्वे मिळाली नाही तर त्यांचे अस्तित्व नष्ट होते, कोमेजून जाते. विकसित होण्याचे त्यांचे मार्ग बंद होत होत जाऊन त्याला जशी दैनावस्था प्राप्त होते आणि त्यांच्यावर नष्ट होण्याची पाळी येते. वाढ खुंटते. मानवी जीवनाच्या वाढीसाठी, जगण्यासाठी आवश्यक असलेल्या भूकेचेही असेच आहे. प्रथम त्याला जगण्यासाठी आवश्यक असलेले अन्न, मिळणे गरजेचे आहे. पोटातील भूक त्याला कोणतेही लाचार कृत्य करावयास भाग पाडते. खरातांची 'भुक' वेगळया पध्दतीचे चित्रण करते. तिचा व्याप पोटाच्या खळगी पासून ते मनाच्या स्थैर्यापर्यंत आहे. माणूस म्हणून जगता यावे यासाठी लागलेली पोटाची भूक प्रथम कोणत्याही पध्दतीने भागविण्याचा केलेला अट्टहास मनाला जाणवतो. वाचणाची भुकही इथे दिसून येते. वेगवेगळया प्रकारच्या भूकेचे चित्रण 'भूक' या कथे मधून आलेले आहे. 'भूक' हे खरातांच्या कथेचे केंद्रस्थान आहे. 'झड' या कथेतून आलेले भूकेचे चित्रण तर मनाला चटके लावणारे आहे. "पाटलाच्या घरी रात्रंदिवस राबून त्याच्या (संभ्या) पोटाला भाकर नव्हती. पंचेविस रूपये महिन्यावर तो पाटलाच्या दावनीत बांधला होता. उपाशी पोटाने चिंब भिजून कुडकुडत तो काम करीत होता. मागच्या बाजारीच गिरजाला लुगडे आणले होते म्हणून पंचविस रूपये, पहिन्यावर राहिलेल्या संभ्याचे सगळे पैसे संपले होते. दररोज एका लुगडयावरच ती आपली अंग झाकायची आणि पदराचा शेव अंगावर घेऊन झोपायची."[२] ही जगण्याची धडपड, अडचन केवळ आणि केवळ जगण्यासाठीच आहे. हे या वाक्यातून सिध्द होते. वास्तवतेचे विदारक आणि परिणामकारक चित्रण कथेतून व्यक्त होते. जगण्याच्या तगमगीतून माणूस बाहेर कसा येणार हा विचार मनाला लागून जातो.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule

दारिद्रय आणि जगण्याचा संघर्ष

ग्रामीण जीवनात जगण्याचे स्त्रोत्र म्हणजे केवळ शेतीची मजुरी होती. त्या काळात कोणत्याही प्रकारचे दुसरे उपजिविकेचे साधन नव्हते. त्यात पावसाळा म्हटले की, मजुरी मिळणे शक्यच नाही अशात कुटुंबाचे कसे हाल होतात हे दिसून येते. "मी गेलोय पायच धरले, मटकन म्हणालो बापू दोन दिसं उपाशीच होतो बघा! झडीच काम नाय, धंदा नाय, पोटात अन्नाचा कण नाय की वटात चहाचं पाणी नायं हो! दोन किलो तरी निदान जवारी द्या सांज साजरी करा. मी फेडून देईन कामधंद्यात नाहीतर पोरायच्या मायले धाडीन निंदाले उपाशीच हायत हो लेकरं, झडीचे जवा तो व्हय म्हणाला तवाच सोडले पाय"[३] कथेचा नायक दौलत जेव्हा दोन किलो ज्वारी मोठया विणवणीतून आणि लाचारीतून घेऊन आला तेव्हा त्याच्या मनाला केवढा आनंद होता. शिवाय लाचारयुक्त स्वाभिमानाने त्याला हायसेही वाटले होते.

भुकेमुळे वाण्याची विनवणी करताना पत्करावी लागणारी लाचारी, क्षणभर भागलेल्या भुकेने माणसाला सुखावून जाते हे या कथेतून जाणवते. वास्तविक काम करण्याची त्याची तयारी आहे. मात्र पावसाच्या झडीमुळे शेतावर किंवा बाहेर कुठेही कामाला जाता येत नाही ही अडचण. एक दिवस काम मिळाले नाही तर घरात उपाशी राहण्याची पाळी येते. हे वास्तव इथे जाणवते. भूकेसाठी नानाप्रकारच्या तडजोडी करणारी माणसे कथेतून येतात. घरात वांशिक दारिद्रय असल्यामूळे स्वत:च्या कुटुंबाची आणि मुलांची भूक भागविण्यासाठी सखु आपल्या मुलाला म्हणाली "लेकरा, तुझा बाप गावाले गेला तं अजुनही आला नाही, म्हणून आज तू गावातून भाकरी मागून आण. त्या कोपऱ्यातील खुंटीले अडकविलेला कंदील घे.' मी वातीले जाळ लावून देते. गावातूंन लवकर चक्कर मारून ये. हिवाडयाचे लोकही लवकरच दरवाजे लावून झोपतात. तो हो.... .....नाही' म्हणतच होकार नकार देवू लागला, परंतु त्याच्या पोटातील भूक व घरातील वांशिक दारिद्रय दिव्याच्या पिवडया उजेडात चमकू लागले होते. घरातून आक्रोशून जावयास सांगत होते. परिस्थितीमुळे स्वाभिमानही त्यांचा गुलाम होऊ पहात होता. परंतु आपल्या आईच्या जीवनगर्भ सांगण्यामुळे मान तुकवू लागला होता. गावावरून कोसच्या कोस पायदळ आलेल्या बापाचा कष्टलेला चेहरा त्याला दिसू लागला. तेव्हा त्याने चटकन त्याच्या आईने लावलेला कंदील उचलला"[४] हे भुकीचे भयान वास्तव काळयाकुट्ट रात्रीच्या अंधारासारखे आतडयांना ओरवडत जाणारे वास्तव खरात चित्रित करतात.

अन्याया विरूध्द चीड

दलित साहित्याचे प्रमुख वैशिष्टे म्हणजे नकार, वेदना, चीड आणि विद्रोह ही आहे. आजपर्यंत अस्पृष्यतेच्या आणि वाटयाला आलेल्या दारिद्रयाच्या उपेक्षा आणि मानहानीच्या वेदना सोसणाऱ्या दलितांची जेव्हा अस्मिता जागी झाली तेंव्हा त्यांना अन्यायाची जाणीव होऊ लागली. स्वत:वर होणाऱ्या अन्यायाबद्दल त्यांच्या मनात तीव्र संताप आणि चीड निर्मान झाली सुरवातीच्या काळात शोषणाचे संपूर्ण वास्तव चित्रण समाजासमोर मांडण्याची वश्त्ती निर्माण झाली. दलितांचे चित्रण करीत असताना त्यांच्या साहित्यात अन्यायाबद्दल चीड निर्माण होणे ही उपरिहार्यता होती. खरातांच्या कथा हया प्रवर्तनाच्या युगस्पर्शाशी संबंधीत असल्यामुळे त्यांच्या कथातून अन्यायाबद्दल चीड निर्माण झालेली जाणवते. संघर्ष हा दलित साहित्याचा मुळ गाभा असला तरी खरातांची मूळ प्रवश्त्ती ही संघर्षवादी नाही. चीड आणि उव्देग व्यक्त करणे हेच त्यांच्य लेखनातून जाणवते. १४ ऑक्टो. १९५६ नंत गावागावात संघर्षाचे सत्र सुरू झाले. लोकांचा स्वाभिमा जागा झाला. आजपर्यंत खाली मान घालून जाणा आज वर मान करून चालू लागला. राघोजी जेव्ह घोडयावरून शेताकडे जावू लागला. तेव्हा गावातील सवर्ण लोकांना एकदम धक्काच बसतो. अस्पृष्या घोडयावर बसणे ही केवळ राघोबाची चूक नव्हती त रितिच्या विरोधातील हे त्याचे वर्तन होते असे लोकां वाटते. देवाने घातलेली रीत तू मोडू नकोस अ गावच्या पाटलाचा त्याला सल्लाही मिळतो. मात्र त्या राघेजी बेमुर्वतपणे म्हणतो, "थूं! त्या रितीवर! जी म गुलाम बनविते. पाटील मी आता पूर्विची मानसिक घेऊन जगणारा अस्पश्य राहिलो नाही. माणूस झा आता तूमच्या गावच्या रितीशी आमचा काही ए

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule

संबंध नाही. तुमची रीत, तूमचा धर्म, तुम्हीच पहात बसा. आम्हाला सांगू नका आणि घोड्याचा लगाम सोडा."[५] अर्थात हा त्याचा स्वाभिमान होता. पूर्वीच्या अस्पृष्यांच्या लाचारीचे जीवन आता त्याला जगायचे नाही ही त्या संस्कृती विरोधातील किंवा आज पर्यंत झेललेल्या अत्याचार अन्यायाबद्दलची घृणा त्याचा मनात निर्माण झाली. शिवाय यातूनच त्यांचा उद्वेगही जाणवतो.

'रक्तपालखी' या कथेतून शोषणाविरोधात बंड करून उठणारा एकलव्य धनुर्विद्येत निष्णात असतो. गरूदक्षिणा म्हणून द्रोणाचार्यने एकलव्याचा अंगठा कापून टाकणे. वास्तविक विद्या तर त्याला दिलीच नाही. मात्र गुरूदक्षिणेचा निर्लज्ज पणा आणि कावा एकलव्याच्या लक्षात येतो. तेव्हा अंगठा गमावल्याचे दु:ख करण्याऐवजी तो त्वेशाने पेटून उठतो. "आदर्श मानलेल्या पुतळ्याच्या हृदयात तो एक एक बाण मारत होता. ज्या हाताने त्याचा अंगठा तोडला होता. त्या न्यायावर जुलुम करणाऱ्या हाताला त्याने धडापासून वेगळे एकाच बाणात केले. ज्या डोळ्यांनी विषमता या भूमीत रोवण्याचा प्रयत्न चालविला होता. ते डोळेच त्याने आंधळे केले होते. ज्या ओठांनी, न्याय नाकारणारा, अन्याय सिंहासणावर बसविणारा उच्चार उद्गारला होता ते ओठच त्याने छिन्नविछिन्न केले."[६] अशा प्रकारे जिवाची तगमग असहय झाल्याने जडफडणारी आणि चीड व्यक्त करणारी वृत्ती कथेतून जाणवते.

डॉ. आंबेडकरांची प्रेरणा

'पाणी' ही नैसर्गिक देण आहे. पाण्याविना मनुष्याला जगता येत नाही. असे असूनही स्पृष्य लोकांनी महाड च्या तळ्यावर अस्पृष्यांना पाणी पिण्यास मनाई केली होती. त्या तळ्यावर जनावरे पाणी पित होती मात्र 'अस्पृष्य' या मानवाला पाणी पिण्याचा अधिकार स्पृष्य लोकांनी नाकारला. १९२७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या अस्पृष्य सोथीदारांनी महाडचा सत्याग्रह केला. सामाजिक समानतेचा आणि मानवी हक्काच्या या प्रेरणादायी आठवणी सांगताना हरिभाऊ, म्हणतो "मी तरूणपणातच महाडच्या चवदार तळ्याच्या धर्मयुध्दात सामील झालो. काळाराम मंदिराच्या सत्याग्रहात सामील झालो. माझे त्या संघर्षात डोके फुटले. त्या काळातील ते गरीब लोक, अंगावर धड कपडा नाही. पायात चप्पल—जोडे नाहीत परंतु बाबावर प्रखर निष्ठा ठेऊन लढले. मनाला लखलखत्या तलवारीची धार करून झुंझले, विषमतेच्या विरोधातील तो सुरू झालेला लढा या भूमीवर समतेचा मुक्तदिवस होऊन उगवला."[७] 'प्रवर्तनाचा युगस्पर्श' या कथेतून संघर्षाची प्रेरणा करून देणारा प्रसंग लेखक सांगतात. अशा प्रकारच्या समर प्रसंगाने अन्यायाविरूध्दची तीव्र जाणीव जनतेत निर्माण व्हावी आणि बंडाचे निशाण चेतवावे ही लेखकाची मनिषा दिसते. यशवंत मनोहर म्हणतात, "प्रकाश खरात यांची कथा मराठी आंबेडकरवादी कथेतील एका नव्या कथावळणाचा निर्देश करणारी कथा आहे. वेदनांनी जळणारी मानसे जळता—जळता विद्रोहाने कशी पेटून निघतात. त्याचे समर्थ चित्र या कथा सादर करतात."[८] महाडचा सत्याग्रह किंवा काळाराम मंदीर प्रवेश ही संघर्षमय प्रेरणा डॉ. आंबेडकरांच्या नेतश्त्वातून निर्माण झाली हे कथेतून खरातांना सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

निष्कर्ष

१) माणसाचे व्यक्तिगत अनुभव, सामुहिक अनुभव त्यांच्या भोवतीच्या परीसरावर आणि त्यांच्या संवेदनशिलतेवर अवलंबून असतात.

२) खरातांची कथा वास्तववादी जीवनाची अनुभुती देणारी आहे.

३) कथेतून दलितांचे वास्तवादी जीवन साकार झालेले असले तरी कथा मात्र आंबेडकरी प्रेरणेचे बळण घेणारी आहे.

४) पुरोगामी विचारांची मनोव्यवस्था, तटस्थ बुध्दिवाद, तर्कवाद यासारख्या वैचारिक जाणिवा प्रकट करणारी कथा आहे.

५) दलित साहित्याल जाणवणारी वेदना, भावूक संघर्ष, चीड हे कथेतून जाणवतात. ग्रामीणता, दलितता, आणि काही प्रमाणात अन्यायाबद्दल संताप कथेतून जाणवतो.

६) कथेत नकाराचा फारसा स्पर्श होत नसला तरी स्वीकाराची तिव्रता अधिक जाणवते. कारण लेखकांत नवनिर्मितीची जाण आहे.

७) शेतकरी, शेतमजूर, कामगार, नोकर, श्रमिक यांना विशेषत्वाने कथेत स्थान दिलेले असल्यामूळे

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur
सहाय्यक प्राध्यापक
म. ज्यो. फुले महाविद्यालय,

On Date 14th April' 2018 Celebration of 127th Birth Year of Dr. Babasaheb Ambedkar. On this occasion, we publish Online Special Issue on

Dr. Babasaheb Ambedkar's Global Vision - 2018

सहाय्यक प्राध्यापक
म. ज्यो फुले महाविद्यालय,
बल्लारपूर

Published On Date 14.04.2018

Issue Online Available At : http://gurukuljournal.com/

Organized & Published By

Chief Editor,
Gurukul International Multidisciplinary Research Journal
Mo. +919273759904 Email: chiefeditor@gurukuljournal.com
Website: http://gurukuljournal.com/

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

INDEX

Paper No.	Title	Author	Page No.
1	Socio-Political Vision Of Dr. Ambedkar	*Dr. Devendra R. Bhagat*	1-6
2	Dr.B.R.Ambedkar Role In Constitutional Rights Of Womens Empowerment In India	G.SAKTHIVEL	7-10
3	Has Babasaheb's Principles Of Social Justice Reached The '*Depressed Classes*' Of Cachar?	Ruman Sutradhar	11-17
4	Dr. B.R. Ambedkar: A Man With Courage	Ms. Rinku	18-21
5	Dr. B. R. Ambedkar Education Policy In India	Prof. Dilip D. Virutkar	22-26
6	Dr. Babasaheb Ambedkar's Views On Indian Agriculture Policy	Mr.Vinod M.Badwaik	27-30
7	Dr. B.R. Ambedkar's Vision On Land Reforms And Agricultural Development	Dr. Sanjiv K. Nimbalkar	31-35
8	Dr. B R Ambedkar: Social Reformer	Ms. Gagandeep Kaur	36-40
9	Dr.B. R.Ambedkar: The Pioneer Of India	Dr. S. B. Mohitkar	41-45
10	An Important Role Of Dr. B. R. Ambedkar	Dr. Swapan Kumar Barman	46-48
51	डॉ.आंबेडकर ज्ञानाचा सागर व स्त्री स्वातंत्र्य	प्राचार्य डॉ.एस.के.खंगार	101-102
52	मराठीतील दलित-आंबेडकरवादी मराठी कथेतील विद्रोह	प्रा. बादलशहा डोमाजी चव्हाण	103-107
53	डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार	प्रा.स्वप्नील एस.बोबडे	108-110
54	डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रवादविषयक विचारांची समर्पकता	प्रा. संतोष भावार्थे	111-113
55	डॉ.बाबासाहेब आंबेडकरह्यांचे स्त्री विषयक कार्य आणि मानवमुक्ती लढ्यात विदर्भातील दलित स्त्रियांचे योगदान	डॉ. व्ही.एन. लाखे & प्रा.कु.दिपाली दांडेकर	114-116
56	डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक सुधारणेतील योगदान	प्रा. सिद्धार्थ नारायण वाकुडे	117-119
57	डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री विषयक चिंतन	प्रा.डॉ.संजय गोरे	120-122
58	डॉ.बाबासाहेब आंबेडकर-शिक्षणतज्ञ	डॉ.राजेश शंकरराव मुत्तीवार	123-126
59	डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी भारतीय कामगारांसाठी केलेले ऐतिहासिक कार्य	डॉ. प्रकाश आर.शेंडे	127-129
60	डॉ. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची विचारप्रबोधक पत्रावारिता : एक दृष्टीक्षेप	डॉ. कैलाश भानुदास यादव	130-135
61	वृत्तपत्रसृष्टी आजची आणि पत्रकारिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची	प्रा. डॉ. धनराज खानोरकर	136-144
62	डॉ.बाबासाहेब आंबेडकर का संवैधानिक दृष्टीक्षेप	प्रा. डॉ. रवींद्रनाथ मोघव पाटील	145-150
63	हिंदु कोड बिलातील सुधारणा	प्रा. वर्षा अ.तिडके (शानिवारे)	151-152

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

मराठीतील दलित – आंबेडकरवादी मराठी कथेतील विद्रोह

प्रा. बादलषाहा डोमाजी चव्हाण,
मराठी विभाग,
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,
बल्लारपूर, जि. चंद्रपूर

कथावाङ्मयाची उत्पत्ती जषी मनोरंज़नाच्या माध्यमातून व विरंगुळ्याच्या लालसेने झालेली असली तरी आंबेडकरवादी मराठी कथाकाराच्या कथेत केवळ मनोरंजन किंवा विरंगुळ्याला कुठे थाराच नाही. कारण त्यांच्या कथेतून एखादा मानवताधिष्ठित विचार प्रसूत होत असतो. कथेचा विचार देण्याचा चांगला प्रयोग त्यांची कथा करीत असल्याने ती कथा विचारकथा होत असते. आंबेडकरवादी कथेचा उगमच वैचारिक क्रांतीतून झालेला आहे. आम्हीही माणसं आहोत, आम्हाला माणसं म्हणून माणसासारखा जगण्याचा अधिकार आजवर नाकारला गेला असल्याने आमचे माणूसपण नाकारणाऱ्या व्यवस्थेला आमचा नकार नोंदवीत आम्ही यापुढे माणूस म्हणून जगू इच्छितो हे सांगणारी कथा आंबेडकरी कथेचे आषयमूल्य होते. हा मानवाधिष्ठित विचार आंबेडकरवादी मराठी कथेतून पहिल्यांदा अविष्कारित झाला. त्यामुळे ही कथा विचारकथा बनली. या कथेमध्ये विद्रोह प्रामुख्याने दिसतो.

आंबेडकरवादी मराठी कथा

मराठी कथा प्रारंभी मनोरंजनपर होती त्यात दलित जिवनाविषयी दया–सहानुभूतीद्वारे त्यांचे विकृत दृष्टीने प्रगटीकरण झाल्याचे दिसते. आंबेडकरवादी कथालेखकांनी खऱ्या अर्थाने मानवी समाज सरहद्दीवरील जीवन समाजासमोर आणले.

1960 नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेमुळे निर्माण झालेले साहित्य हे भारतीय साहित्य आहे. या साहित्यात कथा हा वाङ्मय प्रकार जोमाने लिहिला गेला. ज्या लोकांना गावाच्या बाहेर सरहद्दीवर ठेवल्या गेले त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'षिका, संघटीत व्हा, आणि संघर्ष करा' हा मूलमंत्र अंगिकारुन षिक्षण घेतले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेमूळे ते उभे राहिले. तेथूनच साहित्याची चळवळ उभी राहीली.

दलित आंबेडकरवादी मराठी कथा या वाङ्मयप्रकारामध्ये अत्यंत कलासंपन्न कथा लिहिल्या गेल्या आहेत. दलित समाजातील लोकांना पषुपातळीवरचे जीवन जगावे लागत आहे. त्याला समाजरचनाच कारणीभूत आहे. विषमतेमूळे दलितांना भोगावी लागणारी गुलामगिरी आणि आंबेडकरी चळवळीमुळे निर्माण झालेला विद्रोह हा आंबेडकरवादी कथेतून प्रकट होतांना दिसतो. अनेक कथाकारांनी आंबेडकरवादी मराठी कथेच्या इतिहासात मानाचे स्थान भूषविले आहे. त्यात बंधूमाधव, षंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, वामन होवाळ, सुखराम हिवराळे, अमिताभ, योगीराज वाघमारे, अविनाष ढोळस, प्रकाष खरात, जालंदर सोनुने, योगेन्द्र मेश्राम, केषव मेश्राम, चंद्रकांत वानखेडे, धर्मराज निमसरकर इ. कथाकारांचा समावेष होतो. या कथाकारांना आपल्या कथेमध्ये दलित लोकांच्या वेदना मांडल्या व त्यांच्या जीवनातील संघर्ष चितारला.

विद्रोहाची पूर्वपरंपरा

भारतीय समाजात ब्राम्हण, क्षत्रिय, वैष्य व षूद्र हे चार वर्ण होते. ही समाजरचना मुळातच विषमतेवर उभारली गेली होती. ब्राम्हणांनी अध्ययन करावे, क्षत्रियांनी समाजाचे रक्षण करावे, वैष्यांनी व्यापार करावा आणि षुद्रांनी वरील तिनही वर्णाची सेवा करावी ही चातुर्वर्ण्य पध्दती होती. भारतीय समाजाने जाती, उपजाती, त्यांचे व्यवसाय, त्यांच्या धार्मिक श्रध्दा आणि संस्कार, त्याची दैववादी वृत्ती, पाप–पुण्याची कल्पना, दारिद्रय, मागासलेपणा, सहनषीलता या गोष्टी स्वतःला चिकटवून घेतल्या. हजारो वर्षापर्यंत भारतीय समाजात त्या तषाच राहिल्या. विषमतेवर उभ्या असलेल्या समाजाला इंग्रजी राजवटीपूर्वी चार्वाक, तथागत गौतम बुध्द या महापुरुषांनी समाजाला बदलविण्याचे प्रयत्न केले. त्यांनी देवदैववादाविरुध्द, सामाजिक विषमतेविरुध्द, मानसिक गुलामगिरीविरुध्द विद्रोह केला.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

महात्मा ज्योतिबा फुले यांनी एकेश्वरवाद, बुध्दिप्रामाण्यवाद, मुर्तिपूजाविरोध, चमत्कार आणि स्वर्गाच्या कल्पनेबाबत विद्रोह केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही धर्मांतरानंतर अन्याय–अत्याचाराबाबत, वाईट रूढी–परंपरच्या विरोधात, छळ, वेदनेच्या विरोधात विद्रोह केला.

तथागत बुध्द, चार्वाक, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीतील व कार्यातील विद्रोहातून प्रेरणा घेऊन आंबेडकरवादी मराठी कथेत विद्रोह उभा राहिला. हा विद्रोह वेगवेगळ्या कलाकृतीमध्ये साकार झाला. दलित – आंबेडकरवादी मराठी कथेचा शोषणाविरुध्द विद्रोह आहे. बुध्द, चार्वाक, म. फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून हा विद्रोह उभा राहिला.

कथांमधील विद्रोह

दलित– आंबेडकरवादी मराठी कथांना विद्रोही कथा म्हटले जाते ते खूप अर्थपूर्ण आहे. मुळात विद्रोह हा वेदनेतून जन्माला येतो. ही वेदना जर सामाजिक अन्याय अत्याचारातून उद्‌भवलेली असेल व ती अनेक वर्षांपासून संबंधित लोक जर सहन करीत आले असतील. तर तिचे एक ना एक दिवस विद्रोहात रुपांतर झाल्याशिवाय राहत नाही. मानवी समाजाच्या सरहद्दीवरील लोकांनी आपली अस्पृष्यतेची वेदना मूकपणे वर्षानुवर्षे सहन केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उदयामुळे समाजात जागृती झाली. आत्मभान आले, स्वाभिमान जागा झाला, अन्याय–अत्याचार लाथाडून देण्याची भावना निर्माण झाली म्हणजेच विद्रोहाची भावना प्रबल होत गेली. अस्पृष्यता ज्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेतून आलेली होती व ती चार्तुवर्ण्यव्यवस्था ज्या 'मनुस्मृती' ने सांगितलेली होती. त्या सर्वाविरुध्दचा विद्रोह मराठीतील दलित – आंबेडकरवादी कथांमध्ये व्यक्त झालेला आहे.

सर्वकष विद्रोही कथांचे शिल्पकार :–

अण्णाभाऊ साठे

अण्णाभाऊ साठे हे दलित – आंबेडकरवादी कथेतील पहिले समर्थ कथाकार. त्यांनी 'बरबाद्या कंजारी', 'सुलवांडी', 'आबी', 'मानामती', गजाआड', 'जिवंत काडतूस', 'बंडवाला', 'सावळा नांग', यापैकी बहुतेक कथांमधून मुंबईच्या बकाल वस्तीत जगण्याच्या मानसांचे, त्यांच्या जगण्यातले जळजळीत अनुभव त्यांनी कथाबध्द केले आहेत. अण्णाभाऊंच्या कथांमधील मानसे विद्रोह करणारी आहेत. समाजव्यवस्थेने वाटयाला दिलेल्या सामाजिक, आर्थिक विषमतेविरुध्द अहोरात्र संघर्ष करणारी आहेत.

शंकरराव खरात

शंकरराव खरात हे महाराष्ट्रातील ख्यातनाम कथाकार. त्यांच्या नावावर 'बारा बलुतेदार', 'तडीपार', 'सांगावा', 'टिटवीचा फेरा', 'तुटका' इ. कथासंग्रह आहेत. आंबेडकरी समाज, पूर्वाश्रमीचा अस्पृष्य मागूस व त्यांचे जीवन, असा आणि एवढाच त्यांच्या कथेचा विषय राहिलेला नाही. जाती–संप्रदायवादी साहित्य असा आक्षेप टेवणाऱ्यांना त्यांनी प्रथमतःच इथे चपराक लावली. समाजव्यवस्थेत भरडलेल्या, दडपल्या–नागवल्या गेलेल्या जन दलितांच्या मागास उपेक्षित, वंचित जीवनाची त्यांनी पोटतिडिकीने कैफियत मांडली.

बंधुमाधव

बंधुमाधवांच्या कथा परिवर्तनाभिमुख आहेत. दलितांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचारांची, दुःखाची, वेदनांची अतिशय प्रभावी आणि आत्मप्रत्ययी चित्रे यांच्या कथेत येतात. त्यांच्या नावावर 'आम्हीही माणसं आहोत', 'फाटलेले आकाश' हे कथासंग्रह आहेत.

बाबुराव बागुल

बाबुराव बागुल यांची कथा ही शिल्पासारखी सुंदर आहे आणि भयंकर व अफाट विद्रोही आहे. 'जेव्हा मी जात चोरली होती' आणि 'नरगा स्वस्त होत आहे' व 'आंबेडकर भारत' हे तीन्ही अत्यंत तेजस्वी व धारदार कथांनी समृध्द असे कथासंग्रह आहेत. बागुलांच्या कथेचे विद्रोही रुप मनाचा ठाव घेणारे आहे.

योगिराज वाघमारे

योगिराज वाघमारे यांचे 'उद्रेक', 'बेगड', 'गुडदाणी' हे कथासंग्रह प्रसिध्द झाले आहेत. 'उद्रेक' कथासंग्रहातील 'लढाई', 'जत्रा', 'बंड', 'हवेली', 'जगणूक', 'उद्रेक' इ. कथा हया वास्तव जीवनाच्या

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

सामर्थ्यवान कथा आहेत. मुलांचे मानसषास्त्र घेऊन अन्यायाविरुध्द चीड–संताप व षेवटी बंड पुकारणारी 'बंड' ही कथा आहे. साध्या सरळ भाषेतून भावविष्व जिवंत करणारी वाघमारेंची कथा दलित जीवनातला सारा जाळ विद्रोही सामर्थ्याने व्यक्त करते.

माधव कोंडविलकर

मानवी समाज सरहद्दीवरील जीवनवास्तवाचे अत्यंत हृदयस्पर्षी चित्रण करणारे माधव कोंडविलकर हे एक समर्थ कथाकार. 'नागडा', 'कोड', 'अगतिक', 'अंतःस्फोट' इ. कथांमधून दैन्यदुःखाचे चित्रण आलेले आहे त्यासोबतच सामाजिक व कौटुंबिक कलहाचे संघर्ष–चित्रण हा या कथेचा गाभा आहे. उद्वेग, चीड व विद्रोहाने भरलेली वास्तव जीवनाची ही प्रत्ययकारी कथा आहे.

केशव मेश्राम

केषव मेश्राम यांच्या प्रतिभेचा अविष्कार कथेत मोठया प्रमाणावर झालेला आहे. केषव मेश्राम हे केवळ दलितांचे दैन्य, दुःख आपल्या कथेत चित्रित करीत नाहीत तर दलितांतील लढाऊपणाचे, त्यांच्यातील जागृत झालेल्या अस्मितेचेही दर्षन घडवितात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव दलितांवर कसा पडलेला आहे याचे चित्र मेश्रामांच्या 'मोर्चा' या कथेत दिसून येते. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिले पाहिजे यासाठी झालेल्या संघर्षाचे चित्र लेखकाने अतिषय प्रभाविपणे मांडले आहे. जातीयतेचा विखारही मेश्रामांच्या कथांचा विषय होतो तेव्हा त्यांच्यातील विद्रोही रुप प्रत्ययाला येते.

अमिताभ

'पड', 'मसनवटा', 'जन्मखुण', 'हरिजनमास्तर', 'सत्येकाम जाबाली', 'सल' इ. अमिताभ लिखित कथा आहेत. वास्तव जीवनाचे प्रक्षोभक चित्रण करणाऱ्या आहेत. उपेक्षा, लाचारीच्या, विटाळाच्या, चीड संताप असणाऱ्या हया ताकदवर कथा आहेत. दलितांविषयी असणारी सवर्णियांची भावना लेखकाने अगदी नेमक्या शब्दात टिपली आहे. जातीयतेची परंपरा सवर्णीय विसरायला तयारच नाही याचा प्रत्यय 'सल' या कथेत येतो. दलितांमध्ये विद्रोही विचारांचे तरुणही आहेत की जे ही जातीयतेची परंपरा मोडू पाहतात. सिध्दार्थ कांबळे हा शेंडेंचा मित्र अतिषय विद्रोही आहे.

अर्जुन डांगळे

अर्जुन डांगळे यांच्या 'बांधावरची माणसं' संग्रहातील सामाजिक जीवनाच्या दुःखाचा आक्रोष येण्यापेक्षा वर्गीय आर्थिक दृष्टीकोनच प्रभावी वाटतो. एकुन जीवनजाणीवांमध्ये संयत विद्रोहाचा लेखकाने समतोल साधला आहे.

सुधाकर गायकवाड

'उद्वेग' सारख्या थोडयाच कथा लिहिणारे जोरदार कथाकार म्हणजे सुधाकर गायकवाड हे होत. ऐतिहासिक पार्श्वभूमीवर ब्राम्हण व षूद्र यांच्यातला संघर्ष पाहण्यासारखा आहे. त्यात वर्णव्यवस्थेचा पर्दाफाष करतांना विद्रोह निर्माण झाला आहे.

योगेन्द्र मेश्राम

दलित, आदिवासी, बहुजन–जीवनावर योगेन्द्र मेश्राम यांनी पुष्कळ कथा लिहिल्यात. 'रक्ताळलेली लक्तरे', 'जगण्याचा प्रष्न', 'हाहाःकार' इ. कथा संग्रह त्यांच्या नावावर आहेत. त्यांनी आपल्या कथेतून गरिबी, बेकारी, पोटाचा प्रष्न, ग्रामीण गुंडगिरी, अंधश्रध्दा, दलितांवर होणारा अन्याय, अत्याचार, स्त्रियांवरील जूलुम यांचे अतिषय प्रत्ययकारी चित्रण केले आहे. 'रक्ताळलेली लक्तरे' या कथेतून मेश्राम मानवी वर्तनाची, अंर्तमनाची आणि सामुहिक कृतीची मीमांसा करताना दिसतात. या कथेचा नायक बाळू हा जागृत मनाचा आहे. त्यामुळेच तो पोलीसांच्या गोळीचा षिकार होतो. कामाच्या मोबदल्यात मजुरांना दिली गेलेली कमी मजुरी, त्यामुळे मजुरांवर उपासमारीची पाळी येते. शेवटी त्यांच्या संतापाच्या ज्वालामुखीचा उद्रेक होतो व ते विद्रोह करुन उठतात.

डॉ. वि. स. जोग म्हणतात, "जगण्याचा प्रष्न', अस्मितेला वाचवा रे', 'आक्रोष रिकाम्या थैलीचा', 'बुढढी', 'झुला', 'झकोला' इ. सामर्थ्यवान कथा मेश्रामांची रोंगावत् येणारी, घोंगावत येणारी आणि थरथरुन

Officiating Principal
Mahatma Jyotiba Phule
Mahavidyalaya, Bellary

सोडणारी आहे. हया कथा वाचताना जणू सुरुंगाच्या स्फोटाप्रमाणे स्फोट होत आहेत आणि पारंपारिक घट्ट कल्पनांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडत आहेत. असा अनुभव येतो.'' मेश्रामांच्या कथांचे मोठेपण हे त्यातल्या गर्भात असलेल्या जीवनवादितेत आणि मानवद्रोही चाकोरीविरुध्द बंड पुकारणाऱ्या विद्रोही भूमिकेत आहे.

प्रकाश खरात

भूतकाळातील दलित जीवनाचा रुक आणि षौर्यप्रधान ऐतिहासिक घटनांचे मनस्वी चित्रण करणारे डॉ. प्रकाष खरात हे आजचे समर्थ कथाकार आहेत. त्यांनी 'अंधाराचा अस्त', 'अक्षरांची पहाट', 'प्रवर्तनाचा युगस्पर्ष' इ. कथासंग्रहातून युध्दकथा लिहिल्या. दलितांच्या विद्रोही चळवळीचे जिवंत प्रत्यंतर आणून देणारी षेणातील दाणे' ही क्रांतिप्रवण कथा आहे. विद्रोह करु पाहणारा दामू या कथेचा नायक आहे. तो षिक्षणाचा उजेड घेऊन परिरिस्थतीवर मात करण्याची इच्छा ठेवतो. गणराज्य दिनाला षाळेतून मिळालेला पेढा सगळयांनी मिळून खावा यासाठी तो नदीवरुन येत असलेल्या आपल्या आईकडे धाव घेतो. वर्तमान दलित जीवनांनी ओतप्रोत भरलेली ही प्रक्षोभक आणि परिणामकारक कथा आहे. स्वातंत्र मिळूनही दलित समाज दारिद्रय भोगत आहे. अन्याय, अत्याचाराला सामोरे जातो आहे. अन्न, वस्त्र,निवारा अषा किमान गरजा देखील त्यांच्या पूर्ण होत नाही त्यामुळे त्यांची कथा विद्रोहाकडे वळते.

डॉ. यषवंत मनोहर म्हणतात, ''अंधाराचा अस्त' मांडणाऱ्या प्रकाष खरातांची कथा दारिद्रयाचे आक्रंदन साकार करते. षेणातील दाणे खाणारी माणसे इथे भेटतात. खरातांच्या कथेत वेदनांचा आकांत जसा आहे तर विद्रोहाचा गडगडाटही आहे.'' आंबेडकरवादी कथेने वाचकाला गुंगवण्याऐवजी त्याला चेतवावे, जागवावे, अस्वस्थ करावे आणि पेटवावे या अपेक्षेची खरातांची कथा पूर्ती करते.

डॉ. प्रकाष खरात यांच्या एकुणच कथेतून जो नवा पुरोगामी दृष्टीकोण, नवे विज्ञाननिष्ठ, बुध्दीवादी प्रयोजन आणि नव्या युगप्रेरणा व नव्या सामाजिक जाणिवा व्यक्त होतात. त्यांचे महत्व इथे आहे. येथील धर्मसंस्कृतीने टाकलेल्या, उपेक्षिलेल्या गतकाळातील ऐतिहासिक जीवनाचा या कथेत नव्या दृष्टीने जसा साक्षात्कार घडविलेला आहे, त्याचप्रमाणे वर्तमान काळातील माणसा–माणसांच्या वृत्तीप्रवृत्तीचा षोधही त्यांच्या कथेने घेतलेला आहे. दलितांच्या स्थिती–गतीचे व प्रगतीचे चित्रण ती करते. त्याचवेळी त्यांच्या अधोगतीला कारण ठरलेल्या या विषमतावादी समाजव्यवस्थेची चिरफाडही करते, विद्रोह करते.

चंद्रकांत वानखेडे

अण्णाभाऊ साठे यांच्या कथेचा वारसा पुढे नेणारा कथाकार म्हणजे चंद्रकांत वानखेडे होय. त्यांनी मराठी कथेत मोलाची भर घातली. त्यांच्या नावावर 'विटाळ', 'मयतीची फुल' आणि 'भूक' इ. कथासंग्रह आहेत. वानखेडे यांच्या कथा मनाला चटका लावून जातात. दलित समाजातील षोषणाला वाचा फोडतात. त्यांनी आपल्या कथेत नायकाच्या स्वभावातील षूरता, माणूसकी, अन्यायाविरुध्दची चिड अतिषय समर्थपणे व्यक्त केली आहे.

चंद्रकांत वानखेडे यांची कथा आषयाने आणि विषयानेही समृध्द आहे. दलितांच्या वाटयाला जातिव्यवस्थेने व अस्पृष्यतेने आलेले जगणे आणि त्यामुळे भोगावे लागलेले भोगवटे हा वानखेडे यांच्या कथाविषयाचा स्थायीभाव आहे परंतु त्याचे रडगाणे गात ही कथा थांबत नाही तर ती त्यावर प्रतिकाराचा व विद्रोहाचा उपाय सुचवितो. चंद्रकांत वानखेडे यांच्या कथेतील पात्रे गुलामगिरीने, लाचारीने, न्युनगंडाने, धार्मिक लबाड मानसिकतेने पीडीत व षोषित आहेत. ते प्रसंगी लाचारी स्वीकारीत जगतात परंतु वेळ आल्यास विद्रोह सुध्दा करतात. अन्यायाचा प्रतिकार हा मानवी व्यवहार वानखेडे यांच्या कथेतून प्रकटतो.

जालंधर सोनुने

जालंधर सोनुने या कथाकाराने आपल्या 'अषांतसागर', 'भाबडी', 'संवेदना', 'बलीदान', या कथासंग्रहातुन वास्तववादी जिवन प्रकट केले आहे. त्यांच्या कथासंग्रहातील नायक परिस्थितीषी संघर्ष करतांना दिसतो.

धर्मराज निमसरकर

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

धर्मराज निमसरकर हे नव्या पिढीतील कथाकार आहेत. त्यांनी 'वेदनास्पर्ष', 'आंदोलन', 'संकेतबंड', 'उसवलेल आकाष', आणि 'ठसठसणाऱ्या जखमा',या कथासंग्रहातुन दलित कामगारांच्या मनातील विद्रोह षब्दबध्द केला आहे. भारत देषात कामगारांच्या अनेक चळवळी आणि संप झाले तरीही येथला कामगार उपेक्षितच राहीला यात मोठया प्रमाणात कामगारांच्या संगठन षक्तीचा वाटा आहे. तसेच युनियनच्या नेत्यांचा मोठया प्रमाणात कुटील डाव आहे. हे लेखकाला मुळात जाणवले याचेच हुबेहुब चित्र त्यांनी प्रस्तुत कथा संग्रहातुन केलेले आहे. व त्यामध्ये विद्रोह आलेला आहे.

समारोप

आंबेडकरवादी मराठी कथांचा विद्रोह हा प्राण आहे. ते या कथेचे मूल्य आहे. या कथेने माणूस केंद्रस्थानी मानून त्याच्या जीवनवास्तवाचे चित्रण केले आहे. व मानवतावाद उभा केला आहे. दलित, आदिवासी बहुजन समाजातील अनुभव हेच तिचे आषयद्रव्य आहे. वंचितांच्या जीवनाची अभिव्यक्ती ही पहिल्यांदा दुःखाभिव्यक्ती असते. ही दुःख अनुभूती मांडणारी कथा उपेक्षित–वंचितांचे अन् षोपितांचे दुःखचित्रण करणारी, तरीही ती आपले रडगाणेच न गाता दुःख देणाऱ्या षोषक, जुलमी प्रवृत्तींच्या विरोधात आणि अपमानिय, लाचारी गुलामीचे जीवन वाटयास देणाऱ्या या धर्मसंस्कृतीच्या आणि व्यवस्थेच्या विरोधात ही कथा विद्रोहाची लढावू प्रेरणा देणारी आहे. विद्रोह हे दलित कथेचे अंगभुत लक्षण आहे तिने जीवन–परिवर्तनाची प्रेरणा दिली व आपले मन क्रांतिप्रवण ठेवले. विद्रोहाचे आंदोलन निर्माण करुन वाचकांच्या हृदयाला हलविले आहे.

संदर्भ ग्रथसूची :

1) बागुल बाबुराव , एक मुलाखत, माय–मराठी, दलित साहित्य विषेषांक, 1975
2) फडके भालचंद्र , दलित साहित्य वेदना व विद्रोह, श्रीविद्या प्रकाषन, पुणे, 1977
3) निकम छाया , दलित कथा : निर्मिती आणि समिक्षा, सुविधा प्रकाषन, पुणे, 2006
4) मेश्राम योगेन्द्र, आंबेडकरवादी वाङ्मयीन जाणिवांची अक्षरसाक्ष, सुगावा प्रकाषन, पुणे, 2000
5) मनोहर यषवंत , आंबेडकरवादी मराठी साहित्य, भीमरत्न प्रकाषन, नागपूर, 1999
6) खरात प्रकाष, दलित कथाःउगम आणि विकास, सुगावा प्रकाषन, पुणे, 1994
7) जोग. वि. स., 'जगण्याचा प्रष्न' (प्रस्तावना) योगेन्द्र मेश्राम
8) मनोहर यषवंत, आंबेडकरवादी मराठी साहित्य, भीमरत्न प्रकाषन, नागपूर, 1999

सहाय्यक प्राध्यापक
म. ज्यो फुले महाविद्यालय,
बल्लारपूर

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com



सहाय्यक प्राध्यापक
महात्मा ज्योती फुले महाविद्यालय
बल्लारपूर

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - I January - March - 2019

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

Dagadojirao
7 Copy

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Officiating Principal
Mahatma Jyotiba F...
Mahavidyalaya, Bala...

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

CONTENTS OF MARATHI PART - I

अ.क्र.	लेख आणि लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
१	दलित कवितेची सद्यस्थिती **प्रा. कातकडे केशव श्रीरंग** **प्रा. गजलवार रमाकांत काळबाराव**	१-५
२	आदिवासी साहित्य : कविता, कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथा, वैचारिक लेखन **वऱ्हाडे बापुराव भास्कर**	६-८
३	आदिम दु:खाची गाथा : रानआसवांचे तळे **जया रमाकांत शिंदे**	९-१२
४	अण्णाभाऊ साठेंची कादंबरी एक चिंतन **प्रा. डॉ. मेधा गोसावी**	१३-१५
५	स्त्रीवादी साहित्य : कवितेच्या संदर्भात **डॉ. सुधाकर पंडितराव बोथीकर**	१६-२१
६	साठोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरी - स्वरूप व वाटचाल **डॉ. योगिता मारूती रांधवणे**	२२-२४
७	समकालीन दलित कवितेची सद्य:स्थिती **प्रा. डॉ. रमेश श्रीरंग औताडे**	२५-२९
८	दलित चळवळीची शोकांतिका मांडणारे नाटक: भाई तुम्ही कुठे आहात ! **डॉ. संदिप बनसोडे** **सुनिल सदाशिवराव कांबळे**	३०-३३
९	वंचित नवशिक्षीत पिढींचा आवाज : भटक्या विमुक्तांची आत्मकथने **डॉ. भारत विठ्ठलराव शिंदे**	३४-३८
१०	ग्रामीण कविता : सद्य:स्थिती **प्रा. बोंतेवाड नागेश रामलू**	३९-४१
११	भटक्या विमुक्तांच्या साहित्य चळवळीची सद्यस्थिती **डॉ. सरला गोरे/सावकारे**	४२-४४
१२	ग्रामसंस्कृतीच्या परिवर्तनाच्या कथा : 'दाही दिशा' **प्रा. बादलशहा डोमाजी चव्हाण**	४५-४९

सहाय्यक प्राध्यापक
म. ज्यो. फुले महाविद्यालय,
बल्लारपूर

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

१२. ग्रामसंस्कृतीच्या परिवर्तनाच्या कथा : 'दाही दिशा'

प्रा. बादलशहा डोमाजी चव्हाण
मराठी विभाग, महात्मा जोतिबा फुले महाविद्यालय, बल्लारपूर, जि. चंद्रपूर.

प्रास्ताविक

मराठीमध्ये इ.स. 1950 पासून ग्रामीण जीवनावर आधारित वाङ्मय प्रसिद्ध होत आहे. त्यात कथा हा वाङ्मयप्रकार ग्रामीणांच्या जीवनाचे रास्त दर्शन घडविणारा आहे. सुरूवातीला ग्रामीण जीवनातल्या दारिद्र्यावर, पिळवणुकीवर जहांगिरदार, सावकार यांच्या जुलमावर आधारित कथावाङ्मय प्रामुख्याने होते. नंतरच्या कालखंडात ग्रामीण जीवनाच्या व्यक्तिचित्रावर आधारित कथा लिहिल्या गेल्यात. त्यानंतर मनाचा वेध घेणाऱ्या कथा लिहिल्या गेल्यात आणि आता मन आणि मनाच्या संदर्भात शरीर असे मिश्रीत रूप ग्रामीण कथेला आले. अशाप्रकारे ग्रामीण कथाकारांच्या आजवर चार पिढ्या निर्माण झाल्या. सध्या रा.रं. बोरांडे, भास्कर चंदनशिव, चारूता सागर, सखा कलाल इत्यादी नव्या दमाचे लेखक ग्रामीण कथा लिहितांना दिसतात. याच मालिकेत रवीन्द्र शोभणे यांच्या कथा शोभणाऱ्या आहेत.

शोभणे यांचा 'दाही दिशा' हा दुसऱ्या क्रमांकाचा ग्रामीण कथांचा संग्रह असून तो 1994 मध्ये प्रकाशित झाला.या कथासंग्रहाने रवीन्द्र शोभणेंना ग्रामीण कथाकारात स्थान मिळवून दिले म्हणूनच ते ग्रामीण कथाकारातील चौथ्या पिढीतले अग्रगण्य कथाकार ठरतात. त्यांच्या 'दाही दिशा' कथासंग्रहातील कथा ग्रामीण जीवनातील अनेक प्रकारची दुःख, व्यथा, दारिद्र्य, उपासमार, शोषण याचे हृदयद्रावक दर्शन घडविणाऱ्या आहेत. त्यांच्या जोडीला शरीराचे भोग आणि या सर्वातून होणारी केविलवाणी फरपट, मनाची ओढाताण वाचकांच्या मनाला भिडून जाते. ग्रामीण जीवनाचे रास्त दर्शन घडविण्यात शोभणे यशस्वी ठरले आहेत.

'दाही दिशा' या कथासंग्रहामध्ये एकूण अकरा कथा आहेत. त्या कथा ग्रामीण जीवन साकारणाऱ्या आहेत. शोभणेंच्या या कथांमधून ग्रामीण जीवन सजीव होऊन समोर येते ते फक्त मानसांच्या स्वभावाचेच चित्रण करीत नाहीत तर माणसांबरोबर निर्माण झालेले दारिद्र्य, अंधश्रद्धा, अन्न, वस्त्र, निवाऱ्याचे प्रश्न या बाबींचेही चित्रण करतात. ग्रामीण माणूस सरळ स्वभावाचा आहे; पण जगण्यातील संघर्ष त्याला सरळमार्ग शोधण्यास भाग पाडते. हा माणूस असाह्य आहे. अगतिक झाला आहे या सर्व बाबींचे बारकावे या कथासंग्रहातील कथांमध्ये येतात. 'दाही दिशा' तील कथांचे चित्रण, त्यांची मांडणी आणि भाषाशैलीमुळे ते नव्या पिढीतील शंकर पाटील आहेत असे म्हटले तरी वावगे होणार नाही.

विदर्भातील ग्रामीण जीवन सजीव करणारा कथासंग्रह

'दाही दिशा' या कथासंग्रहातील अकराही कथा विदर्भातील ग्रामीण जीवन साकार करणाऱ्या आहेत. या कथासंग्रहामध्ये केवळ मनुष्यस्वभावाचे चित्रण नाही तर माणसाबरोबर निर्माण झालेले दारिद्र्य, अंधश्रद्धा, अन्न, वस्त्र, निवाऱ्याचे प्रश्न आहे. सापाचा खेळ करून उदरनिर्वाह करणाऱ्या या मदाऱ्यास एक देखणी महिला एक रूपया देते

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

आणि योगायोगाने त्या बाईचे प्रेत मदाऱ्यांच्या गावातील नदीत सापडते. दहा रूपयासाठी मदारी ते प्रेत पाण्याबाहेर काढतो. दुसऱ्या दिवशी सरपंचाचा माणूस त्याच्या खोपटाच्यादाराच्या चौकटीत येतो आणि म्हणतो, "मदारी, प्रेताचा पंचनामा झाला. प्रेत मसणात गाडायची परवानगी मिळाली आता तुला सरपंचांनी बोलावलं चल"[1] सरपंचाने बोलावल्यामुळे मदारी जातो. त्या मृत बाईला स्मशानभूमीत उजव्या खांद्यावर टाकून येतो. कथालेखक लिहितो, "अमास्येच्या रात्रीतला एखादा वेताळ वस्तीतल्याच बाईला घेऊन जात आहे की काय असाच मदारीचा तो संपूर्ण अवतार भासत होता."[2] स्मशानभूमी त्या मृत बाईला नेल्यानंतर तिच्यावर अंत्यसंस्कार करतो आणि अखरीस तो स्वतः बळी जातो. केवळ दहा रूपयासाठी, पोटाच्या भूकेंसाठी माणसे वणवण भटकतांना दिसतात. जीवनाची पर्वा न करता काम करत राहतात; पण शेवटी त्यांचा अंत होतो.

ग्रामीण भागातील बुवाबाजी आणि अंधश्रद्धेचे चित्रण 'झूल' या कथेमध्ये आलेले आहे. 'झूल' या कथेत भाऊराव मास्तर स्वतःच्या स्वार्थासाठी गौतमला बुवाबाजी करायला लावून लग्न झालेले असतांना सुद्धा सन्यासी बनवितो. भाऊराव मास्तर आणि गौतम बुवा यांच्या मायाजाळात लोक फसतात. कथालेखक लिहितो, "कुणी विहिरीला खोदताखोदता पाषाण लागला म्हणून, कुणी मुलीचं लग्न जमत नाही म्हणून तर कुणी तान्ह्या पोराच वागत नाही म्हणून गौतम बुवाजवळ येऊ लागले. बुवान दिलेला कौल लोकांच्या पथ्थ्यावर पडू लागला आणि मग त्याचं नाव अख्या पंचक्रोशीत देवरूपी गौतमबुवा म्हणून कानोकानी झालं होत."[3] अशाप्रकारचे अनेक बुवा बनविणारी माणसे व बुवा बनणारे लोक खूप आहेत. ते आपल्याकडे ग्रामीण लोकांचा कल वळवून स्वतः खूप श्रीमंत झाले आहेत आणि सर्वसामान्य ग्रामीण भागातील गरीब जनतेच्या मनात अंधश्रद्धेचे जाळे पसरवितांना दिसतात.

दुःखाने कोलमडलेल्या माणसांच्या कथा

'दाही दिशा' या कथासंग्रहातील माणसांची दुःखे ही अनेक प्रकारची आहेत. ही दुःखे जगावेगळी नसली तरी दुःखाचे कांगोरे वाचकांच्या मनाला बोचून जाणारे आहेत. आपण कल्पनाही करू शकणार नाही अशा त्यांच्या व्यथा आहेत. 'दाही दिशा'तील सर्व कथांतून दुःख, व्यथा, मनाची होळपळ इतक्या ठळकपणे मांडली आहे की, ग्रामीण जीवनात याशिवाय दुसरं काहीच नसतं का? असा प्रश्न पडतो. त्यांचा खंबीरपणा, त्यांच्या मनाचा मोठेपणा त्यांच्या आशा–आकांक्षा या दुःखात कोलमडून जातात.

'मोर्चा' या कथेतील शिवरामचे सुशी वरील प्रेम, वात्सल्य, आई–बाप या दोन्ही भूमिका निभावतांना त्याच्या अंतःकरणाला पडलेली पीळ, सुशी मोर्चात हरपल्याने त्याच्यावर कोसळलेले आभाळ, कुणालाच कळत नाही. "तो दिवसभर भटकत होता. पोरीला शोधत होता. आनं आसपासचे सगळे रस्ते शोधले, चौक शोधले, दुकानाच्या पायऱ्या पाहिल्या, संध्याकाळ होईलपर्यंत भटकत राहिला, हिंडता–हिंडता त्याच्या पायावर गोळे दाटून आल्यासारखे झाले; पण तरीही तो चालतच होता."[4] तो माणसात असतांनाही त्याला एकाकी वाटत होते. अगतिकता, लाचारपणा त्याला जाणवत होता. म्हणूनच स्वतःचे दुःख भावंडा शिवराम कुत्र्याच्या पिलांजवळ व्यक्त करतो. तसेच 'सांड' मधला बजरंग्या सांड आणि किसन पैलवान एक जनावर आणि एक आडदांड माणूस पण दोघेही सारखेच माजलेले, मस्तावलेले नी म्हणूनच दोघांचाही शेवट सारखाच होतो. ह्या दोन्ही रूपातील दुःखाचे, व्यथेचे कारण देहभोगाच्या अस्मितेत आहे. त्यांच्या छडपलेल्या वासना सतत नागासारखा फणा काढतात आणि दुःखाला कारण होतात.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

'ससा आणि कासव' या कथेतील बाब्या कमी डोक्याचा आणि वाढ खुंटलेला म्हणून नेहमी त्याला दुसरे मुलं दुःख देत असतात. प्रेक्षकांना हसविण्याचं काम करण्यासाठी सर्कसमध्ये त्याला कामं मिळते. सर्कशीचा दुसरा खेळ संपल्यावर सर्व सर्कसमधले लोक झोपायच्या तयारीला लागतात. अर्धा पाऊण तास सशाची वाट पाहून थकल्यावर बाब्या सर्कशीतील वेगवेगळ्या तंबुत सशाचा तपास घेण्यास निघतो तेव्हा"... हत्तीच्या पायाखाली चिरडल्या गेल्यामुळे ससा मरून पडला होता. बाब्यानं आपल्या सशाला ओळखलं होतं. पोटातल्या आतड्या बाहेर पडलेल्या सशाकडे पाहून त्याच्या डोळ्यात पाणी आलं. हुंदके देत तो रडू लागला."[5] सशाच्या मरणानंतर बाब्या दुःखाच्या अग्नीत जळत होता. 'चुंभळ' या कथेतील भिकीला तीच्या नवऱ्याचा, बिसनचा मृत्यु झाल्यावर तिच्या वाट्याला दुःख आले त्यानंतर तीला आपल्या दोन्ही मुलांकडून, कोसा आणि वच्छी कडून आधाराची अपेक्षा होती. "आपल्याले उचलाले जड जाणारं हे सौंसाराचं वझं आपल्या पोराइच्या अधारानं हलकं व्हईल, हे वझं पेलाले आपल्या लेकरांचा आपल्याले चुंभळीसारख्या अधार व्हईल म्हणून तिचं एकलकोडे मन पुढच्या आशेवर झुकल्यागत व्हायचं."[6] पण तिच्या आशेची निराशा झाली. ज्या कामाने तिचा नवरा मरण पावला होता तेच वच्छी नावाची मुलगी, यशवंता नावाच्या पोरासोबत मध्यरात्री सामसुम झाल्यावर अंगावरच्या कपड्यानिशी पळून गेली तेव्हाही तिला खूप दुःख झाले.

अशाप्रकारे या कथासंग्रहातील ग्रामीण जीवनातील दाही दिशा दुःखाने काळवंडलेल्या, झाकोळलेल्या जाणवतात. कोठेही सुखाचा छोटासा किरणही दिसत नाही.

ग्रामसंस्कृतीच्या परिवर्तनाच्या कथा

मुलीच्या लग्नाची चिंता नसलेला बाप क्वचितच आढळेल. मग तो शहरात राहणारा असो किंवा खेड्यात राहणारा असो. मुलीचा जन्म होणे म्हणजे महापाप होणे. मुलगी जन्माला येणे म्हणजे नरकद्वार उघडे करून घेणे अशी समजूत होती; पण 'घोर' या कथेमध्ये आबा नावाचा ग्रामीण शेतकरी जुन्या विचारांवर मात करतो आणि आपल्या एकुलत्या एक मुलीचे लग्न करण्यासाठी शेत विकणार असतो; पण त्याच्या गावाला येणाऱ्या सडकेमध्ये त्याची शेती जाणार हे निश्चित होतं. सडकेत जाणाऱ्या शेताचे पैसे सरकारकडून मुलीच्या लग्नाआधी मिळणार नाही या विवंचनेत तो असतो. तेव्हा "याच्यामधून आता काईतरी उपाव निघनंच. तुमी काव्हून असा जिवाचा खकाना करता त्यासाठी आपली लेकं का कुवाऱ्या राती जन्माला आली का. तिच्या तकदिरात खांदा कोनी असनं."[7] अशी सान्त्वना त्याची पत्नी बयाबाई देते. मुलीच्या वाढत्या वयाचा विचार करून आबा आपल्या पोरीच्या लग्नासाठी आपले बैल नरखेडच्या बैलबाजारात विकायला नेतो. अशाप्रकारे 'घोर' ही कथा एका मुल्यबदलाची सुसंस्कृतीच्या परिवर्तनाची कथा आहे.

माणसे प्राण्यांशी संवाद साधणारी

माणूस दुःखी झाला की, दुःख वाटून घेणारा कुणीतरी शोधत असतो. 'दाही दिशा' कथासंग्रहातील माणसांच्या वाट्याला आलेले दुःख ते प्राण्यांजवळ व्यक्त करताना दिसतात. बाब्या (ससा), शिवराम (मोर्चा) यांना जीवनातील एकाकीपणाची व्यथा छळत असते. ह्या कथा अस्तित्ववादाशी नातं जुळण्याचा भास निर्माण करतात. 'मोर्चा'मधील शिवराम नागपूर पाहण्याच्या व मजूरीही मिळेल या उद्देशाने नागपूरला मोर्चामध्ये आपल्या मुलीसोबत जातो. मोर्चावर दगडफेक होते व त्याचा हात पकडून असलेली त्याची लहान मुलगी हरवते. तो तिला शोधतो पण ती भेटत नाही. आपली एकूलती एक मुलगी मोर्चात हरवल्यानं शिवरामच्या आयुष्यात आलेली पोकळी, एकाकीपणा त्याला असह्य

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

होतो आणि आपल्या मनाची व्यथा तो एका कुत्र्याच्या पिलाला पोटाशी घेऊन व्यक्त करतो. "माही सुशी कुठी गेली बाप्पाऽ तू तरी सांग राजा माही पोरगी कुठी हारोली?"[8] ही विवंचना समजल्यागत ते पिलूही त्याचं मुकपणानं दुःख आपल्या ओल्या डोळ्यांनी त्याच्याकडे पाहत त्याला चाटत राहतो.

'ससा आणि सर्कस' मधील बाब्या हा पाच सहा वर्षाचा पण नीट बोलता न येणारा, समजही कमी असलेला. तो माणसांशी नातं जोडू शकत नाही तेव्हा तो मुक्या प्राण्यांशी मनाचे संवाद साधतो. त्याने एक ससा पाळलेला असतो त्याला सजवायचं, घुंगरू बांधायचे, सशाबरोबर आपणही चित्रविचित्र हावभाव करून नाचायचं हा बाब्याचा खेळ होता. वेडाबावडा बाब्या असाच माणसापासून, कुटुंबापासून तुटलेला, दुरावलेला म्हणून सशाशी संवाद साधतो. त्याच्या सहवासात स्वतःचा आनंद शोधतो आणि ससा मरताच तो स्वतःपासून तुटतो. अशाप्रकारे 'ससा आणि सर्कस' मधील बाब्या मोर्चामधील शिवराम हे प्राण्यांशी संवाद साधताना दिसतात. खरे तर कुणाशीच संवाद न साधू शकणारी, बाब्या, शिवरामसारखी साधी, सरळ व भाबडी माणसे प्राण्यांशी संवाद साधतात आणि जगाच्या दृष्टीने मात्र वेडी–खुळी ठरतात.

समारोप

रवीन्द्र शोभणे यांचा 'दाही दिशा' हा ग्रामीण कथांचा संग्रह आहे. ग्रामीण जीवनातील लोकांचे दुःख त्यांचे दारिद्र्य, त्यांच्या अंधश्रद्धा, अन्न, वस्त्र, निवाऱ्याचा प्रश्न या बाबींचे चित्रण करणारा आगळा–वेगळा कथासंग्रह आहे. कथांची शिर्षकेच जरी पाहिलीत तरी त्या कथासंग्रहाची उंची त्यांचा मोठेपणा पटकन आपल्या लक्षात येते. ग्रामीण जीवनातील कोवळे वेधक अनुभव या कथासंग्रहामध्ये कथाकारांनी मांडले आहे. रवीन्द्र शोभणे यांनी ग्रामीण जीवनातील माणसांचे अंतरंग या कथासंग्रहात प्रकट केले आहे. त्यांनी अंतरंगाच्या संमीत्र भावनांचे रेखाटन केले आहे. त्यात पूर्वीच्या ग्रामीण कथात येणारे पाटील व त्याचे अत्याचार हाच विषय नसून विविध विषय आहेत. या कथांमधील ग्रामीण जीवनातील दाही दिशा दुःखाने काळवंडलेल्या झाकोळलेल्या जाणवतात. कोठेही सुखाचा छोटासा किरण अगदी तिरपाही दिसत नाही. "डॉ. रवीन्द्र शोभणे हे कथेला आपल्या पद्धतीने फुलवितात व एकदम वेगळी कलाटणी देतात. ग्रामीण माणसामधील विविधता त्यांचे धारिष्ट्य, बदलत्या काळाबरोबर तरुणांना बदलायचे आहे तर म्हातारे रूढी तोडायला तयार नाहीत केवळ दारिद्र्यामुळे त्यांच्या नशिबी भोग येतात. त्यांची मनातील व शारीरिक कुतरओड होते. ताणतणाव निर्माण होतात. त्यांच्या मनाची अस्वस्थता, व्यथा, संघर्ष, प्रेमसंबंध, विवाहबाह्य संबंध या साऱ्यांचे चित्रण करण्यात शोभणे यशस्वी झाले आहेत."[9]

अशाप्रकारे 'दाही दिशा' या कथासंग्रहाचे अंतरंग ग्रामीण जीवनातील माणसांच्या व्यथा, वेदना, दारिद्र्य, दुःख, ग्रामसंस्कृती, मनाची असह्यता, आत्मभान, माणसांची पार्थिवता यामधून दिसून येते.

निष्कर्ष

1. 'दाही दिशा' कथासंग्रहातील कथा विदर्भातील ग्रामीण जीवन सजीव करणाऱ्या आहेत.
2. ग्रामसंस्कृतीचे परिवर्तन कथेतून मांडले आहे.
3. माणूसकीचं दर्शन व्यक्तिरेखांमधून होते.
4. 'स्व' अनुभूतीमुळे जगाशी झुंज देण्याची प्रेरणा कथेतून मिळते.
5. कथेतील माणसे प्राण्यांशी संवाद साधणारी आहेत.

सहाय्यक प्राध्यापक
ज्यो महाविद्यालय
बल्लारपूर

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

6. माणसांची पार्थिवता अधोरेखित करणाऱ्या कथा आहेत.

संदर्भ ग्रंथ

1. रवींद्र शोभणे, 'दाही दिशा', पुणे, 1994, पृ. 11.
2. तत्रैव, पृ. 10.
3. तत्रैव, पृ. 16.
4. तत्रैव, पृ. 123.
5. तत्रैव, पृ. 110.
6. तत्रैव, पृ. 56.
7. तत्रैव, पृ. 84.
8. तत्रैव, पृ. 124.
9. तत्रैव, प्रस्तावनेतुन.
10. म्हैस्कर सरोज, दै. गावकरी, दिनांक 25.12.1994.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

5.2

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

AJANTA

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur



सहाय्यक प्राध्यापक
म. ज्यो. फुले महाविद्यालय
बल्लारपूर

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - III

Impact Factor / Indexing
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta
Prakashan

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - III January - March - 2019

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

CONTENTS OF MARATHI PART - III

अ.क्र.	लेख आणि लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
२६	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जीवनवादी नाट्यसमीक्षा **डॉ. सतीश पावडे**	१३६-१३९
२७	दलित साहित्यावरील डॉ. भालचंद्र फडके यांची समीक्षा **प्रा. डॉ. अरुण व्ही. लाडे**	१४०-१४५
२८	दलित समीक्षेच्या विकासाचे शिल्पकार : म. ना. वानखडे, बाबुराव बागुल, भालचंद्र फडके, रा. ग. जाधव, गंगाधर पानतावणे, यशवंत मनोहर **प्रा. बादलशाहा डोमाजी चव्हाण**	१४६-१४८
२९	दलित साहित्य समीक्षा **प्रा. डॉ. अशोक पाठक** **शरद ठाकर**	१४९-१५२
३०	जाहिरात लेखन एक चिंतन आणि मुल्यमापन एक विचार **प्रा. डॉ. कोतमे धिरजकुमार सत्यलाल**	१५३-१५६

सहाय्यक प्राध्यापक
म. ज्यो फुले महाविद्यालय,
बल्लारपूर

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

२८. दलित समीक्षेच्या विकासाचे शिल्पकार : म. ना. वानखडे, बाबुराव बागुल, भालचंद्र फडके, रा. ग. जाधव, गंगाधर पानतावणे, यशवंत मनोहर

प्रा. बादलशाहा डोमाजी चव्हाण
मराठी विभाग, म. जोतिबा फुले महाविद्यालय, बल्लारपूर, जि. चंद्रपूर.

दलित साहित्य हा साठोत्तरी कालखंडातील जिवंत असा प्रभावशाली वाङ्मय प्रवाह आहे. या प्रवाहाने घवघवित यश संपादन करून मराठी वाङ्मयात भर घातली आहे; त्याला समृद्ध केले आहे. "दलित साहित्य माणसाच्या शोषणाचे आणि त्याच्या लक्तरलेल्या आयुष्याचे वस्तुनिष्ठ दर्शन घडविले. साहित्याच्या प्रकृतीकडे दलित साहित्य घेऊन जाते आणि माणसाच्या मनात नव्या आकाक्षांची पेरणी करते."[१] हे साहित्य मानवी जीवनातील वास्तव प्रश्नांची दखल घेते. मनुष्याच्या शोषणाची मांडणी करून त्याविरूद्ध बंड करण्याचे धाडस निर्माण करते त्यामुळे ख-या अर्थाने हे साहित्य जीवनवादी ठरते.

१९६० नंतर दलित साहित्य प्रवाहांतर्गत कविता, कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथन इत्यादी साहित्य प्रकारातून साहित्यनिर्मिती झाली तशीच ह्या साहित्य निर्मितीची समीक्षाही होऊ लागली. दलित समीक्षेचा आरंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनात दिसतो. "साहित्य समीक्षा म्हणजे साहित्यावरील भाष्य होय. ते लिखित रूपात व नंतर मुद्रित रूपात अवतरल्यानंतर समाज त्याची दखल घेत असतो. परंतु व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्रे, अधिवेशने, मेळावे, संमेलने ह्यांच्याशी संबंधित वक्ते आपल्या वकृत्वातून जी साहित्य समीक्षा करीत असतात ती मौखिक स्वरूपाची असल्याने जरी ती हवेत विरणारी असली, तरी तिचे महत्त्व कमी असते असे नाही. अशा प्रकारच्या मौखिक स्वरूपातील दलित साहित्य समीक्षेचे आरंभकर्ते दुसरेतिसरे कोणी नसून स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे."[२] दमदार व समाजप्रबोधनपर साहित्य कसे असावे याची प्रचिती डॉ. आंबेडकरांच्या विचारांतून आणि साहित्यातून होते.

दलित साहित्याची समीक्षा करणारे अनेक समीक्षक आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात फक्त म.ना. वानखेडे, बाबुराव बागूल, भालचंद्र फडके, रा.ग. जाधव, गंगाधर पानतावणे आणि यशवंत मनोहर यांच्या समीक्षेची मांडणी केली आहे. म.ना. वानखेडे यांनी 'दलितांचे विद्रोही वाङ्मय' ह्या पुस्तकातून समाजशास्त्रीय समीक्षा मांडली आहे. "खरे म्हणजे सौंदर्य ही सापेक्ष कल्पना आहे. ते निरंतर किंवा चिरंजीव सत्य आहे

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

असे मला वाटत नाही. सौंदर्याच्या कल्पना त्या-त्या युगातील विचारांशी संबंधित असतात. एके काळी राजे महाराजे हेच साहित्याचे विषय असत. बहुजन समाजातील लोक चालत नसत; पण आज साहित्य वरिष्ठ वर्गाकडून कनिष्ठ वर्गाकडे चाललेले आहे. गावकुसाबाहेरील, झोपडपट्टीतील जीवन साहित्याचे विषय होऊ लागले आहे. म्हणूनच आता सौंदर्याच्या कल्पना बदलणे जरूरीचे आहे."[३] म.ना. वानखेडे यांनी मांडलेले विचार हृदयस्पर्शी आहेत. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या सूत्रांचा अवलंब करून साहित्य समीक्षा केलेली आहे.

बाबुराव बागूल यांनी 'दलित साहित्य: आजचे क्रांतीविज्ञान' या समीक्षा ग्रंथातून दलित साहित्याची चिकित्सा केलेली आहे. "बाबुरावांचे चिंतन स्वतःचे, त्यांची विचार करण्याची पद्धत स्वतःची आणि त्यांची तत्त्वज्ञ भाषाशैलीही स्वतःची!"[४] एका समीक्षकाने दुस-या समीक्षकाविषयी काढलेले गौरवोद्गार ही बागूलांच्या समीक्षेची पावतीच आहे. भालचंद्र फडके हे दलित साहित्याचे खंदे पुरस्कर्ते होते. त्यांनी 'दलित साहित्य: वेदना आणि विद्रोह', 'दलित साहित्याची प्रकाशयात्रा', 'फुले-आंबेडकर: शोध आणि बोध', 'डॉ. आंबेडकर आणि दलित साहित्य' इत्यादी पुस्तके लिहिलेली आहेत. त्यातून त्यांनी साहित्यविषयक चर्चेसोबतच दलित साहित्याचे महत्त्व आणि समाजशास्त्रीय समीक्षेची मांडणी केलेली आहे.

रा.ग. जाधव यांच्या नावावर 'निळी पहाट', 'निही क्षितिजे', 'तृतीया' आणि 'साहित्य आणि सामाजिक संदर्भ' इत्यादी पुस्तके आहेत. त्यातून त्यांनी समाजशास्त्रीय समीक्षेची मांडणी केली आहे. "प्रा. रा.ग. जाधवांनी आंबेडकरवादी कलाकृतीची उत्कृष्ठ अशी सौंदर्यग्रहणे केली. ती मराठी समीक्षेत सर्वार्थांनी अनन्यसाधारण आहेत. इतकी मर्मग्राही, काव्यपूर्ण आणि विचार प्रवृत करणारी सौंदर्य समीक्षा मराठीतही दिसत नाही."[५] जाधवांची समीक्षा कलावादाकडे न झुकता जीवनवादी बनली आहे. ती दलित समीक्षेला उंच शिखरावर नेणारी आहे.

गंगाधर पानतावणे यांनी मोठ्या प्रमाणात समीक्षा लिहिलेल्या आहेत. त्यांची 'मूल्यवेध', 'विद्रोहाचे पाणी पेटले आहे', 'दलितांचे प्रबोधन', 'वादळांचे वंशज', 'प्रबोधनाच्या दिशा', 'पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर', 'हलगी', 'चैत्य', 'लेणी', 'साहित्य: प्रकृती व प्रवृती', 'विद्रोह, विज्ञान, विश्वात्मकता', 'आंबेडकरी जाणिवांची आत्मप्रत्ययी कविता' इत्यादी पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. यशवंत मनोहर हे दलित समीक्षासृष्टीतील एक तोलामोलाचे नाव आहे. त्यांनी 'दलित साहित्य : सिद्धांत आणि स्वरूप', 'स्वाद आणि चिकित्सा', 'निबंधकार डॉ. आंबेडकर', 'दलित साहित्य चिंतन', 'आंबेडकरवादी आस्वादक समीक्षा', 'समाज

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule

आणि साहित्यसमीक्षा', 'मराठी कविता आणि आधुनिकता', 'आंबेडकरी चळवळ आणि साहित्य', 'परिवर्तनवादी जीवनमूल्ये आणि वाङ्मयीन मूल्ये', 'आंबेडकरवादी मराठी साहित्य', 'युगसाक्षी साहित्य', 'नवे साहित्यशास्त्र', 'बौद्ध संस्कृती आणि साहित्य', 'साहित्य आणि समाजक्रांती', 'इहवादी साहित्याची पूर्वदिशा' इत्यादी पुस्तकातून आंबेडकरवादी सौंदर्यशास्त्राची मांडणी केली आहे. "सौंदर्यशास्त्रातील लौकिकतावाद आणि अलौकिकतावाद यांच्या संदर्भातील मनोहरांचा आक्षेप अत्यंत मुलभूत आहे. त्यांच्या मते प्रश्न समीक्षक स्विकारणे, त्या मूल्यभावाचा आहे. प्रतिगामी मूल्यभाव पुरस्कारणारा अलौकिकतावाद या दोन वस्तुस्थितीमध्ये भेदरेषा काढता येत नाही."[६] हे यशवंत मनोहरांचे विचार यथायोग्य आहेत. जीवनमूल्य आणि सौंदर्यमूल्य हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. ते नाणे आहे समीक्षेचे. हे नाणे चकाकते ठेवल्याचे काम मनोहरांनी मोठ्या खुबीने केलेले आहे.

दलित साहित्य हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानातून आणि आंदोलनातून जन्माला आलेले आहे. ह्या साहित्याची पाठराखण दलित समीक्षेने केलेली आहे. म.ना. वानखेडे, बाबुराव बागूल, भालचंद्र फडके, रा.ग. जाधव, गंगाधर पानतावणे आणि यशवंत मनोहर यांनी दलित समीक्षेला उंच शिखरावर पोचविले. त्यामुळे त्यांना दलित समीक्षेच्या विकासाचे शिल्पकार म्हणणे योग्य ठरते. समीक्षक हा साहित्याचा मार्गदर्शक असतो. तो साहित्याला दिशा दखवितो. प्रस्तुत समीक्षकांनी दलित साहित्यातील वास्तवाची मांडणी करून दलित समीक्षेच्या इतिहासात मानाचे स्थान मिळविले आहे.

संदर्भ ग्रंथ

1. फडकुले निर्मलकुमार, 'दलित साहित्याची संकल्पना', ले. जयवंत व्हटकर, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि., पुणे, २००६, प्रस्तावनेतून.
2. लिंबाळे शरणकुमार (संपा.), 'शतकातील दलित विचार', दिलीपराज प्रकाशन प्रा.लि., पुणे, २००१, पृ. ८८.
3. वानखेडे म.ना., 'दलितांचे विद्रोही वाङ्मय', प्रबोधन प्रकाशन, नागपूर, १९८१, पृ. ८१.
4. मनोहर यशवंत, 'आंबेडकरवादी मराठी साहित्य', भीमरत्न प्रकाशन, नागपूर, १९९९, पृ. २८४.
5. तत्रैव, पृ. २८६.
6. मनोहर यशवंत, 'दलित साहित्य चिंतन', संघमित्रा प्रकाशन, नागपूर, १९८८, पृ. ३५.

सहाय्यक प्राध्यापक
म. ज्यो. फुले महाविद्यालय.

Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

AJANTA



Volume-VIII, Issue-IV
October - December - 2019
Part - I
Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

AJANTA

Volume - VIII Issue - IV October - December - 2019

PART - I

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

CONTENTS OF PART - I

अ.क्र.	लेख आणि लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
१५	वैदर्भीय काव्यप्रवाहाचा स्वातंत्र्यपूर्व वामङ्यीन वारसा **डॉ. जयश्री शास्त्री**	८१-८६
१६	वैदर्भीय नव्वदोत्तरी मराठी कविता **प्रा. डॉ. भूषण रामटेके**	८७-९२
१७	विदर्भातील निवडक लेखिका **डॉ. पद्मरेखा धनकर**	९३-९७
१८	विदर्भातील आदिवासींची राजकिय व सामाजिक जागृती **प्रा. डॉ. संजय गोरे**	९८-१०२
१९	विदर्भातील आदिवासी कवितेतील मातृदर्शन **डॉ. प्रवीण व. काळे**	१०३-१०६
२०	वारकरी संप्रदाय आणि वं. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज **राजेंद्र आ. मालेकर**	१०७-१११
२१	विदर्भाची दंडार **डॉ. मधुकर व्ही. नंदनवार**	११२-११६
२२	नक्षलवादी चळवळीचा प्रभाव आणि वैदर्भीय मराठी आदिवासी कादंबरी **डॉ. विजय रैवतकर**	११७-१२४
२३	वैदर्भीय साहित्यसमीक्षक : डॉ. आशा सावदेकर **प्रा. डॉ. विजय रूपराव राऊत**	१२५-१२९
२४	एक परिवर्तनवादी : वैदर्भीय संत गाडगेबाबा **प्रा. डॉ. संतोष देठे**	१३०-१३४
२५	'वर्तमान' कथासंग्रहाचे स्वरूप **प्रा. बादलशाहा डोमाजी चव्हाण**	१३५-१३७
२६	विदर्भातील मराठी वीरशैव साहित्य व साहित्यिक **प्रा. डॉ. प्रवीण कारंजकर**	१३८-१४२
२७	वैदर्भीय लोककला (डाहाका) **प्रा. सतीश एस. कर्णासे**	१४३-१४७
२८	कवी अनिल : जीवन आणि काव्य **डॉ. सुदर्शन दिवसे**	१४८-१५२

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

VOLUME - VIII, ISSUE - IV – OCTOBER - DECEMBER - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

२५. 'वर्तमान' कथासंग्रहाचे स्वरूप

प्रा. बादलशाहा डोमाजी चव्हाण
मराठी विभाग, म.जो. फुले महाविद्यालय, बल्लारपूर, जि. चंद्रपूर.

मराठी कथेच्या विकासात विदर्भातील कथालेखकांचे मोठे योगदान आहे. त्यांपैकी एक दमदार कथालेखक म्हणून रवींद्र शोभणे यांचे नाव घ्यावे लागते. मराठी कथेकडे वाचकांचे लक्ष वेधण्याचे काम त्यांच्या कथेने केले. 'वर्तमान' (१९९१) हा त्यांचा पहिला कथासंग्रह आहे. नावाप्रमाणे वर्तमान स्थितीची जाणीव करून देणारा एक कसदार कथासंग्रह आहे. प्रत्येक व्यक्ती आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक व्यवस्थेपासून अलिप्त राहू शकत नाही. उलट तो व्यवस्थेच्या जाळ्यात गुरफटत जातो. त्याच्या गुरफटण्याचा शोध हा 'वर्तमान' कथासंग्रहातील कथांचा विषय आहे.

रवींद्र शोभणे यांच्या 'वर्तमान' कथासंग्रहाचे स्वरूप निराळे आहे. कथेचा आशय, विषय, अभिव्यक्ती वेगळी आहे. "एका अशक्त झालेल्या वाङ्मयप्रकाराला पुन्हा सशक्त करणारा एक डॉक्टर मिळाला आहे. रवींद्र शोभणे यांच्या रूपाने."[१] हे सत्य आहे. त्यांनी ग्रामीण भागातील अस्सल अनुभवासोबतच शहरातील व्यामिश्र अनुभव तेवढ्याच ताकदीने मांडले आहे. त्यातून मानवी नात्याच्या गुंतागुंतीचा शोध घेतलेला आहे.

राजकारणप्रधान कथा

मराठी साहित्यजगतात राजकीय नाटक, कादंबऱ्याप्रमाणे राजकीय कथाही लिहिल्या गेल्यात. 'वर्तमान' कथासंग्रहातील कथा राजकारणाचा वेध घेणाऱ्या आहेत. "तत्त्वापेक्षा व्यवहाराचा विजय होतो नेहमीच. व्यवहार शिक, अरे, शेवटी आपला समाजच आपल्याला मोठा करतो. कोणताही माणूस हा समाजाला मोठा करीत नाही."[२] असे आजच्या काळातील राजकारणाचे रेखाचित्रण 'पायरीचा दगड' या कथेमध्ये येते. राजकारणात चालणाऱ्या धुमाळीचा उल्लेख शोभणेंनी कथेत केलेला आहे.

स्त्री–पुरूष संबंधातील गुंतागुंत

रवींद्र शोभणे यांनी स्त्री–पुरूष संबंधातील गुंतागुंत 'न सापडलेलं उत्तर', 'आपुले मरण' आणि 'इस शहर मे...' ह्या कथांमधून व्यक्त केलेली आहे. ह्या कथांमध्ये कधी स्वतंत्रपणे तर कधी कथानकाशी समरस होणारे प्रेम मांडले आहे.

वृत्तपत्रीय विश्वाचा नि:सत्त्व निर्जीवपणा

आजच्या वृत्तपत्रिय विश्वाचा नि:सत्त्व निर्जीवपणा व्यक्त करणाऱ्या 'सत्य', 'हकनाक', 'आपुले मरण' ह्या कथा आहेत. या कथांमधून आजच्या युगात वृत्तपत्र हे मानवी समस्या दुर करणारे की मानवालाच समस्या बनवणारे? असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. "'सत्य' या कथेत पत्रकारितेचा अनुभव आहे. जेंव्हा जेंव्हा लेखक नसलेला पत्रकार अनुभव लिहितो तेंव्हा तो अनुभवाच्या पातळीवर राहतो; पण जातिवंत लेखक, त्याची चांगली कथा करू शकतो. रचनाचातुर्य, उत्कंठा, गुंफण, धक्का आदी सर्व या कथेत आहे; पण त्या कथेतून माणूस साकार होतो."[३] वर्तमानपत्रांच्या जगात कित्येकदा प्रबळ व्यवस्थेच्या विरोधात जाण्याचा एखाद्या

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

पत्रकाराचा प्रयत्न कसा विफल ठरतो याचे दर्शन 'सत्य' या कथेतून घडते. प्रस्तुत कथा वर्तमानपत्रात काम करणाऱ्या माणसांच्या अन्यायाला वाचा फोडणाऱ्या आहेत. या कथांतून वृत्तपत्रिय विश्वाचा नि:सत्त्व निर्जीवपणा उघडकीस येतो.

कथांचे केंद्रस्थान

'वर्तमान' कथासंग्रहातील कथांचे केंद्र मध्यमवर्गीय माणसांचे जीवन हेच आहे. मध्यमवर्गीय माणसाला जगताना किती कठीण समस्यांना तोंड द्यावे लागते हे कथांमधून शोभणेंनी दाखविले आहे. "सद्य! स्थितीतील सामान्य माणसाच्या जीवनातील व्यामिश्रता आणि समाजसापेक्ष जटिलता याचा निर्मितीच्या पातळीवर शोध घेणे हे शोभणे यांच्या लेखनाचे सुत्र आहे."[४] ह्या कथा सर्वसामान्य माणसांच्या मनाचा वेध घेणाऱ्या आहेत. जीवनात आलेल्या संकटांना न घाबरता त्यावर मात करून ताठ मानेनं माणसाने जगावे हा संदेश प्रस्तुत कथांच्या माध्यमातून मिळतो.

वर्तमान वास्तव दाखविणारा कथासंग्रह

एखादा विद्यार्थी, विद्यार्थी जीवनात चळवळ्या असतो. तो जनतेच्या हिताचे कार्य करण्यास धडपडतो; पण येथील व्यवस्था मात्र त्याला संपविण्याचा प्रयत्न करते. हे वास्तव शोभणेंनी आपल्या कथेत मांडले आहे. सुधीर सातपुते हा विद्यार्थी भाषणात म्हणतो, "मित्रहो... आपल्या समाजाला सरकार दरबारी, नोकरभरतीमध्ये आरक्षण मिळावं, आपल्या समाजातल्या मुलांना शालेय जीवनात शैक्षणिक शिष्यवृत्ती मिळावी, याकरता आपण सरकारकडे विनंती अर्ज करणार आहोत."[५] आपल्या समाजाचे हित रक्षण करणाऱ्या सुधीर सातपुतेची बाळासाहेबांकडून हत्या होते. आजही आपल्याला समाजात अशा घटना घडतांना दिसतात. एखादा व्यक्ती घटनेची सत्यता उघडकीस आणण्याचा प्रयत्न करतो तेंव्हा त्याला वाईट अनुभव येतो हे वर्तमान वास्तव शोभणेंनी कथेत मांडले आहे.

दु:खाचं उदात्तीकरण करणारी पात्रे

'वर्तमान' कथासंग्रहामध्ये आलेली सर्व पात्रे स्वत:च्या वाट्याला आलेल्या दु:खाच उदात्तीकरण करून जगू पाहतात. भावनिक आधार, स्वतंत्र अस्तित्त्व, निखळ मैत्री असे स्वत:च्या मनाचे समर्थनासाठी आधार उभे करून, विवाहबाह्य संबंधात गुरफटतात. त्यांना वैवाहिक बंधनाची सुरक्षितता हवी असते आणि बंधणापलीकडचे स्वैर बंधनही हवे असते. समाजात उभी—आडवी विणलेली कौटुंबिक चौकट, त्यांच्या अंतर्मनातील स्वातंत्र्याला थोपवते. त्यामुळे ही चौकट वापरण्याच्या अबोल मानसिकतेतून विवाहबाह्य स्त्री—पुरूषाचे संबंध आकार घेतात; पण ह्या चौकटीबाहेर जाण्याची हिंमत ते करताना दिसत नाहीत.

प्रतिमांचा वापर

रवींद्र शोभणे यांनी आपल्या विधानांच्या स्पष्टीकरणासाठी अनेक प्रतिमांचा वापर केलेला आहे. "गुलाबाच्या पाकळीसारखा तिचा नाजूक तळवा तिनं सुधीरच्या खरचटलेल्या, राकट तळव्यावर ठेवला आहे."[६] अशी कल्पना गाडीमध्ये बसलेला सुधीर सातपुते करतो. "पक्षिणीच्या पिलाला पंख फुटले होते. त्याला आपलं घरटं अपुरं वाटत होतं. जुन्या घरट्याला तो विसरला होता."[७] अशी काव्यमय प्रतिमा सुधीर सातपुतेविषयी वापरलेल्या आहेत. शोभणेनी प्रतिमांचा अनुभवाच्या प्रकृतीनुसार चपखल वापर करून कथेच्या मुळ वातावरणाला आणि आशयाला अधिकच अर्थपूर्ण केले आहे.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

पारंपरिक कथेपेक्षा निराळे स्वरूप

'वर्तमान' कथासंग्रहाचे स्वरूप पारंपरिक कथेपेक्षा निराळे आहे. कथांचा आशय वेगळा आहे. त्यांचे स्वरूप मध्यमवर्गीय जीवनाचे वर्तमान शोषणाच्या समाजाचे आहे. त्यात मध्यमवर्गीय जीवनाचे प्रतिबिंब दिसते. त्यांचे जीवन, त्यांच्यावरील अन्याय–अत्याचार, त्यांचे कुटुंब, शिक्षणरचना, राजकारणामुळे त्यांची झालेली वाताहत हे सगळे वाचकांना अस्वस्थ करते. माणसांच्या मनात अनेक प्रश्न यामुळे उपस्थित होतात.

'वर्तमान' कथासंग्रहाचे स्वरूप वेगवेगळ्या पातळीवरचे आहे. अस्वस्थता, परिणामकारकता, ठसठशितपणा, चिंतनशिलता, वास्तव जीवनदर्शन, अगतिकता इत्यादीमुळे रवींद्र शोभणेंचे कथा वेगळी वाटते.

समारोप

विदर्भात गेल्या अनेक वर्षात मराठी कथेची भरभराट झाली त्यात रवींद्र शोभणे यांची कथा मैलाचा दगड ठरली. त्यांच्या 'वर्तमान' कथासंग्रहातील आठही कथा वर्तमान स्थितीवर प्रहार करणाऱ्या आहेत. माणसांच्या अस्तित्वाचा सखोल शोध घेणाऱ्या ह्या कथा वाचणीय आणि जीवनातील अनेक समस्यामुळे वाचकांना अंतर्मुख करतात. तेथील नायिका वेगवेगळ्या प्रवृत्तीच्या तर नायक जीवनात संघर्ष करणारा आहे. त्यांनी कथेतून मध्यमवर्गीय माणसाची वर्तमान स्थिती सांगण्याचा प्रयत्न केला आहे. शोभणेंच्या कथांचा आशय आणि त्यांची भाषा वेगळ्या स्वरूपाची आहे. त्यांच्या कथांमध्ये ठसठशित व्यक्तिचित्रण, मध्यमवर्गीयांचे जीवनदर्शन इत्यादी गुण आहेत. त्यांच्या कथेचे स्वरूप हे मराठीतील सामाजिक कथांच्या जवळचे आहे.

निष्कर्ष

१. 'वर्तमान' कथासंग्रहातील कथा राजकारणप्रधान आहेत.
२. स्त्री–पुरूष संबंधातील गुंतागुंत कथांमध्ये आलेली आहे.
३. वर्तमानपत्राच्या कार्याविषयी कथेतून प्रश्न उपस्थित केला आहे.
४. आधुनिक युगातील विद्यार्थ्यांचे चित्रण आलेले आहे.
५. कथांमध्ये काव्यमय प्रतिमाचा वापर केलेला आहे.
६. 'वर्तमान' कथासंग्रहातील कथांचे स्वरूप निराळे आहे.

संदर्भ ग्रंथ

१. जोग वि.स., 'युगवाणी', नागपूर, मे–जून १९९३, पृ. ४६
२. शोभणे रवींद्र, 'वर्तमान', मुंबई, जुलै १९९१, पृ. १४
३. उनि., पृ. ४७
४. उनि., मलपृष्ठावरील मजकूर
५. शोभणे रवींद्र, 'वर्तमान', मुंबई, जुलै १९९१, पृ. ०६
६. तत्रैव, पृ. १६
७. तत्रैव, पृ. २१

सहाय्यक प्राध्यापक
म. ज्यो फुले महाविद्यालय,
बल्लारपूर

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

5.2

वर्ष १० वे
अंक - ४ था (जानेवारी ते मार्च - २०२०)

UGC CARE Listed Journal
ISSN 2231 - 573X

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

निकष

भाग - ३



संपादक
डॉ. शिवाजी हुसे
मराठी विभाग प्रमुख,
शिवाजी महाविद्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद.

सहाय्यक प्राध्यापक
म. ज्यो. फुले महाविद्यालय,
बल्लारपूर

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

UGC CARE Listed Journal
ISSN 2231 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

मध्ययुगीन मराठी साहित्याचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन विशेषांक

अंक - ४ था (जानेवारी ते मार्च - २०२०)

या अंकाचे संपादक

डॉ. शिवाजी हुसे
(मराठी विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद.)

डॉ. रामचंद्र झाडे
(मराठी विभाग, शिवाजी महाविद्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद.)

मार्गदर्शक

डॉ. विजय मोसले
(प्राचार्य, शिवाजी महाविद्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद.)

संपादक मंडळ

डॉ. सर्जेराव जिगे
डॉ. फुला बागुल
डॉ. अनिल गर्जे
डॉ. ताहेर पठाण
डॉ. वंदना महाजन
डॉ. प्रकाश खेत्री
प्रा. संजय भालेराव
डॉ. ममता इंगोले
डॉ. वामन जाधव
डॉ. यशवंत सोनुने

मूल्यमापन समिती

डॉ. एस. एम. कानडजे
डॉ. अशोक देशमाने
डॉ. दिलीप बिरुटे
डॉ. सुखदेव पोटदुखे

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातून अनुदान प्राप्त झाले आहे.
परंतू या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३. मो. ९४०४०००३९८

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

वर्ष - १० वे - अंक - चौथा - जानेवारी ते मार्च - २०२०
तिफण - ISSN 2231 - 573X

भाग - ३

अ.क्र.	लेख आणि लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
१३	शाहीर पठ्ठे बापूराव एक व्यक्तिमत्व : लावणीतील सौंदर्यस्थळे **डॉ. गायत्री गाडेकर**	६४-७५
१४	महाराष्ट्रातील सूफी संतांचे मराठी वाङ्मय : आकलन आणि अध्यापन **टकले गणेश प्रल्हादराव**	७६-८०
१५	महात्मा बसवेश्वर यांच्या लिंगायत धर्माचे तत्तवज्ञान व आचारसूत्रे **प्रा. डॉ. मारोती गायकवाड**	८१-८३
१६	महात्मा बसेवश्वरांचे धार्मिक सुधारणा संदर्भातील वचन साहित्य **प्रा. डॉ. बालाजी खराबे**	८४-८७
१७	अपेक्षित संत साहित्याचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन (अपेक्षित समाजातील संत हे वारकरी संप्रदायातील संदर्भासाठी घेतले आहेत) **डॉ. मारेवाड गणेश शिवाजी**	८८-९१
१८	वखर वाङमयाचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन **प्रा. डॉ. विजय पाटील**	९२-९५
१९	वचन साहित्यातील म. बसेवश्वरांचे क्रांतीकारी विचार **प्रा. डॉ. मदकुंटे पी. एम.**	९६-९९
२०	महानुभव साहित्य स्वरूप व रूपरेषा **डॉ. यशोद श्रीमंतराव पाटील**	१००-१०४
२१	स्त्रियांची सामाजिक स्थिती आणि संत कवयित्रींचे वाङ्मयीन कार्य **प्रा. डॉ. राजेंद्र रामकृष्ण सांगळे**	१०५-११३
२२	संतसाहित्याचे अध्ययन : विशेष संदर्भ (संत रामदास) **रंजना दत्तोपंतराव कुलकर्णी**	११४-११८
२३	मराठी शाहिरी वाङ्मयातील सांस्कृतिकता **प्रा. बादलशाहा डोमाजी चव्हाण**	११९-१२१
२४	शाहीर अनंत फंदी आणि परशराम यांच्या लावणीतून व्यक्त झालेले भाषिक सौंदर्य - एक अभ्यास **सहा.प्रा. संतोष लक्ष्मण राणे**	१२२-१३१

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

वर्ष - १० वे - अंक - चौथा - जानेवारी ते मार्च - २०२०
तिफण - ISSN 2231 - 573X

२३. मराठी शाहिरी वाङ्मयातील सांस्कृतिकता

प्रा. बादलशाहा डोमाजी चव्हाण
महात्मा जोतीबा फुले महाविद्यालय, बल्लारपूर, जि. चंद्रपूर.

प्रास्ताविक

मानव हा समाजशील प्राणी आहे. आपल्या जीवनात तो सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक आणि सांस्कृतिक ईत्यादी उपक्रम महत्वाचे मानतो. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक उपक्रमाचा अर्थाशी संबंध येतो तर साहित्य, कला, ज्ञान, नीती ईत्यादींचा सांस्कृतिक उपक्रमाशी सलोखा असतो. म्हणूनच मानवी जीवनात साहित्याला अतिशय महत्वाचे स्थान आहे. साहित्याप्रमाणेच भाषेचाही संस्कृतिशी जवळचा संबंध आहे. साहित्यातून संस्कृतीचे दर्शन घडते.

साहित्यातून संस्कृती जोपासली जाते. प्रत्येक गंभीर कृती, वाड्.मयीन कृती हा विशिष्ट युगाच्या प्रत्यक्ष ऐतिहासिक प्रक्रियेच्या व घटनेच्या प्रतिबिंबाचा दस्तऐवज असतो असे लेनिन यांनी म्हंटले आहे ते योग्यच आहे. अठराव्या शतकामध्ये संतकवी आणि पंडित कवींच्या कवितेक्षा स्वतंत्र स्वरुपाची दमदार कविता शहिरांनी लिहिली. त्यांनी आपल्या लेखणी व वाणीतून मनोरंजनाबरोबरच प्रबोधनही केले. त्यांनी आपल्या काव्यातून तत्कालीन सांस्कृतिक जीवनाचे विशेष मांडले. पेशवेकाळातील संपूर्ण घडामोडींचे साक्षीदार स्वत: शाहिर असल्यामूळे त्यांनी आपल्या काव्यात त्या काळातील सांस्कृतिक जीवन रेखाटलेले आहे.

राम जोशी, अनंतफंदी, सगणभाऊ, प्रभाकर, होणाजी बाळा, परसराम ईत्यादी शाहिरांनी आपल्या लेखणीतून आणि वाणीतून तत्कालीन समाजजीवनातील सण-उत्सव, वेगवेगळे कौटूंबिक विधीप्रसंग, समारंभ ते साजरे करण्याची पध्दत, मनोरंजनाचे प्रकार यासोबतच संगीत, नृत्य, गायन ईत्यादी कला जोपासलेल्या आहेत. यावरुन तत्कालीन सांस्कृतिकता शाहिरांनी जोपासली असे म्हणावे लागेल.

सण आणि उत्सव

शाहिरांनी अनेक कवने लिहिलेली आहेत. त्यात तत्कालीन सण आणि उत्सवाचे वर्णन आलेले आहे. दसरा, दिवाळी, नागपंचमी, रंगपंचमी, संक्रांत, गणेशोत्सव, रंगसमारंभ ईत्यादी सण-उत्सवाचे वर्णन शाहिरांनी केलेले आहे.

'पात्रा, नाटकशाळा वसंत चातुर्य पवाडी गवयी घाडी कीर्त करुन दाविती, रिझाविती आणून रसगोडी।।1

पेशवेकाळात गणेशउत्सवाप्रसंगी दहा दिवस विविध प्रकारचे कार्यक्रम चालत असायचे. त्यात कथा, किर्तन, गायन, वादन, नृत्य आणि सोंगाचे आयोजन करण्यात येत होते. अशाच एका उत्सवाच्या प्रसंगाचे वर्णन प्रस्तुत कवण्यातून सगणभाऊंनी केलेले आहे.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

रंगसमारंभ

शाहिरांनी आपल्या रचनांतून रंगपंचमी, रंगउत्सवाची वेगवेगळी वर्णने केलेली आहेत. त्यावेळी रंगसमारंभाप्रसंगी नृत्य, गायन, तमाशा, कुस्त्यांचे कार्यक्रम आयोजित करण्यात येत होते. रंगसमारंभात प्रत्येक व्यक्ती रंग खेळण्यात रंगायचा या प्रसंगाचे वर्णन होणाजी बाळा करतात -

'बंब रंगाचे भरुन ठेवले ठायी ठायी शहराभितरी
गुलाल हौद भरुनिया खूप कसले हत्तीवरती
तक्त राण्यावर पात्रा नाचती परोपरी
रंग भरुन पिचकाऱ्या घेतल्या सर्वांनी आपंल्या करी'2

रंगसमारंभाप्रसंगी रंगाची उधळण होत असे. लोक धुंदीतच रंगोत्सवात सहभागी होवून आनंद लुटायचे. संगीताच्या तालावर नाचायचे. 'पेशवाईतील रंगोत्सवात आनंदाला, उत्साहाला आणि जल्लोषाला भरते आणणारा असाच होता'3. पेशवे मनोरंजनाचे शौकीन होते. ते विविध समारंभात स्वत: सहभागी व्हायचे त्यामुळे शाहिरांना काव्य रचण्यास वाव मिळाला असे शाहिरांनी काव्यात नमूद केले आहे.

नृत्य आणि गायन

पेशवे काळातील काही मराठी राज्यकर्ते चैनी व विलासी जीवन जगत असल्यामुळे अनेक शाहिरांना, कलावंताना त्यांनी राजाश्रय दिला. त्यामुळे नृत्य आणि गायनाला खूप महत्व आले. सण, उत्सव व समारंभाप्रसंगी नृत्य आणि गायनाचे कार्यक्रम होत असायचे. शाहिर, गायक, नर्तिका पेशव्यांचा राजवटीत सक्रिय होत्या. त्यांना पेशव्यांकडून बक्षिसही मिळायची. सगणभाऊंनी एका उत्सवाचे वर्णन पुढीलप्रमाणे केलेले आहे.

'केले मोठे महोच्छाव खूब मोठया गजरातीचे
तज्हे तज्हेचे ख्याल तमाशे बहु होती दळभारात'4

तत्कालीन सांस्कृतिक जीवन समृध्द करण्यात शाहिरांचा सिंहाचा वाटा होता. "लोकजीवनातील विविध प्रसंग, समोर जीवावर उदार होऊन पराक्रम करणारे वीरपुरुष आणि आपल्या रुपगुणसौदर्याने मोह घालणाज्या रुपयौवना यांचे प्रेमोत्कट भाव; भोवतालच्या वातावरणातील रगेलपणा आणि रंगेलपणा व त्यातून प्रत्ययाला येणारे असंख्य प्रसंग या साज्यांच्या संस्कारातून शाहिरांची कविता जन्माला आली आहे."5 वेगवेगळया घटनाप्रसंगांना कवेत घेत शाहिरांनी आपले काव्य फुलविले दिसते. केवळ पेशव्यांनीच नाही तर दुसज्या सयाजीराव गायकवाड यांनी व छत्रपती शिवाजींनी शाहिरांच्या अनेक कलाना राजाश्रय दिला त्यामुळे त्याकाळातील सांस्कृतिक जीवनाला महत्व आले.

संगीत

शाहिरांनी जसे नृत्य आणि गायनाला महत्व दिले तसेच संगीतालाही महत्व दिले. संगीतातील निरनिराळे राग, सूर, विविध वाद्य यांचा उल्लेख शाहिरांच्या काव्यात आढळतो. शाहिरांनी आपल्या कवणातून सात राग आणि त्याचा गायकीतील परिणाम कथन केलेला आहे. त्यामूळे महाराष्ट्रातील संगीत शास्त्राचा परिचय होतो.

'ऐकून घ्यावी आता सांगतो उत्पन्न रागाची

सहाय्यक प्राध्यापक
म. ज्यो. फुले महाविद्यालय,
बल्लारपूर

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule

एका एका सहा कन्या छत्तीस रागिण्यांची
भ्रम युगात निद्रिस्त शिव तो एका समयाला
हृदयातुन हुंकार शब्द तो वदनास हो आला'6

शाहिर हैबती यांनी संगीत शास्त्रावर अनेक रचना केलेल्या आहेत. प्रस्तुत कवनातून स्वरांचा उगम कसा झाला. हे तो सांगतो. तत्कालीन संगीत विषयक संदर्भ हैबतीच्या कवनात आढळतात. सांस्कृतिक जीवनात नृत्य, गायन आणि संगीताला अतिशय महत्त्व आहे. त्यामुळे जीवनाला वेगळी कलाटणी मिळते. हिच कला शाहिरांनी जोपासली आहे.

जत्रा, यात्रा आणि उरुस

पूर्वीप्रमाणे आजही ग्रामीण भागामध्ये जत्रा, यात्रा आणि उरुस भरतात. यावरुन त्या-त्या काळातील धार्मिक व सांस्कृतिक जीवन लक्षात येते. शाहिरांच्या वाड्.मयात तसे उल्लेख आढळतात. ग्रामीण देवी-देवता, त्यांचा लोकांवरील प्रभाव, तेथील परंपरा त्यांच्या काव्यात डोकावतांना दिसतात. जत्रा-यात्रांतून तमाशाचे फड, कुस्त्यांचे फड आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजनाचा उल्लेख आढळतो. पीरांचा उरुस हा मुस्लिम बांधवांच्या जीवनात महत्वाचा आहे. उरुसप्रसंगी मुस्लिम बांधवांबरोबर हिंदू बांधवही बहुसंख्येने सहभागी होत. आजही ही प्रथा कायम आहे. सर्व जाती, धर्म, पंथांचे लोक जत्रा, यात्रा आणि उरुस ईत्यादी प्रसंगी एकत्रित येते. सांस्कृतिक दृष्टया जत्रा, यात्रा आणि उरुस यांना अतिशय महत्वाचे स्थान होते. याचा उल्लेख शाहिरांच्या वाड्र.मयात आढळतो.

मराठी शाहिरी वाड्र.मय हा सांस्कृतिक ठेवा आहे. शाहिरांनी आपल्या काव्यात समाजजीवनाचे चित्रण केले. त्यांच्या प्रेरणा स्वतंत्र आहेत. त्यांनी लावण्या, पोवाडे, कवणे रचली. शिवकाळ ते पेशवेकाळपर्यंत राजाश्रय मिळालेल्या शाहिरांनी आपले काव्य फुलविले आणि लोकांच्या मनोरंजनोसोबतच सांस्कृतिक ठेवा जोपासला. त्या काळातील सण-उत्सव, रंगसमारंभ, नृत्य आणि गायन, संगीत, जत्रा-यात्रा आणि उरुस, लग्नातील सजावट, हळद लावण्याचा प्रसंग, गमतीचे खेळ ईत्यादी वेगवेगळया विधि-प्रसंग ईत्यादींचे वर्णन त्यांच्या काव्यात आढळते. तत्कालीन सांस्कृतिक जीवनाचा परिपाठ जणू शाहिरांनी आपल्या काव्यातून सांगितला आहे.

संदर्भ ग्रंथ

1. चि.सी. जहागिरदार, सगणभाऊकृत लावण्या व पोवाडे, संपा. गो. गो. अधिकारी, सारस्वत प्रकाशन, पुणे, 1924, आ. 1, पृ. 41.
2. शं.तु. शालिग्राम, होणाजी बाळ यांच्या लावण्या, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, 1924, आ. 4, पृ. 193.
3. चंद्रकांत व्यवहारे, मराठी शाहिरी वाड्.मयाचे स्वरुप, विश्वभारती प्रकाशन, नागपूर, 1988, आ. 1, पृ. 106.
4. चि. सि. जहागिरदार, उणि., पृ. 41
5. ल. रा. नसिराबादकर, प्राचीन मराठी वाड्.मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, 1988, आ. 3, पृ. 228.
6. शाहिर हैबती, चरित्र आणि काव्य, संपा. वि.कृ. जोशी, संपदा प्रकाशन, पुणे, 1956, आ. 1, पृ. 34.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

RNI MAHMAR 35329-2010

ISSN- 2229-4929

Peer Reviewed

Akshar Wangmay

International Research Journal

UGC-CARE LISTED

Special Issue - I

Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation

January 2021









Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawansh

Executive Editor : Prof. Kartik R. Patil

Principal,
Rashtrasant Tukdoji College, Chimur
Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

Co-Editor : P. M. Rajurwade

Address
'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist- Latur 413515 (MS)

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

CONTENTS

Sr. No.	Paper Title	Page No.
1.	Cropping Pattern Analysis Using Remote Sensing Data and GIS **Dr. A . K. Wavare, Dr. S. D. Koli**	1-4
2	Role Of Krishi Vigyan Kendra In Women Empowerment **A. K. Wavare , G. G. Pawar**	5-9
3	Geographical Analysis of Changing Scheduled Caste rural and Urban Population Growth in Beed District **Dr. Chaudhari Prakash Hirachand.**	10-13
4	Design thinking for the Mitigation of Migrant workers' Problems during Pandemic Crises-A study **Rev. Fr. Dr. Thumma Fathima Reddy, Dr. Allam Joseph Praveen Kumar**	14-16
5	Shrimant Babasaheb Deshmukh Market Yard, Atpadi Pomegranate Trade **Shri. Dattatraya Dnyandev Jadhav, Principal Dr. Satish B. Jadhav**	17-19
6	Quality Issues in School Education: Perspectives of National Education Policy 2020 towards achieving SDGs **Dhaneswar Behera Dr. Ravula Krishnaiah**	20-
7	Functioning of ECCE Centres' in Tribal Areas of Odisha: A Case Study **Arnnapurna Dash, Dhaneswar Behera**	23-25
8	The Role of Teacher in Sustainable Development of Natural Resources. **Mr. Siddhartha Narayan Wakude**	26-28
9	Impact of Covid-19 Is Not Gender Neutral In India **Dr. Anil Kumar Teotia**	29-32
10	Inclusion of Children with Special Needs at Elementary School Level: What Stakeholders Perceived? **Ajit Kumar Barik, Dhaneswar Behera**	33-35
11	Impact of Lead India Trainings on Moral Values to School Children A Case Study of Selected Schools in Khammam District, Telangana State **Srinivas Bangaru, Dr. Nallaboina Sudershan Acharya**	36-38
12	Study of Pandemic COVID-19 Cases and its Impact on Higher Education in India **Dr. Rajendra O. Parmar**	39-43
13	Opportunities and Prospects in Online Teaching **Karan Vora & Yashika Poddar**	44-45
14	Women Empowerment in India: Now and Then **Sunil Hiremani, Dr. N. S. Mugadur**	46-49
15	Study of Insect's Diversity and Abundance In Millat Nagar, Bhiwandi, District Thane **Saiyada Shaikh and Dr. Nisar Shaikh**	50-
16	Insecticidal activity of ethanolic extract of some plants parts on mortality rate of Confused flour beetle, *Tribolium confusum* **Shifa Vinchu, Dr. Nisar Shaikh**	54-58
17	Online Advocacy & witness preparation in International Arbitration: Amidst COVID Pandemic **Shantanu Pachahara**	59-61
18	An Econometric Analysis of International Trade on Economic Growth of India **Budihal Nikshep Basavaraj, Dr. N. S. Mugadur**	62-65
19	The Problems of Indian Agriculture in Todays Scenario – A Glance **Dr. Prashant M. Puranik**	66-68
20	A Geographical Study Natural Resources And Sustainable Development In The Tribal Area Nashik: Maharashtra **Mr. Laxman Suresh Shendge, Dr. Deepak Narayan Thakare**	69-71
21	A Brief Study on the Effects of Covid-19 on Economy of India **Prof. Dr Rajdhar Chaitram Bedse**	72-76
22	Health Condition of Women between Christian Community and non-Christian Community of Bankura Municipality, West Bengalby Waist-HipRatio and Middle Upper Arm Circumference **Somnath Mukherjee**	77-79

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

47	दलित साहित्य आणि दलितांची चळवळ प्रा. बादलशाहा डोमाजी चव्हाण	152-153
48	औरंगाबादच्या नामांतराचा मुद्दा: महानगरपालिका निवडणुकीपुर्वीचे राजकारण शरद बाबुराव सोनवणे	154-157
49	Covid 19 उद्याची जाणीव... Dr. GauriMadhavHari	158-159
50	"स्वयं सहायता समूह योजना की हितग्राही बारेला जनजातीय महिलाओं की सामाजिक एवं आर्थिक स्थिति का अध्ययन" (म.प्र के बड़वानी जिले की पानसेमल, निवाली एवं सेन्धवा तहसील के विशेष सन्दर्भ में) मोसम्बी सेनानी	160-162
51	कोविड 19 का शहरी जीवन पर पड़ा प्रभाव प्रा.डॉ.दळवे सुर्यकांत माधवराव	163-164
52	कोविड -१९ मुळे भारतासमोर निर्माण झालेली आव्हाने प्रा. डॉ. विक्रमराव नारायणराव पाटील	165-168
53	एकलव्य रेसिडेंशिअल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोईसुविधा रंगशाम संभाजीमोडक	169-171
54	कोरोना काळातील विविध क्षेत्राचे बदलते रूप प्रा सतीश एस. कर्णासे	172-174

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

'Akshar Wangmay' UGC Care Listed, International Research Journal, ISSN: 2229-4929, January 2021
Special Issue, Volume-I *"Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation"*

दलित साहित्य आणि दलितांची चळवळ

प्रा. बादलशाहा डोमाजी चव्हाण
मराठी विभाग, महात्मा जोतिबा फुले महाविद्यालय, बल्लारपूर, जि. चंद्रपूर - ४४२७०१
Email- badalchawhan@gmail.com

दलित साहित्य हा साठोत्तरी कालखंडातील जिवंत असा प्रभावशाली वाङ्मयप्रवाह आहे. या प्रवाहाने घवघवित यश संपादन करून मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली आहे; त्याला समृद्ध केले आहे. हे साहित्य मानवी जीवनातील वास्तव प्रश्नांची दखल घेते. मनुष्याच्या शोषणाची मांडणी करून त्याविरूद्ध बंड करण्याचे धाडस निर्माण करते त्यामुळे खऱ्या अर्थाने हे साहित्य जीवनवादी साहित्य ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी माणसाला माणूसकीची जाणीव करून दिली. त्यांच्या विचारातून व त्यांच्या परिवर्तनवादी चळवळीतून दलित साहित्याचा उदय झाला. या साहित्याने सर्वसामान्य माणसांचे जीवन, त्यांचे प्रश्न व शिक्षणाअभावी आलेल्या दुःखांची मांडणी केली आहे.

महाराष्ट्र ही समाजसुधारकांची भूमी आहे. या भूमीत पुरोगामी तत्त्वांचा पुरस्कार करणाऱ्या महात्मा जोतिबा फुले, न्यायमूर्ती रानडे, लोकहितवादी आणि गो.ग. आगरकर यांनी आपल्या साहित्यातून तत्कालीन रूढी, परंपरांचा विरोध केला. "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे या समाजाचा जणू नवा जन्म झाला हजारो वर्षे नाडलेला, पिचलेला, गांजलेला हा माणूस लिहू-बोलू लागला."[१] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमुळे दलितांना बोलण्याचा व लिहिण्याचा अधिकार मिळाला. त्यांच्यात आत्मभान जागृत झाला. तो प्रत्येक क्षेत्रात पुढे येऊ लागला. "दलित समाज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या युगप्रवर्तक नेतृत्वामुळे जागा होऊन त्यांच्यामध्ये जी नवचैतन्याची ज्योत प्रज्वलित झाली तेचीच परिणती म्हणजे दलित साहित्य. दलित साहित्य आणि दलित चळवळ यांच्यामध्ये एक अतूट नाते आहे."[२] दलित चळवळीतून दलित साहित्य उदयास आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य, बंधुत्व व न्याय ही तत्त्वे जोपासायला सांगितले. ही तत्त्वे प्रामुख्याने दलित चळवळीत दिसत होती. "डॉ. बाबासाहेबांच्या क्रांतिदर्शी समता संगरातून दलित साहित्याच्या प्रवाहाचा उगम झाला." डॉ. आंबेडकरांनी समतां प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला, त्यासाठी त्यांनी वेगवेगळी आंदोलने केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० मार्च १९२७ मध्ये महाडचा सत्याग्रह केला. ही खरी दलित चळवळीची सुरूवात होय. त्यानंतर ३ मार्च १९३० मध्ये काळाराम मंदिर सत्याग्रह, १५ ऑगस्ट १९३६ ला मजुरांच्या हितासाठी स्वतंत्र मंजूर पक्षाची स्थापना, २० सप्टेंबर १९४२ ला अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना, १९४६ मध्ये 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना केली. त्यातून १९४६ मध्ये मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालय आणि १९४९ मध्ये औरंगाबाद येथे मिलींद महाविद्यालय सुरू केले. ही महाविद्यालये चळवळ जिवंत ठेवणारी स्फूर्तिकेंद्रे झाली. १४ ऑक्टोबर १९५६ ला डॉ. आंबेडकरांनी धर्मांतर केले. त्यांच्या चळवळीने नवतरूणांचा स्वाभिमान जागा झाला. जे दुःख त्यांनी भोगले, ज्या यातना त्यांनी सहन केल्या त्या यातनांना वाचा फोडून त्याबद्दल नकार, विद्राह केल्याशिवाय ते समाधानी होणार नव्हते. त्यांनी जणू नरकयातनेतून दिव्यत्वाकडे झेप घेतली असे त्यांना वाटू लागले "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेली दलित चळवळ हीच दलित साहित्याच्या निर्मितीस प्रामुख्याने कारणीभूत ठरत गेली. शिक्षणाचा वाढता विस्तार, स्वतंत्र भारताने स्वीकारलेली लोकशाही शासनपद्धती इत्यादीमुळे दलित चळवळ व दलित साहित्य दिवसेंदिवस वाढतच गेले."[३] परंपरेने दलितांना मुक्त हस्ते जगू दिले नाही; पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या नवीन विचाराने तो आता शांतपणे जगत आहे दलितांना दास्यमुक्त करण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी आंदोलने केली त्या आंदोलनाची दखल साहित्यातून त्यांना घ्यायची होती त्यातूनच दलित साहित्य आकारास आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर ३ ऑक्टोबर १९५७ साली भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाली. आंबेडकरी जनतेच्या अन्यायाला वाचा फोडण्याच्या जाणिवेने अर्जुन डांगळे, बाबुराव पवार, प्रल्हाद चेंदवणकर, नामदेव ढसाळ, राजा ढाले, बाबुराव बागुल या लढावू साहित्यिकांनी ९ जुलै १९७२ मध्ये मुंबईत 'दलित पँथर' या संघटनेची स्थापना केली. "बाबासाहेबांचे विचार, त्यांच्या चळवळी यामुळे दलितांमध्ये चैतन्य पसरले आणि नवा माणूस घडविण्याची प्रक्रिया सुरू झाली. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात या प्रक्रियेचे पडसाद घुमू लागले."[४] डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेतूनच 'दलित पँथर' चा उदय झाला. औरंगाबाद येथून दलित साहित्याला वाहिलेले 'अस्मितादर्श' हे त्रैमासिक सुरू झाले.

दलित साहित्याने दलितांचे जीवन रेखाटले व भारतीय साहित्यात भर घातली. "दलित साहित्याची चळवळ ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील अपूर्व आणि असामान्य महत्त्वाची घटना आहे. हजारो वर्षे मूक राहिलेल्या दलितांच्या अंतःकरणातील व्यथा आणि वेदना, प्रलोभ आणि विद्रोह यांना या चळवळीमुळेच शब्दरूप मिळाले. त्यातूनच निर्माण झालेल्या दलित साहित्याने एक नवा शक्तिस्रोत मराठी साहित्यात आणून सोडला."[५] दलित साहित्य हे विज्ञान, विद्रोह, निष्ठा व विश्वमयता यावर आधारित आहे. दलित साहित्याचे वेगळेपण हेच की, मराठीतील दलित साहित्याला दलित चळवळीची पार्श्वभूमी आहे. "दलित चळवळीबरोबरच दलित साहित्याची चळवळही वाढली. ती दलितांच्या सामाजिक लढ्यांना सतत सन्मुख राहिली जागृती, विद्रोह, नकार, नव्या मानवतावादी मूल्यांची स्थापना ही दलित चळवळीची दिशाच. दलित साहित्याच्या चळवळीचेही प्रेरणास्थान राहिली."[६] सामाजिक परिवर्तन ही काळाची गरज असते. या

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

गरजेपोटीच दलित चळवळ व दलित साहित्याची निर्मिती झाली. आपले विद्रोही विचार जोपासत नियतीवाद्यांशी या साहित्याने टक्कर दिली. तिने प्रस्थापित साहित्याला टक्कर देत आपला संघर्षशील बाणा जोपासला आहे.

दलित साहित्याने साहित्यनिर्मितीबरोबरच सामाजिक परिवर्तन केलेले आहे. ह्या साहित्यावर खेड्यातील शेतकरी, कष्टकरी, कामगार, पीडित, शोषित, स्त्रिया इत्यादींची जबाबदारी आहे. दलितांच्या जीवनातील अडचणी, समस्या, अज्ञान, अंधकार दूर करण्यासाठी दलित साहित्य लिहिले जात आहे. हे साहित्य सामाजिक परिस्थितीचे चित्रण करते. ते सामाजिक अन्यायाविरूद्ध शस्त्राप्रमाणे उभे राहते. आपल्या भारतात अनेक जाती, धर्म, पंथांचे लोक राहतात. प्रत्येकाची जीवनशैली ही वेगवेगळी आहे. चालीरीती, परंपरा वेगवेगळ्या आहेत. देशातील सर्व जाती-धर्म-पंथीयांनी नैतिक मूल्ये आणि बंधुभाव जोपासावा तेव्हाच राष्ट्राचा विकास होईल त्यादृष्टिने दलित साहित्याची वाटचाल सुरू आहे.

संदर्भ ग्रंथ:

1. गायकवाड बाबुराव, 'समुचित', नागपूर, जा.फे.ना., १९८६, पृ. ३०
2. खांडेकर ताराचंद 'साप्ताहिक जयभीम', संपा. जोगेंद्र कवाडे, धम्मचक्र प्रवर्तन दिन विशेषांक, नागपूर, १९८४, पृ. ७६
3. पानघाटे बाबुराव, 'अखिल भारतीय दलित साहित्य संमेलन', वणी, १९८३, पृ. २५
4. रांगोलेकर अविनाश, 'दलित साहित्य: उगम आणि विकास', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ., २०१०, पृ. ९१
5. डांगळे अर्जुन, 'लोकराज्य', डॉ. आंबेडकर जयंती विशेषांक, मुंबई, १९८१, पृ. ४१
6. कवठेकर बाळकृष्ण, 'दलित साहित्य: एक आकलन', अजब प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ., १९८१, पृ. १०८
7. सोमन अंजली, 'मराठी कथेची स्थितीगती' प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९५, पृ. १९७

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

5·2

ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

निष्कर्ष

वर्ष १२ वे अंक १ ला
एप्रिल, मे, जून २०२३



Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

तिफण

वर्ष १२ वे, अंक - पहिला एप्रिल ते जून २०२१

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

(भाग—०२)

• संपादक •
डॉ. शिवाजी हुसे
पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३,
मो. ९४०४०००३९८.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

अनुक्रमणिका - 02

अ.क्र.	प्रकरण	
•	शुभेच्छा – प्रा. कार्तिक पाटील	04
•	शोध महानवाचा : संपादकीय – प्रा. प्रफुल एम राजुरवाडे	06
1	बहुजनउद्धारक – डॉ. बाबासाहेब आंबेडकर – प्रा. संजय उगेमुगे	11
2	डॉ" बाबासाहेब आंबेडकर आणि .चवदार तळे सत्याग्रह" – प्रा. अजित जाधव	15
3	संततिनियमन : दारिद्र्यनिर्मूलनावरील प्रतिबंधक उपाय–डॉ. आंबेडकर – प्रा. प्रदिप भानसे	19
4	राष्ट्रपिता महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संघर्ष आणि समन्वय –प्रा.डॉ. इंगोले	25
5	डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्वतंत्र मजूर पक्ष प्रा. संजय अहिर	31
6	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार कल्याणातील योगदान प्रा दिलिप धोंगडे	42
7	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार – प्रा यमराज बिरारिस	50
8	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्रिशिक्षण विषयी विचारांची प्रासंगिकता – प्रा. भानुदास जामनेकर	54
9	महिला सबलीकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान – प्रा. बडगुजर	58
10	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सबलीकरणातील योगदान – प्रा. बादलशाहा चव्हाण	63
11	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार – प्रा. लोकेशकुमार नंदेश्वर	68
12	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत साहित्य – प्रा. एकनाथ फुटाणे	74
13	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार - एक दृष्टीक्षेप प्रा अनिता महावादीवार	83
14	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया – प्रा. हरेश गजभिये	89
15	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक धोरण– एक अध्ययन – प्रा. मंगला बनसोड	94
16	शेती, शेतकरी, आणि डॉ. आंबेडकर - प्रा. प्रफुल राजुरवाडे	99
17	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 'मुकनायक' पाक्षिकातून निर्भीड पत्रकारिता – प्रा.शरद बेलोरकर	105
18	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धम्मसंकल्पना व सामाजिक समता प्रा. रुपेश मेश्राम	108
19	गौतम बुद्धाची शिकवण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा धम्म आणि आजची प्रसंगिकता –प्रा.मनिषा वर्मा	113
20	चंद्रपुर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धम्मदीक्षा सोहळ्याच ऐतिहासीक अध्ययन – संशोधक प्रविण वाळके	121
21	डॉबाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही विषयक विचार . – प्रा. अतुल खोसे	128
22	फुले आंबेडकर विचारांची विश्वव्यापकता वर्तमान काळाच्या संदर्भात – प्रा. डॉ. मस्के	131
23	महात्मा गांधीचे विदर्भातील अस्पृष्योद्धारकांचे कार्य – प्रा. कमल केशोर इंगोले	135

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

अनुक्रमणिका - 02

अ.क्र.	प्रकरण	
•	शुभेच्छा – प्रा. कार्तिक पाटील	04
•	शोध महानवाचा : संपादकीय – प्रा. प्रफुल एम राजुरवाडे	06
1	बहुजनउद्धारक – डॉ बाबासाहेब आंबेडकर – प्रा. संजय उगेमुगे	11
2	डॉ" बाबासाहेब आंबेडकर आणि .चवदार तळे सत्याग्रह" – प्रा. अजित जाधव	15
3	संततिनियमन : दारिद्र्यनिर्मूलनावरील प्रतिबंधक उपाय–डॉ. आंबेडकर – प्रा. प्रदिप भानसे	19
4	राष्ट्रपिता महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संघर्ष आणि समन्वय –प्रा.डॉ. इंगोले	25
5	डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्वतंत्र मजूर पक्ष प्रा. संजय अहिर	31
6	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार कल्याणातील योगदान प्रा दिलिप धोंगडे	42
7	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार – प्रा यमराज बिरारिस	50
8	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्रिशिक्षण विषयी विचारांची प्रासंगिकता – प्रा. भानुदास जामनेकर	54
9	महिला सबलीकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान – प्रा. बडगुजर	58
10	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सबलीकरणातील योगदान – प्रा. बादलशाहा चव्हाण	63
11	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार – प्रा. लोकेशकुमार नंदेश्वर	68
12	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत साहित्य – प्रा. एकनाथ फुटाणे	74
13	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार - एक दृष्टीक्षेप प्रा अनिता महावादीवार	83
14	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया – प्रा. हरेश गजभिये	89
15	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक धोरण– एक अध्ययन -- प्रा. मंगला बनसोड	94
16	शेती, शेतकरी, आणि डॉ. आंबेडकर - प्रा. प्रफुल राजुरवाडे	99
17	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 'मुकनायक' पाक्षिकातून निर्भीड पत्रकारिता – प्रा.शरद बेलोरकर	105
18	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धम्मसंकल्पना व सामाजिक समता प्रा. रुपेश मेश्राम	108
19	गौतम बुद्धाची शिकवण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा धम्म आणि आजची प्रसंगिकता –प्रा.मनिषा वर्मा	113
20	चंद्रपुर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धम्मदीक्षा सोहळ्याच ऐतिहासीक अध्ययन – संशोधक प्रविण वाळके	121
21	डॉबाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही विषयक विचार . – प्रा. अतुल खोसे	128
22	फुले आंबेडकर विचारांची विश्वव्यापकता वर्तमान काळाच्या संदर्भात – प्रा. डॉ. मस्के	131
23	महात्मा गांधीचे विदर्भातील अस्पृष्योद्धारकांचे कार्य – प्रा. कमल केशोर इंगोले	135

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सबलीकरणातील योगदान

प्रा. बादलशाहा डोमाजी चव्हाण

भारतीय समाजात महिलांचा दर्जा श्रेष्ठ मानला जातो. आदर्शवादी मुल्यांतून डोकावून पाहिल्यास तिचे स्थान श्रेष्ठ वाटते पण व्यवहारात मात्र स्त्री म्हणून तिला दुय्यम स्थान दिले जाते. भारतीय समाजातील महिलांचे स्थान बदलावे, महिलांना षिक्षण देवून त्यांना व्यक्तिमत्व विकास करण्याची संधी द्यावी, त्यांना सबल करावे तेव्हाच ती पुरूषांच्या बरोबरीने कार्य करेल, असे विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले.

तथागत बुध्द, महात्मा फुले, गो.ग. आगरकर, लोकहितवादी, ताराबाई शिंदे, धोंडो केषव कर्वे यांनी महिलांसाठी कार्य केले. या महापुरूशांच्या पाऊलावर पाऊल ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधान, हिंदू कोडबिल यांच्या माध्यमातून महिलांचे सबलीकरण करण्यासंबंधी ठोस पाऊल उचलले. त्यांनी महिलांचे मनोबल वाढविण्यासाठी महाड येथे अत्यंत मौलीक विचार मांडले. डॉ. आंबेडकरांनी वेश्या व मुरळ्यांना मागदर्शन करून त्यांच्यात बदल घडवून आणला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातील चौदाव्या–पंधराव्या कलमान्वये स्त्री–पुरूष समानता सांगितली. त्यामुळे स्त्री–पुरूष भेद नाहीसा झाला. स्त्रीमुक्तीचा प्रभावी जाहिरनामा म्हणजे हिंदू कोडबिल होय. या कायद्यामुळे बालविवाह प्रथा मोडीत निघाली. सतीप्रथा, विधवांचे केशवपन बंद झाले. पण हिंदू कोडबिल संसदेत पास न झाल्यामुळे डॉ. आंबेडकरांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला. हिंदू कोड बिलाला जरी संसदेत मान्यता मिळाली नाही तरी समाजाचा स्त्रीयांकडे पाहण्याचा दृष्टीकोण हळूहळू बदलत गेला. स्त्रीयांच्या सबलीकरणाच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे.

प्रास्ताविक

15 ऑगस्ट 1947 मध्ये भारत देषाला स्वातंत्र्य मिळाले. भारताला स्वातंत्र्य मिळून 66 वर्ष झाली. या 66 वर्षाच्या काळात देशात राजकीयदृष्ट्या, भौतीक दृष्ट्या परिवर्तन घडून आले. पण स्त्रीयांच्या दर्जाच्या संदर्भात, तिच्या सबलीकरणाच्या संदर्भात मुलभूत अशा प्रकारचा बदल झाला नाही. जग बदलले पण दुःख, दैन्य अन् दास्यात जगणाऱ्या स्त्रियांचे जीवन मात्र बदलले नाही. ज्यांनी आकशात उंच भरारी घेऊन आपली प्रगती केली त्यांनी थोडे खाली येऊन महिलांच्या उत्थानाचे कार्य करायला हवे.

"आभाळाएवढी ज्यांची उंची
त्यांनी थोडे खाली यावे
मातीत ज्यांचे जन्म मळले
त्यांना थोडे उचलून घ्यावे."

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

स्वतंत्र भारताला गुलामगिरीत जगणाऱ्या महिलांच्या संदर्भात चिंतन, मनन होण्याची गरज आहे. तिच्या जीवन मनाची कोंडी फोडण्याची गरज आहे. देशाच्या विकासाच्या दृष्टीकोनातून महिलांचे सबलीकरण होणे आवश्यक आहे.

महिलांचे सबलीकरण म्हणजे काय ?

समाजातील तमाम महिलांचे व्यक्तिमत्व एक माणूस म्हणून विकसीत करायचे व यासाठी त्यांना समानसंधी द्यावयाची या प्रकीयेलाच सबलीकरण म्हणता येईल.

महिलांचे सबलीकरण म्हणजे स्त्रियांना चुल आणि मुल या पारंपरिक चक्रातून बाहेर काढणे, त्याचप्रमाणे स्त्री म्हणजे संतती निर्मितीचा कारखाना नाही किंवा धुणी, भांडी करणारी वाशिंग मशीन नाही. तर मानवी मन असलेली, माणसाला घडविणारी, हाडामासाच्या अर्भकाचे सामाजिक प्राण्यात रूपांतर करणारी समाजव्यवस्थेतील पुरूषांइतकीच किंबहुना त्यापेक्षा महत्वाची व्यक्ती आहे.

भारतीय समाजात महिलांचे स्थान

भारतीय समाजात महिलांच्या दर्जाच्या संदर्भात असे दिसून येते की, भगिनी म्हणून तिचे स्थान, तिचा दर्जा श्रेष्ठ मानला गेला. आदर्शवादी मुल्यातून डोकावल्यास तिचे स्थान श्रेष्ठ वाटते. पण व्यवहारात मात्र स्त्री म्हणून तिला दुय्यमच मानले आहे. त्याला इतिहास पुरावा आहे.

ऋग्वेद काळ सोडला तर भारतीय समाजात स्त्रीयांचे स्थान कनिष्ठच राहीले आहे. त्याचप्रमाणे तिचे अधिकार नाकारून तिला परावलंबी बनविले आहे. मध्यंतरीच्या काळात जे स्वातंत्र्य तिच्या वाटयाला आले होते. ते काळाशी समायोजन म्हणून आले होते. पुरूषप्रधान व्यवस्थेत तिला माणूस समजुन कोणतेही अधिकार दिलेले दिसुन येत नाहीत. उलट तिच्यावर आर्थिक, धार्मिक, वैवाहिक बंधने लादून अप्रत्यक्षरित्या तिचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. समाज प्रतिष्ठेच्या नावाखाली तिला घरात कोंडून ठेवले. तिला माणसिकदृष्ट्या कमकुवत, दुर्बल बनवून गुलामगिरीच्या खाईत लोटून दिले.

या देशातील तमाम स्त्रीयांवर अघोषीत गुलामी लादली. त्यांच्या शिक्षणाचा, धर्म आचरणाचा, अर्थार्जनाचा, मालमत्तेचा अधिकार गोठवला. परंतू यापेक्षाही महत्वाची बाब म्हणजे या पुरूषप्रधान असलेल्या वर्ण, जाती व्यवस्थेनी विचार स्वातंत्र्यच हिरावून घेतले. विचार करण्याची श्रृंखला तोडली. विचार करू षकली नाही म्हणून तिला स्वातंत्र्याच्या दालनाचा दरवाजा अनेक वर्शापर्यंत ठोठावता आला नाही. गुलामगिरीच्या बेडयांनाच ती आपली आभुषण मानत राहिली.

महिला सबलीकरणातील अडथळे

भारत देशात स्त्रीया जे अत्याचार आणि हिंसाचार सहन करतात त्यांना रूढी परंपरांचा सामाजिक आधार अजुनही मिळतो. हुंडा बंदीचा कायदा झाला पण हुंडा देणे घेणे आणि हुंडयासाठी छळ करणे, ठार मारणे सुरूच आहे. 'मुलगा वंशावर दिवा लावायला हवा' या हव्यास पायी आणि दडपणापायी कितीतरी स्त्रीयांना मानहानी सहन करावी लागते. बालविवाहाची बंदी असतानासुध्दा 14–15 वर्षाच्या मुलींचे लग्न लावले जातात. अजुन पाळण्यातही लग्ने लावली जातात. देवदासी प्रथा बंदीचा कायदा आहे. पण मुली देवाला सोडल्या जातात आणि त्या शेवटी शरीरविकीसाठी बाजारामध्ये पोहोचतात. महिलांना स्वतःच्या रक्षणाचे हक्क मिळावेत यासाठी नवीन हिंसाचार प्रतिबंधक दिवाणी कायदा संमत करण्यात आला आहे. प्रश्न असा आहे की, या सर्वांची काटेकोर अंमलबजावणी कधी होणार आहे? समाजातील

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

वातावरण त्यासाठी पोषक दिसत नाही. कारण शासनयंत्रना, न्याययंत्रना, पोलीसयंत्रना आणि राजकीय सत्तेच्या वर्तुळातील वरिष्ठ वरबाज राजकारणी आणि नोकरशाही यांना सामाजिक हिताच्या गोष्टीची अंमलबजावणी करण्याचा रस उरलेला नाही. सुकृतीपेक्षा विकृतीकडेच जास्त कल होत चालला आहे. महिला सबलीकरणातील हे महत्वाचे अडथळे आहेत.

महिलांच्या सबलीकरणाच्या चळवळी

" आर्य येण्यापूर्वी भारतात स्त्रीसत्ताक समाजसंस्था होती. आर्यांनी पुरूषसत्ताक समाजरचना निर्माण करण्यास आरंभ केला. त्यांच्या एकूणच वाङ्मयाने स्त्रीला गौणत्वच केवळ दिले नाही तर तिला दास्यत्वात ढकलले आहे. मैत्रेयी, गार्गी अशा अपवादभूत स्त्रीयांनाही मर्यादितच स्वातंत्र्य होते. चार्वाक हे स्त्रीमुक्तीचा विचार करणारे, वर्णभेदावर, जातीभेदावर प्रहार करणारे होते. स्त्रीयांवर लादलेली पतिव्रतांची बंधने त्यांनी झुगारली, व स्त्री–स्वातंत्र्याचा त्यांनी पुरस्कार केला.

तथागत बुध्द स्त्रीयांच्या संदर्भात उदारमतवादी होते. बुध्दांनी स्वातंत्र्याचा आणि समतेचा पुरस्कार केला. स्त्रीच्या जीवनात बुध्दाने नवी क्रांती घडविली. त्यांनी आपल्या भिख्खूसंघात स्त्रीयांना प्रवेश दिला. "बुध्दाने स्त्री जीवनात क्रांती केली होती. समाजाचे हे लुळे केले गेलेले अर्धे अंग त्यांनी सबळ केले होते. " बुध्दाने स्त्रीयांना स्वतःच्या मुक्तीचा, स्वतःच्या विकासाचा आणि ज्ञानसंपादनाचा अधिकार दिला होता.

महात्मा फुले यांनी स्त्रीला पुरूषापेक्षा श्रेष्ठ मानले. स्त्रीमुक्तीचे प्रत्यक्ष कार्य महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी केले. स्त्रीयांना दुय्यम लेखणाऱ्या विचारावर महात्मा फुले यांनी आपल्या शैलीत असूड ओढले आहे. म. फुलेंनी स्त्रीयांवर होणाऱ्या अन्याय–अत्याचारामागील कारणांचा शोध घेतला व हा सर्व अविद्येने केलेला अनर्थ आहे हा क्रांतीकारी षोध लावला. गोपाळ गणेश आगरकर, लोकहितवादी, ताराबाई शिंदे, धोंडो केशव कर्वे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रीयांच्या सबलीकरणाच्या दृश्टीने कार्य केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सबलीकरण

स्त्री ही जन्मदात्री आहे. ती मनुष्याला जन्म देत, त्याला घडवते. ती मानवी समाजाचा अविभाज्य घटक आहे. स्त्रीची दुर्दशा करून कोणत्याही मानवी समाजाला स्वतःचा सुसंस्कृतपणा सिध्द करता येत नाही. स्वतःचे अर्धांग लुळे करून आणि ठेवून कोणत्याही समाजाला आपला निरोगीपणा सिध्द करता येत नाही. जगातील महिलांच्या वाटयाला कनिष्ठपणा आला. पण भारतातील स्त्रीचा भोगवटा विलक्षण होता. भारतात स्त्रीचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि लैंगिकदृष्टया, शारीरिक आणि मानसिकही शोषण निर्विघ्नपणे सुरू होते. येथील पुरूषीसंस्कृतीने स्त्रीयांना माणूसपणापासूनच तोडले. धर्मांनी, जातींनी स्त्रीची माणुसपणाशी गाठ पडू दिली नाही. स्त्रीचे शरीर आणि अपत्य जन्माला घालण्याची तिची शक्ती यामुळे स्त्रीचे महत्व वाढायला हवे होते. पण या गोष्टीच्या मदतीनेच पुरूषीसंस्कृतीने तिचे पंख कापले तिला शुद्र ठरविण्यात आल, तिला अतिशुद्र ठरविण्यात आले. शुद्रातिशुद्र, आदिवासी आणि भटके–विमुक्त यांची स्त्री आपल्या सवंगडय सोबत दास झाली. तिचा सवंगडी गुलाम होता. ती या गुलामाचीही गुलाम झाली.

'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' हे मनुचे स्त्रीसंबंधीचे धोरण होते. मनुने स्त्रीची माणूसकी नष्ट करण्यासाठी 'मनुस्मृती' लिहीली. या ग्रंथाने स्त्रीयांचा अपमान केला. तिचा समाजात अनादर केला. या ग्रंथात समतेचा विचार नाही. अशा असमतेची शिकवण देणाऱ्या धर्मग्रंथाचा दहनविधी डॉ. बाबासाहेब

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

आंबेडकरांनी 25 डिसेंबर 1927 साली महाड येथे केला. स्त्रीयांना जाळणारा ग्रंथ जाळून त्यांनी स्त्रीमुक्तीचे रणशिंग फुंकले.

महिलांचे मनोबल वाढविण्याविण्याचे डॉ. आंबेडकरांचे विचार

स्त्री ही माणूस आहे. म्हणून तीने पुरूषाप्रमाणे शिक्षण घ्यावे. तिने स्वाभिमानाने जगावे. स्वतःचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य तिला असावे. स्त्रीने विवाहानंतर नवऱ्याची गुलाम बनता कामा नये. समान अधिकारी बनावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांना स्वच्छता पाळण्यास सांगितले. दारूडया नवऱ्यांना, मुलांना आणि भावांना घरात घेऊ नका, स्वतःला अस्पृष्य मानू नका. लुगडे फाटके असले तरी स्वच्छ ठेवा, गुलींना षिकवा, असे स्त्रीयांचे मनोबल वाढविण्यासाठी त्यांनी गहाड येथे अत्यंत मौलिक विचार मांडले.

डॉ. आंबेडकरांचे वेश्या व मुरळ्यांना मार्गदर्शन

16 जून 1936 मध्ये मुंबई येथील दामोदर हॉलमध्ये भरलेल्या सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे म्हटले होते की, ''स्त्रीजात ही समाजाचा अलंकार आहे. प्रत्येक समाज स्त्रीयांच्या चारित्र्याला अधिक मान देतो. आपली गृहिनी होणारी स्त्री उत्तम कुळातील असावी. अषी प्रत्येकजण अपेक्षा करतो. अशी पत्नी मिळावी म्हणून खटपट करतो, कारण त्याला माहीत असते की आपल्या कुटूंबाचा व कुळाचा नावलौकीक स्त्रीयांच्या शिलावर अवलंबून आहे. इतकी थोरवी स्त्रीवर्गाला प्राप्त झालेली आहे. काही वेष्यांनी आणि मुरळ्यांनी बाबासाहेबांच्या मार्गदर्शनानंतर आपले स्वतंत्र संसार उभे केले.

कुटुंब नियोजनाच्या आग्रहाविषयीची भुमिका

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इ.स. 1938 साली कुटुंबनियोजनाची आवष्यकता सांगितली. जास्त मुले असणे हा सामाजिक गुन्हा आहे. हेही त्यांनी सांगितले. बाळंतपणाच्या यातनांमधून स्त्रीची सुटका व्हावी. तिला स्वास्थ लाभावे, तिची शक्ती समाजसुधारणेच्या कामाकडे लावावी,. आपल्या बौध्दीक विकासासाठी तिला भरपूर वेळ मिळावा, तिला 'चुल आणि मूल' यातच डांबून राहावे लागू नये ही त्याची भुमिका कुटुंबनियोजनाच्या आग्रहामागे होती.

देशाच्या इतिहासातील कांतीकारी मुद्दा

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार या नात्याने डॉ. आंबेडकरांच्या समाजकांतीच्या विचारांचा प्रभाव संविधानात दिसतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांच्या हक्कांना, तिच्या समतेला आणि मुक्तीला कायद्याचे रूप दिले. एक व्यक्ती एक मत हा या देशाच्या इतिहासातील मुद्दा आहे. भारतीय संविधान हे स्त्रीयांसाठी कवच ठरले. संविधानाच्या चौदाव्या कलमाने सर्व व्यक्तींना कायदेशीर समानता बहाल केली. कायद्याचे संरक्षण दिले. पंधराव्या कलमाने स्त्री–पुरूषभेद नाहीसा झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे कार्य स्त्रीयांच्या दृष्टीने ऐतिहासीक ठरले.

स्त्रीमुक्तीचा प्रभावी जाहीरनामाः हिंदू कोडबिल

स्त्री ही माणूसच आहे. पुरूषांपेक्षा ती कमकुवत नाही. स्त्री असण्यात कोणताही कमीपणा नाही. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोडबिलाची मांडणी केली. हिंदू कोडबिलाने स्त्रीयांना घटस्फोटाचा अधिकार दिला. नवऱ्याने घटस्फोट दिल्यास तिला पोटगीचा अधिकार दिला. व्यक्तीचा एक विवाह कायदेशीर असल्यास दुसरा विवाह योग्य कारण नसल्यास अवैद्य ठरून स्त्रीला स्थैर्य दिले. स्त्रीला दत्तक घेण्याचा व दत्तक जाण्याचा अधिकार दिला. वडिलांच्या मिळकतीत मुलांच्या बरोबरीने मुलींना समान वाटा दिला. मुलींना वारस होण्याचा हक्क मिळाला. स्त्रीच्या आंतरजातीय विवाहास मान्यता मिळाली. त्यामुळे स्त्रीमुक्तीचा प्रभावी असा जाहीरनामा हिंदू कोडबिल ठरला. या कायद्यामुळे बालविवाह मोडीत निघाले. बालविवाह बंद झाले. सतीप्रथा, विधवांचे केशवपनही बंद झाले. त्यामुळे 'हिंदू कोडबिल म्हणजे भारतीय स्त्रीच्या स्वातंत्र्याची सनद होय.' असे डॉ. यशवंत मनोहर यांनी म्हटले आहे.

महिलांच्या मुक्तीसाठी डॉ. आंबेडकरांनी तयार केलेले, कांतीकारी रूप असलेले, स्त्रीला समता, स्वातंत्र्य व पुरूषांच्या बरोबरीने हक्क देणारे हिंदू कोडबिल संसदेत पास झाले नाही. " It was killed

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

and died unwept and unsung !" न रडता कोणतेही गुणगान न करता हिंदू कोडबिल ठार केले गेले आणि गाडले गेले असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले. त्यावेळी ते दुःखी झाले. स्त्रीमुक्तीच्या या सरसेनापतीने, भारतीय स्त्रीवादाच्या या शिल्पकाराने आपल्या कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला.

स्त्री मुक्ती चळवळीमुळे स्त्रियांमध्ये नवी चेतना

विवाह संस्थेमुळे स्त्रियांचे होणारे शोषण आणि समाजातील तिचे दुय्यम स्थान ह्याविषयी समाजमनात हालचाल सुरू झाली. पुरूषांनी स्त्रीरूपाचे गोडवे गाणाऱ्या तथाकथीत प्रतिमा निर्माण केल्या होत्या. देवता, सती, पतिव्रता, माता, अबला, अर्धांगी, सौभाग्यवती अशा तथाकथित रूपांना तडे जाऊ लागले. जोडीदार, मैत्रीण, सहकारी आणि कार्यकर्ती अशा नव्या रूपात जीवनाच्या अनेक क्षेत्रात स्त्री अग्रेसर होऊ लागली. तिने 'अर्धांगी' होण्यापेक्षा 'पूर्णांगी' होणे पसंत केले. 'चूल आणि मूल' हे तिचे कार्यक्षेत्र मागे पडले. आणि तिचे पारंपरिक रूपही पालटले. स्त्रीमुक्ती चळवळीमुळे स्त्रीयांमध्ये नवी चेतना निर्माण झाली.

समारोप

आजच्या यंत्र युगातही स्त्रीयांचे लैंगिक शोषण होत आहे. आजच्या संगणक युगात गर्भजल चिकित्सा या यंत्राच्या साह्याने स्त्री बालहत्या प्रचंड प्रमाणात घडवून आणल्या जातात. स्वातंत्र्याच्या 69 वर्षानंतरही 40 लाख स्त्रीया कोणत्या ना कोणत्या पुरूषी हिसाचाराच्या बळी ठरतांना दिसून येतात. भारतीय समाजातील स्त्रीयांची अवस्था पाहिल्यास या अवस्थेमागील सर्व कारणाचा शोध घेण्याची गरज आहे. स्त्रीयांना खऱ्या अर्थाने सामाजिक समता प्रस्थपित करून घ्यायची असेल तर अन्यायाची केंद्रस्थाने असलेली समग्र व्यवस्था उध्वस्त करायला हवी. कारण स्त्री मुक्ती म्हणजे केवळ दया दाखवणे नव्हे तर या समाजव्यवस्थेत तिला समता व स्वातंत्र्य मिळवून देणे होय.

स्त्रीयांच्या सबलीकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी तयार केलेल्या हिंदू कोडबिल या कायद्याने स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीने समान हक्क प्राप्त होणार होते. या संबंधात तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी अमेरीकेमध्ये असे वक्तव्य केले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून आम्ही दोन अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी मिळविल्या त्या म्हणजे भारतीय घटना व सर्वांच्या न्यायाकरिता, स्त्रीयांना हक्क देणारा हिंदू कोडबिल कायदा हा होय. ज्या स्त्रीयांना शिक्षणापासून वंचित केले जात होते. त्यांना संपत्तीत स्थान नव्हते. सामाजिक व्यवस्थेत अन्याय झाला होता अशा स्त्रीयांना दिलासा देणारे हिंदू कोडबिल होते. या बिलाला जरी मान्यता मिळाली नाही तरी स्त्रीयांकडे पाहण्याचा दृष्टीकोन हळूहळू बदलत गेला हे मान्य करावेच लागेल.

संदर्भ ग्रंथ सूची

1) आ.ह.साळुखे : हिंदू संस्कृती आणि स्त्री, मुंबई, 1998, पृश्ठ–28
2) यषवंत मनोहर : आंबेडकरवादी मराठी साहित्य, भीमरत्न प्रकाषन, नागपूर, 1991,पृष्ठ 69
3) तत्रैव, पृष्ठ–72
4) रायटिंग्ज ॲड स्पीचेस, खंड, 12, महाराष्ट्र शासन, मुंबई 1993, पृष्ठ–719

मराठी विभाग,
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,
बल्लारपूर, जि. चंद्रपूर

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

IMPACT FACTOR (SJIF) 2021-7.380 ISSN 2319-4766

SRJIS

An International Peer Reviewed & Refereed Journal

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL - JUNE,2021, VOL- 10, ISSUE-55

राष्ट्रीय चर्चासत्र विशेषांक, मराठी विभाग, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, (जि. चंद्रपूर) महा.

मुख्य-संपादक
डॉ. सुबोध कुमार सिंह
प्राचार्य

संपादक
डॉ. जयश्री शास्त्री
मराठी विभाग प्रमुख



Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

© : AUTHOR

Edition : 2021

Disclaimer: We do not warrant the accuracy or completeness of the Information, text, graphics, links or other items contained within these articles. We accept no liability for any loss, damage or inconvenience caused because of reliance on such content. Only the author is the authority for the subjective content and may be contacted. Any specific advice or reply to query on any content is the personal opinion of the author and is not necessarily subscribed to by anyone else.

Warning: No part of this book shall be reproduced, reprinted, or translated for any purpose whatever without prior written permission of the Editor. There will be no responsibility of the publisher if there is any printing mistake. Legal aspect is in Warora jurisdiction only in favour of Editor in Chief for this Special Issue on **समकालीन मराठी साहित्य : चिंतन आणि चिकित्सा.**

NOTE: Conference proceeding publication / Special issue publication/ Book with ISBN/ **Edited Book with ISBN publication** Contact us on **9881595917** either send your proposal to **srjisarticles16@gmail.com**

An International Peer Reviewed & Refereed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES
S. No. 5+4/5+4, TCG'S, Saidatta Niwas, D-Wing, Ph - II,
1st Floor, F. No. 104, Nr. Telco Colony & Blue Spring Society,
Dattanagar-Jambhulwadi Road, Ambegaon (BK), Pune – 411046.
Website: www.srjis.com

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380

ISSN 2319-4766

An International Peer Reviewed & Refereed Journal

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE, 2021, VOL- 10, ISSUE-55

Index

SR. NO.	TITLE & AUTHOR NAME	PAGE NO.
1	समकालीनता, नवीनता आणि अभिजातता *डॉ. राजेंद्र गोविंदराव नाईकवाडे*	1-13
2	समकालीन स्त्रीवादी साहित्य प्रवाहातील नव्वदोत्तर स्त्रीवादी कथा *डॉ. मनीषा नागपुरे*	14-20
3	सगकालीन मराठी अनुवादित कादंबरी *डॉ. स्मिता वानखेडे*	21-26
4	समकालीन मराठी अनुवादित साहित्य (नव्वदोत्तर साहित्यकाल) *डॉ. चंद्रशेखर आत्माराम भगत*	27-34
5	समकालीन मराठी कथा *डॉ. कोमल वि. ठाकरे*	35-44
6	वर्तमान परिप्रेक्ष्यात समकालीन दलित कविता *डॉ. अक्षय किशोर घोरपडे*	45-51
7	फ. म. शहाजिंदे यांच्या साहित्यातील स्त्रीवादी दृष्टीकोन *डॉ. बालाजी व्ही. डिगोळे*	52-56
8	समकालीन लेखिकांच्या कादंबऱ्यातील स्त्रीवाद *प्रा. उज्वला नामदेवराव जानवे*	57-63
9	'तद्भव' कथासंग्रहाचे स्वरूप *प्रा. डॉ. बादलशाहा डोमाजी चव्हाण*	64-67
10	समकालीन मराठी गझलकाव्य *प्रविण रामकृष्ण मोरे, डॉ. भास्कर सु. ढोके*	68-75

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

'तद्भव' कथासंग्रहाचे स्वरूप

प्रा. डॉ. बादलशाहा डोमाजी चव्हाण
मराठी विभाग, महात्मा जोतिबा फुले महाविद्यालय, बल्लारपूर, जि. चंद्रपूर-442701
badalchawhan@gmail.com Mob.No. 8007928227

डॉ. रवींद्र शोभणे हे नाव मराठी कथेला नवीन नाही. 'वर्तमान' (१९९१), 'दाही दिशा' (१९९४), 'शहामृग' (१९९८) या तीन कथासंग्रहानंतर 'तद्भव' हा त्यांचा चवथा कथासंग्रह २००४ मध्ये प्रकाशित झाला. वरील तीन कथासंग्रहापेक्षा 'तद्भव' या कथासंग्रहाचे स्वरूप निश्चितच वेगळ आहे. रवींद्र शोभणे यांच्या कथा अनुभवाच्या आणि आकृतीबंधाच्या दृष्टिने वेगळ्या आहेत.

एखाद्या कथाकाराने कलात्मक पातळीवरून भोगलोलुपता चित्रित केली तर वाचकांच्या आस्वादात काहीही फरक पडत नाही. दृकश्राव्य माध्यमांमुळे वाचनप्रेम कमी होत असलेल्या आजच्या काळात भारत सासणे, आशा बगे, प्रकाश खरात, चंद्रकांत वानखेडे, रवींद्र शोभणे इत्यादी मोजके लेखक कलामूल्यांची जाणीव ठेवून आपल्या अनुभूतीचे यथार्थ चित्रण करीत आहेत. रवींद्र शोभणे यांच्या 'तद्भव' या कथासंग्रहात 'एका शिंगाचा घोडा', 'भग्न गोकुळाच्या वाटा', 'उदाहणार्थ: एक सत्वपरीक्षा', 'तद्भव', 'ओली धिप्पाड भिंत', 'दौड', 'अदृश्यच देणं', 'वर्तमानाची खवलेदार पाठ' अशा आठ कथा समाविष्ट आहेत. शोभणेंनी आकृतीबंधाच्या आणि अनुभवाच्या संदर्भात आपण अतिशय समज आहोत असा दावा प्रस्तावनेत केला आहे.

वर्तमानाच्या कथा :

'तद्भव' या कथासंग्रहामध्ये पूर्वप्रसिद्धी मिळालेल्या आठही कथांचा समावेश आहे. त्या वर्तमानातील कथा आहेत. माणसाच्या जगण्याचं एक आदर्श मूल्यनिष्ठ वर्तुळ असतं. समाजाच्या नीतिनियमांनी रूढी-परंपरांनी, जन्म-मृत्यू-विवाह बंधनांनी, जात-धर्म-विचारसरणींनी माणसं बांधलेली असतात. काळ बदलतो परंतु माणसाच्या विचारांच आदर्श वर्तुळ मात्र त्याचं अस्तित्व पोखरत असते. मूल्यांचा पुन्हा विचार करायला भाग पाडते. मूल्यांची, आदर्शाची पडझड होणे हे प्रत्येक कालखंडाचे विशेष आहे. काळानुरूप नवीन मूल्यव्यवस्था जन्माला आलेली असते, परंतु तिचा स्विकार करतांना माणसांसमोर अनेक प्रश्न उपस्थित होतात. शेवटी जगणं हेच सर्वोच्च असतं, या निष्कर्षापर्यंत आलेली माणसं जीवनातला मूल्य-हासही पचवितात आणि जीवनाचे सोनं करू पाहतात. काहींना ते जमतं तर काहींना जमत नाही. ज्यांना जमत नाही ते मुळ संकट कोसळतात तेंव्हा समाजात नविन प्रश्न निर्माण होतात. रवींद्र शोभणे यांच्या 'तद्भव' या कथासंग्रहातील कथा वर्तमानाच्या परिप्रेक्षात विचारांच्या आणि मूल्यांच्या अभिसरणात, माणसांच्या वर्तमान जगण्याला अर्थपूर्ण करू पाहतात.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

माणसं स्वकेंद्रित असतात, भोगलोलूप असतात, मतलबी असतात, काळाला आणि मूल्य-हासाला शरण जाणारी असतात, स्वार्थी असतात. ही सर्वच माणसाच्या जगण्याची केंद्रे आहेत. म्हणूनच माणसाच्या जीवनातील अनुभवही माणूसपण हादरविणारे असतात. रवींद्र शोभणे यांच्या कथांमधून साकार होणारी माणसे त्यामुळेच आपल्याला भोवतालची वाटतात.

माणसांच्या पराभूत वृत्तीची चिरफाड :

'एका शिंगाचा घोडा' ही रूपकथा आहे. ती काहीशी दुर्बोध आणि अगम्य अशीच आहे. माणसाच्या मनातील कामगंडामुळे पराभूत झालेली माणसिकता एका म्हातारीच्या निमित्ताने लेखकाने मांडलेली आहे. काखेमध्ये शबनम बॅग घेऊन आपला एका शिंगाचा हरविलेला घोडा शोधण्यासाठी एक म्हातारा गावोगावी फिरतो आणि विचारतो - "माझा घोडा हरवला, घोड्याच्या शोधात आलो होतो."१ गावातील लोक त्याची टिंगल करतात तेंव्हा तो निघून जातो. तो गेल्यावर एक म्हातारी त्याच गावात येते व आपल्या म्हाता-या पतीविषयी विचारणा करते. "त्याला एकच शिंग आहे याचं ते शिंगसुद्धा बोथट झालेलं आहे. त्याला दुसर शिंग फुटलचं नाही."२ लोक तिलाही वेड्यात काढतात. ती गावातून निघून गेल्यावर पुन्हा तोच म्हातारा आपल्या हातात लाकडी घोडा घेऊन गावामध्ये येतो. आपल्या बचावासाठी शिकारी कुत्र्यावर लाकडी घोड्याने वार करतो. लाकडी घोड्याचे तीन तुकडे होतात. आणि तो पुन्हा दुस-या गावात एका शिंगाचा घोडा शोधण्यासाठी निघुन जातो. इथे ही कथा संपते.

हातातील लाकडी घोड्याचे तीन तुकडे होणे आणि पुन्हा घोडा शोधायला निघणे इथे कथा जरी संपत असली तरी ती वाचकांच्या मनात सुरूच राहते. एखाद्याला मूलं न होणे आणि त्याकरिता जन्मभर तशी त्या शिंगाच्या शोधात वणवण करणे याचे अतिशय भेदक चित्रण या कथेत आले आहे.

मानवी संबंधाचे ताण दाखविणारी कथा :

'भग्न गोकुळाच्या वाटा' या कथेतून मानवी संबंधाचे ताण तीव्रतेने आले असून मनोवैज्ञानिक विश्लेषणही आले आहे. मध्यमवर्गीय भावभावनांचे रेखाटन अधिक प्रत्ययकारी व प्रभावी असे आहे. साहेबराव आपल्या आईच्या वाईट कृत्यामुळे तिचा राग करायचा. दुर्गामावशीकडून जेंव्हा त्याला सत्य कळले तेंव्हा तो आपल्या आईच्या आठवणीने व्याकूळ होतो; पण वेळ निघून जाते. त्याची आई जगातून निघून जाते. खरे तर मानवी संबंधाचे ताणं प्रस्तुत कथेत दिसून येतात.

व्यक्तिची सत्वपरीक्षा :

उदाहरणार्थ: 'एक सत्वपरीक्षा' या कथेतील नायक हा क्रांतीकारी आहे. तो समाजातील कर्त्या सुधारकाचे बोट धरून चालणारा कार्यकर्ता आहे. तो रूढीभंजक, मूर्तिभंजकही असतो. रूढीप्रिय गोष्टींवर आघात करतो, "आपल्या कृतीनं, विचाराणं वादळ निर्माण व्हावं, आपल्या कृती-उक्तीची समाजातील सर्व स्तरावर चर्चा व्हावी, ही त्याची प्रामाणिक इच्छा असायची; किंबहुना तीचं त्याची महत्वाकांक्षा होती."३ हा नायक समाजकार्यात अग्रेसर असणा-या नानासाहेबांचा खरा अनुयार्य होता. त्यासारखीचं 'चेतना' ही सुद्धा अनुयायी होती. लग्नापूर्वी ती गर्भवती झाली, तेंव्हा तीने नानासाहेबांना खरी वास्तविकता सांगितली.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

माणसं स्वकेंद्रित असतात, भोगलोलूप असतात, मतलबी असतात, काळाला आणि मूल्य-हासाला शरण जाणारी असतात, स्वार्थी असतात. ही सर्वच माणसाच्या जगण्याची केंद्रे आहेत. म्हणूनच माणसाच्या जीवनातील अनुभवही माणूसपण हादरविणारे असतात. रवींद्र शोभणे यांच्या कथांमधून साकार होणारी माणसे त्यामुळेच आपल्याला भोवतालची वाटतात.

माणसांच्या पराभूत वृत्तीची चिरफाड :

'एका शिंगाचा घोडा' ही रूपकथा आहे. ती काहीशी दुर्बोध आणि अगम्य अशीच आहे. माणसाच्या मनातील कामगंडामुळे पराभूत झालेली माणसिकता एका म्हातारीच्या निमित्ताने लेखकाने मांडलेली आहे. काखेमध्ये शबनम बॅग घेऊन आपला एका शिंगाचा हरविलेला घोडा शोधण्यासाठी एक म्हातारा गावोगावी फिरतो आणि विचारतो - "माझा घोडा हरवला, घोड्याच्या शोधात आलो होतो."१ गावातील लोक त्याची टिंगल करतात तेंव्हा तो निघून जातो. तो गेल्यावर एक म्हातारी त्याच गावात येते व आपल्या म्हाता-या पतीविषयी विचारणा करते. "त्याला एकच शिंग आहे याचं ते शिंगसुद्धा बोथट झालेलं आहे. त्याला दुसर शिंग फुटलचं नाही."२ लोक तिलाही वेड्यात काढतात. ती गावातून निघून गेल्यावर पुन्हा तोच म्हातारा आपल्या हातात लाकडी घोडा घेऊन गावामध्ये येतो. आपल्या बचावासाठी शिकारी कुत्र्यावर लाकडी घोड्याने वार करतो. लाकडी घोड्याचे तीन तुकडे होतात. आणि तो पुन्हा दुस-या गावात एका शिंगाचा घोडा शोधण्यासाठी निघुन जातो. इथे ही कथा संपते.

हातातील लाकडी घोड्याचे तीन तुकडे होणे आणि पुन्हा घोडा शोधायला निघणे इथे कथा जरी संपत असली तरी ती वाचकांच्या मनात सुरूच राहते. एखाद्याला मूलं न होणे आणि त्याकरिता जन्मभर तशी त्या शिंगाच्या शोधात वणवण करणे याचे अतिशय भेदक चित्रण या कथेत आले आहे.

मानवी संबंधाचे ताण दाखविणारी कथा :

'भग्न गोकुळाच्या वाटा' या कथेतून मानवी संबंधाचे ताण तीव्रतेने आले असून मनोवैज्ञानिक विश्लेषणही आले आहे. मध्यमवर्गीय भावभावनांचे रेखाटन अधिक प्रत्ययकारी व प्रभावी असे आहे. साहेबराव आपल्या आईच्या वाईट कृत्यामुळे तिचा राग करायचा. दुर्गामावशीकडून जेंव्हा त्याला सत्य कळले तेंव्हा तो आपल्या आईच्या आठवणीने व्याकूळ होतो; पण वेळ निघून जाते. त्याची आई जगातून निघून जाते. खरे तर मानवी संबंधाचे ताणं प्रस्तुत कथेत दिसून येतात.

व्यक्तिची सत्वपरीक्षा :

उदाहरणार्थ: 'एक सत्वपरीक्षा' या कथेतील नायक हा क्रांतीकारी आहे. तो समाजातील कर्त्या सुधारकाचे बोट धरून चालणारा कार्यकर्ता आहे. तो रूढीभंजक, मूर्तिभंजकही असतो. रूढीप्रिय गोष्टींवर आघात करतो, "आपल्या कृतीनं, विचाराणं वादळ निर्माण व्हावं, आपल्या कृती-उक्तीची समाजातील सर्व स्तरावर चर्चा व्हावी, ही त्याची प्रामाणिक इच्छा असायची; किंबहुना तीचं त्याची महत्वाकांक्षा होती."३ हा नायक समाजकार्यात अग्रेसर असणा-या नानासाहेबांचा खरा अनुयार्यी होता. त्यासारखीचं 'चेतना' ही सुद्धा अनुयायी होती. लग्नापूर्वी ती गर्भवती झाली, तेंव्हा तीने नानासाहेबांना खरी वास्तविकता सांगितली.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

आपल्या मर्यादीत विश्वात काहीतरी अव्दितीय, अपूर्व, काहीस वेगळ करू इच्छिणारा, संधी शोधणारा क्रांतीकारक नायक गर्भवती चेतनाशी लग्न करतो, त्याच्या मनातल्या क्रांतीविचारांची वाफ लयाला गेल्यावर मात्र, त्याला चेतनाशी जुळवून घेणं शक्य होत नाही. समाजाच्या दबावानं तो जीवनमूल्यांची बदलती क्रांतीकारक रूपं स्विकारू शकत नाही. जीवनाच्या प्रत्यक्ष रणांगणात क्रांतीची वाफ होते. हा खरे तर आजच्या सामाजिक जीवनाचाच पुनर्विचार करायला भाग पाडणारा प्रश्न आहे. अशाप्रकारे क्रांतीकारक युवकाची सत्त्वपरीक्षा घेणारी प्रस्तुत कथा आहे.

व्यावहारिक भूकंपाची घसरण :

'दौड' या कथेतून व्यावहारिक भूकंपाची घसरण व्यक्त होते. पठाण उद्योग समुहामध्ये रायभाने नावाचा व्यक्ती मशिनिष्ट या पदावर कार्यरत असतो. प्रोबेशन मध्ये असतानाच त्याचा अपघात होवून तो स्वतःचे दोन्ही हात गमावतो. नूकतेच त्याचे लग्न झाले त्यातच हा अपघात; त्याच्या पत्नीवर आघात झाला. तीची स्वप्ने बेचिराख झाली.

रायभानेची पत्नी, कामगार युनियन लीडर दादा गावंडे, मॅनेजर एम.डी. पठाण यांचे वेगवेगळे धेय्य असतात. नव-याचे हात अपघातात निकामी झाल्यावर जगणं सुंदर करण्यासाठी तिची शोधयात्रा सुरू असते आणि शेवटी पठाण साहेबांच्या नादी लागून, ती आपला अधःपतीत जीवनाचा गाडा पुढे नेऊ पाहते, म्हणूनच व्यावहारिक तडजोडीपोटी होत चाललेली मूल्यांची घसरण 'दौड' या कथेत दिसून येते.

विस्मयकारक प्रत्यय देणारी कथा :

माणसाच्या स्वार्थी जगण्यावर प्रकाश टाकणारी आणि विस्मयकारक प्रत्यय देणारी 'अदृष्टाचं देणं' ही कथा आहे. "मानवी मनाची क्षुद्रता व नियतीचं वरदान यामध्ये नाट्याचा विस्मयकारक प्रत्यय आणून देणारी 'अदृष्टाचं देणं' ही कथा प्रस्तुत संग्रहाचं भूषणच म्हणता येईल."४ गणोबा वाणी आपल्या गिरजा नावाच्या पत्नी सोबत आणि दोन मुलीसोबत राहतो. त्याचे गावामध्येच दुकान असते. पावसाळ्याच्या दिवसात एक म्हातारी दुकानातील सामान खरेदीसाठी येते. मुसळधार पाऊस असल्यामुळे रात्रभर गणोबाच्या पत्नीच्या आग्रहाखातर त्यांच्याकडे मुक्काम करते. मात्र आपल्याजवळील मोहरा गमावते. गणोबाची स्वार्थीवृत्ती जागी होते. माणसांच्या स्वार्थी जगण्यावर प्रकाश टाकणारी ही कथा आहे. माणसातील स्वार्थ त्याच्यातल्या माणूसपणाचा मृत्यू घडविणारा आहे.

आजच्या पिढीची कथा :

'तन्द्रव' ही आजच्या पिढीची कथा आहे. ती वास्तवातील मग्नतेचे कलापूर्ण दर्शन दाखविणारी आहे. एका आघाडीच्या वृत्तपत्राचे नंदू आणि बेला हे दोघेही प्रतिनिधी असतात. नागपूर जिल्ह्यातील मोवाड हे गाव वर्धा-वैनगंगा नदीच्या महापूराने वाहून जाते. ही बातमी सर्वत्र पसरते. गेल्या शंभर वर्षामध्ये असा महापूर कधी आलाच नाही. "या परिसरातल्या साध्या वार्ताहरांवर विसंबून राहण्याइतपत ही घटना नगन्य नाही. याची जाणीव राष्ट्रीय प्रसारणातल्या बातमीनं बहुतेक वृत्तपत्रवाल्यांना झाली आणि त्यांनी तिथल्या विशेष वृत्त सेवेसाठी आपापले प्रतिनिधी छायाचित्रकारांसह रवाना केले."५ नंदू आणि बेला हे दोघे तिथे गेले. नंतर

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

त्यांच्यात प्रेमसंबंध प्रस्थापित होवून बेला गर्भवती होते. तेंव्हा नंदू तिला ॲबॉर्शन करण्यास भाग पाडते. ही कथा फार अलवार आहे, संवेदनाक्षम आहे. बदलत्या जीवनाचे, वासनांचे आवेग तरूण-तरूणींच्या वागण्यात कसे प्रतिबिंबित झाले ते कळते. एका तरूण मुलीच्या मनाचा प्रश्न लेखक फार हळवेपणाने मांडतो. तिच्या वाटण्याला तरूणाईचा नवीन संदर्भ देतो. पराभूत मनाला कणखर बनविण्याचा तो प्रयत्न करतो.

'तन्द्रव' कथेसंबंधी रवींद्र शोभणे लिहितात, "तन्द्रव' या कथेकडे जेंव्हा मी आज तटस्थपणे पाहतो तेंव्हा या कथेतून व्यक्त होणा-या अनुभवाचा पोत हा एकपदरी निश्चितच नाही; तो तीनपदरी किंवा त्रीस्तरीय स्वरूपाचा आहे. हे प्रथमच जाणवले."६ आजच्या पिढीला जवळचे वाटणारे कथानक प्रस्तुत कथेमध्ये आहे. तरूणांच्या मनाची घुसमट, त्यांचे प्रश्न, त्यांची जिद्द, नवीन गोष्ट करू पाहण्याची आकांक्षा, युवक-युवतीचे प्रेमसंबंध नंतर त्यामध्ये आलेले विघ्न इत्यादी गोष्टी कवेत घेत ही कथा साकार होतांना दिसते. त्यामुळे ही कथा आजच्या पिढीला जवळची वाटते.

समारोप :

समाजातील माणसाचे मूल्यहीन वर्तन कथाकार रवींद्र शोभणे यांनी चितारले आहे. जीवनातील दुःख, त्याच्या अलक्षित अनुभवाचा शोध घेण्याची धडपड कौतुकास्पद आहे. शोभणेंनी टिपलेले संवेदन अर्थवाही व गंधवाही आहे. त्यामुळे वाचकांना वाचनाचे वेढ लागते. 'तन्द्रव' कथासंग्रहातील संपूर्ण कथा ह्या वर्तमानाच्या आहेत. माणसांच्या पराभूत वृत्तीची चिरफाड, मानवी संबंधाची तान-तनाव इत्यादी विषय घेऊन त्यांची कथा प्रकटलेली आहे. त्यांच्या कथा विस्मयकारक प्रत्यय देणा-या आजच्या पिढीच्या कथा आहेत. ह्या कथासंग्रहातील कथांमधून माणसांच्या ठिकाणी असणा-या आत्मकेंद्रितता, स्वार्थीबुद्धी, भोगलोलुपता या स्वभावदोषातून परिणाम होणा-या जीवनानुभवांची विभिन्न रूपं साकार झालेली आहेत.

निष्कर्ष :

(१) 'तन्द्रव' कथासंगहातील कथा वर्तमानाच्या कथा आहेत.

(२) 'तन्द्रव' कथासंग्रहाचे स्वरूप इतर कथासंग्रहापेक्षा वेगळे आहे.

(३) अनेक नविन विषयांना कवेत घेत प्रस्तुत कथासंग्रह लिहिलेला आहे.

(४) कथेतील व्यक्तिरेखा आपल्या सभोवतीच्या वाटतात.

संदर्भ ग्रंथ :

(१) रवींद्र शोभणे, 'तन्द्रव', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००४, पृ. १२
(२) तत्रैव, पृ. २१
(३) तत्रैव, पृ. ४६
(४) तत्रैव, मलपृष्ठावरील मजकुरातून
(५) तत्रैव, पृ. १२२
(६) रवींद्र शोभणे, 'कथा लेखनासंबंधी माझी भूमिका आणि तन्द्रव' यामधून

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

ISSN 2241-573X
UGC Care Listed Journal

विभूति

वर्ष : २२ वे | अंक : ४ था
अक्टूबर - २०२२

तेलगणी वाङ्मयातील स्त्री विशेष

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

UGC Care Listed Journal ISSN 2231 - 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

तिफण

MAHMAR 34737/13/1/2009-TC

लोककवी वामनदादा कर्डक विशेषांक (भाग-२)

वर्ष १२ वे, अंक – दुसरा; जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

● संपादक ●

डॉ. शिवाजी हुसे

● अतिथी संपादक ●

डॉ. युवराज धबडगे
मराठी विभागप्रमुख

प्रा. नागेश बोन्तेवाड
मराठी विभाग

दगडोजीराव देशमुख महाविद्यालय, वाळूज, जि. औरंगाबाद

● संपादक मंडळ ●

डॉ. सर्जेराव जिगे
डॉ. फुला बागूल
डॉ. अनिल गर्जे
डॉ. संजय सांभाळकर
डॉ. ताहेर पठाण
डॉ. वंदना महाजन
डॉ. रामचंद्र झाडे
डॉ. ममता इंगोले
डॉ. वामन जाधव
डॉ. यशवंत सोनुने

मूल्य : ३०० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड,
जि. औरंगाबाद – ४३११०३. मो. ९९०४००३९९८

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

अनुक्रमणिका

अ. क्र.	शीर्षक / लेखक-संशोधक	पृ. क्र.
1.	लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि कार्य - प्रा. डॉ. रमेश श्रीरंग औताडे	1 – 6
2.	लोककवी वामनदादा कर्डक यांची लोकगीते - प्रा.डॉ. दिलीप सावंत	7 - 10
3.	वामनदादा कर्डक यांच्या गीतातील बौध्द तत्वज्ञान - डॉ. लोणे राजेंद्रकुमार लक्ष्मणराव	11 – 13
4.	लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील बौध्द तत्वज्ञान - डॉ. उत्तम हरिबा कांबळे	14 - 17
5.	वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता - सुनील स कांबळे / डॉ. संदिप बनसोडे	18 - 22
6.	वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि कार्य - प्रा.डॉ.प्रेमला मुखेडकर	23 - 26
7.	वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता व नाटकीयता - डॉ. संदीप अ. बनसोडे / रामेश्वर गिरधर देवरे	27 - 29
8.	लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि कार्य - शारदा किशन धामणगावकर	30 - 33
9.	लोककवी वामनदादा कर्डकांच्या बुध्दगीतांचे सामाजिक महत्त्व - प्रा. डॉ. शिवाजी संभाजी गायकवाड	34 - 36
10.	लोककवी वामदादा कर्डक यांची महिला गीते - प्रा.डॉ. आशा सोपान गिरी	37 - 40
11.	वामन दादाकर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता आणि निसर्ग प्रतिमा - प्रा. विक्रम उ. मोरे	41 - 44
12.	वामनदादा कर्डक : नव्या युगाचा शाहीर - प्रा. देवेंद्र बाबुराव निकम, प्रा. डॉ. म. सु. पगारे	45 - 48
13.	मानवतावादी कवी वामनदादा कर्डक यांच्या काव्यातील मुल्यविचार - प्रा. डॉ. बाळासाहेब लिहिणार	49 - 52
14.	लोककवी वामनदादा कर्डक यांच्या लोकगीतांचा अभ्यास - प्रा. डॉ. डी. ए. पाटील	53 - 56
15.	वामनदादा कर्डक यांच्या लोकगीतांतील सामाजिकता - डॉ.नवनाथ ज्ञानोबा पवळे	57 - 59
16.	वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता - प्रा.डॉ.कोतमे धिरजकुमार सत्येकाम	60 – 62

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

अनुक्रमणिका

अ. क्र.	शीर्षक / लेखक-संशोधक	पृ. क्र.
1.	लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि कार्य - प्रा. डॉ. रमेश श्रीरंग औताडे	1 – 6
2.	लोककवी वामनदादा कर्डक यांची लोकगीते - प्रा.डॉ. दिलीप सावंत	7 - 10
3.	वामनदादा कर्डक यांच्या गीतातील बौध्द तत्वज्ञान - डॉ. लोणे राजेंद्रकुमार लक्ष्मणराव	11 – 13
4.	लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील बौध्द तत्वज्ञान - डॉ. उत्तम हरिबा कांबळे	14 - 17
5.	वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता - सुनील स कांबळे / डॉ. संदिप बनसोडे	18 - 22
6.	वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि कार्य - प्रा.डॉ.प्रेमला मुखेडकर	23 - 26
7.	वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता व नाटकीयता - डॉ. संदीप अ. बनसोडे / रामेश्वर गिरधर देवरे	27 - 29
8.	लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि कार्य - शारदा किशन धामणगावकर	30 - 33
9.	लोककवी वामनदादा कर्डकांच्या बुध्दगीतांचे सामाजिक महत्त्व - प्रा. डॉ. शिवाजी संभाजी गायकवाड	34 - 36
10.	लोककवी वामदादा कर्डक यांची महिला गीते - प्रा.डॉ. आशा सोपान गिरी	37 - 40
11.	वामन दादाकर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता आणि निसर्ग प्रतिमा - प्रा. विक्रम उ. मोरे	41 - 44
12.	वामनदादा कर्डक : नव्या युगाचा शाहीर - प्रा. देवेंद्र बाबुराव निकम, प्रा. डॉ. म. सु. पगारे	45 - 48
13.	मानवतावादी कवी वामनदादा कर्डक यांच्या काव्यातील मुल्यविचार - प्रा. डॉ. बाळासाहेब लिहिणार	49 - 52
14.	लोककवी वामनदादा कर्डक यांच्या लोकगीतांचा अभ्यास - प्रा. डॉ. डी. ए. पाटील	53 - 56
15	वामनदादा कर्डक यांच्या लोकगीतांतील सामाजिकता - डॉ.नवनाथ ज्ञानोबा पवळे	57 - 59
16.	वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता - प्रा.डॉ.कोतमे धिरजकुमार सत्येकाल	60 – 62

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

33.	आंबेडकरी शाहीर : वामनदादा कर्डक - प्रा. सौ. नंदा निवृत्ती मास्कर	135 - 137
34.	वामनदादा कर्डक यांच्या गीतरचनेतील शैलीविशेष – गेयता - डॉ. जया जितेंद्र कदम	138 - 141
35.	महाकवी वामनदादा कर्डक : आंबेडकरी तत्वज्ञानाचा काल-आज व उद्याचा चेहरा - प्रा. डॉ. सोपान माणिकराव सुरवसे	142 - 145
36.	लोककवी वामनदादा कर्डक यांची स्त्रीगीते - डॉ. देवमन दत्तुजी कामडी	146 - 155
37.	वामनदादा कर्डक यांची गझल रचना - डॉ. मुख व इघारे	156 - 159
38.	लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकर दर्शन - प्रा. डॉ. दलशाहा डोमाजी चव्हाण	160 - 166
39.	वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता - डॉ. राजाराम अं. झोडगे	167 - 170
40.	लोककवी वामनदादा कर्डक यांच्या काव्यातील सामाजिक बांधिलकी : शोध व स्वरूप - प्रा. निखिल भिकाजी उंबरकर	171 - 173
41.	तुकोबांच्या कुळातील लोककवी : वामनदादा कर्डक - प्रा. डॉ. विठ्ठल खंडूजी जायभाये	174 - 178
42.	आंबेडकरी चळवळीचा तेजोमय दीप - प्रोफेसर डॉ.शैलेश विश्वनाथ त्रिभुवन	179 – 181
43.	आंबेडकरवादी लोकशाहीर वामनदादा कर्डक - प्रा.डॉ. बहरे राजू सायन्ना	182 - 184
44.	लोककवी वामनदादा कर्डक यांची लोकगीते - प्रा. डॉ. विलास खुणे	185 - 187
45.	शोषितांचा हृदयस्पर्शी आवाज : महाकवी वामनदादा कर्डक - प्रा.डॉ. शोधी एम. देशपांडे	188 - 191
46.	लोककवी वामनदादा कर्डक यांची राष्ट्रीय कविता - प्रा.डॉ. विलास शं. पाटील	192 - 194
47.	लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजीकता - डॉ. रंजना मधुकर कदम	195 – 200
48.	लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान - प्रा.डॉ.साहेबराव भानुदासराव शिंदे	201 – 204
49.	लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतांचे स्वरुप आणि विचार - प्रा.डॉ. चंद्रशेखर निवृत्ती एंगडे, प्रा. संजय नामदेवराव आठवले	205 - 210

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकर दर्शन

- प्रा. डॉ. बादलशाहा डोमाजी चव्हाण
मराठी विभाग,
महात्मा जोतिबा फुले महाविद्यालय,
बल्लारपूर, जिल्हा. चंद्रपूर
भ्रमणध्वनी 8007928227
ई-मेल badalchawhan@gmail.com

आंबेडकरवादी मराठी साहित्यात लोककवी वामनदादा कर्डक यांचा महानायक म्हणून गौरव करण्यात येतो. वामनदादा हे सच्चे समाजशिक्षक, लोकशिक्षक आणि महान लोककवी होते. त्यांची कविता आंबेडकरी जनतेच्या घराघरात पोहचली आहे. वामनदादाच्या कवितामुळे आंबेडकरवादी मराठी कविता उर्जावान झाली. त्यांनी आधुनिक क्रांतिकारी कविता लिहिलेल्या आहेत. आपल्या गितस्वरुपी कवितांनी भगवान बुध्द महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, माणसांच्या मना-मनात पोहचविले. वामनदादांनी देव, दैव, आत्मा, पुनर्जन्म, मनू यांना नकार दिला व मानवतावादाचा स्विकार केला. या जगाला बदलवायचे असेल तर मनुष्याने स्वत:पासून सुरुवात करावी. स्वत:ला दिव्यातील तेलाप्रमाणे जाळावे. संघर्षरत राहावे आणि जगाला प्रकाशाच्या दिशेने न्यावे असे ते म्हणत असत.

बीजशब्द :

युगप्रवर्तक, भीमशाहीर, लेखणी, चळवळ, तत्त्वज्ञान, प्रतिभा, महापरिनिर्वाण.

प्रास्ताविक :

विसाव्या शतकातील महापुरुषांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक असामान्य महापुरुष होते. त्यांचे विचार प्रबोधनकारी आहेत. त्यांच्यामुळे भारतीय समाजातील वेगवेगळया क्षेत्रात क्रांती झाली. पूर्वी भारतीय समाजमन चातुर्वर्ण्य आणि जातीभेदामुळे हवालदील झाले होते. हा समज बाबासाहेबाच्या तत्वज्ञानामुळे आणि चळवळीमुळे जागृत झाला. त्यांच्यामुळेच या समजाला नवी दिशा, नवे बळ मिळाले. आता तो नव-नवीन क्षेत्रात वाटचाल करीत आहे. याला साहित्यक्षेत्रही अपवाद राहिले नाही. समस्त बहुजन वर्गाच्या आचार-विचारात परिवर्तन करण्यामागे आंबेडकरी चळवळ आणि तत्वज्ञान यांचा सिंहाचा वाटा आहे. यामुळे समाजाला नवी दिशा मिळाली. त्यांचा स्वाभिमान जागा झाला. एका नव्या युगाचा प्रारंभ झाला. मुक्यांना वाचा आली ते क्रांतीचे नवे गीत गाऊ लागले.

1930 नंतर मराठी कवींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर कविता लेखनास प्रारंभ केला त्याच्याबद्दल आदर, प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त केली. "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाने कवी, कलावंतांच्या प्रतिभांना नवा आशय, नवे भावविश्व, नविन विषय आणि नविन जाणिवाही प्राप्त झाल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या युगंधर प्रेरणेने मराठी कवितेत

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

खऱ्या अर्थाने एका नव्या आणि विद्रोही सुर्यकुळाच्या कवितेचा प्रारंभ झाला. मराठी कवितेचे तारांगण निखाज्यांनी फुलले मराठी कवितेतले हे अनोखे दर्शन होते."[1] मराठी कवितेत वेगळ्या भूमिकेतून कवितांची रचना करणारे वामनदादा कर्डक हे आंबेडकरी विचारांचे पाईक होते त्यांनी विविधांगी लेखन केले आहे प्रामुख्याने भीम-बुध्द गिते लिहिली. त्यांच्या गीतांनी लोकरंजनासह लोकशिक्षण दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार कवितेतून-गीतांतून खेडया-पाडयापर्यंत पोहचविण्याचे महान कार्य केले. त्यामुळे त्यांना 'भीम शाहीर' म्हणून गौरविण्यात येते. वामनदादा हे पुढील पीढीतील कवी-गायकां चे मार्गदर्शक आहेत. त्यांच्या पाऊलावर पाऊल ठेवून नंतरच्या पीढीतील कवी-गायकांनी कविता लिहिलेल्या आहेत.

जीवन परिचय :

तब्बल 82 वर्ष आंबेडकरी चळवळीची सेवा करण्याऱ्या वामनदादा कर्डकाचा जन्म क्रांतिकारी, संघर्षमय वातावरणात देशवंडी, ता. सिन्नर, जिल्हा. नाशिक येथे 15 ऑगस्ट 1922 मध्ये झाला. आई सईबाई आणि वडिल तपाजी कर्डक. वामनदादा तीन वर्षाचे असतानाच वडीलांचे निधन झाले. गावात शाळा नसल्यामुळे ते गुरे राखायचे. वयाच्या अकराव्या वर्षी आई-भाऊ-बहिण यांच्यासह मुंबईला गेले तेथे वामनदादा, त्यांची आई आणि बहिण सायनच्या कोळशाच्या वखारीत कोळसा वेचून तो कुर्ला येथे नेऊन विकायचे. त्यांनी लेजीम व लाठीचे उत्तम शिक्षण घेतल्यानंतर बी.डी.डी चाळ नं. 13 शिवडी येथे समाजकल्याण केंद्रात ते लेझीम शिक्षक झाले. वाचता येत नसल्यामुळे त्यांना वाईट वाटायचे. देहलवी शिक्षकाच्या सहकार्याने ते वाचन करणे शिकले. वाचनामुळे आणि चित्रपटामुळे त्यांच्यातील कलावंत जागा झाला त्यांनतर त्यांनी नाटक आणि चित्रपट कथा लिहिल्या. 1942 नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी थेट संपर्क आला समता सैनिक दलाच्या संचालनात सहभागी होऊन ते संचालन करायचे.

वामनदादा कर्डक यांच्या नावावर 'वाटचाल' (1973) 'मोहळ' (1976), 'हे गीत वामनाचे' (1977) हे कवितासंग्रह गीतसंग्रह आहेत. 'माझ्या जीवनाच गाणं' (1996) हे आत्मकथन लिहिले आहे. यासोबतच काही चित्रपट गीते आणि ध्वनिफिती आहेत. त्यांच्या नावावर दहा हजार गाणी आहेत. वामनदादाचे जीवनच एक गाणं आहे. वामनदादाची कविता सामाजिक जाणिवेतून प्रकट झाली आहे. त्यांचे आदर्श भगवान बुध्द महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर असल्यामुळे त्यांच्यावर विपुल प्रमाणात कविता लिहिलेल्या आहेत 1943 ते 1980 या कालावधित त्यांनी विपूल लेखन केले. बाबासाहेब आंबेडकरांची गाणी गातांना तर ते भीममय होतात व प्रेक्षकांना भीममय करतात. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. अशा या बहुआयामी व्यक्तिमत्वाचा मृत्यू 15 मे 2004 मध्ये झाला.

बाबासाहेबाच्या जन्माविषयीच्या कविता :

आंबेडकरवादी मराठी कवितासृष्टीत वामनदादा कर्डक हे अत्यंत महत्त्वाचे कवी आहेत. त्यांनी वस्तुनिष्ठ कवितेसोबतच जुन्या-नव्याचा मेळ घालणाऱ्या कविता अतिशय सकसपणे लिहिल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मामुळे अनाथ असलेल्या बहुजनांना पिता आणि गुरु मिळाला बाबासाहेबांमुळे विषम व्यवस्था हादरली अस्पृश्यता, जातीवाद, विषमता, कर्मकांड डगमगायला लागले. लक्षावधी बहुजनांची दयनिय अवस्था नाहिशी झाली. जणू बाबाहेबाचा जन्म हा कोटयावधी बहुजनांचा उध्दार करण्यासाठीच झाला होता.

"उध्दरली कोटी कुळे
भीमा तुझ्या जन्मामुळे
एक ज्ञानज्योतीने कोटी, कोटी ज्योती
उजळे, काळोख मावळे
भीमा तुझ्या जन्मामुळे"[2]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मापूर्वी अस्पृश्यांची अवस्था अतिशय वाईट होती चांगले जगताही येत नव्हेत. त्यांच्या जन्मामुळे गुलामगिरीचे जीवन जगणाऱ्या लक्षावधी बहुजनांच्या हातापायांतील बेडया तडातडं तुटल्या त्यांना स्वातंत्र्य मिळाले. त्यांच्या आयुष्यातील अंधार नाहिसा झाला नवे आयुष्य जगायला मिळाले. जुने विचार, जुनी व्यवस्था, जुणी गाणी सर्व सोडून नविनतेच्या दिशेने वाटचाल सुरु झाली. "भीमजन्माचा सोहळा वर्णन करतांना वामनदादांची प्रतिभा तेजोमय होऊन

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Pallarpur

जाते. उंच-उंच भराऱ्या मारु लागते. भीमजन्माचा आनंद व्यक्त करतांना शब्दही थिटे पडावेत अशी त्यांची मानसिक अवस्था झाली असावी"[3] बाबासाहेबाच्या जन्मामुळे आकाश आश्चर्यचकीत झाले. सुर्य. चंद्र, तारे, पृथ्वी, विजा, वारा यांना हेवा वाटला. बाबासाहेबाच्या जन्मप्रसंगाचे वर्णन करतांना वामनदांदानी असंख्य शब्द वेगवेगळी विशेषणे, उपमा योजलेल्या आहेत. "वामनदादांची कविता ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावरील महकाव्य होय."[4] हे अगदी सत्य आहे. कारण वामनदादांनी बाबासाहेबाच्या वेगवेगळया पौलुंवर कविता रचलेल्या आहेत.

डॉ. बाबसाहेब आंबेडकराचे युगप्रवर्तकत्व :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे वामनदादा कर्डक यांच्या कवितांचे प्रेरणास्थान आहेत त्यांनी अतिशय समर्पकणे बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे वर्णन केले आहे. बाबासाहेबाचे सामाजिक-राजकीय लढे ते विसरु शकले नाही. त्यांच्या महपरिनिर्वानानंतर चळवळीला आलेली अवकळा ते विसरु शकले नाही.

"भीम माझ्यामध्ये होता, मान ताठ होती माझी माझ्यातला भीम इथे मीच केल उणा, दोष देऊ कुणा?"[5]

वामनदादाच्या कवितेतील हे दु:ख दलित समाजाला जाणवणाऱ्या पोरकेपणाचे आहे. यासोबतच त्यांनी बाबासाहेबांच्या जीवनातील घडामोडीचे दर्शन घडविले आहे. "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रुपाने जगासमोर मुखर झाले आहे. त्यामुळे आजचे, उद्याचे आणि उद्याच्या उद्याचे नायकही डॉ. बाबासाहेब आंबेडकरच आहेत. असे वर्णन ओजस्वी भाषत, लयदार आणि पल्लेदार शौलीत, मंजुळ वाणीने वामनदादांनी केलेले आहे"[6] वामनदादांनी बाबासाहेबाचे युगप्रवर्तकत्व सिध्द करणाऱ्या अनेक कविता लिहिल्या. बाबासाहेब हे त्यांच्या कवितांच्या जीव की प्राण होता त्यांच्यावर त्यांची श्रध्दा होती. बाबासाहेबाविषयीची कृतज्ञता वामनदादांनी मरेपर्यन्त जोपासली. बाबासाहेबांचे गुणवर्णन, त्यांच्या कार्याचे वर्णन करण्यात त्यांनी आपली हयात घालविली. त्यांनी आपल्या काव्य गीतांतून लोकांमध्ये स्फूर्ती जागविली त्यांची कविता ही आंबेडकरवादी मराठी साहित्यातील अनमोल ठेवा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे रंजल्या-गांजल्या बहुजनांची आईवडील होते. त्यांच्यात स्वाभिमान जागृत करणारा हा महामानव होता. जगातील वेगवेगळया नेत्यांना वेगवेगळी विशेषणे लावली जातात. मात्र बाबासाहेबांना भीमाई, आपले वडील, आपल्या वडीलांचे वडील अशी विशेषणे लावली जातात आणि ते खरेच आहे. आपल्या समाजाला मायेची उब, बापाचा आसरा देणारे. बापाचे कर्तव्य पूर्ण करणारे बाबासाहेब जगाच्या पातळीवर एकमेव असे महापुरुष झाले. वामनदादा लिहितात-

"चांदण्याची छाया कापराची माया
माऊलीची माया होता माझा भीमराया
चोचीतला चारा देत होता सारा
आईचा उबारा देत होता सारा
भीमाईपरी चिल्ल्यापिल्ल्यापरी
पंख पांघराया होता माझा भीमराया"[7]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरी समजाचे नाते आईमुलासारखे आहे. बाबासाहेब बहुजन समजाचे उध्दारक आहेत. "मराठी साहित्यात आईवरच्या कविता काही कमी नाहीत. त्या खरोखरच्या जन्मदात्रीवर लिहिल्या आहेत. पण एका क्रांतीपुरुषाला, एका महापुरुषाला, एका बंडखोर नेत्यालाच आईच्या भूमिकेत नेऊन त्याच्यावर लिहिलेली वामनदांदांची प्रत्येक कविता आणि प्रत्येक गाणे काळीज ओले करणारे आहे भीमाई आणि तिची जनता यांच्यात खरोखरच माय-लेकरांचे नाते होते, हे समजून घेण्यात या कवितांमुळे कसलीच अडचण येत नाही"[8] वामनदादांनी अगदी सुलभतेने वावासाहेब आणि दलित समजाचे वर्णन आपल्या कवितेतून केलेले आहे. ते त्यांना कधी आई संबोधतात तर कधी पिता संबोधतात आणि लिहितात.

"जाताच पिता अनुभवी
तापलां दुहीचा रवी
संपली नवी टवटवी

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

बोले जो वामन कवी
आज मोजी घटका पळा
माझ्या भीमरायाचा मळा"[9]

भारतीय समाजात वडील हा कुटुंबप्रमूख असतो. वडीलांच्या निधनानंतर कुटुंबावर दुखाचे सावट पसरते, कुटुंब कोसळते. बाबासाहेब तर दीन-दलितांचे सर्वस्व होते. त्यांच्यानंतर समाजावर दुखाचा डोंगर कोसळला. कधीही भरुन न निघणारी समाजाची हानी झाली. समाजात निराशा पसरली असे वर्णन वामनदादांनी मोठया तन्मयतेने केलेले आहे.

लेखणीचे वर्णन :

वामनदादा कर्डक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वेगवेगळया पैलूंवर कविता लिहिलेल्या आहेत. बाबासाहेबांना त्यांच्या लेखनीने उत्तुंग शिखरावर पोहचविले हया लेखनीमूळेच बाबासाहेब प्रकांड पंडीत झालेत. बॅरिस्टर झाले. प्रोफेसर झाले आणि भारतीय संविधानाचे निर्माते झाले. वामनदादांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्ञानाचे पराक्रमाचे, लढयाचे वर्णन जसे केले आहे तसे त्यांच्या लेखनीचेही वर्णन केले आहे. बाबासाहेब आंबेडकरांची लेखनी गीत होवून आपले महत्व सांगते. ही पलपती लेखनी गर्वासाठी गर्वाचा विषय झाली आहे.

"जगातली देखणी
बाई मी भीमाची लेखणी।।
काळया मनुचा इमला मी पाडीला
त्यात मनुचा मुडदा मी गाडीला
मुडदा मनुचा मीच पाडला रणी गं
बाई मी भीमाची लेखणी।।"[10]

डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या कार्यावर अनेक कविता आढळतात. मात्र त्यांच्या लेखनीवर कविता लिहिणे कुणाला गवसले नाही ते वामनदादा ना गवसले. वामनदादांनी आपल्या प्रतिभाबलाने बाबासाहेबाच्या लेखणीचे वर्णन केले आहे. या लेखणीमुळेच मुनचा मुडदा गाडल्या गेला संपूर्ण सत्य उजगर झाले सत्य घटना समोर आल्या हे कार्य केवळ बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनीमुळेच साध्य झाले म्हणून त्यांची लेखनी महान ठरते

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ:

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या हयातील दलितांच्या उत्थानासाही वेगवेगळया चळवळी केल्या. 20 मार्च 1927 मध्ये महाडच्या चवदार तळयाचा सत्याग्रह केला. हा सत्याग्रह दलितांच्या एकूणच लढयाच्या अस्मितेची नांदी होती 3 मार्च 1930 मध्ये काळाराम मंदिर सत्याग्रह केला. शेतकरी, शेतमजूर, कामगार, श्रमिक, महिला यांच्यासाठी बाबासाहेबांनी अनेक चळवळी उभारल्या. बौध्द धम्माचा स्विकार ही सुध्दा जागतिक कितींची महान चळवळच होती. बाबासाहेबानी आपल्या लक्षावधी अनुयायांसह 14 ऑक्टोबर 1956 रोजी नागपूर येथे बौध्द धम्माचा स्विकार केला. त्यांनी दलितांना नवीन जीवन दिले. हा धम्म स्विकाराचा समारंभ वामनदादांनी हेरला आणि त्याप्रसंगाचे वर्णन आपल्या कवितेत केले.

"त्या भीम माऊलीला, लाखात पाहिले मी
जयगान माऊलीचे लाखात गाईल मी
गेली हजार वर्षे नव्हता मनात हर्ष
मसनातल्या मनूचे आघात साहिले मी..."[11]

तीन हजार वर्षापूर्वीचा, आपल्याच मातीला बौध्द धम्म स्विकरण्याचे भाग्य बाबासाहेबामुळेच सर्वानां लाभले यामध्ये सर्वाना मुक्तीचा मार्ग दिसला स्वाभिमान जागा झाला, दलित समाजात नवचौतन्य आणि सत्व निर्माण झाले. आपल्या हक्कासाही ते लढू लागले. वामनदादांची कविता सर्व प्रकारच्या शोषणाचा निषेध करते आणि समता, स्वातंत्र्य आणि बंधुता याचा स्विाकार करते. त्यांची कविता आजपर्यंत ज्या शोषकांनी दलितांचे शोषण केले त्या सर्वांचा निषध करते व संपूर्ण शोषितांना ती आव्हान करते बाबासाहेबाची सामाजिक चळवळ पुढे नेण्यासाठी वामनदादांनी स्वतःच्या पोटाची, घरादाराची

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

पर्वा केली नाही. डॉ. आंबेडकर हे बहुजनाच्या स्वाभिमानाचा. प्रगतीचा आणि उत्थानाचा मार्ग होता व त्यात अनेक वाटा सामील झाल्या होत्या.

बाबासाहेबाचे महापरिनिर्वाण :

वामनदादा कर्डकांची कविता स्वातंत्र्य, समता, बंधता या मूल्यांचा पुरस्कार करणारी आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 6 डिसेंबर 1956 ला महापरिनिर्वाण झाले. याचे पडसाद वेगवगेळया चळवळींवर उमटले. वाड्.मय चळवळही याला अपवाद नाही. मराठी साहित्यातून विशेषत: मराठी कवितेतून डॉ. आंबेडकरांचे व्यक्तिमत्व, त्यांच्याविषयीचा आदरभाव, त्यांच्या कार्य-कर्तुत्वाविषयीचा आदरभाव व्यक्त झाला. वामनदादांनी आपल्या कवितेतून बाबाहेबाची शिकवण त्यांचे व्यक्तिमत्व यासोबतच त्यांच्या महापरिनिर्वाणाविषयी देखील कविता लिहिलेल्या आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर बहुननांना फार दुख झाले. हे दु:ख न संपणारे होते. बाबासाहेबांचे कार्य आणि विचार मात्र अजरामर आहेत. समाजाला दिशादर्शक आहेत. देहू रोड. जि. पुणे याठिकाणी बाबासाहेबांच्या स्मरणार्थ स्तूप उभारला गेला. वामनदादा लिहितात.

"जेथे समाज सारा हा एकरुप आहे
तेथेच खरा माझ्या बाबांचा स्तूपआहे
तनमनाने, धनाने, जळतो भीमेपणाने
मानू तयास आम्ही तो भीमरुप आहे"[12]

बाबासाहेबांनी शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा मुलमंत्र दिला. त्यांनी शिक्षणासोबत संघटनेला महत्व दिले समाज एकसंघ झाला तर कुणाचीही ब्र काढण्याची ताकद नाही आणि या संघटीत होण्याला विशेष महत्व येईल. संघटीत होणे म्हणजे बाबासाहेबांच्या विचारांचा पाईक होणे होय संघटीत होणे म्हणजे बाबासाहेबांच्या विचारांशी एकरुप होणे होय तेच खरे बाबासाहेबांचे स्वप्न सत्यात उतरविणे होय. आजही बाबासाहेबांचे विचार महत्वाचे ठरतात. त्यांची उपयोगिता कमी होणार नाही हे विचार चिरकालीन टिकणारे आहेत. त्यांना बाजूला सारुन जगताच येणार नाही ऐवढे ते महत्वाचे आहेत

आंबेडकरोत्तर चळवळ :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वानानंतर समाजात दुहीचे वातावरण निर्माण झाले समाजाचे तुकडे-तुकडे झाले. चळवळीचेही तुकडे झाले. बाबासाहेबांनी समाजात समता प्रस्थापित करुन समाजाला एकसंघ बनविले होते. तोच समाज आतुन पोखरला अशावेळी वामनदादा कर्डक बाबासाहेबांच्या आठवणीने व्याकुळ होतात

"काय सांगू तुला आता, भीम माझा कसा होता
लेकराला जशी माता, भीम माझा तसा होता"[13]

बाबासाहेब समग्र बहुजनांचे उध्दारक आहेत. ते आपल्या समाजाला मुलाप्रमाणेच मानत असत. म्हणून संपूर्ण समाज बाबासाहेबांच्या एका हाकेला हो देत होता. वामनदादांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विपुल लेखन केले आहे. बाबासाहेबानंतर त्यांच्या राजकीय पक्षाची जी दुर्दशा झाली त्यावर त्यांनी अतिशय मर्मभेदी प्रहार केलेला आहे.

"भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते
तलवारीचे तयांच्या न्यारेच टोक असते
वाणीत भीम आहे, करणीत भीम असता
वर्तन तुझ्या पीलांचे सारेच चोख असते"[14]

बाबासाहेब आंबेडकरांप्रती प्रत्येकाने ईमान राखायला पाहिजे अुनयायांच्या वार्णा आणि करणीत फरक पडता कामा नये. बाबासाहेबांचे विचार आत्मसात करुन आपले आचरण चांगले करावे असा ते सल्ला देतात वामनदादांनी आपल्या कवितेतून जणू आंबेडकरी विचारांची पेरणी केली आहे बाबासाहेबानंतर चळवळीला ओहोटी आली. त्यांनी आपल्या शरीरातील रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत समाजाची सेवा केली. मात्र त्यांनीच उभारलेली चळवळ कमकुवत झाली. लोक

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Bellarpur

स्वार्थाने बरबटले. सत्तेसाठी वाटाघाटी सुरु झाल्या.

भंगले संसारस्वप्न घर पित्याचे भंगले
बांधणारे भिंत धोकेबाज आम्ही पाहतो
वाटला संसार वाटा आईचाही पाडला
अन् तिच्या ज्या जीवनांची सांज आम्हीपाहतो
पाहिले ना जे कधी ते आज आम्ही पाहतो
जात असता माऊलीची लाज आम्ही पाहतो (पाहिलेन जे कधी)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हयातीत जे घडले नाही अशा विपरीत घटना आता घडत आहेत बाबासाहेबांनी नवसमाजाचे स्वप्न पाहिले होते. ते स्वास्थाने बरबटलेल्या लोकांमूळे अपूर्ण राहिले. पुढारी स्वाहितासाठी सत्ताधाऱ्यांच्या दावणीला बांधले गेले. याची वामनदादांना खंत वाटते बाबासाहेबांची चळवळ कमकुवत करण्याचे प्रयत्न राजकीय पातळीवरुन सुरु आहेत. ते सफल झाले तर बाबासाहेबांनी मोठया मेहनतीने उभी केलेली परिवर्तनाची चळवळ मागे जाईल. ती मागे जाऊ नये. खचू नये. थांबू नये यासाठी वामनदादांनी जिवाचे रान केले आतातरी बाबासाहेबांच्या अनुयायांनी सावधगिरी बाळगावी आणि समाजाला योग्य दिशेने न्यावे असा सल्ला कवितांच्या माध्यमातून त्यांनी दिलेला आहे

विररसांनी ओतप्रोत भरलेली आंबेडकरी कविता :

वामनदादा कर्डक यांची 'आम्ही तुफानातले दिवे' ही कविता अत्यंत महत्वाची आहे. ती वीररसांनी ओतप्रोत भरलेली आहे. ती बंडात्मक आणि विद्रोहात्मक आहे. आपण लढू शकतो, अन्यायाचा प्रतिकार करु शकतो असे सांगणारी आहे. बहूजन समाजाचा एक इतिहास आहे. वामनदादा म्हणतात, आपण लहान नाहीत तर तुफानातले दिवे आहोत. जो दिवा तुफानात, वादळात विझन नाही त्या दिव्याप्रमाणे बाबासाहेबांचे अनुयायी आहोत कोणत्याही विपरित परिस्थितीवर मात करुन पेटतच राहणे हा आपला गुणधर्म आहे. ते लिहितात -

"तुफानातले दिवे, आम्ही तुफानातले दिवे
तुफान वारा, पाऊस-धारा मुळी न आम्हा शिवे
तथागताच्या चिरंतनातून
मानवतेच्या कणाकणातून
भीमयुगाच्या निरांजणातून
तेल मिळले नवे
आम्ही तुफानातले दिवे "[15]

ही एक अप्रतिम कविता आहे. वामनदादांने अवघे आयुष्य आंबेडकरमय झाले होते त्यांच्या रक्तात, स्वासात आंबेडकर होते. "वामन कर्डक हा कवी अशा दिव्यांना तेलाची रसद पुरविणारा कवी आहे."[16] हे खरेच आहे. बाबासाहेबांचे विचार, त्यांचे कार्य सांगण्यासाठीच वामनदादांचा जन्म झाला अशी कबुली ते देतात, आपल्या कवितेत तसे नमुद करतात.

समारोप :

लोककवी वामनदादा कर्डक यांनी एकूण दहा हजार कविता लिहिलेल्या आहेत. त्या गीतांच्या स्वरुपात आहेत. काळानुसार ही गीते बदलली. यावरुन त्यांच्या प्रतिभेची उंची कळते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावरील कवितांमुळे गीतांमुळे त्यांना मानसन्मान मिळाला. त्यांनी बाबासाहेबांच्या विविध पैलुंवर, त्यांच्या जन्मघटनेवर, कार्यावर, चळवळीवर, महापरिनिर्वाणावर, कविता लेहिल्या आहेत. त्यांच्या गीतांनी एक नवे शास्त्र निर्माण केले ही गीते ऐकतांना आणि कविता वाचतांना आपण हरकून जातो. बाबासाहेब म्हणायचे माझ्या दहा सभांतून जेवढी जागृती होत तेवढीच कर्डकांच्या एका गीतांच्या कार्यक्रमातून होत असते. वामनदादांनी बाबासाहेबांचे विचार खेडयापाडयात पोहचविले. बाबासाहेबांच्या वैचारिक चळवळीला बौध्दिक खाद्य पुरविले.

वामनदादा कर्डक हे आंबेडकरी विचारांचे भाष्यकार होते बाबासाहेबासारखा व्यक्ती पुन्हा तयार व्हावा असे त्यांना

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule

वाटत होते. बाबासाहेबांना अमर करण्यात त्यांचा सिंहाचा वाटाआहे. वामनदादांची एक-एक कविता आचार्य पदवीचा विषय होऊ शकते एवढी महान ताकदीची त्यांची कविता आहे. वामनदादांची कविता आंबेडकरवादी मराठी साहित्यातील अमूल्य असा ठेवा आहे.

संदर्भ ग्रंथ:

1) वामन निंबाळकर, 'साठोत्तरी मराठी कवितेत आंबेडकरदर्शन' प्रबोधन प्रकाशन, नागपूर, 1993, प्रस्तावनेतून
2) वामन कर्डक, 'मोहळ', आनंद प्रकाशन, औरंगाबाद, 2008, पृ. 9.
3) उत्तम कांबळे, 'वामनदादाच्या गीतातील भीमदर्शन' सुगावा प्रकशन, पुणे, 2005, पृ. 12.
4) सागर जाधव, 'महाकवी वामनदादा कर्डक : चरित्रकाव्य', आलोक-संबोधी प्रकाशन, यवतमाळ, 2008, पृ. 8.
5) वामन कर्डक, उनि, पृ. 44
6) सागर जाधव, उनि, पृ. 49
7) वामन कर्डक, उनि, पृ. 44
8) उत्तम कांबळे, 'वामनदादांच्या गीतातील भीमदर्शन', सुगावा प्रकाशन, पुणे, 2005, पृ. 16.
9) वामन कर्डक, उनि, पृ. 20
10) वामन कर्डक, 'भीमा तुझ्या जन्मामुळे, वामनदादा कर्डक यांची भीमगीते, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, 2012, पृ. 19
11) वामन कर्डक, 'मोहळ' आनंद प्रकाशन, औरंगाबाद, 2008, पृ. 77
12) तत्रौव, पृ. 21
13) तत्रौव, पृ. 13
14) तत्रौव, पृ. 48
15) तत्रौव, पृ. 36
16) यशवंत मनोहर, 'आंबेडकरवादी मराठी साहित्य', भीमरत्न प्रकाशन, नागपूर, 1999, पृ. 174.

◆◆◆◆◆

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Impact Factor-7.675 (SJIF)
ISSN-2278-9308
December-2021
ISSUE No-(CCCXXXIII) 333

B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

वैदर्भिय साहित्यातील

शोधनिबंध विशेषांक

२०२१

- सपादक -

डॉ. अजय चिकाटे

डॉ. विजय राऊत

- This Journal is Indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

For Details Visit To : .....

INDEX

No.	Title of the Paper — Authors' Name	Page No.
1	मुक्तिबोधांची दीर्घ कविता — डॉ.कोमल वि. ठाकरे	1
2	वैदर्भीय प्रजाप्रिय प्रथम राज्यकर्ती—नागनिका — डॉ.गणेश चव्हाण	8
3	राष्ट्रसंताच्या पोवाडयातील ग्रामोध्दाराची सुत्रे — डॉ. प्रवीण कारंजकर	11
4	रवींद्र शोभणे यांच्या दोन कादंबऱ्या — प्रा.डॉ.अनिल बोपचे	16
5	वैदर्भीय कथाकार: सदानंद देशमुख — डॉ.प्रवीण घारपुरे	20
6	ग्रामीण कादंबरी: स्वरूप आणि आशय — डॉ. तुधीर बन्नुवान मोरे	24
7	यशवंत मनोहर यांच्या जीवनायन आणि वामन निंबाळकर यांच्या महायुध्द या काव्यसंग्रहातील आशयाचे वेगळेपण — प्रा. डॉ. प्रशांत रामदासजी राऊत	28
8	कुसुमावती देशपांडे यांचे ललित निबंध लेखन — डॉ. मंगला डाहाट	33
9	वैदर्भीय स्त्रीचे नेतृत्व करणारी 'धग' कादंबरीतील कौतिक — प्रा. सतीश एस.कर्णासे	38
10	झाडीपट्टीतील 'बहिणाबाई' : कवयित्री अंजनाबाई खुणे — डॉ.पद्माकर डिगांबर वानखडे	42
11	'आकांत' कारबाबाराव मडावी - एक परिवर्तनवादी आदिवासी साहित्यिक — श्री सूर्यभान डोंगरे	47
12	आधुनिक मराठी साहित्यातील स्त्री चळवळीचे स्वरुप — डॉ. स्मिता प्र. खोंडे	52
13	झाडीपट्टी नाट्यशारदेच्या दरबारातील प्रथितयश कलावंतांची मांदियाळी — डॉ धनराज एल खानोरकर	57
14	राघववेळ : एक आकलन — डॉ. नरेंद्र इश्वर घरत	62
15	निखाऱ्यांच्या पाऊस पाडणारा वैदर्भीय कवी : जावेद पाशा — डॉ. कविता मुरारीलाल राजाभोज	67
16	वैदर्भीय कविता आणि कवी — प्रा. भोजराज व्ही. बोदेले	73
17	सटवाई : ग्रामीण व्यवस्थेचे धगधगते वास्तव उलगडणारा कथासंग्रह — डॉ. कैलास वानखडे	76
18	झाडीपट्टीतील दंडार लोकनाट्य — स्वरूप आणि चिकित्सा — डॉ. शरद जे. मेश्राम	83
19	गिरीश सपाटे यांची कविता : मर्मबंध ते काळोख गडद होत चाललाय... — डॉ.अशोक भक्ते	87

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

20	वैदर्भीय लोकजीवनात ग्रामगीतेचे महत्व डॉ. साधना जिचकार	92
21	अरूणा सबाने ह्यांच्या कादंबरी लेखनातील स्त्रीवादी दृष्टिकोन कु. करूणा वसंतराव डहाके	95
22	माधव सरकुंडे यांच्या 'वाडा' आदिवासी कादंबरीतील समाजवास्तव डॉ. रेखा जगनाळे–मोतेवार	99
23	दलित- आंबेडकरी साहित्य प्रवाह: एक आकलन डॉ.निता उदेभान मेश्राम	104
24	अरुणा सबाने यांच्या स्त्रीवादी कादंबरीलेखनाचे स्वरुप ; वैशिष्टये डॉ. मनीषा वसंतराव नलगे	112
25	''ग्रामीणतेचे ज्वलंत वास्तवचित्रण रेखाटणारी कादंबरी : चारीमेरा'' प्रा. राजेंद्र बांगर	115
26	वैदर्भीय ग्रामीण कथासाहित्य डॉ. बाबलशाहा डोमाजी चव्हाण	122
27	ग्रामगीतेतील 'ग्रामनिर्माण' पंचक: संस्कार आणि जडण घडण प्रा. डॉ. महेंद्र द. झलके	125
28	वैदर्भीय साहित्यिक डॉ. रवींद्र शोभणे : व्यक्ती आणि वाङ्मय प्रा. कमलाकर एन. माहुरे	130
29	वैदर्भीय स्त्रीमुक्तीवादी लेखिका कुमुद पावडे यांच्या आत्मकथनाचा 'अंत:स्फोट' प्रा. अजय वा. बारसागडे	133
30	'माझ्यातला कवी मरत चाललाय': एक आकलन डॉ. संजय जीवनलाल सिंगनजुडे	137
31	अनिल यांची सामाजिक व वैचारिक स्वरूपाची कविता प्रा. डॉ. राकेश कभे	143
32	वैदर्भीय ऐतिहासिक नाटके डॉ. मीनाक्षी भोयर	149
33	अंतर्मनाचे पदर उलगडणारी 'हराळी' डॉ. विलास गुलाबराव गजबे	153
34	वैदर्भीय साहित्यधारा : डॉ.प्रतिमा इंगोले हयांचे काव्यसंग्रह संदर्भात (शेतकऱ्यांच्या नारी, बाईची कहाणी, भुलाई) डॉ.विजया जितेंद्र राऊत	158
35	वैदर्भीय सामाजिक कार्यकर्त्या सीमा साखरे यांच्या' संग्राम' आत्मचरित्राची स्त्रीवादी अंगाने चिकित्सा डॉ. अमृता डोरलीकर	167
36	झाडीपट्टी रंगभूमीचे वेगळेपण डॉ. माधव धोंडीबा कांडणगिरे	171
37	सण–उत्सवांकडे पाहण्याचा राष्ट्रसंताचा वैज्ञानिक दृष्टिकोन राहुल लक्ष्मणराव रक्षित	175
38	वैदर्भीय कांदबरी व कादंबरीकार प्रा. राग मुरलीधर सपाटे	182
39	कुसुमावती देशपांडे : व्यक्ती आणि ललितवाङ्मय डॉ. संगीता खुरद	188
40	'माणूस' या कादंबरीतील व्यक्तिरेखा : एक आस्वाद प्रा. डॉ. विनोद उत्तमराव भालेराव	192
41	अनिलांच्या कवितेतील प्रेमजाणिवा डॉ. अंजली मुकुंद पांडे – जोशी	198

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor (SJIF) -7.675,Issue NO, 333 (CCCXXXIII)
ISSN : 2278-9308
December, 2021

वैदर्भीय ग्रामीण कथासाहित्य

डॉ. बादलशाहा डोमाजी चव्हाण
सहायक प्राध्यापक,महात्मा जोतिबा फुले महाविद्यालय, बल्लारपूर
ई-मेल –badalchawhan@gmail.com,भ्रमणध्वनी – ८००७९२८२२७

सारांश

मराठी साहित्यामध्ये वेगवेगळया प्रवृत्ती आणि नवप्रवाह आहेत. त्याप्रैकी ग्रामीण साहित्याचा प्रवाह हा ग्रामीण समाजजीवनाच्या आणि साहित्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. वैदर्भीयकथालेखकांनीप्रारंभीचीनवकथाघडविली व तिचा विकास करण्यात महत्वाचे योगदान दिले. त्यांनी मराठी कथेचा प्रवाह गतिमान केला. त्यांचे विदर्भ भूमीशी घट्ट असे नाते आहे. विदर्भातील संती, तेथील निसर्ग,लोकांची जीवन जगण्याची पध्दत ,धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक,जीवनपध्दती, त्यांचे सण-उत्सव,त्याच्याश्रध्दा-अंधश्रध्दा, त्यांचे प्रश्न- समस्या या सर्वांचे चित्रण कथांमध्ये चित्रित झाले आहे.

वैदर्भीय कथा साहित्यातून मानवी मनाच्या शोधासह जीवनमुल्ल्यांचा शोधही घेण्यात आला आहे. प्रत्येक कथालेखकाची प्रकृती जरी वेगळी असली तरी त्यांची कथा सभोवतालच्या वातावरणाने साकार झाली आहे. त्यांच्या विचारपध्दतीनुसार कथेतील पात्रांचा संवाद आलेले आहेत. नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, अकोला,बुलडाणा,वाशिम, यवतमाळ ई. जिल्ह्यातील आणि जवळपासच्या परिसरातील जीवनदर्शन, तेथीललोकजीवन, डोंगर, नद्या कथेत आलले आहे. परिवर्तन झालेल्या आणि होत असलेल्या ग्रामीण जीवनाचे प्रश्न आणि समस्यांना कथेत मांडण्याचा प्रयत्न वैदर्भीयकथालेखकांनी केलेला आहे. ही कथा कल्पनेपेक्षा वास्तवाला धरून लिहिल्या गेली आहे. कथालेखक ज्या परिसरात राहतो तेथील बोलीचा वापर कथेत केल्यामुळे मराठीतील विविध बोलींचा परिचय वाचकांना झालेला आहे. कथा बोलीभाषेतूनलिहिल्यामुळे प्रभावी झालेल्या आहेत. वैदर्भीय ग्रामीण कथालेखकांची कथा आशयाच्या, विषयाच्या आणि रचनेच्या दृष्टीने मराठी कथेला गती देण्यास सहाय्यभूत ठरली आहे.

प्रस्तावना

विदर्भ हा प्रदेश निसर्गसंपत्तींनीसमृध्द आहे. येथे साहित्य रत्नांची खाण आहे.वर्धा, वैनगंगा, चंद्रभागा, पूर्णा, तापी,शहानुर ह्या नद्या आहेत. विदर्भात नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, वर्धा, यवतमाळ, अकोला, अमरावती,वाशिम, बुलढाणा ई. जिल्ह्याचा समावेश आहे. विदर्भाला सामाजिक, राजकीय,सांस्कृतिकइतिहास आहे. हे एक कृषिप्रधान राज्य आहे. हा परिसर डोंगर- दऱ्या, जंगले यांनी वेढलेला आहे.मराठी साहित्यविश्वातविदर्भाचे साहित्यविषयक योगदान महत्त्वाचे आहे. वैदर्भीयकथालेखकांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. वा.कृ. चोरघडे,उध्दवशेळके, भाऊ मांडवकर, मनोहर तल्हार, सुभास सावरकर, बाजीराव पाटील; वामन इंगळे,बाबाराव मुसळे,वि.स. जोग, मधुकर वाकोडे, प्रतिमा इंगोले, दे.शी. दुधोलकर,सतीशतराळ, पुरुषोत्तम बोरकर, सदानंद देशमुख, नरेंद्र इंगळे, अमिताभ,प्रकाश खरात, जालंधर सोनुने, रवींद्रशोभणेया कथालेखकांनी कथांतून ग्रामीण जीवनाचा वेध घेतलेला आहे. त्यांनी ग्रामीण कथेला उंचीवर पोहचविले. त्यांची कथा मराठी कथासृष्टीत मैलाचा दगड ठरणारी आहे.

बीजशब्द

विदर्भ,ग्रामीण, समस्या, वातावरण, निसर्ग, बोलीभाषा

वैदर्भीय ग्रामीण कथा

वा.कृ.चोरघडे हे विदर्भातील जेष्ठकथालेखक आहेत. त्याच्या कथांचा 'संपूर्ण चोरघडे' या पुस्तकात समावेश आहे. त्यांनी कथांतून आपले अनुभव मांडले आहे. त्यांचे बालपण नरखेडजि. या परिसरात गेल्यामुळे त्यांच्या कथेत हाच परिसर डोकावतो. त्यांनी कथेत बाजाराहाटेचे वर्णन, नद्या, पशु पक्षी, जनावरे, सूर्यबिंब ई. चे वर्णन सकसपणे केलेले आहे. "कालपासून पावसाचा थेंब खंडला होता. जरुरीच्या ठिकाणी पाऊस पडायला ढग निघून गेले होते. आकाश रात्रीपासून स्वच्छ होते. हवेत सुखद असा गारवा आला होता. गाढ झोपून त्या गावची माणसे जेव्हा उठली तेव्हा वाजूच्या टेकडीवरून प्रसन्नपणे सूर्यबिंब वर येतांना त्यांनी पाहिले."[१] वामन चोरघडे यांनी 'अतिथी देवो भव' या कथेत ग्रामीण भागातील निसर्गाचे सुंदर वर्णन केले आहे. "एकंदरीत चोरघडे यांची कथा ग्रामीण कथा विदर्भाच्या काळया सकस भूमीत उगवलेली,रुजलेली,ज्वारीच्या घोसदारकणसासारखी टवटवीत व सकस वाटते."[२] हे खरेच आहे. खेड्यातील लोकांच्या श्रध्दा -अंधश्रध्दा, त्यांचे प्रश्न- समस्या, सुख-दुखः,जीवन जगण्याची पध्दत याचे वर्णन चोरघडे यांनी केलेले आहे.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

दे.शी.दुधलकर यांचा 'काळोख' हा कथासंग्रह प्रसिध्द आहे. यात विदर्भातील ग्रामीण जीवनातील समस्यांचे वर्णन आलेले आहे. दुधाळकर यांनी ग्रामीण कथेत एक वेगळे जीवनदर्शन घडविले. अनुभव व तो मांडण्याची पध्दत, आशय व विषयातील उत्कटता, भाषा व संवेदनशीलता या गुणांमुळे त्यांची कथा वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहे. सुरेश आकोटकर यांचा 'अंधारसावल्या' हा कथासंग्रह प्रसिध्द आहे. त्यांनी कथेतून ग्रामीण भागातील गरीबी, दारिद्र्य आणि अंधश्रध्दाप्रामुख्यानेरेखाटलेल्या आहेत.

विदर्भाचे माडगुळकर असा ज्यांचा गौरव केला जातो त्या उध्दवशेळके यांचे स्थान ग्रामीण कथेत महत्वाचे आहे. त्यांचे 'शिळात अधिक आठ कथा', 'वांगी', 'संसर्ग', 'गरिबाघरची लेक', 'हिरवी झुळूक' ई. कथासंग्रह प्रसिध्द आहेत. त्यांनी कथेत ग्रामीण जीवनाचे चित्रण केलेले आहे. "उध्दवशेळके यांच्या कथांमधून गोचर होणारा परिसर हा विदर्भाचा विशेषत्वाने अमरावती जिल्ह्याचा परिसर आहे. एरव्ही समृद्धी असलेल्या वऱ्हाडातीलखुरटलेल्या माणसांचे चित्रण त्यांच्या ग्रामीण कथेतून येतो ."[३]शेळकेंनी ग्रामीण कष्ठकरी माणसे कथेतून उभी केलेली आहेत. त्यांच्या कथेत ग्रामीणांचे स्वभाव, त्यांनी जिद्द प्रामुख्यानेपहावयास मिळते.

मनोहर तल्हार यांचे 'वुढीचखाटल', 'तोलरेघ', 'गोरीमोरी', 'नि:संग', 'कॅन्सल', आणि 'दुजा शोक वाहे' ई. कथासंग्रहप्रसिध्द आहेत. त्यांनी कथेतून निदर्भातील ग्रामीण जीवनातील घटना प्रसंगाचे वर्णन केलेले आहे. भाऊ मांडवकर यांचे 'मेंगी', 'कानचिरी' हे कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांनी ग्रामीण माणसांचे, पशुंचे दुख:, त्यांच्या वेदना कथेतून मांडल्या आहेत. त्यांनी ग्रामिणांच्या वागण्या-बोलण्यावर प्रकाश टाकला आहे. "उन्ह लाहा लाहा करीत होती. अंगावरून झावा जात होत्या. रानात आणि रान माळावर काहीच भुरभूरतांना दिसत नव्हत. नाही म्हणायला जोराचा सुसाट वारा धुडयाचे लोट उडवत होता आणि धुदाडांना उगीच उत येत होता."[४]मजुरांना उन्ह- पावसात शेतात राब राबरावावे, काम करावे लागते. 'मेंगी' कथेतील शेवंती आपल्या तान्या बाळाला अफू देऊन घरीच ठेवते आणि शेतावर कामाला जाते. शेताच्या रस्त्यालगतआम्रवृक्ष, जांभळाची झाडे तिच्याकडे एकटक पाहतात असे तिला वाटते. मांडवकरांच्या कथेत निसर्ग प्रामुख्यानेप्रकटतो.

बाजीराव पाटील यांचे 'मिरचीच्या खड्यावर', 'दि ग्रेट झेडपी.सर्कस' हे कथासंग्रह प्रसिध्द आहेत. त्यांच्या कथांची नाळवैदर्भीय ग्रामीण कथांशी जूळलेली आहे. त्यांच्या कथांचा विषय ग्रामीण भागातील दारिद्र्य, , फसवेगिरीअंधश्रध्दा, हा आहे. शेती, पिके,औजारे, निसर्ग यांचे वर्णन पाटील करतात. प्रतिमा इंगोले यांचे 'हजारी वेलपान', 'अकसिदीचे दाने ', 'सुगरणचा खोपा', 'जावयाचे पोर', 'लेक भूईची' ई.कथासंग्रहप्रसिध्द आहेत . त्यांनी आपल्या कथेतून ग्रामीण स्त्रीजीवनरेखाटले आहे. स्त्रियांच्या समस्या, त्यांची सुख-दु:खे, रीतीरिवाज, सण-उत्सव, शेती व्यवसायातील माणसे, शेत जमीनदार, शेत मजूर हे त्यांच्या कथेचे विषय आहेत. त्यांनी लोकजीवन, लोकसंस्कृतीतील अनुभवलाच कथाविषय केले आहे. त्याच्या कथांमधून येणारी स्त्री ही परंपरेत रखडणारी, समाज आणि नियती यांच्यामुळे दु:खभोग वाट्याला येणारी व जगण्याच्या संघर्षात एकाकीपणे उभी असणारी स्त्री आहे.

सतीशतराळ यांच्या नावावर 'आळ' आणि 'आग' हे दोन कथासंग्रह आहेत. त्यांनी कथेतून ग्रामीणांच्यासुख-दु:खांचाधांडोळा घेतलेला आहे. पूर्णा, चंद्रभागा भूलेस्वरी या तीन नद्यांच्या तीरावरील परिसर त्यांच्या कथेत येतो."थंडी उलसीक कमी झालती पण उन्हाया काही अजून लागला नोटा. चान्द्रभागेन अंधाराची रजई अंगावर घ्याले सुरुवात केलती"[५] नदीच्या काठावरील मंदिर,वडाचे झाड, आखर, आमराई हे आपल्या कथेत साकारले व परिसराला समृध्दीमिळवून दिली. वावाराव मुसळे यांचे 'मोहरलेला चंद्र', 'झिंगुलुखूलुखू' हे कथासंग्रह प्रसिध्द आहेत. त्यांनी कथेतून मानवी श्रध्दा, रूढी- परंपरा जोपासणाऱ्या मानसिकतेचे आणि वदलत्या ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविले आहे. त्यांनी कथेत पावसाळी वातावरण, मजुरांचेनिंदनाचे काम, शेतातील आंवा, चिंच,वेहड्याची झाडे, नाला, पूर, वीज, बैल ई. विषयावर कथा लिहिलेल्या आहेत..

संतोष मुलावकर यांचे 'तीवकसिक्सर' व 'पुष्पाचलफड'हे दोन कथासंग्रह प्रसिध्द आहेत. त्यांनी ग्रामीण जीवनातील ताणतणाव कथेत रेखाटले आहे. सदानंद देशमुख यांचे 'उठावण', 'अंधारवड', 'महालुट', खुंदरघास','गाभूळ गाभा' हे कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांनी कथेतून ग्रामीण जीवनाचा वेध घेतलेला आहे, आजचे ग्रामीण वास्तव रेखाटले आहे. "वांधावरल्या गवंताच्या पानावर दवाचे थेंब सांडले व्हते. पायवाटेने जातांना कपडे गवताला आंग घासून वल्लचिक व्हायला लागे. आजूवाजूच्या वावरातले पिक कसे घौसवाज दिसत होते... हायव्रीड आता वेहाडे झाले व्हते. काहीचीखुडणी झाली होती."[६] देशमुखांनी कथेत शेत पिकांचे वर्णन केलेले आहे. उभ्या पिकांमुळे शेतकऱ्यांचे मन आनंदित होते. ज्वारी,पर्हाटी , तिळ, वोरू, भुइमुंग, तूर ई. पिके भरभरून आली की,शेतकऱ्यांनाखूप आनंद होतो. यांचे वास्तव चित्रण देशमुखांनी कथेत केले आहे.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

विदर्भातील ग्रामीण जीवन कसे आहे? त्यांचे आर्थिक- सामाजिक जीवन कसे आहे? याविषयीची माहिती अमिताभ यांच्या 'पड' या कथेत आलेली आहे. मराठीतील ग्रामीण बोलीतील शब्द, तेथील पात्रे, त्यांच्या जगण्याचा संघर्ष त्यांची कथा अचूकपणे मांडते. 'अंधाराचा अस्त', 'अक्षरांची पहाट', 'प्रवर्तनाचा युगस्पर्श' हे प्रकाश खरात यांचे कथासंग्रह आहेत. 'अंधाराचा अस्त ' या कथासंग्रहातप्रामुख्यानेशोषितांचे सामाजिक व आर्थिक भावजीवन मांडले आहे. वर्तमान काळातील माणसे दारिद्र्यातही कसे स्वत:च्या मनाचे अधःपतन होऊ देत नाहीत. ग्रामीण जीवनातील दारिद्र्यातही इमानदारी कशी जोपासली जाते हे 'झड' कथेत खरातांनी मांडले आहे.

जालंधर सोनुने यांनी 'प्रशांत सागर', 'भाबडी', 'हिरमोड', 'बलिदान', 'संवेदना' या कथासंग्रहामधून वैदर्भीय ग्रामीण जीवनातील व्यक्तिरेखा साकारल्या आहेत; ग्रामीण लोकजीवन मांडले आहे आणि ग्रामीण बोलीतून संवाद रेखाटले आहेत. त्यामुळे त्यांची कथा लोकजीवनाची झाली आहे. आई-वडीलांचे मुलांसाठी कष्टउपसणे, दारिद्र्यात राहून शिक्षण घेत असतांना करावा लागत असलेला संघर्ष हा त्यांच्या कथेचा विषय आहे. साधी- सरळ माणसे व साधी सरळ अभिव्यक्ती हे त्यांच्या कथेचेविशेष आहे.

रवींद्रशोभणे हे विदर्भातील एक दमदार कथालेखक आहेत. त्यांचे 'वर्तमान', 'दाही दिशा', 'तद्भव', 'शहामृग', 'चंद्रोत्सव', 'ओल्या पापाचे फूत्कार', 'अदृस्ताच्यावाटा' ई. कथासंग्रह प्रसिध्द आहेत. त्यांनी 'दाही दिशा' कथासंग्रहामधून विदर्भातील ग्रामीण जीवन सजीव करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या कथा ग्रामीण जीवनातील दुख:, व्यथा, दारिद्र्य, उपासमार,शोषण यांचे हृदयद्रावक दर्शन घडवितात.शोभानेंनीकथेतून केवळ माणसांच्या स्वभावाचेच चित्रण केलेले नाही तर माणसांबरोबर निर्माण झालेले दारिद्र्य ,समस्यांचे चित्रणही केलेले आहे .

प्रत्येक पालकाला आपल्या मुलीच्या लग्नाची चिंता असते.'घोर' कथेतील आबा हा शेतकरी असतो. सडकेत जाणाऱ्या शेतीचे पैसे सरकारकडून मुलीच्या लग्नापूर्वी मिळणार नाही या विवंचनेत असतो तेव्हा "याच्यामधून आता काईतरीउपावनिघनच. तुम्ही कॉहून जीवाचा खकाना करता. त्यासाठी आपली लेक का कुवाऱ्या राती जन्माला आली का. तिच्या तकदीरातयखांदा कोणी असन"७ अशी सांत्वना त्यांची पत्नी बयाबाईदेते. मुलीच्या वाढत्या वयाचा विचार करून आबा आपल्या मुलीच्या लग्नासाठी आपले बैल नरखेडच्याबैलबाजारात विकतो. ग्रामीण भागात केवळ आबाच हा निर्णय घेत नाही; तर प्रत्येक वडील मुलींच्या हितासाठी हा निर्णय घेतात. 'घोर' ही कथा एका मुल्यबदलाची, ग्रामसंस्कृतीच्या परिवर्तनाची कथा आहे.

वैदर्भीय ग्रामीण कथालेखक आणि त्यांच्या कथासंग्रहांनी मराठी कथा समृध्दकरण्यात महत्वाचे योगदान दिले आहे. प्रत्येक कथालेखकाच्या कथेचे स्वतंत्र असे वेगळेपण आहे. कथेतील जीवन्दर्शनातील सीमारेषा एकमेकांच्या कथानकात जरी मिसळलेल्या असल्या तरी प्रत्येकांची अभिव्यक्ती निरनिराळी आहे; अनुभव घेण्याची व ती व्यक्त करण्याची पध्दत वेगवेगळी आहे. त्यामुळे प्रत्येक लेखकांच्या कथालेखनाचे विशेषही वेगवेगळे आहेत.

निष्कर्ष

१) मराठीतील वैदर्भीय ग्रामीण कथा वास्तववादी आहेत.
२) वैदर्भीय ग्रामीण कथा ह्या ग्रामीण जीवन सजीव करणाऱ्या आहेत.
३) वैदर्भीय ग्रामीण कथेतील व्यक्तिरेखांमुळे माणुसकीचे दर्शन घडते.
४) कथेतील माणसे प्राण्याशी- निसर्गाशी संवाद साधतांना दिसतात.
५) वैदर्भीयलेखकांनी कथा साहित्यातून ग्रामसंकृतीचे परिवर्तन मांडले आहे.
६) वैदर्भीय ग्रामीण कथालेखकांनीकथेतून लोकजीवन, सामाजिक व आर्थिक भावजीवन मांडले आहे.
७) मराठीतील वैदर्भीय ग्रामीण कथा बोलीभाषेतून साकार झाली आहे.

संदर्भ ग्रंथ

१) वामन चोरघडे, ,'साहित्य संपदा',संपा.श्याममोहरकर, राघव पब्लिशर्स,नागपूर, २०१३, पृ.१२.
२) इंदुमती शेवडे,'मराठी कथा उगम आणि विकास',सोमैयापब्लिकेशन, मुंबई,१९७३,पृ.३२४.
३) अंबादासमाडगुळकर,'मराठी ग्रामीण कथा', ठोकळ प्रकाशन पुणे,१९६७, प्रस्तावनेतून.
४) भाऊ मांडवकर, 'मेंगी', सेवा प्रकाशन, अमरावती,१९५८, पृ.७४.
५) सतीशतराळ, 'आळ', अभिजित प्रकाशन, नागपूर, १९९६, ०६.
६) सदानंद देशमुख, 'लचांड', मेहता पब्लिशिंगहाऊस, पुणे, १९९३,२४.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

5.3

द्वितीय अंक

इतिहास दर्पण
ITIHAS DARPAN

विक्रमाब्ध २०७९, युगाब्ध ५१२४
जानेवारी २०२२

अखिल भारतीय इतिहास संकलन योजना की शोध पत्रिका
आपटे भवन, केशव कुंज, झंडेवाला, नई दिल्ली - ११० ०५५

RESEARCH JOURNAL OF AKHIL BHARTIYA ITIHAS SANKALAN YOJANA
Apte Bhawan, Keshav Kunj, Jhandewala, New Delhi - 110 055

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

Journal Recommendation Form	
Name of the Journal	**Itihas Darpan**
ISSN Number	**0974-3065**
Nature of Publication	**Hard Copy**
Periodicity	**Half Yearly**
Publisher	**Akhil Bharatiya Itihas Sankalan Yojan, 10196/A, Apte Bhawan, Keshav Kunj, Jhandewala Mandir, New Delhi - 110055, Bharat**

Criteria	Answer	Score
The journal has a website which provides full postal and email addressesof Chief Editor and Editors, and at least some of these addresses are verifiable official addresses	**Yes**	
		Select score
The website provides complete instructions to authors/reviewers	**Yes**	**+1**
The journal has a well-defined peer-review and publication policy	**Yes**	**+1**
The journal has a well-defined Ethics policy	**Yes**	**+1**
The journal has a declared frequency of publication each year	**Yes**	**+1**
The journal is published regularly and in time following its declared frequency	**Yes**	**+1**
The journal claims that it is indexed in a given database and this claim is verified	**yes**	**+1**
Journal levies submission/publication charges	**No**	
Since when is the journal being regularly published (select any one)	**> 6 Years**	**+2**
Final Score (taking into consideration scores of points 1-8)		**08**

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

अनुक्रमणिका

अ. क्र.	शोधनिबंधांचे नाव	लेखकाचे नाव	पृष्ठ क्रमांक
१	यशवंतराव होळकर यांची लष्करी व्यवस्था	महेशकुमार भगवानराव चौरे	१-८
२	जनाबाई माधवराव रोकडे कार्य आणि कर्तृत्व	डॉ. सपकाळ रामेश्वर विक्रम	९-१४
३	बंगालचा नवाब सिराजउद्दौला आणि ब्रिटीश	डॉ. सचिन उत्तमराव हंचाटे सहयोगी	१५-२८
४	महाराष्ट्रातील स्त्रियांचे नेतृत्व आणि स्त्रीवादी चळवळीचे योगदान	डॉ. पी. बी. सिरसट	२९-३३
५	भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महाराष्ट्रातील वृत्तपत्रांचे योगदान	श्री. दराडे नवनाथ एकनाथ डॉ. सविता गंगाधरराव मुंढे	३४-४०
६	महानुभाव संप्रदायाच्या भाषिक व सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास	सतिष उत्तमराव रिंढे	४१-४५
७	भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महिलांचे योगदान विशेष संदर्भ : बीड जिल्हा	प्रा. डॉ. प्रशांत साबळे	४६-५४
८	मुंबईतील ब्रिटिश कालीन कामगार क्षेत्रातील स्त्रियांची स्थिती	प्रा. दिलीप भिमराव गिऱ्हे	५५-६०
९	भक्ती चळवळीची सामाजिक फलश्रुति	डॉ. नवनाथ ज्ञानोबा पवळे	६१-६४
१०	भारतीयांचे इंग्रजांविरुद्ध सशस्त्र लढे एक : ऐतिहासिक अध्ययन	प्रा. डॉ. नाईक एन. डी.	६५-६९
११	रायगड जिल्यातील आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे कार्य	प्रा. डॉ. पाथरकर एस. व्ही.	७०-७५
१२	स्वातंत्र्यपूर्व काळातील शेतकरी चळवळ : विशेष संदर्भ पारनेर तालुका	गवारी विश्वास रोहिदास डॉ. उत्तम अप्पासाहेब पठारे	७६-८३
१३	1857 चा स्वातंत्र्य समर आणि मराठवाडा	प्रा. डॉ. शिंदे अनंत नामदेवराव	८४-८८
१४	क्रांतिगुरू लहुजी साळवे यांचे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान	प्रा. डॉ. ताडेराव राज भुजंगराव	८९-९७
१५	राष्ट्रीय आंदोलनातील महाराष्ट्राचा सहभाग	प्रा. डॉ. सखाराम मारुती वांढरे	९८-१०५
१६	लोकशाहिर अण्णा भाऊ साठे आणि	डॉ. बादलशाहा डोमाजी चव्हाण	१०६-११३

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

लोकशाहिर अण्णा भाऊ साठे आणि संयुक्त महाराष्ट्राची चळवळ

डॉ. बादलशाहा डोमाजी चव्हाण
सहायक प्राध्यापक,
महात्मा जोतिबा फुले महाविद्यालय,
बल्लारपूर, जि.चंद्रपूर
badalchawhan@gmail.com
भ्रमनध्वनी- ८००७९२८२२७

गोषवारा

१५ ऑगस्ट १९४७ मध्ये भारत देश स्वातंत्र्य झाला. काही दिवसानंतर भाषावार प्रांतरचनेची मागणी वाढू लागली. येथील जनतेला घटकराज्य निर्मिती व्हावी असे वाटू लागले. नोठनोठी शहरे आणि राज्यांची सरहद्द याविषयी वेगवेगळ्या गटा- तटात भेद दिसू लागले. भाषावार राज्ये वेगवेगळी केली तर देशातील वातावरण तापेल अशी शंका भारतीय केंद्रीय नेत्यांच्या मनात उद्भवली. म्हणून त्यांनी भाषावार राज्य निर्मितीच्या प्रश्नाला मूठमाती देण्याचा प्रयत्न केला. हे अनेक राज्यांना अमान्य होते; तेथूनच राज्य निर्मितीसाठी जनआंदोलनाला प्रारंभ झाला. त्यातूनच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला गती मिळाली. १ मे हा जागतिक कामगार दिन आहे. याच दिवशी म्हणजेच १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. त्यामुळे हा दिवस महाराष्ट्र दिन म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्रातील शेतकरी, कामगार, विद्यार्थी व सर्वसामान्य जनता, महाराष्ट्रातील नेते, साहित्यिक आणि लोकशाहीर यांनी मुंबईसह महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेसाठी ही चळवळ चालविली. तोच 'संयुक्त महाराष्ट्राची चळवळ' होय या चळवळीला तत्कालीन केंद्रीय मंत्र्यांचा विरोध होता तेव्हा सर्व मराठी भाषिकांनी त्याविरोधात केलेला हा महासंग्राम आहे. या चळवळीला साहित्यिक- विचारवंताचा पाठिंबा होता. शाहीर अमरशेख, आचार्य अत्रे आणि अण्णा भाऊ साठे यांचेही या चळवळीला योगदान मिळाले. अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या क्रांतिकारी साहित्याने जन माणसांना जागृत केले. त्यांची लावणी, पोवाडा आणि लोकनाट्य हे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसाठी प्रेरणादायी ठरले.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

अण्णा भाऊ साठे यांनी संयुक्त महाराष्ट्र आणि मराठी संकृतीच्या विविध पैलूंचे चित्रण आपल्या साहित्यात केलेले आहे.

प्रस्तावना

महाराष्ट्रात अनेक प्रतिभावंत उद्यास आले आहेत; अनेक लोकशाहिरांनी जन्म घेतला आहे. अण्णा भाऊ साठे हे प्रभावी साहित्यिक, लोकशाहीर म्हणून सुपरीचित आहेत. त्यांनी शाहिरीच्या आणि साहित्याच्या माध्यमातून समाजाचे प्रबोधन केले. त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू हा सामान्य माणूस आहे. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये विविध चळवळी उदयास आल्या त्यापैकी एक संयुक्त महाराष्ट्राची चलवल होय. १९५०ते १९६० च्या दशकातील ही चळवळ लोकशाहीवादी होती. अण्णा भाऊ साठे हे लोकशाहीवादी विचारवंत म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्यावर मार्क्सच्या विचारसरणीचा प्रभाव होता. मुंबईत रोजगारासाठी आल्यावर ते कामगार चळवळीत सक्रीय झाले. इ.स.१९३६ मध्ये ते कॉ. श्रीपाद डांगे यांच्यामुळे कम्युनिस्ट चळवळीत सहभागी झाले. इ.स.१९४२ मध्ये चले जाव आंदोलनात त्यांचा सहभाग होता. ते चळवळीत जरी सक्रीय असले तरी त्यांनी साहित्यनिर्मिती विपुल प्रमाणात केलेली आहे. त्यांनी अनेक कादंबऱ्या, कथा, लोकनाट्य, नाटके, नाटिका, प्रवासवर्णन, कविता असे विपुल लेखन केले आहे. त्यांच्या एकूणच साहित्याचा केंद्रबिंदु माणूस आहे. आपल्या समग्र साहित्यातून त्यांनी समाजप्रबोधन केलेले दिसून येते.

प्रस्तुत शोधनिबंधात लोकशाहिर अण्णा भाऊ साठे यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत दिलेल्या योगदानाविषयीचे विश्लेषण केले आहे.

बीजशब्द

चळवळ, साहित्य, लावणी, पोवाडा, लोकनाट्य, जनजागृती

संयुक्त महाराष्ट्र चळवळीची पार्श्वभूमी

इंग्रजांनी राजकारणाच्या दृष्टिकोनातून भारतातील विविध भागात प्रांतरचना केली. इ . स .१९२० मध्ये नागपूर मुक्कामी काँग्रेसचे अधिवेशन झाले . महात्मा गांधी आणि काँग्रेसने भाषावार प्रांतरचनेला मान्यता दिली १९४७ . मध्ये भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले; स्वातंत्र्यानंतर मात्र भाषावार प्रांतरचनेची मागणी वाढली. तत्कालीन पंतप्रधान डॉ. राजेंद्र प्रसाद

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

यांनी न्या.एस. के. दार यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमले. विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी दार कमिशन समोर महाराष्ट्र राज्याची मागणी केली. मात्र या कमिटी ने भाषावार प्रांतरचनेला असमर्थता दाखविली .संयुक्त महाराष्ट्र आणि मराठी भाषेवरील प्रेमाखातर ही चळवळ बऱ्याच काळपर्यंत सुरू राहिली. दिवसेंदिवस ही चळवळ प्रभावी होत गेली .'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' हे आंदोलनाचे घोषवाक्य होते. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या त्रिराज्य योजनेला संयुक्त महाराष्ट्र समितीने कडकडून विरोध दर्शविला. याच काळात संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जास्तच फोफावलीसंयुक्त महाराष्ट्रासाठी काँग्रेस . वगळून इतर पक्षांनी कम्युनिस्ट पक्ष, सोशालिस्ट विचारसरणीच्या पक्षांनी इ.स १९५० . ते १९६० या काळात आंदोलने केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर.के .प्र ,अत्रे, एस. एम. जोशी, श्रीपाद डांगे, सेनापती बापट, भाई उद्धवराव पाटील, शाहीर अमर शेख, प्रबोधनकार ठाकरे इत्यादी नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उभी केली या चळवळीला आपल्या लेखणी आणि वाणीने अण्णा भाऊ साठेंनी बळ दिले. आपल्या शाहिरीतून त्यांनी ही चळवळ जनसामान्यांपर्यंत पोहोचविली ."पाच हजार वर्षांनीसुद्धा मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही व 'मोरारजींनी काँग्रेस जिवंत असेपर्यंत मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही ,गुंडगिरीला योग्य जबाब मिळेल' अशी मुक्ताफळ उधळली."[१] २० नोव्हेंबर १९५५ मध्ये मोरारजी देसाई आणि स .का . पाटील यांनी मुंबईतील चौपाटीवर भरलेल्या सभेत संयुक्त महाराष्ट्राच्या विरोधी भाष्य केले यावरून त्यांचा संयुक्त महाराष्ट्राला विरोध होता हे कळते. लोकांनी मात्र देसाई यांची सभा उधळली . संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी मराठी लोक एकत्रित आले; रस्त्यावर उतरले. इ. स . १९५७ च्या निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र चळवळीला १०१ जागा जिंकल्या. या दुभाषिक राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे झाले .या निवडणुकीत अण्णा भाऊ साठे यांनी पाठिंबा दर्शविला.

१६ व १७ डिसेंबर १९४८ रोजी मुंबई येथे संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अधिवेशन भरले होते. अधिवेशनाचे उद्घाटक काकासाहेब गाडगीळ तर अध्यक्ष रामराव देशमुख होते. या अधिवेशनात प्रामुख्याने अण्णा भाऊ साठे उपस्थित होते. त्यांनी तेथे 'मुंबई कुणाची' हा तमाशा

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

ISSN: 0974-3065

यांनी न्या.एस. के. दार यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमले. विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी दार कमिशन समोर महाराष्ट्र राज्याची मागणी केली. मात्र या कमिटी ने भाषावार प्रांतरचनेला असमर्थता दाखविली .संयुक्त महाराष्ट्र आणि मराठी भाषेवरील प्रेमाखातर ही चळवळ बऱ्याच काळपर्यंत सुरू राहिली. दिवसेंदिवस ही चळवळ प्रभावी होत गेली .'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' हे आंदोलनाचे घोषवाक्य होते. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या त्रिराज्य योजनेला संयुक्त महाराष्ट्र समितीने कडकडून विरोध दर्शविला. याच काळात संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जास्तच फोफावलीसंयुक्त महाराष्ट्रासाठी कॉंग्रेस . वगळून इतर पक्षांनी कम्युनिस्ट पक्ष, सोशालिस्ट विचारसरणीच्या पक्षांनी इ.स १९५० . ते १९६० या काळात आंदोलने केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर.के .प्र ,अत्रे, एस. एम. जोशी, श्रीपाद डांगे, सेनापती बापट, भाई उद्धवराव पाटील, शाहीर अमर शेख, प्रबोधनकार ठाकरे इत्यादी नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ उभी केली या चळवळीला आपल्या लेखणी आणि वाणीने अण्णा भाऊ साठेंनी बळ दिले. आपल्या शाहिरीतून त्यांनी ही चळवळ जनसामान्यांपर्यंत पोहोचविली ."पाच हजार वर्षांनीसुद्धा मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही व 'मोरारजींनी कॉंग्रेस जिवंत असेपर्यंत मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही ,गुंडगिरीला योग्य जबाब मिळेल' अशी मुक्ताफळ उधळली."[१] २० नोव्हेंबर १९५५ मध्ये मोरारजी देसाई आणि स .का . पाटील यांनी मुंबईतील चौपाटीवर भरलेल्या सभेत संयुक्त महाराष्ट्राच्या विरोधी भाष्य केले यावरून त्यांचा संयुक्त महाराष्ट्राला विरोध होता हे कळते. लोकांनी मात्र देसाई यांची सभा उधळली . संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी मराठी लोक एकत्रित आले; रस्त्यावर उतरले. इ. स . १९५७ च्या निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र चळवळीला १०१ जागा जिंकल्या. या दुभाषिक राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे झाले .या निवडणुकीत अण्णा भाऊ साठे यांनी पाठिंबा दर्शविला.

१६ व १७ डिसेंबर १९४८ रोजी मुंबई येथे संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अधिवेशन भरले होते. अधिवेशनाचे उद्घाटक काकासाहेब गाडगीळ तर अध्यक्ष रामराव देशमुख होते. या अधिवेशनात प्रामुख्याने अण्णा भाऊ साठे उपस्थित होते. त्यांनी तेथे 'मुंबई कुणाची' हा तमाशा

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

सादर केला. मुंबईसह मध्यप्रांत, वऱ्हाड, नागपूर, कोल्हापूर, मराठवाडा, गोवा येथील सर्व प्रदेशाचा संयुक्त महाराष्ट्र स्थापन करावा असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

लाल बावटा कलापथकाची स्थापना व कार्य

इ. स. १९१७ साली रशिया मध्ये साम्यवादी क्रांती झाली. या क्रांतीचा प्रभाव एकूणच जीवणावर पडला. सामाजिक- सांस्कृतिक आणि साहित्य क्षेत्रही ढवळून निघाले. महाराष्ट्र याला अपवाद नाही. गरीब- श्रीमंत, भांडवलदार- श्रमिक हा भेद पुसून समानता प्रस्थापित करण्यासाठी, श्रमिकांना जागृत करण्यासाठी शाहीर अमरशेख, द. ना. गव्हाणकर या शाहीर मित्रांच्या मदतीने १९४४ मध्येलाल बावटा कला पथकाची स्थापना झाली. या कलापथकाने संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. अण्णा भाऊ तर मुंबई, बेळगाव निपाणी, कारवार ही शहरे महाराष्ट्रात आली पाहिजे; यासाठी १९५०-६० च्या दशकात महाराष्ट्र भ्रमण करून जनजागृती केली. हे कलापथक म्हणजे महाराष्ट्रातील जनतेच्या प्रबोधनाचे एक माध्यम ठरले.

शाहिरीतून जनजागृती

मराठी साहित्याच्या इतिहासात शाहिरांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. पूर्वी शाहिरांना राजाश्रय होता. शाहिर हे जनजागृतीचे माध्यम होते. आजही शाहिरीतून समाजप्रबोधन होताना दिसते. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ गतिमान करण्यात महाराष्ट्रातील शाहिरांचा सिंहाचा वाटा आहे. अण्णा भाऊ साठे हे या चळवळीतील महत्त्वाचे शिलेदार होते. त्यांनी आपल्या साहित्यातून लोकांची मने जिंकली; त्यासह सर्वसामान्यांचा स्वाभिमान जागृत केला. ते स्वतः साम्यवादी विचारसरणीचे असल्यामुळे सर्वसामान्यांच्या वेदना त्यांनी जाणल्या व त्यातून त्यांना बाहेर काढण्यासाठी शाहिरीचे शस्त्र वापरले; त्यातून समाज प्रबोधन केले. हे त्यांचे कार्य संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसाठी मोलाचे ठरले. त्यांनी या चळवळीचा प्रचार व प्रसार केला. पोवाडा आणि लोकनाट्याच्या माध्यमातून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला गतिमान केले. त्यांच्या या कार्यामुळेच शाहिरांना समाजात मान सन्मान मिळाला.

माझी मुंवई : अप्रतिम लोकनाट्य

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीने सर्वच राजकीय, सामाजिक पक्ष, विरोध सोडून एकत्र आले. आचार्य प्र. के. अत्रे, का. डांगे, दादासाहेब गायकवाड, एस. एम. जोशी, प्रबोधनकार ठाकरे

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

ISSN: 0974-3065

इत्यादी नेत्यांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रासाठी जिवाचे रान केले. या नेत्यांचे विचार जनमाणसांपर्यंत पोहचविण्याचे कार्य महाराष्ट्रातील शाहिरांनी केले. त्यात अण्णा भाऊ साठे हे बिनीचे शिलेदार ठरले. 'माझी मुंबई' हे त्यांचे लोकनाट्य आहे. मुंबई ही महाराष्ट्राचीच आहे. तिच्या शिवाय महाराष्ट्र प्रदेश पूर्णत्वास जाऊ शकणार नाही. हे त्यांनी आपल्या कार्यक्रमातून मराठी जनतेला ठणकावून सांगितले. हे करीत असतांना मोरारजी देसाई सरकारने अण्णा भाऊंच्या कार्यक्रमांवर बंदी घातली. त्यानंतर त्यांनी 'तमाशा' ऐवजी 'लोकनाट्य' हा कलाप्रकार हाताळला. त्यांनी मुंबईच्या शिवाजी पार्क मैदानावर बहुसंख्य लोकांसमवेत 'माझी मुंबई' हे लोकनाट्य सादर केले. त्याचा परिणाम भिंतीवर पोस्टर्स झळकू लागले. सभांमधून घोषणा घुमू लागल्या.

'माझी मुंबई' या लोकनाट्यातील 'काळ्या बाजाराचा पोवाडा' हा तत्कालीन परिस्थितीवर आणि आजच्या परिस्थितीवरही तंतोतंत लागू पडतो. सामान्य माणसांचे दुःख, वेदना या पोवाड्यातील अण्णा भाऊंनी अतिशय परिणामकारकपणे मांडल्या आहेत. या पोवाडयामुळेच 'माझी मुंबई' हे लोकनाट्य बहारदार झाले आहे.

अण्णा भाऊ साठे हे मार्क्सवादी विचारवंत होते. त्यांनी जणू दुःख, पिळवणूक आणि अन्यायाच्या विरोधात लोकनाट्यातून रणशिंग फुंकले होते. लोकनाट्यामुळे सामाजिक बदल निश्चित होणार असे त्यांचे मत होते. "कलेबद्दलच्या या दृष्टिकोनामुळे आपली लोकनाट्ये पुराणमतवादी समीक्षकांच्या निकषानुसार कलात्मकदृष्ट्या व शैलीदृष्ट्या परिपूर्ण करण्याची त्यांनी कधीच पर्वा केली नाही."[२] लोकनाट्य हा सोपा आणि स्पष्ट असा कलाप्रकार आहे. त्यामुळे तो सर्वसामान्यांना आवडतो. अण्णा भाऊंचे साहित्य हे जीवनवादी आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्यकडे लोक आकर्षिल्या गेली. त्यांनी या लोकनाट्यातून सर्व सामान्यांचे दुःख वेदणा व्यक्त करून राज्यकर्त्यांचा पाखंडीपणा जनतेसमोर आणला. सहज आणि सोप्या भाषेत अण्णा भाऊंनी लोकनाट्ये लिहिली. त्यांची लोकनाट्ये मराठी साहित्यसृष्टीत अजरामर ठरली आहेत.

अण्णा भाऊ साठे यांचे शाहिरी काव्य

अण्णा भाऊ साठे यांच्या जशा कथा- कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. तशाच शाहिरी कविताही प्रसिद्ध आहेत. खरेतर त्यांची प्रकृती ही शाहिरांची होती. त्यांनी आपले काव्य

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

ISSN: 0974-3065

लोकजागृतीसाठी , प्रचार कार्यासाठी आणि समाजहितासाठी समर्पित केले आहे. त्यातून त्यांनी लोकरंजनाबरोबरच लोकशिक्षणनही दिले.

" श्रोत्यांच्या मनास काव्यानंद देणे आणि इतिहासात गुंतवून ठेवणे एवढाच अण्णा भाऊंचा हेतू नाही तर काळाच्या स्थितीगती बरोबरच ते श्रोत्यांना वर्तमानातही आणून सोडतात. महाराष्ट्राची परंपरा भविष्यकाळातही पुढे नेण्याविषयी आवाहन करतात."[३] अण्णा भाऊंनी तत्कालीन प्रश्नांचा वेध आपल्या काव्यातून घेतला आहे. या प्रश्नासंबंधी आपली भूमिका मांडली आहे.लोकांना जागृत करणे हेच त्यांचे ध्येय होते; त्यासाठी त्यांनी लावणी आणि पोवाडा हा कलाप्रकार हाताळला. " अण्णा भाऊंच्या पोवाड्याचे वेगळेपण लक्षणीय आहे. त्यांना फक्त महाराष्ट्र परंपरेविषयी अभिमान जागृत करावयाचा नाही तर ही परंपरा पुढे नेऊन अधिक समृद्ध करण्याचे आवाहन त्यात आहे. महाराष्ट्राच्या नैसर्गिक व भौगोलिक सौंदर्याचे, इतिहासाचे, संत महंताच्या कार्याचे वर्णन करता करता ते गुणगौरव करतात. त्याचबरोबर महाराष्ट्र परंपरेचा सोप्या, साध्या अर्थसुलभ भाषाशैलीत परामर्श घेतात."[४] एकंदर विचार केला तर अण्णा भाऊ यांच्या लावणी आणि पोवाड्याचे लक्षणीय अशी वैशिष्ट्ये आहेत. त्यांनी आपल्या एकूनच काव्यातून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी आवाहन केले आहे.

अण्णा भाऊंनी मराठी माणसांच्या मनातला स्वाभिमान जागा केला. त्यांनी सर्वांना संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी पुढे येण्याचे आवाहन केले.

"एकजुटीच्या या रथावरती | आरुड होऊनी चल बा पुढती ||
नव महाराष्ट्र निर्मुनी जगती | करी प्रकट नीज धाव ||
जग बदल घालून घाव | सांगून गेले मला भीमराव ||"[५]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राला पाठींबा होता. त्यांच्या एका हाकेला समस्त जनतेने हो दिला. अण्णा भाऊ साठेंनी हे काव्य जरी बाबासाहेबांविषयीच्या उपकाराच्या जाणीवेतून लिहिले असले तरी त्यात श्रीमंताकडून दलीतांच्या पिळवणूकीचे, त्यांच्या दास्याचे वर्णन आलेले आहे. त्यासोबतच सर्व दिन-दुबळ्यांनी बाबासाहेबांच्या जीवन कार्यापासून प्रेरणा घेऊन जगाचे कल्यान करावे.असे आवाहन केले आहे. या रचनेत संयुक्त महाराष्ट्राच्या विचारांची छाप दिसून येते. अण्णा भाऊ साठे यांनी संघटनेचे महत्व सांगितले; संघटनेशिवाय संघर्षाला महत्व नाही हे त्यांनी सांगितले. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

ISSN: 0974-3065

चळवळीत संघटनेला खूप महत्व आहे. हे त्यांनी ओळखले व चळवळीत आपले स्थान मजबूत केले. त्यांनी आपल्या काव्यातून महाराष्ट्राची अस्मिता जागृत केली. त्यामुळे तत्कालीन सरकारने त्यांच्या जलसा आणि तमाशाच्या कार्यक्रमावर बंदी घातली.

'महाराष्ट्र देश आमुचा' या काव्यात संत, पंत आणि तंतांची काव्यरचना, महाराष्ट्राची राजभाषा, महाराष्ट्राचा इतिहास यांचे वर्णन आलेले आहे. 'उठला मराठी देश' हे काव्य मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीवर लिहिलेले आहे. संयुक्त महाराष्ट्रासाठी जीवाचे रान करणाऱ्या हुतात्म्याची स्तुती यातून आलेली आहे. 'महाराष्ट्रावरुनी टाक ओवाळूनी काया' ह्या पद्यरचनेचा विषयही संयुक्त महाराष्ट्र हाच आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सर्वांनी हिरीरीने सामील व्हावे; हे करीत असतांना मृत्यू ओढवला तरी चालेल पण मागे वळता कामा नये. असे ते जनतेला आवाहन करतात.

'माझी मैना गावावर राहिली' ही लावणी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला समर्पित अशी सर्वात लोकपिय रचना आहे. ही लावणी १९६० मध्ये लिहिली आहे. बेळगाव, कारवार, निपाणी, डांग आणि उंबरगाव या मराठी भाषिक प्रदेशाची तुलना अण्णा भाऊ प्रियकर-प्रेयसीच्या विरहाशी करतात. प्रेयसी ही गावाकडे राहते आणि प्रियकर हा मुंबईत राहतो. त्याला प्रेयसीचा विरह सहन होत नाही. हाच विषय महाराष्ट्र- कर्नाटक सीमाप्रश्नाबाबतीत आहे. अन्यायाविरुद्ध एकजुटीने उभे राहावे ही मराठी माणसाची परंपरा आहे. अण्णा भाऊ साठेंनी या लावणीतून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनासाठी संपूर्ण महाराष्ट्रात जागृती केली. त्यांनी या लावणीतून व्यक्तिगत दुखाःची जोडी सामाजिक- राजकीय समस्या यांच्याशी घातली आहे. महाराष्ट्रीयन जनतेने केंद्र सरकारविरुद्ध अतिशय तीव्र आंदोलन केल्यामुळे राज्य पुनर्रचनेनंतर मुंबई महाराष्ट्राची राजधानी झाली. मात्र बेळगाव, निपाणी, कारवार, उंबरगाव, डांग, हे मराठी प्रदेश कर्नाटक राज्यात विलीन करण्यात आले. याचे दुख: महाराष्ट्रातील जनतेसह अण्णा भाऊ साठे यांना झाले. त्यांनी हे दुख: प्रस्तुत लावणीतून मांडले आहे.

निष्कर्ष

१. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही महाराष्ट्रातील जनतेच्या अस्मितेचा हुंकार होता.
२. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अण्णा भाऊ साठे यांचे योगदान महत्वाचे आहे.
३. अण्णा भाऊं साठेंनी ही चळवळ खेड्यापाडयापर्यंत पोहचविली.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur

४. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला तत्कालीन केंद्रीय नेत्यांचा विरोध होता.

५. लालबावटा कलापथकाने या चळवळीत महत्वाची भूमिका बजावली.

६. अण्णा भाऊंनी पोवाडे, लावण्या, लोकनाटयाच्या माध्यमातून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला गतिमान केले.

७. अण्णा भाऊंनी लोकनाट्यातून सर्वसामान्यांचे दुखः, त्यांच्या वेदना मांडल्या त्यासोबतच राज्यकर्त्यांचा पाखंडीपणा लोकांसमोर आणला.

८. अण्णा भाऊ साठेंनी आपली लावणी संयुक्त महाराष्ट्रासाठी समर्पित केलेली आहे.

९. अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या शाहिरी काव्यातुन आणि लोकनाट्यातून समाजमन जागृत केले.

१०. अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या समग्र साहित्यातुन मराठी अस्मितेचा झेंडा रोवला.

संदर्भ ग्रंथ

१. लालजी पेंडसे, 'संयुक्त महाराष्ट्राचे महामंथन', मुंबई, १९६५, पृ.११४.

२. बजरंग कोरडे, 'भारतीय साहित्याचे निर्माते अण्णा भाऊ साठे', साहित्य अकादेमी प्रकाशन, नवी दिल्ली, २०११, पृ.५५.

३. सदा कन्हाडे, 'अण्णाभाऊ साठे: व्यक्तित्व आणि कर्तृत्व', लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, २००९, पृ.२०.

४. तत्रैव, पृ.२१.

५. अर्जुन डांगळे(संपा.), 'अण्णा भाऊ साठे निवडक वाङःमय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९८, पृ.१६४.

Officiating Principal
Mahatma Jyotiba Fule
Mahavidyalaya, Ballarpur